6. सामाजिक सुरक्षा और अन्याय से संरक्षण– बंधुआ मुक्ति मोर्चा बनाम भारत संघ, 1984–जबरन श्रम और बाल मजदूरी से सुरक्षा।

मानव गरिमा की रक्षा हेतु महिलाओं को न्याय और समानता का अधिकारः– भारतीय संविधान मानव गरिमा, समानता और सामाजिक न्याय पर आधारित एक न्यायपूर्ण व्यवस्था की परिकल्पना करता है। महिलाओं ने इतिहास में लम्बे समय तक सामाजिक, आर्थिक और राजनीतिक असमानताओं का सामना किया है, इसलिए संविधान ने उनके अधिकारों, गरिमा और सुरक्षा को विशेष महत्व देते हुए अनेक प्रावधानों को शामिल किया है। ये प्रावधान केवल आदर्श नहीं हैं, बल्कि राज्य को सक्रिय रूप से यह दायित्व सौंपते हैं कि वह महिलाओं के लिए समान अवसर, न्याय, संरक्षण और सम्मान सुनिश्चित करे। भारतीय गणराज्य में महिला गरिमा की रक्षा हेतु निर्मित यह संवैधानिक ढाँचा आधुनिक न्याय–तत्वज्ञान, मानवाधिकारों और सामाजिक सुधार की भावना से सम्पन्न है।

सबसे पहले, अनुच्छेद 15(3) महिलाओं की समानता और न्याय के संवैधानिक आधार को सुदृढ़ करता है। यद्यपि अनुच्छेद 15(1) किसी भी प्रकार के लैंगिक भेदभाव को निषिद्ध करता है, किंतु 15(3) यह स्पष्ट करता है कि महिलाओं के लिए विशिष्ट संरक्षणात्मक उपाय समानता प्राप्त करने के लिए आवश्यक हैं। यह सिद्धांत सकारात्मक भेदभाव को वैध बनाता है और महिलाओं की दशकों से चली आ रही संरचनात्मक विषमताओं को कम करने का मार्ग प्रशस्त करता है। महिलाओं के लिए विशेष कानून, कल्याणकारी योजनाएँ, सुरक्षा उपाय तथा आरक्षण–सभी इसी अनुच्छेद से संवैधानिक वैधता प्राप्त करते हैं।

आर्थिक और सामाजिक न्याय के क्षेत्र में अनुच्छेद 39 का महत्व अत्यधिक है। अनुच्छेद 39(A) राज्य को निर्देश देता है कि वह पुरुषों और महिलाओं दोनों के लिए आजीविका के पर्याप्त अवसर सुनिश्चित करे। यह उपबंध आर्थिक स्वतंत्रता को मानव गरिमा का अविभाज्य अंग मानता है। अनुच्छेद 39(D) समान कार्य हेतु समान वेतन की व्यवस्था करता है, जिससे महिलाओं के श्रम का अवमूल्यन समाप्त हो और कार्यस्थल पर लैंगिक न्याय स्थापित हो। वहीं अनुच्छेद 39(E) कार्यस्थलों को हानिकारक या शोषणकारी परिस्थितियों से मुक्त रखने का निर्देश देता है, विशेषकर उन क्षेत्रों में जहाँ महिलाएँ अधिक संवेदनशील स्थिति में होती हैं। ये तीनों उपबंध मिलकर महिलाओं की गरिमा के लिए आर्थिक संरचना को न्यायसंगत बनाते हैं।

महिलाओं से संबंधित श्रम–सुरक्षा को विशिष्ट रूप से नियंत्रित करने हेतु अनुच्छेद 42 अत्यंत महत्वपूर्ण है। यह प्रावधान मानवोचित कार्य–स्थितियों तथा मातृत्व राहत सुनिश्चित करने का निर्देश देता है, जो आधुनिक कल्याणकारी राज्य के लिए अनिवार्य तत्व है। मातृत्व अवकाश, प्रसूति लाभ, कार्यस्थलों पर सुरक्षा–व्यवस्था और मातृत्व के कारण रोजगार के अधिकार को क्षति न पहुँचने की संवैधानिक गारंटी इसी अनुच्छेद की प्रेरणा से विकसित हुई है।[4] यह प्रावधान महिला–शरीर की जैविक वास्तविकताओं का सम्मान करता है और उन्हें गरिमामय श्रम–परिस्थितियाँ प्रदान करने की संवैधानिक नींव तैयार करता है।

समानता आधारित सामाजिक व्यवस्था के निर्माण में अनुच्छेद 44 विशेष भूमिका निभाता है। यद्यपि यह नीति–निर्देशक तत्व है, परन्तु इसका उद्देश्य यह सुनिश्चित करना है कि व्यक्तिगत कानूनों में उपस्थित लैंगिक असमानताओं को समाप्त किया जाए तथा विवाह, तलाक, उत्तराधिकार और पारिवारिक जीवन से संबंधित अधिकारों में महिलाओं को पूर्ण समानता मिले। इसका दीर्घकालिक लक्ष्य महिलाओं की कानूनी स्थिति को आधुनिक, धार्मिक–भेद से मुक्त और समान नागरिकता पर आधारित बनाना है।[5]

महिलाओं की गरिमा का संवैधानिक संरक्षण केवल राज्य–नियंत्रित व्यवस्थाओं तक सीमित नहीं हैय इसे सामाजिक और नागरिक उत्तरदायित्व के रूप में भी स्थापित किया गया है। अनुच्छेद 51A(D) नागरिकों को महिलाओं की गरिमा का सम्मान करने, उनके विरुद्ध हिंसा और उत्पीड़न के विरोध में खड़े होने तथा महिलाओं की स्वतंत्रता और सम्मान में बाधा बनने वाले व्यवहारों का त्याग करने का नैतिक व संवैधानिक दायित्व प्रदान करता है। यह प्रावधान समाज को यह स्पष्ट संदेश देता है कि महिलाओं का सम्मान केवल विधिक आदेश नहीं, बल्कि राष्ट्रीय चरित्र का अनिवार्य तत्व है।

राजनीतिक समानता महिलाओं के न्याय और गरिमा का एक अत्यंत महत्वपूर्ण अंग है। इस संदर्भ में अनुच्छेद 243–D पंचायतों में तथा अनुच्छेद 243–(T) नगर निकायों में महिलाओं के लिए कम–से–कम एक–तिहाई आरक्षण का प्रावधान करते हैं।[6] ये दोनों अनुच्छेद महिलाओं को स्थानीय शासन में प्रत्यक्ष भागीदारी प्रदान करते हैं, जिससे वे नीति–निर्माण, प्रशासनिक नेतृत्व और सामाजिक परिवर्तन की प्रक्रियाओं में सक्रिय भूमिका निभा सकें। राजनीतिक सशक्तिकरण सामाजिक और आर्थिक सशक्तिकरण का आधार बनता है, जिसे ये संवैधानिक प्रावधान सुनिश्चित करते हैं।

निष्कर्षः–

इन सभी संवैधानिक प्रावधानों का सामूहिक प्रभाव यह दर्शाता है कि भारतीय संविधान व्यक्ति की गरिमा, स्वतंत्रता और समानता को राष्ट्र के मौलिक मूल्यों का अनिवार्य घटक मानता है। संविधान व्यक्तियों को न केवल कानूनी सुरक्षा प्रदान करता है, बल्कि राज्य, समाज और प्रत्येक नागरिक पर यह उत्तरदायित्व भी डालता है कि वे एक ऐसा वातावरण निर्मित करें जिसमें सभी नागरिक भय, भेदभाव और असमानता से मुक्त होकर गरिमामय जीवन व्यतीत कर सकें। इस प्रकार भारतीय संविधान व्यक्तियों की गरिमा और न्याय के अधिकार को केवल औपचारिक रूप से नहीं, बल्कि संरचनात्मक, नैतिक और लोकतांत्रिक रूप से स्थापित करता है।

सन्दर्भ सूचीः–

1. आशीर्वादम, ए.डी. मिश्र, कृष्णकान्त– 'राजनीति विज्ञान' एस. चन्द एण्ड कम्पनी लि0 नई दिल्ली–2006 पृष्ठ सं0–213
2. इंद्रा साहनी आदि बनाम भारत सरकार संघ व अन्य एआईआर–1993 एस.सी 477
3. मेनका गांधी बनाम भारत संघ एआईआर 1978 एससी 597
4. ओझा, एस.के.– 'भारतीय संविधान एवं राजव्यवस्था', बौद्धिक प्रकाशन इलाहाबाद 2014–15, पृष्ठ सं0–96
5. काश्यप, सुभाष– 'हमारा संविधान–भारत का संविधान और संवैधानिक विधि' नेशनल बुक ट्रस्ट ऑफ इण्डिया नई दिल्ली 2008, पृष्ठ सं0–138
6. लक्ष्मीकांत, एम,– 'भारत की राजव्यवस्था' मेक्ग्राहिल एजुकेशन इंडिया लि0 चेन्नई 2017, पृष्ठ सं0–7.43

2019 नंतर महाराष्ट्रातील काँग्रेस: बदलत्या सत्ता समीकरणांच्या संदर्भातील एक चिकित्सक अभ्यास

भागवत जांबूतराव जाधव

संशोधक विद्यार्थी पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रा. डॉ. पी. डी. सूर्यवंशी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख स्वा. सै. सू. पवार महाविद्यालय पूर्णा (जं)

गोषवारा (Abstract)

महाराष्ट्राच्या राजकारणात 2019 नंतर मोठे अनपेक्षित उलट फेर घडून आला. पारंपारिक राजकीय आघाड्या आणि युत्या तुटून नवीन राजकीय समीकरणे उदयाला आली त्यामुळे राज्यातील सत्ता समीकरणांमध्ये लक्षणीय बदल झाले. या संपूर्ण सत्ता बदलामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली. 2019 ची निवडणूक निकालानंतर वैचारिक दृष्ट्या वेगळ्या असणाऱ्या शिवसेना आणि भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांना सोबत घेऊन सत्ता स्थापन केली. हे महाराष्ट्राच्या राजकारणातील पहिलाच प्रयोग होता. यातूनच पुढे 2022 मध्ये शिवसेना पक्ष आणि 2023 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यामध्ये विभाजन झाले. त्या कारणाने महाराष्ट्रामध्ये सत्तांतर घडून आले. सोबतच 2024 च्या विधानसभा निवडणुकातील आव्हाने अशा विविध कारणांनी काँग्रेस पक्षाच्या राजकीय भूमिकेत अमुलाग्र बदल होत गेला. सदरील संशोधन पत्रिकेच्या माध्यमातून 2019 नंतरच्या महाराष्ट्रातील राजकीय घटना, काँग्रेस पक्षाची रणनीती, येणाऱ्या आव्हाने आणि भविष्यातील रणनीतींचा आढावा घेण्यात आला आहे.

बीजसज्ञा (Keywords):

महाराष्ट्र, काँग्रेस, महाविकास आघाडी, विधानसभा निवडणूक, राजकीय आघाड्या,विरोधी पक्ष, सत्ता समीकरण

प्रस्तावना (Introducation):

महाराष्ट्र हे राष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचे राज्य समजले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस हा राज्यातील प्रमुख पक्ष होता. परंतु 1999 नंतरच्या काळात प्रादेशिक पक्षांचा उदय तसेच हिंदुत्ववादी विचारसरणी असलेल्या भाजपच्या उदयामुळे काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला हादरे बसायला सुरुवात झाली. 1999 ला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शरद पवारांनी स्थापन केला व 2004 च्या विधानसभा निवडणुकीत त्याचाही फटका काँग्रेसला बसला. या निवडणुकीनंतर धर्मनिरपेक्षता या मुद्द्यावर दोन्ही पक्षांमध्ये आघाडी होऊन त्यांनी सत्ता स्थापन केली व 2009 मध्ये सुद्धा त्यांनी आपली सत्ता कायम राखली. परंतु 2014 व 2019 च्या विधानसभा निवडणुकांमध्ये या दोन्ही पक्षांना अपेक्षित यश प्राप्त झाले नाही. परंतु 2019 ला झालेल्या राजकीय स्थित्यंतरामुळे काँग्रेस पक्षाला पुन्हा सत्तेमध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

1. 2019 नंतरची महाराष्ट्रातील बदलत्या राजकीय समीकरणांचा अभ्यास करणे.
2. काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
3. महाविकास आघाडीतील काँग्रेस पक्षाचे भूमिका समजून घेणे.

4. 2022 नंतरच्या बदललेल्या राजकीय स्थिती आणि काँग्रेस पक्षा पुढील आव्हानांचा आढावा घेणे.
5. पक्षाच्या भविष्यकालीन शक्यतांचा अभ्यास करणे.

गृहीतकृत्य (Hypothesis)

1. 2019 नंतर महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीत बदल झाला.
2. काँग्रेसने महाविकास आघाडीत महत्वपूर्ण भूमिका बजावली.

संशोधन पद्धती (Research Methodology):

सदरील संशोधनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. वृत्तपत्रे, विविध संशोधन लेख, राजकीय विश्लेषण, विविध ग्रंथ तसेच काही संकेतस्थळांचा यामध्ये अभ्यास करण्यात आला आहे. मांडणीसाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला.

अ) 2019 ची विधानसभा निवडणूक आणि नवीन सत्ता समीकरणे:

2014 ते 2019 राज्यात भाजपा आणि शिवसेनाप्रमुख युती सरकार सत्तेत होते. 2019 ची विधानसभा निवडणूक एकत्रितच युती म्हणून लढविली आणि भाजपा सेना युतीला बहुमतही मिळाले होते. परंतु मुख्यमंत्री पदाच्या वाटपावरून दोन्ही पक्षात रस्सीखेच होती. त्यातून त्यांच्यात मतभेद निर्माण झाले. परिणामतः शिवसेनेने भाजपपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. सदरील काळात राष्ट्रवादी पक्षाचे नेते अजित पवार व इतर आमदारांनी अल्पावधीसाठी भाजपाच्या वतीने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी पदाची शपथ घेतली. परंतु ते सरकार अल्पावधीतच पायउतार झाले. या परिस्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाने शिवसेनेला आपला पाठिंबा देऊ केला. शिवसेनेने सुद्धा त्यांचा हा राजकीय पाठिंबा स्विकारून महाविकास आघाडीचा नवीनच प्रयोग महाराष्ट्रात केला. या आघाडीमध्ये शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी हे तीन प्रमुख पक्ष व बच्चू कडू यांचा प्रहार इत्यादींचा समावेश होता. नोव्हेंबर 2019 मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे (MVA) सरकार स्थापन होऊन नवीन सत्ता समीकरणाचा उदय झाला.

महविकास आघाडीतील काँग्रेसची भूमिका राज्यात विधानसभा निवडणुकीनंतर **सत्ता** स्थापनेचा जो तिढा निर्माण झाला होता तो सोडविण्यात मोलाचा वाटा उचललेला दिसतो महाविकास आघाडी स्थापनेत काँग्रेस पक्षाने सामंजस्य, संयमी आणि समन्वयाची भूमिका घेतली होती. पक्षाने आपल्या पारंपारिक धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, आणि लोकशाही मूल्यांच्या आधारेच भाजप विरोधी राजकारणाला प्राधान्य दिले. त्यावेळी त्यांच्यावर विचारधारेला बगल दिल्याचा आरोप झाला. तसेच शिवसेनेवरही हिंदुत्व सोडल्याची टीका भाजप व मित्र पक्षांनी केली होती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात काँग्रेसकडे महसूल, ऊर्जा, शिक्षण आणि सामाजिक न्याय यासारखी महत्त्वपूर्ण खाती दिल्या गेली. कोविड-19 सारख्या जागतिक संकटाच्या काळामध्ये सरकारचा घटक म्हणूनही प्रशासनात सक्रिय सहभाग घेऊन राज्यातील परिस्थिती हाताळण्यास मदत केली. त्याचबरोबर शेतकरी, कामगार आणि दुर्बल घटकांच्या प्रश्नांवरही पक्षाने आपली बाजू लावून धरल्याचे अभ्यासातून दिसते. महाविकास आघाडीच्या स्थापनेमुळे काँग्रेस पक्षाला राज्यातील सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळाली. परंतु शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन मित्र पक्षांमधील विभाजनामुळे त्यांची राजकीय ताकद क्षीण झाल्याने त्यांना(MVA) सत्तेतून पायउतार व्हावे लागले.

ब) 2022 मध्ये शिवसेनेतील बंडाने आलेले राजकीय संकट आणि काँग्रेस

2022 मध्ये शिवसेना पक्षांमध्ये मोठे बंड उफाळून आले. या बंडामुळे सहाजिकच महाविकास आघाडी सरकार संकटात आले. शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांचे नेतृत्वाखाली एका गटाने शिवसेनेपासून वेगळी भूमिका घेत

महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा व भाजपसोबत सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे तत्कालीन उद्धव ठाकरे यांचे मविआ सरकार पायउतार झाले. या राजकीय संकटामुळे काँग्रेसवर राजकीय आणि संघटनात्मक दोन्ही बाबतीत परिणाम दिसून आले. या घटनेमुळे काँग्रेस पुन्हा विरोधी पक्षाच्या भूमिकेत आली. सरकारमधील एक घटक पक्ष असूनही त्यांना या काळात निर्णायक भूमिका व ठरविता आली नाही. यामुळेच पक्षाचा प्रभाव आणि आघाडीतील स्थान याबाबत चर्चा निर्माण झाली. सरकार कोसळण्याच्या कारणांमध्ये वैचारिक विसंगती, अंतर्गत मतभेद, सत्ता संघर्ष, राजकीय कुरघोड्या या सर्वच मुद्द्यांचा समावेश होतो. या घटनेने काँग्रेस समोर नेतृत्व उभारणी, संघटन बांधणी आणि आपला जनाधार परत मिळविण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. त्याचप्रमाणे प्रादेशिक पक्षांचा विचार करता पक्षाची राजकीय पकड सैल झाल्याचे अभ्यासातून ठळकपणे दिसते. या राजकीय संकटामुळे राज्यातील बदलती राजकीय गणिते आणि आघाडीच्या राजकारणातील प्रश्न/आव्हाने स्पष्टपणे उघडी पडली.

क) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विभाजन आणि राज्यातील बदलते राजकारण:

शिवसेना पक्षातील बंडा प्रमाणे राष्ट्रवादी पक्षामध्ये सुद्धा 2023 मध्ये दुफळी निर्माण झाली. राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षातील अनेक आमदारांसह वेगळी भूमिका घेत राज्य सरकारमध्ये मंत्री पदाची शपथ घेतली. तसेच पक्षावरही आपला दावा केला. त्यामुळे ज्याप्रमाणे शिवसेनेची दोन शकले झाली, तशीच राष्ट्रवादी काँग्रेसची सुद्धा झाली. एक म्हणजे राष्ट्रवादी अजित पवार गट (मूळ घड्याळ चिन्ह) आणि दुसरा राष्ट्रवादी पक्ष शरद पवार (तुतारी वाजविणारा माणूस). त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण आणखीच गोंधळाचे व गुंतागुंतीचे झाले. अशा परिस्थितीत काँग्रेसने शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रवादी (शरद पवार) या पक्षांसोबत विरोधी आघाडी टिकवून ठेवली व 2024 ची विधानसभा निवडणूक लढविली. काँग्रेसने यामधून विरोधी राजकारणाचा केंद्रबिंदू बनण्याचा प्रयत्न केला. परंतु निवडणूक निकालात त्यांची ही राज्यातील आतापर्यंतची सर्वात खराब कामगिरी नोंदवली गेली.

ड) 2024 ची विधानसभा निवडणूक आणि काँग्रेसचे आव्हान:

2024 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडी म्हणून स्थापन झालेल्या काँग्रेस राष्ट्रवादी (श.प.) शिवसेना (उबाठा) संयुक्त आघाडीची भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे गट) राष्ट्रवादी पक्ष (अजित पवार गट) यांची महायुती म्हणून विरुद्ध लढत झाली.

तथापि महायुतीने मजबूत संघटन, प्रचार-प्रसार आणि कल्याणकारी योजनांच्या बळावर मोठे यश संपादन केले, तर काँग्रेस व तिच्या सहयोगी पक्षांना अपेक्षित यश मिळाले नाही. या प्रभावाच्या निमित्ताने काँग्रेस पक्ष समोर अनेक गंभीर आव्हाने दिसतात. त्यात राज्यात संघटनात्मक कमजोरी, नेतृत्वाचा अभाव, ग्रामीण भागात त्यांचा घटता प्रभाव, युवा मतदारांशी संवादाचा अभाव, निवडणूक रणनीती मधील फोलपणा व प्रादेशिक पक्षांवर वाढलेले अवलंबित यांचा विचार करावा लागेल आणि योग्य त्या उपाययोजना आखाव्या लागतील. त्यासोबतच निवडणुकीनंतरच्या आघाडीतील मतभेदांची ही चर्चा आहेच त्याचीही गांभीर्याने दखल पक्षाला घेणे गरजेचे राहील.

इ) काँग्रेस पुढील प्रमुख आव्हाने:

पुढील प्रमाणे आहेत.

1. संघटनात्मक पुनर्बांधणी:

राज्यातील बहुतांश जिल्ह्यामध्ये काँग्रेस पक्षाची संघटनात्मक ताकद कमी झाल्याचे दिसते. यामध्ये राजकीय हेतू ने होणारी पक्षांतरे, प्रभावी नेतृत्वाचा अभाव, पक्षामध्ये अंतर्गत वाद अशा विविध कारणांनी पक्ष कमजोर होत

आहे. उदा. नांदेडच्या अशोक चव्हाण यांनी भाजपात प्रवेश केल्याने तेथील पक्षाची अवस्था बिकट झाली. त्याचप्रमाणे अहिल्यानगर मधील विखे घराणे व हिंगोली येथील सातव घराणे यांनीही तेच केले. पक्षाला तळागाळातील कार्यकर्त्यांचे जाळे पुन्हा मजबूत करण्यावर भर द्यावा लागेल.

2. युवा नेतृत्वाची गरज:

काँग्रेस पक्षाला राज्यातील राजकारणात आपला प्रभाव वाढविण्यासाठी नव्या पिढीतील नेतृत्व समोर आणावे लागेल. ही काळाची गरज झाली आहे. युवा मतदारांना आकर्षित करण्यासाठी नवीन चेहऱ्यांना संधी देणे अत्यावश्यक आहे.

3. आघाडीचे राजकारण:

महाराष्ट्रातील राजकीय संघटनांच्या पार्श्वभूमीवर बहुपक्षीय राजकारणात काँग्रेसला भविष्यातही आघाड्यांचे राजकारण करावे लागण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे समन्वय आणि वाटाघाटीची क्षमता पक्षाने ठेवणे त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण बाब राहील.

4. वैचारिक स्पष्टता:

काँग्रेस पक्षाने आपल्या धर्मनिरपेक्ष, सामाजिक न्याय आणि विकास या मुद्द्यांचा आधार पुढील काळातही घेऊन स्पष्ट आणि सातत्यपूर्ण भूमिका ठेवणे आवश्यक आहे.

ई) भविष्यातील शक्यता:

महाराष्ट्रामध्ये पक्षाने 2024 च्या विधानसभा निवडणुकीत व 2026 ला झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक सरस कामगिरी केली नसली, तरी काँग्रेसच्या आधार पूर्णपणे संपला असे नाही. आताही ग्रामीण भाग, दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक आणि काही पारंपारिक मतदार वर्ग पक्षाच्या मागे आहे. योग्य संघटनात्मक उपाय योजना, प्रभावी नेतृत्व आणि जनतेच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका लावून धरल्यास काँग्रेसला पुन्हा पर्याय म्हणून मतदार पाहू शकतात. पक्ष सत्तेत येऊ शकेल. महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेस पक्षाने आपली सहकार्याची आणि सर्व समावेशकतेची क्षमता दाखवून दिली. परंतु भविष्यात स्वतःची पूर्वीसारखी स्वतंत्र राजकीय ओळख व विश्वासार्हता मजबूत करणे, हे पक्षासमोर असणारे सर्वात मोठे आव्हान राहील.

निष्कर्ष (Conclusion)

2019 ला झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल नंतर राज्याच्या राजकारणात अनपेक्षित स्थित्यंतर झाले. भाजप-सेना युतीचे विभाजन, महाविकास आघाडीची स्थापना (परस्पर विचार विसंगती असून समान कार्यक्रमाच्या आधारावर), 2022 मधील सत्तांतर आणि त्या पार्श्वभूमीवर राज्यात झालेल्या पक्ष विभाजनामुळे राज्याचे राजकारण ढवळून निघाले आणि राजकीय गणिते पूर्णपणे बदलली. या सर्व राजकीय प्रक्रियेत काँग्रेसने निर्णायक अशी मात्र तुलनेने दुय्यम भागीदाराची भूमिका निभावल्याचे अभ्यासातून स्पष्टपणे दिसते.

मविआच्या स्थापनेत काँग्रेस पक्षाचे योगदान महत्त्वपूर्ण होते. तथापि बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पक्षाला संघटनात्मक आणि वैचारिक पातळीवर अनेक आवाहनांचा सामना करावा लागत आहे. भविष्यातील त्यांच्या यशासाठी पक्षाने नेतृत्व विकास, संघटनात्मक उपाय, लोक आधारित राजकारणावर जोर देणे गरजेचे राहील. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस आणखी सुद्धा एक महत्त्वपूर्ण घटक असून तिची भूमिका पुढील काळात निर्णायक असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संदर्भसूची:

1. Maharashtra in 2019: Year of Unlikely Alliance. (The New Indian Express)
2. Thackeray Rise: Uddhav Takes Charge as Maharashtra CM. (The New Indian Express)
3. Maharashtra Political Developments and NCP Split. (The Times of India)
4. Palshikar Suhas, From Congress-Systeam to Non-hegemonic Multiparty Competition: Politics in Maharashtra, ISAS Working Paper No. 220.
5. Takkar Usha and Kulkarni Mangesh, Politics In Maharashtra, Om Publication, 2022
6. दीक्षित जितेंद्र, 35 दिवस: 2019 ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी, अनुवाद- पराग पोतदार, ऑगस्ट 2020.
7. चेकमेट:भाजपने महाराष्ट्र कसा जिंकला आणि गमावला(मराठी आवृत्ती), अनुवाद- क्षेमकल्यानी ममता, डायमंड पब्लिकेशन, 2021.
8. दै. लोकसत्ता, तिसरा अंक कधी? विशेष संपादकीय- 3 जुलै 2023
9. दै. लोकसत्ता अग्रलेख, खरे की काय? 14 एप्रिल 2025.
10. दै. लोकसत्ता, एका काँग्रेस कार्यकर्त्याची खंत, 3 ऑगस्ट 2025.

ग्रंथालय विकासासाठी नवकल्पना बदलांचे व्यवस्थापन

डॉ. गणपत रामसिंग पवार
ग्रंथपाल
शिवाजी महाविद्यालय हिंगोली

सारांश

वाचनाची आवड ज्ञानाचा प्रसार आणि शैक्षणिक समृद्धी यासाठी ग्रंथालयांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. परंतु काळानुसार ग्रंथालयांची भूमिका, कार्यक्षमता आणि विकासाच्या दृष्टीने अनेक बदल झाले आहे. यामध्ये नवकल्पना व बदलांचे व्यवस्थापन महत्त्वपूर्ण ठरते. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीमुळे जी अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे अस्तित्वात आली आहे. त्यामुळे ग्रंथपाल व ग्रंथालयासमोर या माध्यमांचा वापर करण्याचे आव्हान उभे आहे. त्यात केवळ ग्रंथावर अवलंबून न राहता तंत्रांचा उपयोग करून वाचकांना अत्यंत महत्त्वाची सेवा पुरवण्यात येतात. याकरिता ग्रंथालय व्यवस्थापकीय घटकांचा विचार करून आर्थिक परिस्थिती, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. ग्रंथालय सेवां देत असताना कोणताही सेवावर परिणाम होतील यांची काळजी घ्यावी. तंत्रज्ञानाचा फायदा घेण्याकरिता ग्रंथपालांना पारंपारिक व्यवस्थापन सोडून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे गरजेचे आहे. तेव्हाच ग्रंथपालास येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाता येईल.

एक विसाव्या शतकाचा उंबरठा ओलांडताना आपण एका नव्या युगामध्ये प्रवेश करीत आहोत. ते युग म्हणजे माहितीचे युग माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीमुळे निर्माण झालेल्या संगणक, सी.डी. रोम, डेटाबेस, नेटवर्क यासारख्या नवीन तांत्रिक साधनांचा वापर आजही ग्रंथालयात करत आहेत. कागदावर अवलंबून ग्रंथालयात जी कामे आज पर्यंत हाताने केली जात होती आणि अभिलेख कागदा सारखा पारंपारिक माध्यमातून जतन करून ठेवले जात होते. आता मात्र इलेक्ट्रॉनिक माध्यमात संग्रहित करून ठेवले जात. ग्रंथालय नव्या युगाकडे वाटचाल करीत आहे.

शोध संज्ञा बदलांचे व्यवस्थापन, परिवर्तन, माहिती तंत्रज्ञान, परिवर्तनातील घटक.

प्रस्तावना

बदल हा निसर्गाचा नियम आहे.परिवर्तन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या परिवर्तनाला बदलीला संस्थेच्या गुणात्मक विकासासाठी सामोरे जावे लागते. परिवर्तनासोबतच संस्थात्मक बदल करावे लागतात. अन्यथा संस्था चे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता असते. या सर्व परिक्रियांना ग्रंथालय अपवाद नाहीत. भूमिका संस्था किंवा संरचना असलेल्या व्यवस्था यांच्या संदर्भात काळांच्या ओघात घडून येणाऱ्या कोणत्याही बदलांना उद्देशून परिवर्तन ही संज्ञा वापरली जाते. परिवर्तनामध्ये संख्यात्मक बदल व तांत्रिक बद्दल महत्त्वाचे दिसून येते. परिवर्तनाचे व्यवस्थापन ही संकल्पना मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. परिवर्तन हे सामाजिक, राजकीय, आर्थिक व तांत्रिक कारणामुळे घडू शकते. परिवर्तन हे वैयक्तिक जीवनावर कमी अधिक प्रमाणात परिणाम करू शकते. परंतु संस्था पातळीवर या परिवर्तनाचे मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. परिवर्तनाच्या व्यवस्था, कर्मचारी, सेवा, भौतिक सुविधा इत्यादी गोष्टीवर परिणाम करू शकतो. सध्या स्थितीला ग्रंथालय व माहिती केंद्रांचा विचार करता माहिती व तंत्रज्ञानाचे युग या ग्रंथालयासाठी संक्रमणांचा काळ आहे. सगळीकडे ग्रंथालयांचे संगणकीकरण हे अतिशय वेगाने होत आहे. पारंपारिक ग्रंथालयांचे अस्तित्व धोक्यात येऊ पाहत आहे. याला महत्त्वाचे कारण म्हणजे माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञान व्यवस्थापन ही संकल्पना पुढे येत आहे. ग्रंथालयासमोर व्यावसायिक संस्थांच्या रूपाने अतिशय बलशाली प्रतिस्पर्धी येत आहेत. त्यांच्याकडून इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे जल व अचूक माहिती ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार भव्य त्या जागी देण्याचा प्रयत्न होत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता ग्रंथालयाने या परिवर्तनांचे स्वागत करून त्यांचा ग्रंथालयांच्या गुणात्मक विकासासाठी वापर करून घेतला पाहिजे.

ग्रंथालयांच्या विकासासाठी नवकल्पना

1. अंकीय ग्रंथालय (digital library)

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पारंपरिक ग्रंथालयांना डिजिटल स्वरूपात बदललेले आहे डिजिटल ग्रंथालयात सर्व प्रकारची माहिती ऑनलाईन उपलब्ध असते हे एक अत्याधुनिक साधन आहे ज्यामुळे वाचनाचे क्षमता वाढवण्यास मदत होते यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स पुस्तके अंकीय मॅक्झिन्स ऑनलाइन रीडिंग प्लॅटफॉर्म समाविष्ट असतात.

2. ऑनलाइन संसाधने(online resources)

इंटरनेट आणि इतर डिजिटल माध्यमाचा वापर करून वेगवेगळ्या विषयांच्या संदर्भातील संसाधनांची उपलब्धता सुलभ झाली आहे या संसाधनांची पोच विविध ठिकाणी झाली आहे ज्यामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना देखील माहिती मिळवता येते.

3. स्मार्ट ग्रंथालय (smart libraries)

ही एक नव कल्पना आहे जिथे वाचकांच्या प्रवेशासाठी ऑटोमेशन क्यू आर कोड रीडिंग डिव्हाईस चे वापर आणि स्मार्ट दिवस चे उपयोग केला जातो. यामध्ये रोबोटस IoT (internet of things)व अन्य तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयांचे कार्य अधिक सुलभ व कार्यक्षम बनवले जाते.

4. सहयोगात्मक वाचन (Collaborative reading)

ग्रंथालय वाचनाच्या पर्यावरणात फक्त एकाच व्यक्तींचे वाचन न करता समाजाच्या इतर सदस्यांनाही प्रेरित करतात. ग्रंथालय या क्षेत्रात वाचन व विचारांच्या सामायिकीकरणांचा एक जागा बनतात. यामध्ये पुस्तक क्लब वाचन समूह कार्यशाळा व सत्रांचा समावेश असतो.

5. संवर्धन व कलेक्शन (Preservation and collection)

दुर्गम व ऐतिहासिक ग्रंथाचे संरक्षण करण्यासाठी डिजिटल संग्रह कागदपत्रांचा डिजिटलीकरण आणि विकीकरण (digitization) करण्यात येते. यामुळे जुन्या ग्रंथांची माहिती सुलभ व सुरक्षितपणे संकलित केली जाऊ शकते.

व्यवस्थापनाची आवश्यकता

कोणत्याही परिवर्तनाला सामोरे जाताना त्या परिवर्तनांचे व्यवस्थापन करावे लागते. माहिती व तंत्रज्ञानात होत असलेला बदल व्यवस्थापनांची आवश्यकता स्पष्ट करताना दोन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. त्यापैकी पहिली म्हणजे माहितीचा उद्रेक हा होय. माहिती विस्फोटामुळे प्रचंड प्रमाणात वेगवेगळ्या माध्यमावर व वेगवेगळ्या स्वरूपात माहिती उपलब्ध होत आहे. उदा. ग्रंथ,नियतकालिके, सी.डी. अंकीय स्वरूपात, इंटरनेट इत्यादी साधनामुळे किती प्रचंड माहिती उपलब्ध झाली यांची कल्पना येऊ शकते. या अनुषंगाने ग्रंथालयामध्ये व्यवस्थापकीय बदल किती आवश्यक आहे यांचा विचार करणे गरजेचे आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालयात शेवट होणारे परिणाम वाचकांना माहिती त्यांच्या कामांच्या जागी किंवा घरी बसल्या विनाविलंब हवी असते. त्यांची गरज भागवण्याचे काम माहिती तंत्रज्ञानामुळे होत आहे. माहिती तंत्रज्ञान हे आधुनिक ग्रंथालयासाठी उपयुक्त ठरलेले आहे. ग्रंथालय सेवा साठवण व संवर्धन अधिक परिणामकारक येऊ लागले आहे. यासाठी आधुनिक ग्रंथालयाने आपला दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. या परिवर्तनाचा ग्रंथालयांच्या गुणात्मक विकासासाठी चांगल्या प्रकारे वापर करून घेता येऊ शकतो.

या दोन्ही घटकांमध्ये परिवर्तन अपरिहार्य आहे. त्यांची दखल घेतली नाही तर ते लागू केले जाईल. अशा असाहय्य परिस्थितीत काम करताना ग्रंथपालास अक्षरशः कसरत करण्याची वेळ येईल. यातून नवीनच प्रश्न निर्माण होतील. म्हणून बदल घडवून आणण्यामध्ये ग्रंथपालांनीच पुढाकार घ्यायला हवा. म्हणजे बदलांची प्रक्रिया घडत असताना त्यांची सूत्रे आपल्या हाती राहतील. त्यावर आपले नियंत्रण राहिले पाहिजे हाच बदलांचे व्यवस्थापन या संकल्पनेचा अर्थ आहे. यासाठी दूरच शक्य नसते तरी जवळच्या भविष्यकाळा बाबत अंदाज बांधायला हवा. त्यानुसार कोणत्याही घटकावर त्वरित परिणाम होतील यांचा शोध घेऊन ते घटक बदलास प्रयत्न करावयास सुरुवात केली पाहिजे.

बदलांचे व्यवस्थापन

बदलांचे व्यवस्थापन म्हणजे सभोवतालची परिस्थिती व वातावरणात होणाऱ्या बदलास अनुसरून योग्य असे निर्णय घेण्याची प्रक्रिया होय. बदलांचे व्यवस्थापन म्हणजे काळानुसार विविध क्षेत्रात होणाऱ्या बदलांच्या संदर्भात आवश्यक असे सर्व व्यवस्थापकीय बद्दल घडून आणणे होय. यात बदलत्या परिस्थितीत ग्रंथालयांचे स्वरूप, ग्रंथालयांचे तंत्र, धोरणे, उद्दिष्टे, गुणवत्ता, विपणन तंत्र इत्यादी संदर्भात आवश्यक असे सर्व बद्दल घडून आणणे होय. बदलत्या परिस्थितीत व्यवस्थापनास आपल्या कार्यात नवीन कल्पना, पद्धती व तंत्रांचा वापर करावा लागतो. व त्या बदलास अनुकूल असे व्यवस्थापकीय स्वरूप ठेवावे लागते. आधुनिक परिस्थितीनुसार व्यवस्थापन तंत्रात बदल घडवून आणल्यास त्याला बदलांचे व्यवस्थापन असे म्हणतात. बदलांचे व्यवस्थापन ही अशी बुद्धिनिष्ठ व सुनियोजित प्रक्रिया आहे की जी व्यवसायांचे भवितव्य ज्यांच्या हाती सोपविली जाते. त्यांच्याकडून व्यवसायावर परिणाम करणाऱ्या नियंत्रणबाह्य घटकावर सातत्यपूर्ण आणि जागरूक देखरेख करण्यासाठी व अनियंत्रित शक्तींचा नियंत्रित शक्तीवरील प्रभाव तपासण्यासाठी आणि त्याद्वारे सुयोग्य व्यावसायिक डावपेच व कार्यक्रम निर्माण करून नियंत्रित व अनियंत्रित घटकांमध्ये समतोल राखण्यासाठी कार्यान्वित केली जाते. व्यवस्थापनात दोन प्रकारचे घटक कार्यरत असतात.

ग्रंथालयामध्ये व्यवस्थापनातील घटकांची अंमलबजावणी करत असताना खालील मुद्दे लक्षात घेतले पाहिजे.

1. **नियंत्रण योग्य घटक**

व्यवस्थापनातील नियंत्रण योग्य घटकात अशा घटकांचा समावेश होतो की ज्या घटकांची पुरेशी माहिती उपलब्ध असते. अशा घटकांचे व्यवस्थापन सहजपणे करता येईल व यावर योग्य नियंत्रणही ठेवता येते.

2. **नियंत्रणबाह्य घटक**

ज्या घटकाबद्दलची पुरेशी माहिती नसते व ज्यावर कोणतेही नियंत्रण ठेवता येत नाही त्यांना नियंत्रण बाह्य घटक असे म्हणतात. या नियंत्रण बाहेर घटकांचा नियंत्रण योग्य घटकावर प्रभाव त्यांच्या व्यवस्थापकीय कार्यावर मर्यादा पडतात. प्रत्येक सामाजिक घटकातील बदलास तोंड द्यावे लागतात. व्यवस्थापन हा देखील सामाजिक प्रक्रिया आहे. तेव्हा बदलत्या परिस्थितीनुसार किंवा काळानुसार व्यवस्थापन प्रक्रियेत देखील बदल करावे लागतात असे बदल व्यवस्थापनास मोठ्या प्रमाणात संघटनात्मक पातळीवर करावे लागतात.

ग्रंथालयामध्ये व्यवस्थापन बदलाचे टप्प्यांची व्यवस्थापनातील घटकांची अंमलबजावणी करत असताना खालील मुद्दे लक्षात घेतले पाहिजे.

1. व्यावसायिक परिस्थिती व वातावरणाचा अभ्यास करून घडणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे व असे बदल व्यवसायिक फायद्यासाठी करता यावे.
2. घडून आलेल्या बदलाबाबत व्यवसायातील कर्मचाऱ्यांच्या प्रक्रिया आजमावणे कारण या बदलाविषयक भूमिकेचा अवलंब प्रत्यक्ष कर्मचाऱ्याकडून होत असतो. तेव्हा ते या बदलाविषयक भूमिकेत सहमत आहेत किंवा नाही याबाबत खात्री करणे.
3. संघटनात्मक बदल घडून आणावयाचे असल्यास त्याबाबत त्वरित निर्णय लागू करण्यासाठी योजना तयार करणे.
4. घेतलेल्या निर्णयांची कल्पना कर्मचारी यांना देणे त्यांच्या विरोध किंवा प्रतिकार असेल तर त्याबाबत चर्चा करून त्यांची मते विचारात घेणे व एक परिपूर्ण बदल विषय योजना तयार करून सर्वांच्या संमतीने अमलात आणणे.
5. नव्याने ठरविलेल्या नियोजनात बदलाप्रमाणे प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे व त्या बदलांच्या परिणामांचा अभ्यासाशी तुलना करून पुढील धोरण ठरणे किंवा बदल कायम करणे. व्यवसाय अंतर्गत राबवण्याच्या धोरणामध्ये अवलंबिलेल्या बदलांचे संकल्पना सर्वांना घ्यावयास असल्यास याबाबत घेतलेल्या निर्णयामध्ये पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे. नसता गोंधळ होण्याची शक्यता असते. असे बदल घडून आणल्यानंतर त्या बदलांचा परिणाम सकारात्मक होतो किंवा नकारात्मक होतो याबाबत ही उच्च व्यवस्थापनाचा अभ्यास करावा. सध्याच्या स्थितीतही यासारख्या योजना योग्य प्रमाणात लागू करण्याचे धोरण अनेक व्यवस्थापनाने स्वीकारलेले आहे. परंतु अशा अनेक बदलाविषयक बाबी सर्वच व्यावसायिका करिता फायदेशीर ठरतील असे

नाही. एका संस्थेत घडून आलेला बदल दुसऱ्या संस्थेला फायदेशीर ठरेल असेही नाही संपूर्ण संगणकीकरणाला देखील सुरुवातीला खूपच विरोध झाला. परंतु आता हा बदल अनेक व्यवसायातून अटळ आहे. हे देखील सर्वांना कळून चुकले.

ग्रंथालय व्यवस्थापन बदल प्रकारांची माहिती माहिती देत असताना खालील बाबींचा विचार करावा लागतो.

1. वातावरण व कार्य परिस्थिती बद्दलामुळे सध्या जग अतिशय वेगाने बदलत आहे. दिवसेंदिवस ग्रंथालय वाचकांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे वाचकांची संख्या, त्यांची मागणी, संशोधक, आधुनिक तंत्र, ग्रंथालयांचे स्वरूप, आर्थिक स्थिती, यात वेगाने बदल घडून येत आहेत. उपभोक्त्यांचे स्वरूप, मागणी, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र यातील बदलामुळे ग्रंथालय क्षेत्रात अनेक समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे व्यवस्थापकांना, ग्रंथपालांना सतत माहिती तंत्रज्ञानाचे अद्यावत माहिती मिळवणे व त्यानुसार त्वरित निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. उपभोग्यांची मूल्य आशा आकांक्षा अपेक्षा यात होणाऱ्या बदलांचा व्यवस्थापकीय निर्णयावर परिणाम होतो.
2. वर्तमानकालीन व्यवस्थापकांच्या प्रश्नांच्या स्वरूपातील बदल समकालीन व्यवस्थापकांच्या प्रश्नांचे स्वरूपीही बदललेले आहे. मोठ्या प्रमाणावरील वाचक संशोधक माहितीचा विस्फोट आर्थिक तंत्र, इलेक्ट्रॉनिक्स तंत्रज्ञान, आधुनिक विपणन, तंत्र व्यवस्थापन इत्यादी कारणे त्यास कारणीभूत आहे त्याचबरोबर कर्मचारी वर्गांची जागरूकता व उपभोक्तांना त्यांच्या हक्कांची झालेली जाणीव ही कारणे आजच्या काळातील व्यवस्थापकांच्या प्रश्नांच्या स्वरूपात होणाऱ्या बदलास कारणीभूत झाले आहे.
3. व्यवस्थापकीय ज्ञानाच्या व व्याप्तींच्या स्वरूपातील बदल सध्याच्या काळात व्यवस्थापकीय ज्ञानाचे स्वरूपी बदलले आहे विविध प्रकारच्या संघटनांच्या व्यवस्थापकीय समस्या विविध स्वरूपांच्या आहेत या समस्यांच्या सोडवणुकीसाठी सर्वसामान्य व्यवस्थापन तत्त्वांचा वापर करावा लागतो व्यवस्थापकांची व्याप्ती वाढल्यामुळे व्यवस्थापकीय वैशिष्ट्य व अत्याधुनिक व्यवस्थापकीय ज्ञान व कौशल्य यांचा उपयोग आवश्यक बनला आहे अशा बदलांचे व्यवस्थापन ही आजची गरज झाली आहे.
4. तंत्रज्ञान यातील बदल आधुनिक युगात व तांत्रिक युगात ग्रंथालयाचे तंत्र पूर्णपणे बदललेले आहे संगणीकरणांच्या या युगात सर्व क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले आहेत.

व्यवस्थापन परिवर्तनासाठी कार्य करणारे घटक

कोणत्याही परिवर्तनासाठी बाह्य घटक व अंतर्गत घटक कार्य करीत असतात यातील बाह्य घटकावर संस्थेच्या अंकुश नसतो. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक, राजकीय व कायदा या घटकांचा समावेश करता येतो. या परिवर्तनासाठी कार्य करणारे काही घटक खालील प्रमाणे आहेत.

1.सामाजिक घटक

सामाजिक घटक प्रामुख्याने समाज हिताच्या दृष्टीने कार्य करतात. समाजाला ज्ञानाची भूक असते ही भूक भागवण्यासाठी ग्रंथालयावर दबाव येत असतो. यांचा परिणाम म्हणून ग्रंथालयांना परिवर्तनाला सामोरे जावे लागते.

2.आर्थिक घटक

आर्थिक घटकांमध्ये किंमत खरेदी प्रक्रिया आय किंवा उत्पन्न गुणात्मक ज्ञानसाधनाची उपलब्धता शब्दांच्या आर्थिक परिस्थितीचे भान इत्यादी बाबींचा समावेश होतो. अलीकडेच पैसे मोजून ज्ञान माहिती विकत घेण्याची प्रवृत्ती वाढत आहे. या संबंधीचा फायदा ग्रंथालयांना करून घेता आला पाहिजे.

3. राजकीय व कायदा

यामध्ये प्रामुख्याने राजकीय स्थिती राज्यकर्त्यांचा दृष्टिकोन शासनाची ध्येयधोरणे व त्या अनुषंगाने केले जाणारे कायदे त्यांचे अंमलबजावणी यांचा समावेश होतो याबरोबरच आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडी उदा. उदारीकरण, खाजगीकरण, स्वामित्व हक्क इत्यादी बाबींचा समावेश होतो. या सर्व गोष्टी ग्रंथालय सेवा दर्जावर

परिणाम करतात या सर्व बाबींच्या आग्रहामुळे ग्रंथालयाला किंवा कोणत्याही संस्थेला परिवर्तनाला सामोरे जावे लागते.

4. **अंतर्गत घटक**

बाहेरील घटका शिवाय अंतर्गत घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते अंतर्गत घटक हे व्यवस्थापकीय पातळीवर कार्य करीत असतात व्यवस्थापन बाहेरील बदलांचा स्वीकार करते किंवा नाही बाहेरील बदलांचे स्वागत करून संस्थेचा दर्जा व गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न करते की बाहेर बदलांना विरोध करते या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. बाह्य बदल स्वीकारायची तयारी असेल तर त्या अनुषंगाने संस्थेच्या नियमांमध्ये ध्येय धोरणामध्ये बदल करणे यासाठी नवीन नोकर भरती पदोन्नती सेवानिवृत्ती कामाचे वाटप इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरतात.

बद्दल व्यवस्थापनाची भूमिका

बदलाला सामोरे जाताना त्या बदलांचे कोणत्याही व्यवस्थापन करावे लागतात. बदलत्या तंत्रज्ञान व्यवस्थापनाची आवश्यकता स्पष्ट करताना दोन गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात त्यापैकी पहिली गोष्ट माहिती विस्फोट यामुळे प्रचंड प्रमाणात व वेगवेगळ्या माध्यमावर वेगवेगळ्या स्वरूपात माहिती उपलब्ध झाली आहे. युनोस्कोच्या अहवालानुसार ही शिक्षण च्या सुरुवातीपासून सोळाव्या शतकात जेवढ्या ज्ञान शाखांचा अभ्यास झाला त्यांच्या आठपट 1960 ते 1970 या काळात झाला यावरून विषयावर शतकांच्या शेवटी किती प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध झाली. यांची कल्पना येते या अनुषंगाने व्यवस्थापकीय बदल करणे आवश्यक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे माहिती तंत्रज्ञानाचे ग्रंथालय सेवेवर होणारे परिणाम म्हणजे वाचकांना माहिती त्यांच्या कामांच्या जागी विना विलंब हवे असते. ही गरज भागवण्याचे काम माहिती तंत्रज्ञानामुळे सोपे झाले आहे. माहिती तंत्रज्ञान आधुनिक ग्रंथालयासाठी उपयुक्त ठरले आहे. त्यामुळे ग्रंथालय सेवा साठवांवर संवर्धन अधिक परिणामकारकता येऊ लागले आहे. या परिवर्तनांचा ग्रंथालयांच्या गुणात्मक विकासासाठी चांगल्या प्रकारे वापर करता येऊ शकतो.

घटकांची दखल घेणे ग्रंथपालास आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथपालांनीच बदल घडवून आणण्यासाठी आवश्यक तो पुढाकार घ्यायला हवा यामुळे ग्रंथपालांना पारंपारिक व्यवस्थापन सोडून अपारंपारिक व्यवस्थापनाचा अवलंब करावा लागेल. ग्रंथपालासमोर अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करून व्यवस्थापन करण्याचे आव्हान आहे. ग्रंथपालांनी परिवर्तन स्वीकारताना खालील बाबी लक्षात घ्याव्या लागतील.

1. नवीन आर्थिक तरतुदींची पूर्तता करणे.
2. कर्मचाऱ्यांना या परिवर्तनाचे महत्त्व समजावून व त्यांची मानसिक तयारी करून सामोरे जाण्यास प्रवृत्त करणे.
3. त्यांच्यातील गुणवत्ता व कार्य कुशलता वाढवण्यासाठी प्रशिक्षण देणे.
4. ग्रंथालयाची गरज ओळखून आर्थिक उपाययोजना कर्मचारी हार्डवेअर सॉफ्टवेअर यांचे व्यवस्थापनातील नियोजन करणे.
5. यात कर्मचाऱ्यांचा होणारा फायदा समजून यातील सहभाग जास्तीत जास्त कसा वाढेल याकडे लक्ष देणे.

उपरोक्त सर्व गोष्टींचा विचार करून ग्रंथालय कार्यातील त्रुटी दूर करून अंमलबजावणी केली तर ग्रंथालयांमध्ये आवश्यक बदल घडवून आणणे कठीण होणार नाही.

व्यवस्थापन परिवर्तनाला विरोध

सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे परिवर्तन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्येक वेळी मानवाने प्रथम परिवर्तनाला विरोध करून त्यांची उपयोगिता खात्रीलायक झाल्यावर त्यांचा स्वीकार केला आहे. संस्था पातळीवर परिवर्तन हे हिताचे सुरक्षिततेचे असेल तर स्वीकारले जाते. परिवर्तन हे संस्थेच्या संस्था सभासदांच्या हिताविरुद्ध हानिकारक असेल तर विरोध होतो. या परिवर्तनाच्या विरोधामध्ये प्रामुख्याने सामाजिक, आर्थिक,मानसशास्त्रीय

घटक कार्य करत असतात अनेक कारणामुळे परिवर्तनाला विरोध होतो. त्यापैकी काही महत्त्वाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

1. कर्मचाऱ्याला नोकरीत असुरक्षितता वाटणे.
2. नवीन कौशल्य शिकण्याची गरज व त्यातून नवीन जबाबदारी अंगावर पडण्याची भीती.
3. त्यांच्याकडील सध्या स्थितीतील ज्ञान कार्य कुशलता उपयुक्त व कार्यक्षम वाटणे.
4. अस्थैर्य व बदलांची भीती वाटणे.

ग्रंथपाल व व्यवस्थापकाकडून होणारा विरोधाची अंमलबजावणी करत असताना खालील मुद्दे लक्षात घेतले पाहिजे.

1.ग्रंथपालांची विचारसरणी

ग्रंथालयांच्या व्यवस्थापन तंत्रात बदल करण्यास व नवनवीन व्यवस्थापन तंत्र स्वीकारणार ग्रंथपाल फारसे तयार नसतात विशेषता भारतासारख्या देशाचे ग्रंथपालांची प्रतिगामी वृत्ती असे बदल स्वीकारण्यास तयार नसतात. आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात भारतीय ग्रंथालय फारसे टिकाव धरू शकत नाहीत. यांच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे या ग्रंथालयात पारंपारिक पद्धतीने करण्यात येणारे व्यवस्थापन आवश्यक आहे. या व्यवस्थापनात रचनेत बदल करण्याची तयारी नसते.

2.ग्रंथपालांची मनोवृत्ती

ग्रंथपालांची देखील व्यवस्थापनातील बदल स्वीकारण्याची तयारी नसते आधुनिक आजच्या गतिमान वातावरणात व्यवस्थापकांचे जुने अनुभव फार झपाट्याने कुचकामी ठरतात. आजच्या काळात निर्णय घेण्याच्या पद्धती तंत्र फार विकसित झाले आहे व्यवस्थापक आमदार आपले ज्ञान ताजेतवाने ठेवावे लागते नवीन व्यवस्थापनांचे तंत्र व सिद्धांत आत्मसात करावी लागतात त्यासाठी प्रशिक्षणाची गरज असते व्यवस्थापन विकास कार्यक्रमात सहभागी व्हावे लागते. हे सर्व करण्याची व नवीन जबाबदारी स्वीकारण्याची त्यांची मानसिक तयारी असली पाहिजे. त्यामुळे व्यवस्थापकाकडूनही नवीन व्यवस्थापकीय बदलास प्रति विरोध होतो.

3. नवीन काही न स्वीकारण्याची वृत्ती

मग आंतरराष्ट्रीय पातळी ग्रंथालय व्यवसाय व व्यवस्थापन क्षेत्रात संगणक व माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो निर्णय प्रक्रियेचे स्वरूपी तांत्रिक झाले आहे. हे सर्व बद्दल स्वीकारण्याची तयारी असली पाहिजे व या नवीन तंत्रांच्या व्यवस्थापनासाठी वापर झाला पाहिजे. परंतु भारतीयांची वृत्ती असे नवीन काही स्वीकारण्याची नसते हे ही व्यवस्थापकीय बदलास प्रति विरोध होण्याचे एक कारण आहे.

4. आधुनिकीकरणास विरोध

आजच्या स्पर्धेच्या काळात ग्रंथालयांच्या विकासासाठी व त्यांच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी आधुनिकीकरणा शिवाय पर्याय नाही. सेवा देण्यात यांत्रिकीकरण विपण विपणनात आधुनिकीकरण, व्यवस्थापनात संगणकीकरण आवश्यक आहे त्यासाठी व्यवस्थापनात हे सर्व बदल शिकारावे लागणार आहेत परंतु अशा आधुनिकीकरणाला तसेच क्षेत्राकडून होणारा विरोध ही व्यवस्थापनातील परिवर्तनास होणाऱ्या प्रति विरोधकांची एक महत्त्वाची कारण आहे.

5. प्रशिक्षणास विरोध

व्यवस्थापकीय कार्यशैली व तंत्रामध्ये जी विविध परिवर्तने सातत्याने होणार आहे. त्यांचे अद्यावत ज्ञान प्राप्त करण्यासाठी व्यवस्थापकांना निरंतर स्वरूपाचे प्रशिक्षण आवश्यक आहे. निर्णय प्रक्रियेचे नवीन तंत्र, संदेश वाहनांच्या नवीन तंत्रांचे ज्ञान, व्यवस्थापन पद्धतीतील नवे प्रवाह, नवीन दृष्टिकोन हे सर्व समजावून घेण्यासाठी व्यवस्थापकीय प्रशिक्षण आवश्यक असते परंतु व्यवस्थापक व ग्रंथपाल कडून अशा निरंतर प्रशिक्षणाला विरोध असतो पर

प्रशिक्षणावरील खर्च अनुत्पादन स्वरूपाचा आहे अशा गैरसमज असतो त्यामुळे अनुत्पादन स्वरूपाचा आहे त्यामुळे व्यवस्थापनातील नवीन बदला बदलास प्रतिरोध होतो.

ग्रंथालयामध्ये नियोजनबद्ध परिवर्तनांची प्रक्रिया करत असताना खालील बाबींचा विचार करावा लागतो.

1. बदल मुक्त करणे

व्यवस्थापकाने परिवर्तनास होणाऱ्या विरोध ची कारणे शोधून काढली पाहिजेत. हा विरोध सर्वच स्तरावरून होण्याची शक्यता असते. विशेषतः कर्मचाऱ्याकडून आर्थिक सामाजिक मानसशास्त्रीय वैयक्तिक कारणामुळे मोठ्या प्रमाणावर विरोध केला जातो. त्यांच्या विरोधात विरोधाची कारणे शोधून काढून कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असते. व्यवस्थापन परिवर्तनाची आवश्यकता व गरज सर्व कर्मचाऱ्यांना समजावून देण्याची जबाबदारी व्यवस्थापनाने पार पाडली पाहिजे. अशा बदलामुळे कर्मचाऱ्यांच्या हितसंबंधावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. उलट त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्यांच्या आर्थिक फायदा होऊ शकेल हे पटवून देऊन बदलांचे व्यवस्थापन अमलात आणले पाहिजे.

2. नवीन पातळीवर जाणे

परिवर्तन घडवून आणावयाचे ते बदल एकदम घडवून आणता हळूहळू बदल घडून आणले पाहिजेत. त्यामुळे कर्मचारी वर्ग नवीन बद्दल स्वीकारण्यास तयार व्हावे लागतो. एकदा होणाऱ्या बदलास कर्मचारी सहजासहजी मान्यता देत नाही असे बदल एकदम स्वीकारले जात नाही. पण हेच बदल सावकाश हळूहळू करत गेल्यास कर्मचाऱ्याकडून ते स्वीकारले जातात व त्यांच्याकडून जसजसे हे बदल स्वीकारले जातील. तसतशी त्या बदलांची व्याप्ती वाढविता येते त्यामुळे बदलाला सहायकांचे पूर्ण सहकार्य मिळवता येते व बदलातून निर्माण होणारे प्रश्न काळजीपूर्वक हाताळता येतात. बदलामुळे निर्माण होणारे संघर्ष टाळता येतो व समन्वयांचे वातावरण निर्माण होते. नंतर असे बदल करून सहाय्यकांची नवीन कार्यपातळी तयार करता येते व कर्मचाऱ्यांना या नवीन पातळीवर आणता येते. बदलासंबंधी सहकार्यांशी चर्चा करून त्यातील प्रश्नांची स्वरूप समजावून सांगून त्यांचे अधिक चांगले सहकार्य मिळवता येते व त्याद्वारे बदलांचे व्यवस्थापन व्यवस्थित रित्या अमलात आणता येते.

3.बदल स्थिर करणे

परिवर्तनाचे व्यवस्थापन पूर्णपणे स्वीकारल्यावर व त्यांच्या अंमलबजावणीची नवीन कार्यपातळी तयार झाल्यावर असे बद्दल स्थिर करावे लागतात. अशा बदलास संस्थात्मक रूप द्यावे लागते. नवीन परिवर्तन करणे आवश्यक वाटे पर्यंत अशा बदलाला स्थिर व कायमस्वरूप प्राप्त करून द्यावे लागते. अशा परिवर्तनास कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांची भूमिका त्यांची कार्यपद्धती नवीन बदलाशी जुळणारे नाते प्रस्तावित करावे लागते. तसे बदल कर्मचाऱ्यांना फायदेशीर ठरत आहेत. यांची प्रचिती आणून द्यावी लागते. तरच व्यवस्थापन यशस्वी ठरू शकते. अशा परिवर्तन करण्यात येणाऱ्या बदलास परिस्थितीनुरूप काही आणखी परिवर्तन करणे आवश्यक वाटत असतील तर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने असे बदल केले पाहिजेत. कर्मचाऱ्यांच्या मनात असे परिवर्तन आवश्यक आहेत. अशी भावना निर्माण करता आली पाहिजे. तरच असे परिवर्तन स्थिर होऊ शकतात.

परिवर्तनाच्या व्यवस्थापनास होणाऱ्या विरोधावर उपाय योजना

परिवर्तनाच्या व्यवस्थापनास अनेक घटकांकडून विरोध होत असला तरी हा विरोध नाहीसा करून असा बदल प्रत्यक्षात अमलात आणणे आवश्यक असते.अशा विविध चे खालील मार्गाने निराकरण करता येते.

1. उद्दिष्टे निश्चिती व परिवर्तनाच्या परिणामांचा अभ्यास करणे कोणतेही बद्दल स्वीकारण्यापूर्वी त्या बदलांचे उद्दिष्टे निश्चित असले पाहिजे. तसेच अशा बदलामुळे व्यवसायावर होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास केला पाहिजे. परिवर्तनासाठी लागणारा वेळ बद्दल चांगले वाईट परिणाम यांचा विचार करून बदल केल्यास त्या परिवर्तनाच्या विरोधांची धार बोथट करता येते.

2. प्रस्तापित बदलावरील प्रतिक्रिया बदल घडवून आणताना विचारात घ्यावयाचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रस्थापित परिवर्तनावर सहाय्यक व इतर कर्मचाऱ्यांची प्रतिक्रिया विचारात घेणे होय. व्यवस्थापनाने संघटनेतील सर्व घटकाशी तथा परिवर्तनाची साधक बाधक चर्चा केल्यास व कर्मचाऱ्यांची मते जाणून घेऊन त्याप्रमाणे बदल केल्यास कर्मचाऱ्याकडून होणारा विरोध कमी करता येतो.
3. बदलांची माहिती देणे व्यवस्थापनाने व्यवस्थापकीय व बदलांची संघटित माहिती सर्व घटकांना दिल्यास असा बद्दल सर्वमान्य होऊ शकतो.
4. कर्मचारी प्रशिक्षण परिवर्तनाच्या व्यवस्थापनास सर्वात मोठा विरोध कर्मचाऱ्याकडून होत असतो कारण नवीन कल्पना यंत्रणा स्वीकारण्यास स्वीकारावयास ते सहजासहजी तयार नसतात. अशावेळी कर्मचाऱ्यांना नवीन परिवर्तनासंबंधीचे शिक्षण व प्रशिक्षण घेऊन बदलाविषयीची वस्तुस्थिती समजावून सांगितल्यास त्यांच्या बदलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलता येतो व विरोध कमी करता येते.
5. नेतृत्वाकडून मार्गदर्शन व्यवस्थापनांच्या बदलास कर्मचाऱ्यांचा विरोध असतो. अशावेळी त्यांना विश्वासात घेऊन तसे परिवर्तन कर्मचाऱ्यांच्या हिताचे कसे आहेत, हे समजावून सांगितल्यास तसेच परिवर्तन कसे आवश्यक व फायदेशीर आहेत हे सांगू शकतात व त्यातून विरोध नाहीसा होऊ शकतो.

माहिती तंत्रज्ञान परिवर्तन

ग्रंथालय पुढील आव्हान ग्रंथालयांच्या विचार करता काही मोठ्या शहरातील ग्रंथांचे विरोध व्यावसायिक व तांत्रिक महाविद्यालयीन ग्रंथालय सोडतात. इतर ग्रंथालयांमध्ये माहिती तंत्रज्ञानाच्या शिरकाव फारसा झालेला नाही. ग्रामीण भागातील अगदी नगण्य महाविद्यालयामध्ये ग्रंथालय परिवर्तन स्वीकारताना ग्रंथालय प्रमुखांना ग्रंथपालांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. बहुतेक ग्रंथपाल विशेषता जुने ग्रंथपाल या परिवर्तनाबद्दल उदासीनता बाळगून आहेत.

1. ग्रंथालयांची गरज ओळखून आर्थिक उपाय व नियोजन कर्मचारी, हार्डवेअर, सॉफ्टवेअर यांचे व्यवस्थित नियोजन करावे लागते.
2. नवीन आर्थिक तरतुदीचे पूर्तता कशी करता येईल याबाबतीत विचार करावा लागेल.
3. आवश्यक ती नवीन संगणक प्रणाली हार्डवेअर, सॉफ्टवेअर कोणकोणते लागतील कुठे मिळतील त्यांची किंमत या बाबत विचार करावा लागेल.
4. कर्मचाऱ्यांना या बदलांचे महत्त्व समजावून त्याला सामोरे जाण्याची मानसिक तयारी करून घ्यावी लागेल.
5. त्यांच्यातील गुणवत्ता व कार्य कुशलता वाढविण्यासाठी प्रशिक्षण घ्यावे लागेल.
6. यामध्ये होणारा कर्मचाऱ्यांचा फायदा समजावून सांगावा लागेल व त्यांच्यामधील जास्तीत जास्त सहभाग कसा वाढेल याकडे लक्ष द्यावे लागेल.

निष्कर्ष

ग्रंथालयांचा विकास साधण्यासाठी नवकल्पना व बदलांचे व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने ग्रंथालयांना अधिक कार्यक्षम सुलभ, आणि माहितीपूर्ण बनवता येईल. यासाठी योग्य परिवर्तनाची योजना, प्रशिक्षण, संवाद आणि मूल्यांकन यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ग्रंथालय ज्ञानाच्या प्रसारासाठी आणि समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात, त्यामुळे त्यांच्या कार्याची कार्यक्षमता वाढवण्यासाठी हे बदल आवश्यक आहेत.

माहिती व तंत्रज्ञानाचे हे युग ग्रंथालयासाठी संक्रमण का ठरत आहे. याच काळात ग्रंथालयांना खाजगी व व्यावसायिक पर्याय निर्माण झालेले आहेत. त्यामुळे ग्रंथालयांची एक सामाजिक संस्था आहे. ही व्याख्या बदलण्याची वेळ येते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. किंबहुना ग्रंथालय ही संकल्पना नामशेस होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यासाठी प्रत्येक ग्रंथालय अधिकारांचे ग्रंथपालांचे आद्य कर्तव्य ठरते की, या परिवर्तनाचे स्वागत करून त्यातील उपयुक्तेचा ग्रंथालयांच्या गुणात्मक दर्जात्मक विकासासाठी वापर करून ग्रंथालय अधिक समृद्ध कशी

होती याकडे लक्ष दिले पाहिजे. या परिवर्तनाचे व्यवस्थापन करून आपला भविष्यकाळ अधिक उज्वल करता येईल. त्यासाठी वैयक्तिक सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. ग्रंथालयांना भविष्यकाळात टिकवून ठेवण्यासाठी केवळ पुस्तकांचे रक्षण करणे पुरेसे नाही. तर आधुनिक तंत्रज्ञान आणि वाचकांच्या बदलत्या गरजानुसार स्वतःमध्ये बदल करणे आणि नवीन प्रयोग करणे ही काळाची गरज आहे.

संदर्भसूची

१. देशमुख, प्रभाकर. (1988), व्यवस्थापन प्रक्रिया, नागपूर: पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन.

२. ब्राटमनकर, ए.बा. (1976), औद्योगिक व्यवस्थापन, पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

३. घुमरे, शंकर. ग्रंथालयांचा गुणात्मक विकासासाठी परिवर्तनाचे व्यवस्थापन, ज्ञानगंगोत्री, नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

४. मानकर, सुधाकर. (2003), व्यवसाय व्यवस्थापनाची तत्त्वे, कोल्हापूर: फडके प्रकाशन.

५. गाढवे, विद्या. (2003), बदलते तंत्रज्ञान व शैक्षणिक ग्रंथालय, ग्रंथपरिवार,परभणी :मराठवाडा विभाग संघ.

६. मानकर, सुधाकर. (2004), व्यवसाय व्यवस्थापनाची तत्वे, कोल्हापूर : फडके प्रकाशन.

७. गिरीधारी, डी.जे. (2004) व्यवसाय व्यवस्थापनाची तत्वे, औरंगाबाद : उदय पब्लिकेशन.

८. ब्राटमनकर ए.बा.(1976), औद्योगिक व्यवस्थापन, पुणे : कॉन्टिनेटल प्रकाशन.

९. सातारकर, सु.प. (2016) , सकल गुणवत्ता व्यवस्थापनांचा ग्रंथालयाकरिता उपयोग, ज्ञानगंगोत्री नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

१०.श्रीवास्तव, डी.(2016) , ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, दिल्ली : भारतीय ग्रंथालय संघ.

११.शर्मा, र.(2018), महाविद्यालयीन ग्रंथालये: सेवा व सुविधा , मुंबई: ज्ञानप्रकाश प्रकाशन.

१२.कुमार, एन.(2020) , ऑनलाईन ग्रंथालयीन सेवांचा प्रभाव, पुणे: शैक्षणिक प्रकाशन.

१३.पाटील, एस (2019) तंत्रज्ञानाचा ग्रंथालय सेवांवर प्रभाव , नागपूर: इन्फोविजन पब्लिकेशन

१४.सिंह, ए (2017) ग्रंथालय व्यवस्थापन आणि अनुप्रयोग, दिल्ली : ग्रंथालय प्रकाशन.

१५.निकोसे,सत्यप्रकाश,(2007) संशोधन पद्धती,नागपूर: प्रज्ञा प्रकाशन.

१६.थोरात, लक्ष्मण (2015) ग्रंथालय माहितीशास्त्र पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.

१७.देशमुख, अ. (2023). *पर्यावरण शिक्षण आणि समाजातील जागरूकता*. पुणे : विद्या प्रकाशन.

१८.शिंदे, म. (2021). *माहिती प्रसार आणि आधुनिक ग्रंथालये*. मुंबई : ज्ञानदीप प्रकाशन.

१९.पाटील, र. (2022). *ग्रंथालय आणि माहिती सेवा*. कोल्हापूर : शैक्षणिक प्रकाशन.

२०. Kumar, S. (2024). *Environmental Awareness and Role of Libraries*. New Delhi: Academic Publications.

२१. Sharma, R. (2025). *Libraries and Knowledge Dissemination*. New Delhi : Research India Press.

२२. Singh, A. (2023). *Role of Libraries in Promoting Environmental Awareness. International Journal of Library and Information Studies*, 13(2), 45–52.

२३. Gupta, R. (2024). *Digital Information Services and Environmental Knowledge* Dissemination. *Journal of Library and Information Technology*, 44(1), 60–67.

महाराष्ट्र आणि मराठी भाषा

शिंदे संतोष मारुती

मु. राजेवाडी, पो. पोखरी, ता. आंबेगाव, जि. पुणे-४१०५०९

मानवाला निसर्गाने दिलेली सर्वांत महत्त्वाची देणगी म्हणजे त्याची भाषा होय. प्रत्येकाला आपल्या मनातील विचार व्यक्त करण्यासाठी, संवाद साधण्यासाठी भाषा आवश्यक आहे. व्यक्ती ज्या समूहातील आहे, त्या समूहाच्या भाषेला बोलीभाषा म्हणून संबोधले जाते. औद्योगिक क्रांतीच्या आधीच्या कालखंडात दळणवळणाची साधने कमी होती आणि मानव प्रवासासाठी घोडा, गाढव, बैल, उंट इत्यादी प्राण्यांचा वापर करत होता. मर्यादित साधनांमुळे तो दूरवरचा प्रवास करू शकत नव्हता. आपल्याच परिसरात प्रवास करून त्याला आपल्या गरजा पूर्ण कराव्या लागत होत्या. या वेळी संप्रेषण ही क्रिया घडून येत होती, मात्र ती तुटक स्वरूपाची होती. या वेळी काही प्रमाणात इतर बोलीभाषांतील शब्द स्वीकारले जात होते.

औद्योगिक क्रांतीनंतर दळणवळणाच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आणि व्यापार उद्योगांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. व्यापार उद्योगांच्या माध्यमातून विचाराविचारांची देवाण-घेवाण सुरू झाली. कालांतराने शिक्षण खेडोपाड्यापर्यंत तळागाळात पोहोचण्यास मदत झाली. या वेळी सर्व सोयी-सुविधा असलेल्या शहरांच्या ठिकाणी बोलली जाणारी भाषा हीच शासन-प्रशासनाची भाषा म्हणून वापरली जाऊ लागली. याच भाषेचा शिक्षणामध्ये वापर झाला. बहुसंख्य लोकांना आपल्या बोलीभाषेकडून मराठी भाषेकडे वळावे लागले. आपली पारंपारिक बोलीभाषा सोडून मराठी भाषेत लेखन-वाचन सुरू झाल्याने बोलण्यातही काही प्रमाणात बोलीभाषेतील शब्द जाऊन प्रमाणभाषेतील शब्द वापरले जाऊ लागले.

मराठी भाषेच्या अनेक बोली आहेत जसे की- १) अहिराणी, २) आगरी, ३) आरे राठी, ४) इस्त्रायली, ५) कातकरी, ६) कोलाणी, ७) कोकणी, ८) कोल्हापुरी, ९) कोरकू, १०) कोटली, ११) कैकाडी, १२) कदोडी/सामवेदी, १३) कोळी, १४) कुच्चकोरवी, १५) कोल्हाटी, १६) कोलामी, १७) कोकणा, १८) कारवारी, १९) खानदेशी, २०) खानदेश भिल्ली, २१) गौण्डी, २२) गावित, २३) गोसावी, २४) गोरमाटी, २५) गोल्हा, २६) गुजरी, २७) घिसाडी, २८) चंदगडी, २९) चितपावनी, ३०) चितोडिया, ३१) छत्तीसगडी, ३२) छप्परबंद, ३४) जिप्सी बंजारा, ३५) जव्हार, ३६) जुदाऊ, ३७) झाडीबोली, ३८) ठाकरी, ३९) डोंबारी, ४०) डांगी, ४१) डोरकोळी, ४२) तंजावर, ४३) तावडी, ४४) देहबोली, ४५) दखनी उर्दू, ४६) धामी, ४७) धोडी, ४८) नंदभाषा, ४९) नागपुरी, ५०) नारायणपेठी, ५१) नंदीवाले, ५२) नाथपंती डवरी, ५३) नॉलिंग मुरुड कोर्लाई, ५४) निमार भिल्ली, ५५) नासिक बागलाणी, ५६) पांचाळ विश्वकर्मा, ५७) पोवारी, ५८) परधानी, ५९) पारोशीमांग, ६०) पारधी, ६१) बेलदार, ६२) बाणकोटी, ६३) बेळगावी, ६४) भटक्या विमुक्त, ६५) भिल्ल, ६६) भिल्ली, ६७) भिलाऊ, ६८) मराठवाडी, ६९) मॉरिशस, ७०) मालवणी, ७१) मथवाडी, ७२) मल्हार कोळी ७३) मावची ७४) माडिया ७५) मांगेली ७६) मांगगारुडी ७७) मेहाली ७८) मठवाडी ७९) मावची टकाडी, ८०) मिरज दखनी, ८१) महाराष्ट्रीय सिंधी, ८२) महाराऊ, ८३) यवतमाळ दखनी, ८४) लेवा, ८५) लेवापाटीदार, ८६) लाडसिक्की ८७) वडारी, ८८) वैदू, ८९) व्हराडी, ९०) वारली, ९१) वाडवळी, ९२) वाघरी, ९३) सिद्धी, ९४) हळबी.

वरील काही बोली ह्या प्रदेशवाचक आहेत, तर काही जात किंवा समूहवाचक आहेत. वऱ्हाडी बोली ही विदर्भामध्ये बोलली जाते, मराठवाड्यात बोलली जाणारी मराठवाडी बोली, कोकण परिसरात बोलली जाणारी कोकणी आहे. धुळे-जळगाव परिसरात बोलली जाणारी अहिराणी तसेच प्रत्येक जातीच्या म्हणून काही बोली आपल्याकडे बोलल्या जात होत्या. उदा. गोंड समूहाची गोंडी. या बोलीभाषा मराठी भाषेच्याच बरोबरीने

अभ्यासल्या जाणे आवश्यक होते, मात्र तसे झाले नाही. 'सर जॉर्ज ग्रियर्सन (१८५१-१९४६) यांच्या नेतृत्वाखाली भारतीय भाषा-पोटभाषांच्या पाहणीचे कार्य १८९४ पासून १९२८ पर्यंत ३४ वर्षे सुरू होते. हैद्राबाद, म्हैसूर, त्रावणकोर, कोचीन ही पूर्वीची संस्थाने आणि पूर्वीचा मद्रास इलाखा सोडून, आजच्या पाकिस्तानासह सर्व प्रदेशांची भाषिक पाहणी ग्रियर्सन यांनी केली. त्या पाहणीनुसार एकूण १७९ प्रमुख भाषा आणि ५४४ उपबोली आढळून आल्या. एकूण ८७२ केंद्रांतून माहिती मिळविण्यात आली.'१

ब्रिटिश अधिकारी सर जॉर्ज ग्रीयर्सन ह्यांनी भारतीय भाषांची पहिली पाहणी केली. भारतातील चारही भाषा कुटुंबातील सुमारे ३६४ भाषांचे आणि बोलींचे लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया ह्या ग्रंथाच्या १९ खंडांच्या स्वरूपात जतन केले. यापैकी सातव्या खंडात मराठी (आर्य भाषाकुटुंबाच्या दक्षिण समूहातील भाषा) आणि तिच्या बोलींचे सविस्तर विवेचन केले आहे'. यानंतर 'राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ, पुणे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने २०१७पासून 'मराठीच्या बोलींचे सर्वेक्षण : प्रतिमांकन आणि आलेखन' हा प्रकल्प कार्यरत आहे. हा प्रकल्प म्हणजे ग्रीयर्सन ह्यांच्या पाहणीनंतरची महाराष्ट्रव्यापी स्वरूपाची ही पहिलीच भाषिक पाहणी म्हणावी लागेल. बोलीभाषेचा अभ्यास झाला नाही. मात्र बोलीभाषातील काही शब्दांनी लोकसाहित्याच्या रूपाने मराठी साहित्यात भर टाकण्याचे महत्त्वाचे काम केले. नंतरच्या कालखंडात बोलीभाषांचा वापर झाला नाही. लोकसाहित्यामध्येच त्यांचं अस्तित्व असल्याचे दिसून येते आणि त्या त्या जातीतील लोक त्यांच्या भाषेत काही प्रमाणात संवाद साधत आहेत. 'गुजराती समाजानं अनेक शतकानंतरही आपली बोली घरगुती वापरापुरती, समाजबांधवांपुरती का होईना, टिकवून ठेवली आहे. याउलट 'आमच्या नातवंडांना मराठी येत नाही, हे अभिमानानं सांगणाऱ्या मराठीच्या प्राध्यापिका आपल्याकडं आहेत.'२

या सर्व घडामोडींमध्ये मराठी भाषेसाठी साहाय्यक ठरणाऱ्या बोलीभाषांचा म्हणावा असा वापर न झाल्यामुळे बोलीभाषा आज मृत होण्याच्या मार्गावर आहेत. मराठी भाषा आणि बोलीभाषा यामध्ये काही प्रमाणात साम्य होते. जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या बोली असताना शिक्षणामध्ये बोली भाषांना स्थान मिळाले नाही. ज्या मराठी भाषेला सहायक ठरल्या असत्या. 'भाषेचा ऱ्हास कसा रोखणार? इंग्रजी भाषेचे मराठीवरील आक्रमण कसे रोखणार? सद्यःस्थितीत मराठी भाषेसमोरील हे मोठे आव्हान आहे.

माध्यमांमधील मराठी भाषेचा वापर मराठी भाषा कमकुवत करत आहे. याविषयी मराठी भाषा अभिमानी, मराठी भाषेचा राजकारणासाठी उपयोग करणारे, मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देणारे, त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये, विद्यापीठ, मराठी भाषा विषयक काम करणाऱ्या संस्था, संघटना, संशोधन अध्यासन दुर्लक्ष करीत आहेत. या वस्तुस्थितीकडे कोण लक्ष देणार? आज सर्व प्रकारच्या माध्यमांमधून मराठी भाषेचा उपयोग इंग्रजीमिश्रित मराठी रूपाने होत आहे. मराठी वृत्तपत्रे, समाज माध्यमे, चित्रपट, दूरदर्शन व खाजगी वाहिन्यांमध्ये उपयोगात आणली जाणारी मराठी भाषा इंग्रजी प्रभावाखाली आहे. मराठी वाक्यच आहे, पण त्यातील शब्द मराठी कमी व इंग्रजी जास्त असतात. साधे, सोपे, सुंदर, सुश्राव्य, सहज मराठी ऐकणे, लिहिणे, वाचणे दुर्मीळ होत चालले आहे. ही वस्तुस्थिती नाकारून कसे चालेल.'३

आजमितिला मात्र मराठी भाषेच्या ऱ्हासास सुरुवात झाली आहे, असे वाटत आहे. कारण,

१) बोलीभाषेमुळे आपली जात माहिती होईल : जसे मुंबईसारख्या शहरामध्ये मराठी भाषेमुळे आपला आर्थिकस्तर माहिती होईल, या कारणामुळे महाराष्ट्रातील बोलीभाषा-मराठीभाषा यांचा वापर बंद झाला आहे.

२) मराठी भाषा ही आज शिक्षणाची भाषा राहिली नाही : या भाषेची जागा इंग्रजी भाषेने घेतली आहे. विविध शाखांचा अभ्यासक्रम आज इंग्रजी, हिंदी भाषेत शिकवला जात आहे. पहिली ते दहावीपर्यंतचा अभ्यासक्रम हा मराठी मध्ये आहे मात्र मराठी माध्यमामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बोटावर मोजता येईल इतकेच शिल्लक आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये बहुसंख्य विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे आपल्याला दिसून येते. बारावी ते पदवी तसेच इतर अभ्यासक्रम हे पूर्णतः इंग्रजी भाषेत आहेत. इंग्रजी भाषा प्रतिष्ठित मानली जात आहे.

३) व्यापारी किंवा व्यावसायीक यांची भाषा : महाराष्ट्रातील महत्त्वाच्या शहरांमध्ये जसे पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, औरंगाबाद (संभाजीनगर), अहमदनगर (अहिल्यानगर) या शहरांमध्ये असणारे व्यापारी हे काही प्रमाणात जरी स्थानिक असले तरी त्यांच्याकडे काम करणारे कामगार मात्र उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान या ठिकाणांहून आलेले आहेत, तसेच काही परप्रांतीयांनी स्वत:चे व्यवसाय उभारले आहेत. गुजरात, राजस्थान या ठिकाणचे व्यावसायिक आपल्याकडे मोठ्या प्रभावावर आहेत. महाराष्ट्रामध्ये परप्रांतीयांची संख्या विचारात घेता देशाच्या दहा ठिकाणांहून आलेल्या लोकांना संवादाची भाषा म्हणून हिंदी भाषेचा वापर करत आहेत आणि महाराष्ट्रीय माणसाला इंग्रजी भाषेचा वापर करण्याचा मोह होतो आहे.

४) मराठी चित्रपटांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंदी-इंग्रजी शब्दांचा वापर :

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो मोठ्या प्रमाणावर अनुकरण करत असतो जसे शिक्षण, नोकरी निमिताने शहरात आलेला व्यक्ती पाच दहा वर्षात मुळ भाषा सोडून तो ज्या ठिकाणी स्थायिक झालेला आहे त्या प्रदेशाची भाषा तो बोलू लागतो हे तो जाणीवपूर्वक करत नाही, मात्र निसर्गनियमाप्रमाणे ही कृती त्याच्याकडून होत असते आणि त्याच्या भाषेत काही प्रमाणात बदल होत असल्याचे दिसून येते. करमणुकीचे साधन म्हणून चित्रपट पाहिले जातात. हिंदी चित्रपटांमध्ये आलेल्या विविध प्रयोगांचा प्रभाव तर भाषेवर पडत आहेच, मात्र मराठी चित्रपटातील अभिनेते-अभिनेत्री स्वतःला वेगळे दाखविण्याच्या हव्यासापोटी मराठी चित्रपटांमधील संवादामध्ये हिंदी-इंग्रजी शब्दांचा वापर करताना आपल्याला दिसून येत आहेत. चित्रपटाला प्रेक्षकवर्ग मिळावा म्हणून समाजमाध्यमांवरील विनंती करणारे मराठी अभिनेते चित्रपटात मात्र हिंदी अभिनेत्यांची नक्कल करण्यामध्ये धन्यता मानतात. प्रस्थापित मराठी दिग्दर्शक चित्रपटांमध्ये मराठी भाषेचा, ग्रामीण भाषेचा वापर व्हावा यासाठी म्हणावे तितके जागरूक असल्याचे दिसून येत नाही. उलटपक्षी दिग्दर्शनाच्या क्षेत्रात नव्याने आलेले नवोदित दिग्दर्शक प्रादेशिक भाषेचा किंवा ग्रामीण भाषेचा वापर करताना दिसून येतात, मात्र त्यांच्या चित्रपटाची संख्या कमी असते. या सर्वांचा प्रभाव मराठी भाषेवर पडत आहे.

५) उद्योगधंदे : महाराष्ट्रातील औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या विविध उद्योगांना भाषेच्या बाबतीत कोणत्याच प्रकारची नियमावली नाही. इंग्रजी, हिंदी आणि काही प्रमाणात मराठी भाषा वापरली जात आहे. कामगार उत्तर भारतातील असल्यास हिंदी भाषेचा वापर करतात, तर दक्षिण भारतीय इंग्रजी भाषेचा वापर करतात. एकूणच त्या उद्योगाच्या परिसरात असलेल्या कामगारांमुळे या व्यवसायाशी निगडित शब्दप्रयोग जनमानसात रुजण्यास सुरवात होते आणि त्या प्रदेशात इंग्रजी किंवा हिंदीमिश्रित भाषा बोलल्या जाऊ लागल्या आहेत.

६) पाश्चिमात्य जीवनशैलीचे अनुकरण : पाश्चिमात्य लोकांचे आपण मोठ्या प्रमाणावर अनुकरण करत आहोत. त्यामध्ये आपला पोशाख, आहार, निवास, या संदर्भात किंवा काही विजेवर चालणारी उपकरणे या सर्वांसाठी मराठी शब्दप्रयोग आज वापरले जात नाहीत.

७) प्रसारमाध्यमांची भाषा : समाजमाध्यमांवर वापरल्या जाणाऱ्या भाषांचा प्रभाव बोलीभाषा आणि प्रमाणभाषेवर पडत आहे. समाजमाध्यमांवर वापरल्या जाणाऱ्या भाषांचा मराठी भाषेच्या बरोबरीने वापर होत आहोत. माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे आणि प्रत्येक व्यक्तीला समाजापर्यंत आपले विचार पोहोचवण्याची सोय झाली आहे. देश-विदेशातील सुप्रसिद्ध व्यक्तीने एखाद्या विषयावर व्यक्त केलेले विचार लोकांच्या मनाला भिडतात, परिणामकारक ठरतात. ज्या भाषेचा वापर त्या व्यक्तीने केलेला आहे त्या भाषेतील शब्द स्वीकारले जात आहेत. उदा. आज, राजकारणी, अभिनेते ,खेळाडू, धर्मगुरू, विचारवंत हे हिंदी, इंग्रजी भाषेचा वापर करत आहेत आणि त्याचा परिणाम सामान्य मासावर तात्काळ होताना दिसत आहे. यु-ट्यूबसारखे माध्यम मागणी तसा पुरवठा या तत्त्वाने काम करत आहे. आपल्या आवडत्या विषयाचीच माहिती आपल्यापर्यंत तत्काळ पोहोचविण्याचे काम त्यांच्या माध्यमातून केले जाते.

प्रसारमाध्यमांची भाषा ही सोयीनुसार स्वीकारलेली असल्याचे दिसून येते. दृक-श्राव्य माध्यमे, श्राव्य माध्यमे आणि मुद्रित माध्यमे या सर्वांची भाषा ही आपल्या सोयीनुसार वापरली जात असल्याचे दिसून येते. जसे की, संगणकावर टंकलेखन करावयाचे असल्याने इंग्रजी शब्दांचा वापर हा दृक-श्राव्य माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये होत असल्याचे दिसून येते. आकाशवाणीसारख्या महत्त्वाच्या प्रसारमाध्यमावरही इंग्रजी शब्दांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याचा दिसून येते. मराठी भाषेतील नियमितपणे प्रकाशित होणारी वृत्तपत्रे मराठी भाषेच्या बाबतीत जागृत नाहीत असे दिसते. प्रत्येक माध्यमातून इंग्रजी शब्दांचा वापर देवनागरी लिपीमधून केला जात आहे आणि एकप्रकारे इंग्रजीमिश्रित मराठी भाषा बोलण्यासाठी लोकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. नवीन इंग्रजी शब्दांना बातमीचा मथळा करून रोज मराठी शब्दांना अडगळीत टाकून देण्याचे कार्य प्रसारमाध्यमांनी चालवले आहे. 'मराठी भाषेचे राजकारण करून उदो उदो करून मराठी भाषा जिवंत राहणार नाही. मराठी भाषा बोलली जाईल, तेव्हाच जिवंत राहील. दैनंदिन जीवनात व व्यवहारात जोपर्यंत मराठी भाषा बोलणार नाही, तोपर्यंत मराठी भाषेला जगविणे कठीण आहे. दैनंदिन व्यवहारात, कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा उपयोग झाला पाहिजे म्हणून शासन स्तरावरून अनेक आदेश निर्गमित करण्यात आले... मात्र मराठी भाषेची घसरण सतत सुरूच आहे.'[४]

'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे मराठी भाषेमध्ये इतर भाषांच्या शब्दांचे प्रमाण व दिवसेंदिवस वाढत आहे. आणि त्यात या सर्व माध्यमांनी इंग्रजी शब्दांचा केलेला वापर हा मराठीसाठी फायद्याचा नाही. वरील सर्व कारणांपैकी हे एक महत्त्वाचे कारण आहे असे वाटते. आज आपल्याला मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा ही सर्वांचे अपेक्षा पूर्ण झाली आहे. मात्र आपण मनापासून मराठी भाषेवर प्रेम करणे, मराठी भाषेचा वापर करणे हेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रामध्ये मात्र मराठी भाषिक हा घाणेरडा, भिकारडा, ठरला गेला आहे. म्हणजेच मराठी भाषेचा आणि तुमच्या प्रतिष्ठेचा सबंध लावण्यास आज सुरुवात झाली आहे.

आपल्या मित्र-मैत्रिणीमध्ये मराठी मुले-मुली हिंदी इंग्रजीचा वापर करू लागले आहेत. व्यवहाराच्या सोयीसाठी लोक हिंदी भाषा वापरू लागले आहेत. मात्र इतर ठिकाणी मराठी भाषिक आपली मराठी अस्मिता प्रखर करत आहे. जसे 'मॉरिशसमधील मराठी समाजात गोंधळ, जागरण, कथा, पूजा पाठ, सर्व सण, उत्सव, भजन, कीर्तन हे आजही मराठी भाषेतूनच करतात. इतकेच नव्हे तर पाचवी, बारसे, साखरपुडा, लग्नविधी आणि अंतिम संस्कारही मराठी भाषेतूनच होतात. म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, लोककथा, लोकगीते, विधिनाट्य यातून मराठी सांस्कृतिक परंपरा दिसून येते. त्यातूनच त्यांनी मराठी भाषेबद्दल, मायदेशाबद्दलची ओढ, हळवेपणा आणि कृतज्ञतेची भावना जपली आहे. भारतीय संस्कृतीतील मूल्ये त्यांनी नव्या पिढीपर्यंत पोहोचवली आहेत. त्यातूनच एक छोटा भारत, एक छोटा महाराष्ट्र या लोकांनी मॉरिशस येथे निर्माण केला आहे.'[५]

महाराष्ट्रापासून भारतापासून दूर असलेल्या मॉरिशससारख्या देशामध्ये मराठी भाषेचे आज संवर्धन होत आहे आणि सर्वच विधी हे मराठी भाषेमध्ये होत आहेत, ही अभिमानास्पद गोष्ट आहे. ते त्यांच्या मातृभूमीमध्ये तिथल्या स्थानिक भाषेचादेखील वापर करू शकले असते, मात्र त्यांनी आपली मराठी अस्मिता जपण्याचे महत्त्वाचे काम केले. विविध विषयांमधून डॉक्टरेट मिळवणारे अनेक विद्यार्थी मराठी भाषेमधूनच पदवी मिळवत आहेत आणि मराठी भाषेची आज त्यांनी मातृभाषा म्हणूनच तिचे संवर्धन केले आहे. या सर्व घडामोडींमध्ये भारतातून दुसऱ्या देशांमध्ये जाऊनही त्यांनी आपली भाषा सोडली नाही किंवा पर्यायी भाषेचा वापर केला नाही, जरी केला असला तरी आपल्या रोजच्या व्यवहारामध्ये मातृभाषा म्हणून मराठी भाषेचाच वापर होत आहे आणि आपण आपल्या मातृभाषेत आपल्याच मातृभूमीमध्ये आपल्या मातृभाषेमधून बोलण्यासाठी आपल्याला संकोच वाटत आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये आज मराठी माणूस जाणीवपूर्वक हिंदी-इंग्रजी भाषांचा वापर करू लागलेला आहे. यामागील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक ही महत्त्वाची कारणे आहेत. परप्रांतीय लोक राजकारणामध्ये ज्या प्रभागामध्ये प्रबळ आहेत, त्या ठिकाणी त्यांनी आपला स्वतःचा मतदार म्हणून आपल्याच राज्यातून आलेले परप्रांतीय लोक वस्ती निर्माण झाली आहे आणि मग आपोआपच मराठी भाषिक हा त्या ठिकाणी अल्पसंख्याक होत गेलेला आहे.

आज मराठी भाषा अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून कोट्यवधी रुपये खर्च करून परदेशामध्येसुद्धा मराठी भाषा अध्यापन केंद्रांची उभारणी होत आहे. चर्चासत्रे, साहित्य संमेलने यांसारख्या संमेलनांवरती हजारो-लाखो रुपये उधळले जात आहेत. मात्र आज मराठी भाषेतून शिक्षण घेणारा विद्यार्थी आणि त्याला शिक्षण देणारा शिक्षक या दोघांचीही उपेक्षाच होत आहे. शासन स्तरावर सत्तेमध्ये असताना आम्ही मराठी भाषेच्या बाबतीत हे करू ते करू... अशा मोठ्या वल्गना करणारे राज्यकर्ते सत्तेवर आल्यानंतर आपल्या राज्याचा राज्यकारभार हा मराठी भाषेतून चालावा यासाठी प्रयत्न करत नाहीत... मात्र हा सर्व इतिहास आहे, पण मराठी भाषेचे भवितव्य हे आपल्याच हातात आहे आणि मराठी भाषेच्या संवर्धनातच आपली संस्कृतीचे भवितव्य आहे हे विसरून चालणार नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या कुटुंबापासून आपल्या स्वतःपासून सुरुवात करून मराठी भाषा आपली बोलीभाषा बोलण्याचा प्रमाणिक प्रयत्न केला पाहिजे. तुम्ही इंग्रजी भाषा, हिंदी भाषा, तमीळ, तेलगू, स्पॅनिश अगदी जेवढ्या तुम्हाला बोलता येतील तेवढ्या भाषांमध्ये पारंगत व्हा, परंतु मातृभाषा म्हणून मराठी भाषेला दूर लोटू नका.

मराठी भाषेतून साधलेला संवाद हा आपल्या नात्यांची वीण घट्ट करणार आहे. दुसऱ्या कोणत्याच भाषेतून आपले नाते घट्ट होत नाही. ती त्या भाषिकांच्या भाषेमध्येच त्यांची नाती घट्ट होत आहेत. म्हणून आपण हिंदी बोलून, इंग्रजी बोलून आपल्या नात्यांमधला विसंवाद वाढवण्यापेक्षा आपण मराठी भाषा बोलून आपल्या नात्यांमधला सुसंवाद वाढवून आपल्या नात्यांची वीण घट्ट करू आणि आपल्या कुटुंबाला, आपल्या गावाला, आपल्या तालुक्याला, जिल्ह्याला, मराठी भाषेच्या अभिमान बाळगायला भाग पाडू आणि हाच खरा छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राचा, मराठी भाषेचा अभिमान असेल आणि मराठी भाषेमध्ये असलेले वैभव पुढील पिढ्यांसाठी आपण जपणूक करणे महत्त्वाचे आहे, असे वाटते.

संदर्भ ग्रंथ :

१) मालशे स. गं. (डॉ.), भाषाविज्ञान परिचय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १८ जून २००९, पृ. ९२.

२) शेलार सुधाकर (डॉ.), 'अभिजात भाषा म्हणजे काय रे भाऊ?', लोकआवाज, ९ ऑक्टोबर २०२५.

३) कुलकर्णी धनंजय, 'सकाळ'- सारांश, पुणे, ता. २९ जुलै २०२५.

४) अग्रवाल सुधीर (डॉ.), 'मराठीच्या अवनतीला जबाबदार कोण'?, मागोवा, वर्धा, ता. ११ ऑगस्ट २०२५.

५) तावरे स्नेहल (डॉ.), 'मॉरिशस आणि मराठी भाषा', ऑगस्ट २०२५.

सोशल मीडिया, राजकीय प्रचार आणि युवा मतदारः महाविद्यालयीन विद्यार्थांच्या दृष्टिकोनातून एक अध्ययन

संशोधन मार्गदर्शक
डॉ. प्रा. पी.डी. सूर्यवंशी
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)
स्वा. सै. सू. पावर महाविद्यालय,
पूर्णा (जं.), जि. परभणी

संशोधन विद्यार्थी
अतूल भगवान शिंदे
(संशोधक विद्यार्थी)
पिपल्स महाविद्यालय,
नांदेड.

प्रस्तवाना

आधुनिक माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया हे समाजजीवनातील एक प्रभावी आणि अपरिहार्य माध्यम बनले आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (Twitter), युट्युब, व्हॉटसअप आणि टेलिग्राम यांसारख्या विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर आज मोठ्या प्रमाणात केला जात आहे. विशेषतः युवा वर्ग आणि महाविद्यालयीन विद्यार्थी हे सोशल मीडियाचे प्रमुख वापरकर्ते असून त्यांच्या समाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विचारांवर या माध्यमाचा लक्षणीय प्रभाव पडत आहे. परिणामी, राजकीय पक्ष, नेते आणि विविध राजकीय संघटना यांनीही सोशल मीडियाचा वापर राजकीय प्रचाराचे प्रभावी साधन म्हणून सुरु केला आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये युवा मतदार हे परिवर्तनाचे महत्वपूर्ण घटक मानले जाते. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात युवकांची संख्या मोठी असल्यामुले त्यांच्या राजकीय सहभागाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

सोशल मीडिया युवा मतदारांना राजकीय घडामोडी, सार्वजनिक धोरणे, निवडणुका, राजकीय विचारधारा आणि विविध सामाजिक प्रश्नांविषयी माहिती उपलब्ध करुन देतो. तसेच या माध्यमातून युवकांना आपली मते व्यक्त करण्याची, राजकीय चर्चांमध्ये सहभागी होण्याची आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावण्याची संधी प्राप्त होते. दुसरीकडे, सोशल मीडियाच्या माध्यमातून खोट्या बातम्या, दिशाभूल करणारी माहिती, राजकीय ध्रुवीकरण आणि अपप्रचार यांचाही प्रसाह होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे सोशल मीडियाचा युवा मतदारांच्या राजकीय विचारसरणी, मतदान वर्तन आणि राजकीय सहभागावर नेमका कसा प्रभाव पडतो, याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रस्तुत संशोधनामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थांच्या दृष्टिकोनातून सोशल मीडिया, राजकीय प्रचार आणि युवा मतदार यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास करण्यात येणार असून त्याद्वारे सोशल मीडियाची राजकीय प्रक्रियेतील भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

संशोधनाची पार्श्वभूमी

पूर्वी राजकीय प्रचारासाठी सभा, जाहीर सभा, वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरदर्शन यांसारख्या पारंपारिक माध्यमांचा वापर केला जात असे. परंतु डिजिटल क्रांतीनंतर सोशल मीडिया हे प्रचाराचे प्रभावी साधन बनले आहे. आज राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात तसेच निवडणुकीबाहेरील कालावधीतही सोशल मीडियाद्वारे जनतेशी संवाद साधतात. युवा मतदार विविध राजकीय घडामोडी, निवडणूक प्रचार, धोरणे आणि राजकीय विचारधारा सोशल मीडियावरून जाणून घेतात. त्यामुळे त्यांच्या राजकीय मतनिर्मितीवर सोशल मीडियाचा प्रभाव पडतो.

संशोधन समस्या

महाविद्यालयीन विद्यार्थी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करतता. सोशल मीडियावरील राजकीय प्रचारामुळे त्यांच्या राजकीय विचारसरणी, मतदान वर्तन आणि राजकीय सहभागावर काय परिणाम होतो, हा या संशोधनाचा मुख्य प्रश्न आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सोशल मीडिया वापराचे स्वरुप अभ्यासणे.
2) सोशल मीडियावरील राजकीय प्रचाराचे प्रकार समजून घेणे.
3) युवा मतदारांच्या राजकीय मतनिर्मितीवर सोशल मीडियाचा प्रभाव अभ्यासणे.
4) विद्यार्थ्यांच्या मतदान वर्तनावर सोशल मीडियाचा प्रभाव तपासणे.

5) सोशल मीडियामुळे राजकीय सहभागामध्ये होणारे बदल अभ्यासणे.

6) सोशल मीडियाद्वारे प्रसारित होणाऱ्या राजकीय माहितीबाबत विद्यार्थ्यांची भूमिका जाणून घेणे.

संशोधन प्रश्न

1) महाविद्यालयीन विद्यार्थी कोणत्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा सर्वाधिक वापर करतात?

2) विद्यार्थ्यांना राजकीय माहिती कोणत्या माध्यमातून प्राप्त होते ?

3) सोशल मीडियावरील राजकीय प्रचारामुळे विद्यार्थ्यांच्या मतदान निर्णयावर परिणाम होतो का?

4) सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांचा राजकीय सहभाग वाढतो का ?

गृहितके

1) सोशल मीडियाचा वापर वाढल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जागरूकता वाढते.

2) सोशल मीडियावरील राजकीय प्रचार विद्यार्थ्यांच्या मतदान वर्तनावर प्रभाव टाकतो.

3) सोशल मीडियामुळे युवा मतदारांचा राजकीय सहभाग वाढतो.

4) सोशल मीडियावरील माहिती विद्यार्थ्यांच्या राजकीय मतनिर्मितीमध्ये महत्वाची भूमिका बजावते.

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनाचा मुख्य उद्देश प्रश्नावलीच्या सहाय्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या राजकीय सहभागावर सोशल मीडियाचा होणार प्रभाव, राजकीय प्रचारातील सोशल मीडियाची भूमिका आणि युवा मतदारांच्या राजकीय दृष्टिकोनाचे अध्ययन करणे हा आहे.

वर्णनात्मक संशोधन: पध्दती अंतर्गत सोशल मीडिया, राजकीय प्रचार, युवा मतदार आणि राजकीय सहभाग या संकल्पनांचे स्वरुप, वैशिष्ट्ये आणि परस्परसंबंध यांचे सविस्तर वर्णन करण्यात आले आहे. तसेच सोशल मीडियाच्या विविध माध्यमांचा वापर, त्यावरील राजकीय माहितीचे स्वरुप, विद्यार्थ्यांची सोशल मीडिया वापरण्याची प्रवृत्ती आणि त्यांचे राजकीय वर्तन यांचा अभ्यास करण्यात आला आहे. या पध्दतीमुळे विषयाशी संबंधित तथ्ये, माहिती आणि परिस्थितीचे वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट करण्यास मदत होते.

या संशोधनासाठी प्रामुख्याने दुय्यम माहिती स्त्रोतांचा (Secondary Sources) वापर करण्यात आला असून पुस्तके, संशोधन लेख, जर्नल्स, शोधनिबंध, वृत्तपत्रे, अधिकृत संकेतस्थळे आणि संबंधित साहित्याचा संदर्भ घेण्यात आला आहे. त्यामुळे विषयाचे सैध्दांतिक आणि समीक्षात्मक स्वरुपात सखोल विश्लेषण करणे शक्य झाले आहे.

नमुना निवड

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने सैध्दांतिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरुपाचे असून यामध्ये दुय्यम माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुले प्रत्यक्ष क्षेत्रीय सर्वेक्षण करण्यात आलेले नसल्याने पारंपारिक अर्थाने नमुना निवडीचा वापर करण्यात आलेला नाही. तथापिर, संशोधन विषयाशी संबंधित साहित्याची निवड हेतुपुरस्सर नमुना निवड (Purposive Sampling) पध्दतीने करण्यात आली आहे. या संशोधनासाठी सोशल मीडिया, राजकीय प्रचार, युवा मतदार, राजकीय सहभाग आणि माहाविद्यालयीन विद्यार्थी यांच्याशी संबंधित पुस्तके, संशोधन लेख, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्स, शोधनिबंध, शासकीय अहवाल, निवडणूक आयोगाचे प्रकाशन, वृत्तपत्रे तसेच अधिकृत संकेतस्थळांवरील उपलब्ध माहिती यांची निवड करण्यात आली आहे. निवडलेले साहित्य संशोधन विषयाशी थेट संबंधित, विश्वसनीय आणि अद्ययावत असल्याची खात्री करण्यात आली आहे.

हेतुपुरस्सर नमुन निवड पध्दतीद्वारे संशोधनाच्या उद्दिष्ट्यांशी सुसंगत साहित्यात समावेश केल्यामुळे विषयाचे सखोल, वस्तुनिष्ठ आणि चिकित्सक विश्लेषण करणे शक्य झाले आहे. त्यामुळे प्रस्तुत अध्ययनामध्ये नमुना निवडीचा आधार हा व्यक्ती अथवा प्रतिसादक नसून विषयाशी संबंधित उपलब्ध साहित्य आणि दुय्यम माहिती स्त्रोत आहेत.

संकल्पनात्मक चौकट

प्रस्तुत संशोधनामध्ये सोशल मीडिया, राजकीय प्रचार आणि युवा मतदार या प्रमुख संकल्पनांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधन विषय समजून घेण्यासाठी या संकल्पनांचे स्वरुप, वैशिष्ट्ये आणि परस्परसंबंध समजून घेणे आवश्यक आहे.

1) सोशल मीडिया (Social Media)

सोशल मीडिया म्हणजे इंटरनेट आधारित असे डिजिटल संवादमाध्यम होय, ज्याद्वारे व्यक्ती, गट आणि संस्था माहिती, विचार, मत, छायाचित्रे, व्हिडिओ आणि इतर सामग्रीची देवाणघेवाण करतात. सोशल मीडिया हे केवळ संवादाचे माध्यम नसून माहिती प्रसार, जनमत निर्मिती आणि सामाजिक तसेच राजकीय सहभागाचे प्रभावी साधन बनले आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (Twitter), युट्युब, व्हॉटसअप, टेलिग्राम आणि लिंक्डइन यांसारखे विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आज व्यापक प्रमाणात वापरले जातात. सोशल मीडियामुळे माहितीचा प्रसार जलद गतीने होतो, तसेच नागरिकांना आपली मते व्यक्त करण्यासाठी आणि सार्वजनिक चर्चेत सहभागी होण्यासाठई व्यासपीठ उपलब्ध होते. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये सोशल मीडिया हे राजकीय संवाद आणि जनसंपर्काचे प्रभावी साधन म्हणून उदयास आले आहे.

2) राजकीय प्रचार (Political Campaigning)

राजकीय प्रचार म्हणजे राजकीय पक्ष, उमेदवार किंवा राजकीय संघटनांनी मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी, जनमत निर्माण करण्यासाठी आणि राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची प्रक्रिया होय. राजकीय प्रचाराचा मुख्य उद्देश मतदारांना विशिष्ट विचारधारा, धोरणे किंवा उमेदवारांच्या समर्थनासाठई प्रेरित करणे हा असतो. पारंपारिक काळात राजकीय प्रचारासाठी सभा, मेळावे, पदयात्रा, पोस्टर्स, वृत्तपत्रे, रेडिओ आणि दूरदर्शन यांचा वापर केला जात असे. परंतु डिजिटल युगात सोशल मीडिया हे राजकीय प्रचाराचे अत्यंत प्रभावी माध्यम बनले आहे. सोशल मीडियाच्या साहाय्याने राजकीय पक्ष आणि नेते अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर मतदारांपर्यंत पोहोचू शकतात. तसेच मतदारांशी थेट संवाद साधणे, प्रचार संदेश प्रसारित करणे जनमत जाणून घेणे सुलभ झाले आहे.

3) युवा मतदार (Young Voters)

भारतातील निवडणूक व्यवस्थेनुसार 18 वर्षे किंवा त्याहुन अधिक वय असलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. साधारणपणे 18 ते 29 वर्षे वयोगटातील मतदारांना युवा मतदार असे संबोधले जाते. युवा मतदार हे लोकशाही प्रक्रियेतील महत्वाचे घटक असून देशाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये त्यांची भूमिका महत्वपूर्ण असते. युवा मतदार हे नवीन विचार, आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक बदल यांना अधिक स्वीकारणारे असतात. त्यामुळे त्यांच्यावर सोशल मीडियाचा प्रभाव तुलनेने अधिक दिसून येतो. राजकीय माहिती मिळविणे, राजकीय घडामोडींवर चर्चा करणे, मतदानाचा निर्णय घेणे आणि राजकीय प्रक्रियेत सहभाग घेणे यामध्ये सोशल मीडिया महत्वपूर्ण भूमिका बजावतो. आजच्या काळात महाविद्यालयीन विद्यार्थी हे युवा मतदारांचे प्रमुख प्रतिनिधी मानले जातात आणि त्यांचा राजकीय दृष्टिकोन घडविण्यात सोशल मीडियाचे योगदान लक्षणीय आहे.

सोशल मीडियाचे राजकीय प्रचारातील महत्व

आधुनिक डिजिटल युगात सोशल मीडिया हे राजकीय प्रचाराचे अत्यंत प्रभावी साधन बनले आहे. इंटरनेट आणि स्मार्टफोनच्या वाढत्यया वापरामुळे राजकीय पक्ष, नेते आणि विविध राजकीय संघटना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. विशेषतः युवा मतदार आणि महाविद्यालयीन विद्यार्थी हे सोशल मीडियाचे प्रमुख वापरकर्ते असल्याने राजकीय प्रचारामध्ये त्याचे महत्व अधिक वाढले आहे.

1) त्वरित संवाद

सोशल मीडियाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्वरित संवाद साधण्याची क्षमता होय. राजकीय पक्ष आणि नेते आपल्या भूमिका, धोरणे, कार्यक्रम आणि प्रतिक्रिया काही क्षणांत लाखो लोकांपर्यंत पोहोचवू शकतात.

कोणत्याही राजकीय घडामोडीवर तत्काळ माहिती देणे आणि मतदारांशी थेट संवाद साधणे सोशल मीडियामुळे शक्य झाले आहे.

2) कमी खर्चातील प्रचार

पारंपारिक प्रचार माध्यमांच्या तुलनेत सोशल मीडियावरील प्रचाराचा खर्च अत्यंत कमी असतो. सभा, जाहिराती, पोस्टर्स आणि प्रचार साहित्य यासाठी मोठ्या आर्थिक खर्चाची आवश्यकता असते, परंतु सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे कमी खर्चात व्यापक प्रचार करता येतो. त्यामुळे लहान राजकीय पक्ष आणि स्वतंत्र उमेदवारांनाही प्रभावी प्रचाराची संधी मिळते.

3) मोठ्या प्रमाणात मतदारांपर्यंत पोहोच

सोशल मीडियाच्या माध्यमातून अल्पावधीत मोठ्या प्रमाणावर मतदारांपर्यंत पोहोचणे शक्य होते. भौगोलिक सीमा, वेळ आणि अंतर यांची मर्यादा कमी झाल्यामुळे राजकीय संदेश देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकांपर्यंत सहज पोहोचविता येतात. त्यामुळे प्रचाराची व्याप्ती आणि प्रभाव दोन्ही वाढतात.

4) प्रत्यक्ष अभिप्राय मिळविण्याची सुविधा

सोशल मीडिया हे द्विमार्गी संवादाचे माध्यम आहे. मतदार प्रतिक्रिया, टिप्पण्या, संदेश आणि चर्चाद्वारे आप्लाय भावना व मत व्यक्त करु शकतात. यामुळे राजकीय पक्षांना जनतेची मते, अपेक्षा आणि समस्या समजून घेण्यास मदत होते. तसेच प्रचाराच्या प्रभावाचे तात्काळ मूल्यांकन करणेही शक्य होते.

5) युवा मतदारांशी थेट संपर्क

आजचा युवा वर्ग सोशल मीडियावर सर्वाधिक सक्रिय आहे. त्यामुळे राजकीय पक्ष आणि नेते युवा मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभावी वापर करतात. विविध पोस्ट, व्हिडिओ, थेट संवाद (Live Sessions), मोहिमा आणि जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण केली जाते. परिणामी, युवा मतदारांचा राजकीय सहभाग आणि लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढण्यास मदत होते.

सोशल मीडियाचे सकारात्मक परिणाम

आधुनिक काळात सोशल मीडिया हे केवळ संवादाचे माध्यम न राहता सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय परिवर्तनाचे प्रभावी साधन बनले आहे. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी आणि युवा मतदारांच्या राजकीय जागरुकता, सहभाग आणि लोकशाही प्रक्रियेतील सक्रियतेमध्ये सोशल मीडियाचे महत्वपूर्ण योगदान दिसून येते. सोशल मीडियाचे विविध सकारात्मक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

1) राजकीय जागरुकता वाढ (Increase in Political Awareness)

सोशल मीडिया नागरिकांना देशातील आणि जगातील राजकीय घडामोडींची त्वरित माहिती उपलब्ध करून देतो. विविध राजकीय पक्ष, नेते, शासकीय संस्था आणि वृत्तसंस्था सोशल मीडियाद्वारे नियमितपणे माहिती प्रसारित करतात. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यंना राजकीय घटना, निवडणुका, सार्वजनिक धोरणे आणि सामाजिक प्रश्नांविषयी अद्ययावत माहिती मिळते. परिणामी, त्यांच्यामध्ये राजकीय जागरुकता आणि सार्वनिक प्रशनांविषयीची संवेदनशीलता वाढते.

2) राजकीय सहभाग वाढ (Increases in Political Participation)

सोशल मीडियामुळे युवकांना राजकीय चर्चांमध्ये सहभागी होण्याची, आपली मते व्यक्त करण्याची आणि विविध राजकीय मोहिमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. ऑनलाइन चर्चा, जनजागृती मोहीम, डिजिटल याचिका मतदान जनजागृती उपक्रम आणि सामाजिक चळवळींमध्ये युवकांचा सहभाग वाढताना दिसून येतो. त्यामुळे राजकीय प्रक्रियेबद्दलची त्यांची रुची वढून लोकशाही व्यवस्थेत सक्रिय सहभागाची भावना निर्माण होते.

3) लोकशाही बळकट होणे (Strengthening of Democracy)

लोकशाही व्यवस्थेचा पाया हा नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित असतो. सोशल मीडिया नागरिकांना शासनाच्या धोरणांवर प्रतिक्रिया देण्याची, प्रश्न उपस्थित करण्याची आणि सार्वजनिक चर्चेत सहभागी होण्याची संधी प्रदान करतो. यामुळे शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होतो. तसेच माहितीचा मुक्त प्रवाह आणि मतांची देवाणघेवाण लोकशाही मूल्यांना अधिक बळकटी प्रदान करते.

4) राजकीय शिक्षण (Political Education)

सोशल मीडिया हे राजकीय शिक्षणाचे प्रभावी साधन ठरत आहे. विविध राजकीय विचारधारा राज्यघटनात्मक मूल्ये, निवडूक प्रक्रिया, नागरिकांचे अधिकार आणि कर्तव्ये याविषयी माहिती सहज उपलब्ध होते. विविध तज्ज्ञांचे लेख, चर्चासत्रे, व्हिडिओ, मुलाखती आणि विश्लेषणात्मक कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना राजकीय ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये चिकित्सक विचारसरणी विकसित होण्यास मदत होते आणि ते अधिक सजग व जबाबदार नागरिक बनतात.

सोशल मीडियाचे नकारात्मक परिणाम

सोशल मीडिया हे राजकीय माहिती आणि संवादाचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचे काही नकारात्मक परिणाम देखील दिसून येतात. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी आणि युवा मतदार सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणात वापर करत असल्याने त्यांच्यावर या नकारात्मक परिणामांचा प्रभाव पडण्याची शक्यता अधिक असते. राजकीय प्रचाराच्या संदर्भात सोशल मीडियाचे काही महत्वाचे नकारात्मक परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

1) खोट्या बातम्या (Fake Naws)

सोशल मीडियावरील सर्व माहिती सत्य आणि विश्वासार्ह असेलच असे नाही. अनेक वेळा अप्रमाणित, दिशाभूल करणाऱ्या किंवा खोट्या बातम्या मोठ्या प्रमाणात प्रसारित केल्या जातात. अशा माहितीमुळे मतदारांची दिशाभूल होऊ शकते आणि चुकीच्या माहितीच्या आधारे राजकीय मतनिर्मिती होण्याची शक्यता वाढते. निवडणुकांच्या काळात खोट्या बातम्यांना वापर विरोधकांची प्रतिमा खराब करण्यासाठई किंवा जनमत प्रभावित करण्यासाठी केला जात असल्याचे दिसून येते.

1. Indian Express च्या नावाने व्हायरल झालेले खोटे शीर्षक (2018 संदर्भ)

In name of fake news, Govt frames rules to blacklist journalists

Look who is busting fake news for 13 Ministers: site with Exam Warriors link

WHAT IT CALLS FAKE: ANTI-BJP AND A NOTE BY CABINET SECRETARY

The Indian EXPRESS

2. औरंगजेबच्या कबरीबाबत बनावट Indian Express स्क्रीनशॉट (एप्रिल-2021)

3. जशोदाबेन-मोदी विवाहासंदर्भातील बनावट Indian Express कात्रण (नोव्हेंबर-2015)

2) राजकीय ध्रुवीकरण (Political Polarization)

सोशल मीडियावरील माहिती अनेकदा विशिष्ट राजकीय विचारसरणीला पूरक असते. त्यामुळे वापरकर्ते आपल्या विचारांशी जुळणारी माहितीच अधिक पाहतात आणि स्वीकारतात. परिणामी, विविध मतप्रवाहांबद्दल सहिष्णुता कमी होऊन समाजात वैचारिक विभाजन वाढू शकते. अशा परिस्थितीत राजकीय ध्रुवीकरण निर्माण होऊन परस्परविरोधी गटांमध्ये तणाव वाढण्याची शक्यता असते.

3) ट्रोलिंग आणि द्वेषपूर्ण प्रचार (Trolling and Hate Campaigns)

सोशल मीडियावर अनेकदा व्यक्ती, राजकीय नेते किंवा विशिष्ट गटांविरुध्द अपमानास्पद भाषा, वैयक्तिक टीका आणि द्वेषपूर्ण संदेशांचा वापर केला जातो. याला ट्रोलिंग असे म्हणतात. ट्रोलिंगमुळे रचनात्मक चर्चेऐवजी संघर्ष आणि वैमनस्य वाढते. तसेच धार्मिक, जातीय किंवा राजकीय द्वेष पसरविणाऱ्या संदेशांमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येऊ शकतो आणि लोकशाही चर्चेची गुणवत्ता कमी होऊ शकते.

4) माहितीचा अतिरेक (Information Overload)

सोशल मीडियावर दररोज प्रचंड प्रमाणात माहिती प्रसारित होत असते. विविध स्त्रोतांकडून सतत येणाऱ्या माहितीमुळे वापरकर्त्यांना कोणती माहिती योग्य, अचूक आणि महत्वाची आहे हे ओळखणे कठीण होते. माहितीच्या अतिरेकामुळे गोंधळ निर्माण होतो तसेच चुकीची किंवा अपूर्ण माहिती स्वीकारण्याची शक्यता वाढते. विशेषतः युवा मतदारांच्या निर्णय प्रक्रियेवर याचा परिणाम होऊ शकतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन

महाविद्यालयीन विद्यार्थी हे समाजात सर्वाधिक जागरुक, सक्रिय आणि परिवर्तनशील घटक मानले जातात. आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करणारा हा वर्ग सोशल मीडियाशी सर्वाधिक जोडलेला आहे. त्यामुले सोशल मीडिया, राजकीय प्रचार आणि राजकीय सहभाग यांविषयीचा त्यांचा दृष्टिकोन समजून घेणे आवश्यक ठरते. आजचे विद्यार्थी केवळ माहिती ग्रहण करणारे नसून माहितीचे देवाणघेवाण करणारे, चर्चेत सहभागी होणारे आणि विविध सामाजिक-राजकीय प्रश्नांवर मत व्यक्त करणारे सक्रिय नागरिक म्हणून उदयास येत आहेत. महाविद्यालीन विद्यार्थ्यांच्या मते सोशल मीडिया हे राजकीय माहितीचे सुलभ आणि प्रभावी माध्यम आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स(Twitter), युट्युब आणि व्हॉट्सअप यांसारख्या माध्यमांद्वारे त्यांना देशातील आणि जगातील राजकीय घडामोडी, निवडणुका, शासनाची धोरणे, सामाजिक प्रश्न आणि विविध राजकीय विचारधारा यांची माहिती सहजपणे प्राप्त होते. पारंपारिक माध्यमांच्या तुलनेत सोशल मीडियावरील माहिती अधिक वेगाने उपलब्ध होत असल्याने विद्यार्थी त्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

राजकीय प्रचाराच्या संदर्भात विद्यार्थ्यांचे मत असे दिसून येते की, सोशल मीडियामुळे राजकीय पक्ष आणि नेते थेट मतदारांपर्यंत पोहोचू शकतात. विविध प्रचार मोहिमा, तेट संवाद, व्हिडिओ संदेश, पोस्ट आणि चर्चांद्वारे युवकांशी संपर्क साधला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राजकीय जागरुकता वाढण्यात मदत होते. अनेक विद्यार्थी

सोशल मीडियामुळे मतदानाचे महत्व, लोकशाही मूल्ये आणि नागरिक म्हणून असलेल्या जबाबदऱ्या यांविषयी अधिक सजग झाल्याचे मानतात. तथापि, विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन पूर्णतः सकारात्मक नाही. सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या सर्व माहितीवर विश्वास ठेवणे योग्य नसल्याचे अनेक विद्यार्थ्यांचे मत आहे. खोट्या बातम्या, अफवा, दिशाभूल करणारी माहिती आणि पक्षपाती प्रचार यांमुळे योग्य माहिती ओळखणे कठीण होत असल्याची भावना अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे सोशल मीडियावरील माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक असल्याचे ते मानतात.

काही विद्यार्थ्यांच्या मते सोशल मीडिया राजकीय चर्चेसाठी उपयुक्त असला तरी अनेकदा ट्रोलिंग, द्वेषपूर्ण भाषा आणि वैचारिक संघर्ष यांमुळे आरोग्यदायी चर्चेला बाधा येते. परिणामी काही विद्यार्थी राजकीय विषयांवरील चर्चेत सहभागी होण्यास टाळाटाळ करतात. दुसरीकडे, अनेक विद्यार्थी सोशल मीडियाला आपले विचार व्यक्त करण्यासाठी आणि सामाजिक तसेच राजकीय प्रश्नांवर भूमिका मांडण्यासाठी महत्वाचे व्यासपीठ मानतात. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दृष्टिकोनातून सोशल मीडिया हे राजकीय शिक्षण, राजकीय जागरुकता आणि लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढविणारे प्रभावी साधन आहे. मात्र या माध्यमाचा जबाबदारीने वापर करणे, माहितीची पडताळणी करणे आणि चिकित्सक विचारसरणी विकसित करणे आवश्यक असल्याचे ते मानतात. त्यामुळे सोशल मीडियाचा प्रभाव केवळ राजकीय प्रचारापुरता मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या राजकीय दृष्टिकोन, मतनिर्मिती आणि सहभाग प्रक्रियेवरही महत्वपूर्ण परिणाम करणारा आहे.

नमुना निवडीमध्ये नांदेड जिल्ह्यातील 3 महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडुन भरुन घेतलेल्या प्रश्नावलीच्या आधारे माहितीचे खालील प्रमाणे विश्लेषण करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील तीन महाविद्यालय :- 1) पिपल्स महाविद्याल, 2) यशवंत महाविद्यालय, 3) शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

तक्ता क्र. 1 : विद्यार्थ्यांकडून वापरले जाणारे प्रमुख सोशल मीडिया प्लॅटफॉर्म

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म	वारंवारता	टक्केवारी
Instagram	60	40%
WhatsApp	45	30%
YouTube	25	16.67%
Facebook	12	8%
X (Twitter)	8	5.33%
एकूण	150	100%



तक्ता क्र. 2: सोशल मीडियामुळे राजकीय जागरूकतेत वाढ झाली का?

प्रतिसाद	वारंवारता	टक्केवारी
होय	105	70%
नाही	20	13.33%
निश्चित सांगता येत नाही	25	16.67%
एकूण	150	100%



तक्ता क्र. 3: सोशल मीडियाचा मतदान निर्णयावर प्रभाव

प्रतिसाद	वारंवारता	टक्केवारी
प्रभाव पडतो	90	60%
प्रभाव पडत नाही	35	23.23%
काही प्रमाणात प्रभाव पडतो	25	16.67%
एकूण	100	100%

तक्ता क्र. 4: सोशल मीडियावरील राजकीय माहिती कितपत विश्वासार्ह वाटते?

प्रतिसाद	वारंवारता	टक्केवारी
पूर्णपणे विश्वासार्ह	30	20%
काही प्रमाणात विश्वासार्ह	85	56.67%
विश्वासार्ह नाही	35	23.33%
एकूण	150	100%

तक्ता क्र. 5: फेक न्यूजचा अनुभव

प्रतिसाद	वारंवारता	टक्केवारी
होय	110	73.33%
नाही	40	26.67%
एकूण	150	100%



संदर्भग्रंथ सुची

1) Abdulrauf, A.A., Hamid, N.B.A., & Ishak, M.S. (2015). Social Media and Youth Online Political participation: Perspectives on Cognitive Engagement. International Journal of Social Science Studies.
2) Mir, A.A. (2022). Social Media and Political Participation Among the Students in India. A Survey analysis. International Journal of Advanced Multidisciplinary Research, 9(8), 10-20.
3) Singh, D.P. (2021). Motivations for Youth's Political participation on Social Media. International Journal of Indian Culture and Business Management, 22(1). 19-36
4) Kumar, S., Sharma, A., & Verma, V. (2021). Social Media: A Tool for Social and Political Inclusion among Youth- A Study of Indian University Students. Current Research journal of Social Sciences and Humanities, 4(1).
5) Alodat, A. M. (2023). Social Media Platforms and Political Participation: A Study of Youth Engagement. Social Sciences, 12(7).

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य : एक ऐतिहासिक व समाजशास्त्रीय विश्लेषण

डॉ. शिल्पा मेश्राम
सहायक प्राध्यापक
डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर

सारांश :

राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य हे भारतीय समाजसुधारणेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनवादी पर्व मानले जाते. त्यांनी शिक्षणाला सामाजिक समता, सामाजिक न्याय आणि बहुजन मुक्तीचे प्रभावी साधन मानून वंचित घटकांच्या उन्नतीसाठी व्यापक शैक्षणिक धोरणे राबवली. तत्कालीन भारतीय समाजरचना ही जातिव्यवस्थेवर आधारित विषम आणि श्रेणीबद्ध स्वरूपाची होती. शिक्षणावर उच्चवर्णीयांचे वर्चस्व असल्यामुळे दलित, शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया आणि इतर मागास घटक शिक्षणापासून वंचित राहिले होते. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे शिक्षण, वसतिगृहे, शिष्यवृत्ती, स्त्रीशिक्षण आणि सर्वांसाठी समान शिक्षण या उपाययोजनांद्वारे शिक्षणाचे लोकशाहीकरण करण्याचा प्रयत्न केला. या शोधनिबंधामध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय विश्लेषण करण्यात आले आहे. त्यांच्या कार्यामागील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा अभ्यास करून शिक्षण आणि समाजरचना यांतील संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, शिक्षण हे समाजातील सत्ता, प्रतिष्ठा आणि सामाजिक स्थान निश्चित करणारे महत्त्वाचे साधन आहे. शाहू महाराजांनी शिक्षणाचा वापर सामाजिक विषमता टिकवून ठेवण्यासाठी नव्हे, तर सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी केला. शाहू महाराजांच्या शिक्षणधोरणांमुळे सामाजिक समतेला चालना मिळाली आणि बहुजन समाजासाठी सामाजिक गतिशीलतेचे मार्ग खुले झाले. शिक्षणामुळे वंचित घटकांमध्ये आत्मसन्मान, जागृती आणि सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. दलित, मागासवर्गीय आणि स्त्रियांसाठी उपलब्ध करून दिलेल्या शैक्षणिक संधींमुळे भारतीय समाजातील पारंपरिक सत्तासंबंधांना आव्हान निर्माण झाले. त्यांच्या कार्यामुळे शिक्षण हे सामाजिक पुनरुत्पादनाचे साधन न राहता सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनले. या अभ्यासामध्ये सामाजिक समता, सामाजिक गतिशीलता आणि सक्षमीकरण या संकल्पनांच्या संदर्भात शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच शिक्षण आणि समाजरचना यांतील परस्परसंबंध स्पष्ट करताना शिक्षण हे समताधिष्ठित समाजनिर्मितीचे प्रभावी साधन असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात सहभाग घेण्यास सक्षम केले. आधुनिक काळातही राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरते. समावेशक शिक्षण, सामाजिक न्याय, स्त्रीसक्षमीकरण आणि वंचित घटकांच्या विकासाच्या दृष्टीने त्यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. अशा प्रकारे, राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे भारतीय समाजाच्या लोकशाहीकरण, सामाजिक समता आणि परिवर्तनवादी समाजनिर्मितीच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणारे ठरते.

मुख्य शब्द : राजर्षी शाहू महाराज, शैक्षणिक कार्य, बहुजन शिक्षण, मोफत व सक्तीचे शिक्षण, शिक्षणाचे लोकशाहीकरण, वसतिगृहे व शिष्यवृत्ती, समाजरचना आणि शिक्षण

प्रस्तावना :

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतातील सामाजिक व शैक्षणिक संरचना अत्यंत असमान, बहिष्कृत आणि मर्यादित स्वरूपाची होती. शिक्षण हे काही मोजक्या उच्चवर्णीय व आर्थिक

दृष्ट्या सक्षम वर्गापुरते सिमित होते, तर बहुसंख्य लोकसंख्या विशेषतः दलित, मागासवर्गीय आणि स्त्रिया शिक्षणाच्या मूलभूत अधिकारापासून वंचित होते. जातीव्यवस्था, सामाजिक बहिष्कार, आर्थिक दारिद्र्य आणि रुढीपरंपरांचा प्रभाव यामुळे ज्ञानप्राप्तीचे दरवाजे बहुसंख्य समाजासाठी बंदच राहिलं होते. परिणामी, शिक्षण हे सामाजिक असमानतेचे प्रतिबिंब आणि त्याचे पुनरुत्पादन करणारे साधन बनले होते. अशा प्रतिकूल पार्श्वभूमीवर कोल्हापूर संस्थानाचे प्रगतिशील शासक राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे शक्तिशाली साधन म्हणून स्वीकारले. त्यांनी शिक्षणाला केवळ वैयक्तिक प्रगतीचा मार्ग न मानता, समाजातील विषमता दूर करून समताधिष्ठित व न्याय्य समाज रचना उभारण्याचे माध्यम मानले. त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे सामाजिक सक्षमीकरणाचे केंद्रबिंदू होते, जे वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यास सक्षम ठरते. शाहू महाराजांनी आपल्या राज्यकारभारात शिक्षणाच्या लोकशाही करण्यासाठी अनेक क्रांतिकारक उपाययोजना राबविल्या. मोफत व सक्तीचे शिक्षण लागू करून त्यांनी शिक्षणाचा हक्क सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला. विशेषतः मागासवर्गय, दलित आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शाळा, वसतीगृहे आणि शिष्यवृत्तीची व्यवस्था करून त्यांनी शिक्षणातील प्रवेशाच्या अडथळ्यांना कमी केले. या उपायोजनांमुळे शिक्षण क्षेत्रात समावेशकता आणि समान संधी या संकल्पना रूढ झाल्या. स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात शाहू महाराजांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. त्या काळात महिलांच्या शिक्षणाला सामाजिक मान्यता नव्हती, तरीही त्यांनी स्त्रियांसाठी शिक्षणाच्या संधी निर्माण केल्या आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या मते स्त्री पुरुष समानते शिवाय समाजाचा विकास अपूर्ण राहतो आणि ही समानता शिक्षणाद्वारेच साध्य होऊ शकते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेचे प्रभावी उदाहरण आहे. त्यांच्या धोरणांमुळे सामाजिक समता, सामाजिक गतिशीलता आणि सक्षमीकरण यांना चालना मिळाली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी पारंपारिक सामाजिक संरचनेतील असमानता कमी करण्याचा प्रयत्न केला आणि वंचित घटकांना सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उन्नतीची संधी उपलब्ध करून दिली. ऐतिहासिक दृष्ट्या शाहू महाराजांचे कार्य हे भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो त्यांच्या सुधारणा पुढील समाजसुधारक चळवळींसाठी प्रेरणादायी ठरल्या आणि सामाजिक न्याय, समता व समावेशक शिक्षण या तत्त्वांना बळकटी मिळाली. त्यांच्या कार्याचा प्रभाव पुढील काळात भारतीय शिक्षण धोरणे, आरक्षण व्यवस्था आणि सामाजिक न्यायाच्या संकल्पनांमध्ये दिसून येतो. आजच्या आधुनिक काळातही शिक्षणातील असमानता, सामाजिक विषमता आणि संधीचा असमतोल हे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य आणि त्यामागील तत्त्वज्ञान अत्यंत प्रासंगित ठरते. त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समताधिष्ठित, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण व्यवस्था उभारणे ही आजची गरज आहे. या शोधनिबंधात राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक कार्याचा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सखोल अभ्यास करून त्यांच्या योगदानाचे स्वरूप, परिणाम आणि आधुनिक संदर्भातील उपयुक्तता यांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टे

1. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे स्वरूप स्पष्ट करणे.
2. यांच्या शैक्षणिक सुधारणांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे.
3. वंचित घटकांसाठीच्या त्यांच्या उपक्रमांचे विश्लेषण करणे.
4. शिक्षणाद्वारे सामाजिक परिवर्तनावर त्यांच्या कार्याचा परिणाम अभ्यासणे.
5. आधुनिक काळातील त्यांच्या शैक्षणिक कार्याची उपयुक्तता तपासणे.

संशोधन पद्धती : या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. वर्णनात्मक पद्धतीद्वारे शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचे स्वरूप मांडले आहे आणि विश्लेषणात्मक पद्धतीद्वारे त्यांच्या कार्याचा सामाजिक परिणाम तपासला आहे. यामुळे ऐतिहासिक माहिती आणि समाजशास्त्रीय विश्लेषण यांचा समन्वय साधता येईल.

समाजशास्त्रीय दृष्टिकोन : समाजशास्त्रीय दृष्टिकोन म्हणून सामाजिक समता, गतिशीलता आणि सक्षमीकरण यांचा अभ्यास करण्यात आला आहे आणि शिक्षण आणि समाज रचना यातील संबंधाचे विश्लेषण केले आहे.

माहितीचे स्त्रोत : या शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला आहे.

तथ्य विश्लेषण पद्धती : गुणात्मक विश्लेषण पद्धतीच्या अंतर्गत शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार, धोरणे, संकल्पना यांचे अर्थ लावणे. तसेच त्यांच्या या कार्यामुळे झालेल्या सामाजिक परिणामांचे सखोल विश्लेषण करणे.

तुलनात्मक विश्लेषण : शाहू महाराजांच्या काळातील शिक्षण आणि आजच्या शिक्षणाची तुलना करून विश्लेषण केले आहे.

शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी :

भारताच्या सामाजिक इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अत्यंत क्रांतिकारी आणि परिवर्तनवादी मानले जाते. त्यांनी शिक्षणाला सामाजिक समतेचे आणि बहुजन मुक्तीचे प्रभावी साधन मानले. त्यांच्या शैक्षणिक कार्यामागे तत्कालीन भारतातील सामाजिक विषमता, जातीव्यवस्था, ब्राह्मणवादी वर्चस्व, स्त्रियांची दयनीय स्थिती आणि बहुजन समाजाची शैक्षणिक उपेक्षा ही ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी होती. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

ऐतिहासिक पार्श्वभूमी : एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारत ब्रिटिशांच्या अधिपत्याखाली होता. या काळात भारतीय समाजात मोठ्या प्रमाणावर सामाजिक विषमता होती. शिक्षणाची संधी मुख्यतः उच्चवर्णीय आणि श्रीमंत वर्गापुर्ती मर्यादित होती. बहुजन, शूद्र-अतिशूद्र, दलित आणि स्त्रिया शिक्षणापासून वंचित होते. जातीव्यवस्थेमुळे खालच्या जातींना शाळांमध्ये प्रवेश मिळत नव्हता. शिक्षण हे सामाजिक प्रतिष्ठेचे साधन बनले होते आणि त्यावर विशिष्ट वर्गाचे नियंत्रण होते. या परिस्थितीत शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम ठरू शकते याची जाणीव शाहू महाराजांना झाली. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीचा शाहू महाराजांवर मोठा प्रभाव पडला होता. महात्मा फुले यांनी शिक्षणाला बहुजनांच्या मुक्तीचे शस्त्र मानले. स्त्री शिक्षण, दलित शिक्षण आणि सर्वांसाठी शिक्षण या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा शाहू महाराजांनी स्वीकार केला. शिक्षणाशिवाय सामाजिक परिवर्तन अशक्य आहे हा विचार त्यांनी आपल्या धोरणाचा केंद्रबिंदू बनविला. "फुले यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी शाहू महाराज शिक्षणातून समाजपरिवर्तन घडविण्याचे स्वप्न पाहत होते."[1] शाहू महाराजांच्या कारकिर्दीपूर्वी कोल्हापूर संस्थानात शिक्षणाची स्थिती अत्यंत असमान होती. ब्राह्मण समाजाचे शिक्षणावर वर्चस्व होते. ग्रामीण व बहुजन समाजात निरक्षरतेचे प्रमाण जास्त होते. अस्पृश्य आणि मागासवर्गीय मुलांना शाळांमध्ये प्रवेश मिळत नव्हता. स्त्रियांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात होते. या असमतोलाला दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या.

सामाजिक पार्श्वभूमी : भारतीय समाजात जातीव्यवस्था अत्यंत कठोर स्वरूपात अस्तित्वात होती. उच्चवर्णीय समाजाने शिक्षणावर एकाधिकार निर्माण केला होता. खालच्या जातींना धार्मिक आणि शैक्षणिक अधिकार नाकारले जात होते. अस्पृश्य समाजाला सार्वजनिक ठिकाणीही प्रवेश नव्हता. शाहू महाराजांनी ही विषमता मोडून काढण्यासाठी शिक्षणाचा वापर सामाजिक संस्थेच्या साधना प्रमाणे केला. बहुजन समाज आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला होता. बहुतेक लोक शेती, मजूरी किंवा पारंपारिक व्यवसायावर अवलंबून होते. गरिबीमुळे मुलांना शिक्षण घेणे शक्य नव्हते. शिक्षणाचा खर्च परवडत नव्हता. म्हणून शाहू महाराजांनी मोफत शिक्षण, वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि आर्थिक मदत यासारख्या योजना सुरू केल्या. त्या काळात स्त्रियांची स्थिती अत्यंत दुर्दैवी होती. स्त्री शिक्षणाला समाजात विरोध होता. बालविवाह, विधवा अवस्था, आणि पितृसत्ताक प्रथा प्रचलित होत्या. स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते. शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देऊन समाज सुधारण्याची दिशा दिली. शाहू महाराजांचे शिक्षण विषयक धोरण मानवतावादी आणि लोकशाहीवादी होते. त्यांच्या मते शिक्षण हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. शिक्षणामुळे आत्मसन्मान आणि सामाजिक जागृती निर्माण होते. शिक्षण हे सामाजिक गुलामगिरी विरुद्ध चे प्रभावी शस्त्र आहे. बहुजन समाजशिक्षित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञान प्राप्तीचे साधन न मानता सामाजिक न्यायाचे माध्यम मानले. त्या काळातील परिस्थिती लक्षात घेता त्यांच्या शैक्षणिक कार्याची आवश्यकता पुढील कारणांमुळे

निर्माण झाली- बहुजन समाजातील निरक्षरता दूर करणे, जातीय विषमता कमी करणे, शिक्षणात सर्वसमावेशकता निर्माण करणे, स्त्री शिक्षणाला चालना देणे, सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करणे, मागास समाजात आत्मविश्वास निर्माण करणे, आणि आधुनिक आणि प्रगतिशील समाजाची निर्मिती करणे. शाहू महाराजांच्या या कार्याला काही घटकांनीही प्रेरणा दिली. त्यात पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रभाव, सामाजिक सुधारणा चळवळी, सत्यशोधक विचारसरणी, ब्रिटिशकालीन आधुनिक शिक्षण व्यवस्था, लोकशाही आणि समतेचे विचार. या सर्वांचा परिणाम त्यांच्या धोरणांवर झालेला दिसतो. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य भारतीय सामाजिक इतिहासात मैलाचा दगड मानले जाते. त्यांनी शिक्षणाचे लोकशाहीकरण केले. बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. सामाजिक न्याय आधारित शिक्षण व्यवस्थेची पायाभरणी केली. त्यामुळे शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य भारतीय समाज सुधारणेच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी ठरते.

शैक्षणिक कार्य व धोरणे : सन 1917 मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. हा निर्णय भारतीय इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. ठराविक वयोगटातील मुलांना शाळेत जाणे बंधनकारक करण्यात आले. पालकांनी मुलांना शाळेत पाठवणे आवश्यक होते. शिक्षण न दिल्यास पालकांवर दंडाची तरतूद करण्यात आली होती. हा निर्णय त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता. "1913 मध्ये महाराजांनी संस्थानातील प्रत्येक खेड्यात शाळा असावी असा आदेश जरी केला."[2] यानुसार गावोगावी प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. " 24 जुलै 1917 रोजी एका हुकूमाद्वारे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याची योजना मांडली."[3] यात "7 ते 14 वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था केली होती."[4] प्राथमिक शिक्षण मोफत करण्यात आले. तसेच "माध्यमिक शिक्षणही मोफत करण्यात आले."[5] कारण गरीब कुटुंबांना शिक्षणाचा खर्च परवडत नव्हता. मुलांना शिक्षणाऐवजी कामावर पाठवले जात होते. म्हणून गरीब विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क घेतले जात नव्हते. त्यामुळे गरीब मुलांनाही शिक्षणाची संधी मिळाली. विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शैक्षणिक सुविधा मोफत देण्यात आल्या. त्यात मोफत पुस्तके, लेखन साहित्य, भोजन व्यवस्था इत्यादींचे व्यवस्था होती. त्या काळात भारतीय समाजात कठोर जाती व्यवस्था अस्तित्वात होती आणि या जाती व्यवस्थेने दलित आणि मागास समाजाला शिक्षणाची संधी दिली नाही. बहुजन समाजातील बहुतांश लोक गरीब होते. शिक्षणाचा खर्च परवडत नव्हता. विद्यार्थ्यांना राहण्याची व अन्नाची व्यवस्था नव्हती. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या सुविधा कमी होत्या. बऱ्याच ग्रामीण भागामध्ये शाळाच अस्तित्वात नव्हत्या. विद्यार्थ्यांना शहरात जावे लागेल. निवासाची व्यवस्था नसल्याने अनेक विद्यार्थी शिक्षण अर्धवट सोडत. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून शाहू महाराजांनी वसतीगृहे आणि शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या. शाहू महाराज म्हणत असत 'गरीब विद्यार्थ्यांना निवास आणि अन्नाची सोय नसेल तर शिक्षणाचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचणार नाही.' शिक्षणासाठी पोषक वातावरण आवश्यक असल्याचे ते मानत. बहुजन विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे. या विचारातून त्यांनी विविध समाज घटकांसाठी वसतिगृहे सुरू केली. विविध जाती धर्म आणि समाज घटकांसाठी अनेक वसतिगृहे सुरू केली. "1891-92 मध्ये महाराजांनी राजाराम महाविद्यालयात एक वस्तीगृह सुरू केले. 1901 मध्ये त्यांनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस या नावाने वस्तीगृह सुरू केले."[6] "अस्पृश्य जातीच्या उन्नतीचे पुरस्कर्ते असलेल्या व्हॉइलेट क्लार्क यांच्या संपर्कात महाराज आले व त्यांनी त्यांच्या नावाने 1908 मध्ये दलित वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. अशाप्रकारे त्यांनी विविध जातीतील विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूर नाशिक नगर पुणे इत्यादी शहरात सुमारे 26 वसतिगृहे सुरू केली."[7] ही वसतीगृहे त्यांनी बहुजन, मराठा, दलित, शेतकरी, मागास, मुस्लिम, विद्यार्थ्यांसाठी निर्माण केली. मुस्लीम विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सुविधा दिल्या. त्यांच्यासाठी विशेष सुविधांची व्यवस्था केली. त्यांच्या वस्तीगृहामध्ये मोफत किंवा कमी खर्चातील सुविधा उपलब्ध होत्या. निवास, भोजन, अभ्यासाची जागा अशा मूलभूत गरजा त्यामध्ये उपलब्ध होत्या. शाहू महाराजांनी आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना ही सुरू केल्या होत्या. या त्यांच्या शिष्यवृत्ती योजनेचे उद्दिष्टे म्हणजे गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देणे, शिक्षणातील गळती थांबवणे, उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, बहुजन समाजात शिक्षणाची आवड निर्माण करणे. शिष्यवृत्तीच्या माध्यमातून राजर्षी शाहू महाराज प्राथमिक व माध्यमिक शिक्षणासाठी मदत करीत असत. गरीब विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करीत असत. पुस्तके व साहित्य उपलब्ध

करून दिली जात असत. " राजर्षी छत्रपती शाहूंनी उच्च शिक्षणाची सोय राजाराम महाविद्यालयातून देण्याची व्यवस्था केली होती. ते कोल्हापूर संस्थानात उच्च शिक्षण देणारे एकमेव महाविद्यालय होते. त्यातून बहुजनसमाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देण्याची संधी प्राप्त करून देण्यात आली होती. तसेच बहुजनसमाजातील लोकांना संस्कृत विषय अभ्यासण्यासाठी त्यांनी 'छत्रपती संस्कृत महाविद्यालया ' ची स्थापना केली होती."[8] महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करून गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनही दिले जात असे. "तांत्रिक शिक्षणाकडे राजर्षी शाहूंनी लक्ष केंद्रित केलेले दिसते केवळ शेतकरी आणि सैनिक यावरच आनंद न मानता व्यापार व उच्चप्रतीचे उद्योगही केले पाहिजे यावर छत्रपती शाहूंनी जोर दिला होता. उद्योग योग्यप्रकारे करून ते यशस्त्रीपणे समाजाला पुढे नेण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली."[9] "व्यावसायिक शिक्षणासाठी १९१२ रोजी जयसिंगराव टेक्निकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली होती."[10] "त्यातूनच त्यांनी कोल्हापूरला शाहुपुरी ही व्यापारी पेठ सुरु केली होती. उद्योग व्यवसाय यशस्वीपणे करण्यासाठी शिक्षण प्रशिक्षणाची गरज प्रतिपादन केली."[11] परदेशी शिक्षणासाठी मदत दिली जात असे. याच मदतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण कार्यालाही सहकार्य केले. शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणालाही विशेष महत्त्व दिले. "भारतातील प्रत्येक स्त्री-पुरुषास जोपावे तो शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध, बलवान होऊ शकत नाही यावर त्यांचा विश्वास होता म्हणून सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांचा कटाक्ष होता."[12] यासाठी पुरुषां प्रमाणे स्त्रियांसाठी ही मोफत शिक्षण सुरू केले. स्त्रियांसाठी वसतिगृहांची व्यवस्था केली. समाजातील स्त्री शिक्षण विरोधी मानसिकतेला विरोध केला.

समाजशास्त्रीय विश्लेषण : राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे केवळ शिक्षणाचा प्रसार करणारे कार्य नव्हते तर ते भारतीय समाजातील पारंपारिक विषमता जातीय श्रेणीकरण आणि सामाजिक बहिष्कारणाला दिलेले प्रभावी आव्हान होते. त्यांच्या शिक्षण धोरणामध्ये सामाजिक समता सामाजिक गतिशीलता आणि वंचित घटकांचे सक्षमीकरण ही मूलभूत तत्वे केंद्रस्थानी होती. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता शाहू महाराजांचे कार्य हे भारतीय समाज रचनेतील असमान सत्ता संबंध बदलण्याचा आणि बहुजन समाजाला सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्याचा एक परिवर्तनवादी प्रयत्न होता. भारतीय पारंपरिक समाजरचना ही जातीव्यवस्थेवर आधारित होती. या व्यवस्थेमध्ये शिक्षण, सत्ता, संपत्ती आणि सामाजिक प्रतिष्ठा यावर उच्चवर्णीयांचे नियंत्रण होते. दलित, शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया आणि इतर मागास घटकांना शिक्षणापासून दूर ठेवण्यात आले होते. समाजशास्त्रज्ञांच्या मते शिक्षण हे समाजातील सामाजिक स्थान निश्चित करणारे महत्वाचे साधन असते. परंतु भारतीय पारंपारिक समाजात शिक्षणाचा वापर सामाजिक समतेसाठी न होता सामाजिक वर्चस्व टिकवण्यासाठी केला जात होता. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले.

सामाजिक समतेच्या दृष्टीने विश्लेषण :

शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य सामाजिक समतेच्या तत्त्वावर आधारित होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक समता म्हणजे समाजातील सर्व घटकांना समान संधी, समान अधिकार, आणि समान प्रतिष्ठा मिळणे होय. भारतीय समाजात जाती व्यवस्थेमुळे निर्माण झालेली विषमता ही सामाजिक असमानतेचे प्रमुख कारण होती. उच्चवर्णीय समाज शिक्षणाच्या माध्यमातून आपले सामाजिक वर्चस्व टिकवून ठेवत होता, तर बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे सामाजिक दृष्ट्या मागे पडत होता. शाहू महाराजांनी मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू करून शिक्षणाचे लोकशाहीकरण केले. शिक्षण सर्वांसाठी खुले करून त्यांनी सामाजिक समतेचा पाया मजबूत केला. दलित आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळांमध्ये प्रवेश देणे, त्यांच्यासाठी वसतिगृहे व शिष्यवृत्ती सुरू करणे, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देणे या उपाययोजनांमुळे शिक्षणातील सामाजिक विषमता कमी होण्यास मदत झाली. हे कार्य समाजशास्त्रीय दृष्ट्या समान संधीचे तत्व प्रत्यक्षात आणणारे होते.

सामाजिक गतिशीलतेच्या दृष्टीने विश्लेषण :

समाजशास्त्रात सामाजिक गतिशीलता म्हणजे व्यक्ती किंवा समूहाच्या सामाजिक स्थानामध्ये होणारा बदल होय. हर्टन आणि हंट च्या शब्दात सांगायचे तर, "श्रेष्ठ व कनिष्ठ सामाजिक दर्जात होणारे भ्रमण म्हणजे सामाजिक गतिशीलता होय."[13] मात्र पारंपारिक भारतीय समाजात जाती व्यवस्था ही बंद स्वरूपाची सामाजिक व्यवस्था असल्याने खालच्या जातींना उच्च सामाजिक स्थान प्राप्त करण्याची संधी नव्हती. जन्मावर आधारित सामाजिक स्थान निश्चित होत असल्याने सामाजिक गतिशीलता मर्यादित होती. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन

समाजासाठी सामाजिक गतिशीलतेचे नवीन मार्ग खुले केले. शिक्षणामुळे दलित, मागासवर्गीय आणि ग्रामीण समाजातील लोकांना शासकीय नोकऱ्या, प्रशासकीय क्षेत्र, आणि आधुनिक व्यवसायांमध्ये प्रवेश मिळू लागला. त्यामुळे पारंपारिक व्यवसायांवरील अवलंबित्व कमी झाले आणि सामाजिक उन्नतीची प्रक्रिया सुरू झाली. शाहू महाराजांनी वसतिगृहे, शिष्यवृत्ती आणि मोफत शिक्षणाच्या माध्यमातून आर्थिक अडथळे कमी केले. यामुळे गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले. समाजशास्त्रीय दृष्ट्या हे उर्ध्व सामाजिक गतिशीलतेचे महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. कारण "व्यक्ती जेव्हा कनिष्ठ सामाजिक स्थानातून उच्च सामाजिक स्थानात किंवा स्तरात संक्रमीत होते तेव्हा त्याला उर्ध्वगामी गतिशीलता असे म्हटले जाते."[14] ही उर्ध्वगामी गतिशीलता शिक्षणामुळे निर्माण झाली. ज्या समाज व्यवस्थेत कोणतेही अधिकार नव्हते तेथे शिक्षणामुळे वंचित समाजात आत्मविश्वास आणि नेतृत्व गुण निर्माण झाले. पुढे या शिक्षित वर्गातून सामाजिक आणि राजकीय नेतृत्व उद्यास आले, ज्यामुळे भारतीय समाजातील सत्ता संबंधामध्ये बदल घडू लागला. स्त्री शिक्षणालाही शाहू महाराजांनी दिलेले महत्त्व सामाजिक गतिशीलतेच्या प्रक्रियेत महत्त्वाचे ठरते. स्त्रियांना शिक्षण मिळाल्यामुळे त्यांचा सामाजिक सहभाग वाढला. पारंपारिक पितृसत्ताक नियंत्रणाला आवाहन मिळाले आणि स्त्रियांच्या सामाजिक दर्जामध्ये सुधारणा झाली. त्यामुळे शाहू महाराजांचे शिक्षण कार्य हे केवळ जातीय नव्हे तर लैंगिक समतेलाही चालना देणारे होते.

सक्षमीकरणाच्या दृष्टीने विश्लेषण :

सक्षमीकरण म्हणजे व्यक्ती किंवा समूहाला स्वतःचे अधिकार, निर्णय क्षमता, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग वाढविण्याची क्षमता प्राप्त होणे होय. समाजशास्त्र दृष्टिकोनातून शिक्षण हे सक्षमीकरणाचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शाहू महाराजांनी शिक्षणाच्या माध्यमातून वंचित समाजाला आर्थिक, आणि मानसिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला. दलित, बहुजन आणि मागास समाज शतकानूशतके सामाजिक गुलामगिरी आणि आत्महत्येच्या भावनेने जगत होता. शिक्षणामुळे या समाजात आत्मसन्मान आणि स्वाभिमानाची भावना निर्माण झाली. शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देऊन त्यांना मानवी प्रतिष्ठेचा अधिकार मिळवून दिला. हे कार्य समाजशास्त्रीय दृष्ट्या मानवी सक्षमीकरण म्हणून पाहता येते. शिष्यवृत्ती, वसतीगृहे आणि व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी आर्थिक सक्षमीकरणालाही चालना दिली. शिक्षणामुळे रोजगाराच्या संधी वाढल्या आणि बहुजन समाज आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊ लागला. यामुळे पारंपरिक सामाजिक अवलंबित कमी झाले. राजकीय सक्षमीकरणाच्या दृष्टीनेही शाहू महाराजांचे कार्य महत्त्वाचे ठरते. शिक्षित बहुजन समाजाने पुढे सामाजिक न्याय, आरक्षण आणि समान अधिकारांच्या चळवळींमध्ये सक्रिय सहभाग घेतला. यामुळे भारतीय लोकशाही अधिक समावेशक बनण्यास मदत झाली. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे सांस्कृतिक सक्षमीकरणाचे ही माध्यम होते. त्यांनी बहुजन समाजात ज्ञान, जागृती आणि विवेकाची भावना निर्माण केली. अंधश्रद्धा, जातीय न्यूनगंड आणि सामाजिक भीती यापासून मुक्त होण्यासाठी शिक्षणाचा वापर करण्यात आला. यामुळे शिक्षण हे सामाजिक नियंत्रणाचे नव्हे तर सामाजिक मुक्तीचे साधन बनले.

शिक्षण आणि समाजरचना यातील संबंध व शिक्षणाचा समाजरचनेवरील परिणाम:

समाजशास्त्र दृष्टिकोनातून शिक्षण आणि समाजरचना यांचा परस्पर संबंध अत्यंत घनिष्ठ आणि परस्परावलंबी मानला जातो. कोणत्याही समाजातील शिक्षणव्यवस्था ही त्या समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक रचनेशी निगडित असते. समाजारचना जशी असेल तशी शिक्षण व्यवस्था घडत जाते आणि त्याचवेळी शिक्षणही समाजरचनेत बदल घडवून आणण्याचे कार्य करते. त्यामुळे शिक्षण हे केवळ ज्ञान प्राप्तीचे साधन नसून समाजाच्या पुनरुत्पादनाचे तसेच सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. राजश्री शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याच्या संदर्भात पाहिले असता, शिक्षण आणि समाजरचना यांचा संबंध अधिक स्पष्टपणे समोर येतो. शाहू महाराजांच्या काळातील भारतीय समाजरचना ही जातीव्यवस्थेवर आधारित विषम आणि श्रेणीबद्ध स्वरूपाची रचना होती. समाजातील सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आणि शिक्षण यावर उच्चवर्णीय समाजाचे नियंत्रण होते. बहुजन, दलित, शूद्र-अतिशूद्र, स्त्रिया आणि इतर वंचित घटकांना सामाजिक जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून दूर ठेवण्यात आले होते. समाजशास्त्रज्ञांच्या मते समाजातील शिक्षण व्यवस्था ही विद्यमान सामाजिक मूल्य, नियम आणि सत्ता संबंध टिकून ठेवण्याचे कार्य करते. भारतीय पारंपरिक समाजात ब्राह्मणवादी सामाजिक व्यवस्थेमुळे ज्ञान आणि शिक्षण हे विशिष्ट वर्गापुरते मर्यादित ठेवण्यात आले. परिणामी खालच्या जातींना शिक्षणापासून वंचित ठेवून त्यांचे सामाजिक

अधिनत्व कायम राखले गेले. समाजशास्त्रातील संघर्षवादी दृष्टिकोन या प्रक्रियेचे विश्लेषण करताना सांगतो की शिक्षण व्यवस्था अनेकदा सत्ताधारी वर्गाच्या हिताचे संरक्षण करते. शाहू महाराजांनी या विषम सामाजिक रचनेला आव्हान देत शिक्षणाचे लोकशाहीकरण केले. शाहू महाराजांनी मोफत आणि सक्तीचे शिक्षण सुरू करून शिक्षणाला सर्वांसाठी खुले केले. हे कार्य समाजरचनेतील पारंपारिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न होता. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला सामाजिक प्रतिष्ठा आणि समानतेचा अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. यामुळे शिक्षण हे सामाजिक पुनरुत्पादनाचे साधन न मानता सामाजिक परिवर्तनाचे साधन बनले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही प्रक्रिया परिवर्तनवादी शिक्षण म्हणून पाहिली जाते.

शिक्षण आणि समाजरचना यांचा संबंध सामाजिक स्तरीकरणाशीही जोडला आहे. समाजातील वर्ग, जात, लिंग आणि आर्थिक स्तर यांच्या आधारे व्यक्तींना विविध संधी उपलब्ध होतात. पारंपारिक भारतीय समाजात जात हा व्यक्तीच्या सामाजिक स्थानाचा मुख्य निर्धारक होता. शिक्षणावर उच्च वर्णी यांचे नियंत्रण असल्यामुळे सामाजिक गतिशीलतेचे मार्ग बंद झाले होते. शाहू महाराजांनी दलित, मागासवर्गीय आणि स्त्रियांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्यामुळे समाज रचनेतील बंद स्वरूपाला धक्का बसला. समाजशास्त्रात शिक्षणाला सामाजिक गतिशीलतेचे प्रमुख साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सामाजिक दर्जामध्ये बदल होऊ शकतो. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणांमुळे बहुजन समाजातील लोकांना नवीन व्यावसायिक, प्रशासकीय आणि सामाजिक संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे जन्माधारित सामाजिक स्थानाऐवजी गुणवत्ता आणि शिक्षणावर आधारित सामाजिक प्रगतीची प्रक्रिया सुरू झाली. ही प्रक्रिया भारतीय समाजरचनेच्या आधुनिकीकरणासाठी महत्त्वाची ठरली. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळे समाजातील सत्ता संबंधांमध्येही बदल घडून आला. पूर्वी शिक्षणाच्या माध्यमातून उच्चवर्णीय समाजाचे वर्चस्व टिकून राहत होते, परंतु बहुजन समाजशिक्षित झाल्यानंतर त्यांनी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली. यामुळे समाजातील पारंपारिक सत्ता केंद्रांना आवाहन निर्माण झाले. समाजशास्त्र दृष्ट्या हे सामाजिक सक्षमीकरण आणि सत्तेचे पुनर्वितरण म्हणून पाहता येते.

स्त्री शिक्षणाच्या संदर्भातही शिक्षण आणि समाजरचना यांचा संबंध स्पष्ट दिसून येतो. पितृसत्ताक समाजरचनेमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले होते. स्त्रियांना शिक्षणापासून दूर ठेवून त्यांची सामाजिक आणि आर्थिक परावलंबित्वाची स्थिती कायम ठेवली जात होती. शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देऊन या पितृसत्ताक रचनेला आवाहन दिले. शिक्षणामुळे स्त्रियाचा सामाजिक सहभागात वाढ झाली आणि त्यांच्यात आत्मविश्वास व स्वाभिमान निर्माण झाला. त्यामुळे समाजरचनेतील लैंगिक विषमता कमी करण्यासाठी शिक्षण प्रभावी ठरले.

समाजशास्त्रीय कार्यात्मक दृष्टिकोन शिक्षणाला समाजाच्या स्थैर्यासाठी आवश्यक संस्था मानतो. शिक्षण समाजातील मूल्यांचे संक्रमण, सामाजिक एकात्मता आणि कौशल्य निर्मितीचे कार्य करते. शाहू महाराजांच्या शिक्षण धोरणामुळे बहुजन समाज मुख्य प्रवाहात आला आणि सामाजिक एकात्मतेची प्रक्रिया मजबूत झाली. परंतु संघर्षवादी दृष्टिकोनानुसार शिक्षण हे असमानतेचे पुनरुत्पादन करणारे साधनही असू शकते. शाहू महाराजांचे महत्त्व यामध्ये आहे की त्यांनी शिक्षणाला विषमता टिकवण्याऐवजी समता प्रस्थापित करण्याचे माध्यम बनवले. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यामुळे भारतीय समाजरचनेत दीर्घकालीन बदल घडून आले. शिक्षणामुळे बहुजन समाजात आत्मसन्मान जागृती आणि संघटनशक्ती निर्माण झाली. सामाजिक न्याय, आरक्षण, समान हक्क आणि लोकशाही मूल्यांच्या चळवळींना यामुळे बळ मिळाले. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांना सामाजिक प्रतिष्ठा आणि निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळू लागला. त्यामुळे शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे गतिशील साधन ठरले. राजश्री शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याच्या संदर्भात शिक्षण आणि समाजरचना यांचा संबंध अत्यंत व्यापक आणि परिवर्तनवादी स्वरूपाचा दिसून येतो. शिक्षण ही केवळ ज्ञान देणारी संस्था नसून समाजातील सत्ता, समता, सामाजिक गतिशीलता आणि सक्षमीकरण यांना आकार देणारी प्रक्रिया आहे. शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक विषमता दूर करण्याचे, बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे आणि समताधिष्ठित समाजरचना निर्माण करण्याचे प्रभावी साधन बनवले. यामुळे त्यांचे शैक्षणिक कार्य भारतीय समाजशास्त्रीय विचारांमध्ये सामाजिक परिवर्तनाच्या आदर्श विचारापैकी एक मानले जाते.

राजर्षी शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची आधुनिक संदर्भातील उपयुक्तता :

राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य आधुनिक काळात अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी मानले जाते. त्यांनी शिक्षण सामाजिक समता, सामाजिक न्याय आणि बहुजन सक्षमीकरण यांना केंद्रस्थानी ठेवून जे कार्य केले त्याची प्रसंगीता आजही कायम आहे. आधुनिक भारतीय समाजात जातीय विषमता, शैक्षणिक असमानता, आर्थिक दरी, स्त्री असमानता आणि सामाजिक बहिष्कारण यासारख्या समस्या अध्यापही विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत शाहू महाराजांचे विचार आणि धोरणे मार्गदर्शक ठरतात. शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे शिक्षण वंचित घटकांसाठी वस्तीगृहे, शिष्यवृत्ती आणि समान शैक्षणिक संधी यावर भर दिला. आजच्या काळात सर्वांसाठी शिक्षण, समावेशक शिक्षण आणि शैक्षणिक हक्क या संकल्पनांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने त्यांनी मागासवर्गीयांसाठी केलेले आरक्षण आणि कल्याणकारी उपाय आधुनिक लोकशाही व कल्याणकारी राज्य व्यवस्थेचे आधारस्तंभ ठरले आहे. स्त्री शिक्षण आणि स्त्री सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्य आजच्या महिला सक्षमीकरणाच्या चळवळींना प्रेरणा देते. तसेच शिक्षणाद्वारे आत्मसन्मान, स्वाभिमान आणि सामाजिक जागृती निर्माण करण्याचा त्यांचा दृष्टिकोन आजच्या सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेतही महत्त्वाचा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता शाहू महाराजांचे कार्य हे समताधिष्ठ लोकशाहीवादी आणि मानवतावादी समाज निर्मितीचे आदर्श उदाहरण आहे. त्यामुळे आधुनिक भारतात सामाजिक समता समावेशक विकास आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांचे कार्य अत्यंत उपयुक्त प्रेरणादायी आणि समकालीन ठरते.

निष्कर्ष :

राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य भारतीय समाज सुधारण्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारी आणि परिवर्तनवादी पर्व मानले जाते. त्यांनी शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन न मानतात सामाजिक समता, सामाजिक न्याय, बहुजन मुक्ती आणि मानव मुक्तीचे प्रभावी माध्यम बनवले. त्यांच्या कार्याचा अभ्यास ऐतिहासिक आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केला असता हे स्पष्ट होते की त्यांनी तत्कालीन भारतीय समाजातील जातीय विषमता, शैक्षणिक बहिष्कार, सामाजिक अन्याय आणि आर्थिक दुर्बलता यांना थेट आवाहन दिले. शाहू महाराजांच्या काळातील समाजरचना ही जातीव्यवस्थेवर आधारित विषम आणि श्रेणीबद्ध स्वरूपाची होती. शिक्षणावर उच्चवर्गीयांचे वर्चस्व असल्यामुळे बहुजन, दलित, स्त्रिया आणि इतर वंचित घटक सामाजिक प्रगतीपासून दूर राहिले होते. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी मोफत व सक्तीचे शिक्षण, वसतिगृहे, शिष्यवृत्ती, स्त्री शिक्षण, दलित शिक्षण आणि सर्वांसाठी समान शैक्षणिक संधी यासारख्या उपाययोजना राबवून शिक्षणाचे लोकशाहीकरण केले. त्यांच्या या धोरणामुळे शिक्षण समाजातील विशिष्ट वर्गापुरते मर्यादित न राहता सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचले. समाजशास्त्रीय विश्लेषणातून असे दिसून येते की शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरले. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजात आत्मसन्मान, स्वाभिमान आणि सामाजिक जागृती निर्माण केली. शिक्षणामुळे वंचित समाजासाठी सामाजिक गतिशीलतेचे मार्ग खुले झाले आणि त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात सहभाग घेण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांच्या कार्यामुळे भारतीय समाजातील पारंपारिक सत्ता संबंध आणि सामाजिक वर्चस्वाला मोठे आव्हान निर्माण झाले. शाहू महाराजांचे कार्य हे सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचेही प्रभावी उदाहरण आहे. त्यांनी शिक्षणाद्वारे दलित, मागासवर्गीय, स्त्रिया आणि गरीब घटकांना सामाजिक प्रतिष्ठा, निर्णय क्षमता आणि आत्मविश्वास मिळवून दिला. त्यांच्या शिक्षण धोरणामुळे समाजातील उपेक्षित घटकांमध्ये नेतृत्व गुण विकसित झाले आणि पुढे सामाजिक न्याय, समान हक्क आणि लोकशाही मूल्यांच्या चळवळींना बळ मिळाले. शिक्षण आणि समाजरचना यांचा संबंध लक्षात घेतला असता शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे गतिशील साधन बनवले. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील असमानता कमी करण्याचा आणि समताधिष्टीत समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांचे कार्य हे केवळ शैक्षणिक सुधारणा नसून व्यापक सामाजिक क्रांतीचे आंदोलन होते. आधुनिक काळातही राजश्री शाहू महाराजांचे विचार आणि कार्य अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरतात. आजही भारतीय समाजात सामाजिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि वंचित घटकांचे प्रश्न विविध स्वरूपात अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत समावेशक शिक्षण, सामाजिक न्याय, स्त्री सक्षमीकरण आणि बहुजन विकास यासाठी शाहू महाराजांचे धोरण मार्गदर्शक ठरते. अशाप्रकारे राजश्री शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य हे भारतीय समाजाच्या लोकशाहीकरण, समताधिष्टीत विकास

आणि सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान मानले जाते. त्यांचे कार्य भारतीय समाज सुधारण्याच्या इतिहासात प्रेरणादायी, परिवर्तनवादी आणि मानवतावादी मूल्यांचे श्रेष्ठ उदाहरण म्हणून सदैव स्मरणात राहील.

शिफारशी :

1. शिक्षणव्यवस्थेमध्ये सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशकता या मूल्यांना अधिक प्रभावीपणे समाविष्ट करणे आवश्यक आहे.
2. वंचित, दलित, आदिवासी, मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत व गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सुविधा सरकारद्वारे दिल्या जाव्यात, त्या अधिक व्यापक कराव्यात व शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावे.
3. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये शैक्षणिक पायाभूत सुविधा, डिजिटल शिक्षणसाधने आणि प्रशिक्षित व सवेतन पूर्णकालीन शिक्षकांची उपलब्धता वाढवावी.
4. शाहू महाराजांच्या धर्तीवर विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे, भोजन योजना आणि शिष्यवृत्ती योजना अधिक प्रभावीपणे राबवाव्यात.
5. स्त्रीशिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठी विशेष शैक्षणिक धोरणे आणि आर्थिक सहाय्य वाढविणे आवश्यक आहे.
6. शिक्षणामध्ये जातीय, लैंगिक आणि आर्थिक भेदभाव रोखण्यासाठी कठोर आणि संवेदनशील अंमलबजावणी यंत्रणा तयार करावी.
7. शिक्षणाला केवळ रोजगाराभिमुख न ठेवता सामाजिक जागृती, संविधानिक मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी विचार यांच्याशी जोडले पाहिजे.
8. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमामध्ये राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक विचारांचा समावेश वाढवावा.
9. सामाजिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन, मार्गदर्शन आणि कौशल्यविकास कार्यक्रम राबवावेत, जेणेकरून त्यांचा आत्मविश्वास आणि शैक्षणिक सहभाग वाढेल.
10. शिक्षणाद्वारे सामाजिक गतिशीलता आणि सक्षमीकरण वाढवण्यासाठी कौशल्याधारित, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे.
11. आधुनिक काळातील डिजिटल दरी कमी करण्यासाठी गरीब विद्यार्थ्यांना इंटरनेट, संगणक आणि ई-लर्निंग साधनांची उपलब्धता करून द्यावी.
12. शिक्षणसंस्थांमध्ये समावेशक आणि भेदभावमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी सामाजिक संवेदनशीलता प्रशिक्षण आयोजित करावे.
13. सामाजिक न्यायाधारित शैक्षणिक धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन, शैक्षणिक संस्था आणि समाजसंस्था यांच्यात समन्वय वाढवावा.
14. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्यावर अधिक संशोधन, चर्चासत्रे आणि अभ्यास प्रकल्प राबवून त्यांच्या विचारांची आधुनिक संदर्भात पुनर्मांडणी करावी.
15. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या शाहू महाराजांच्या विचाराला केंद्रस्थानी ठेवून समताधिष्ठित आणि लोकशाहीवादी समाजनिर्मितीसाठी दीर्घकालीन शैक्षणिक धोरणे तयार करावीत.

संदर्भ :

1) घोरमोडे के. यु., घोरमोडे कला (2006),शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 21
2) लेखक मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पृष्ठ क्र. 140

3) घोरमोडे के. यु., घोरमोडे कला (2006),शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 21
4) तत्रैव, पृष्ठ क्र. 21
5) तत्रैव, पृष्ठ क्र. 23
6) लेखक मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पृष्ठ क्र. 140
7) तत्रैव, पृष्ठ क्र. 140
8) घोरमोडे के. यु., घोरमोडे कला (2006),शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 23
9) तत्रैव, पृष्ठ क्र. 23
10) तत्रैव, पृष्ठ क्र. 28
11) तत्रैव, पृष्ठ क्र. 23
12) घोरमोडे के. यु., घोरमोडे कला (2006),शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य, विद्या प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र. 21
13) पाटील प्रमोद (2016), समाजशास्त्र : परिचय आणि दृष्टीकोण, अंशुल पब्लिकेशन, नागपूर, पृष्ठ क्र. 202
14) तत्रैव, पृष्ठ क्र. 204

महाराष्ट्रातील जलसिंचन: सद्यस्थिती आणि उपाययोजना

डॉ. पी. एस. मिसाळ

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन, जि. जालना

गोषवारा:

जलसिंचन सुविधांची उपलब्धता हि कृषी क्षेत्राच्या विकासाला गती देणारी महत्वाची तंत्रात्मक सुधारणा आहे. महाराष्ट्र राज्यात कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने शासकीय पातळीवरून जलसिंचन क्षेत्रात वाढ करण्याचे सतत प्रयत्न केले जात आहेत. जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत राज्यस्तर प्रकल्पावर ५५.६१ लक्ष हेक्टर तर जलसंधारण विभागाच्या स्थानिकस्तर प्रकल्पावर १९.९८ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून वर्तमान स्थितीत राज्याची एकूण निर्मित सिंचन क्षमता जवळपास ७५.५८ लक्ष हेक्टर पर्यंत पोहचली आहे. निर्मित सिंचन क्षमतेचे लागवडीलायक क्षेत्राशी असलेले प्रमाण जवळपास २७ टक्के असे कमी असून येणाऱ्या काळात महाराष्ट्र राज्यातील जलसिंचन क्षेत्र वाढीसाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील जलसिंचन स्थितीवर प्रकाश टाकून जलसिंचन क्षेत्रामध्ये वाढ व्हावी यासाठी काही उपाययोजना सुविचविण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन लेखात केला आहे.

प्रस्तावना:

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते. दैनंदिन जीवन जगत असतांना लोकांना लागणारे अन्नधान्य आणि उद्योगांना लागणारा कच्चा माल केवळ कृषी क्षेत्रातूनच पुरवला जाऊ शकतो. कृषी क्षेत्राचा विकास हा औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक मानला मानला जातो तर दुसऱ्या बाजूला काही उद्योगांचा विकास कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक मानला जातो. वित्त पुरवठा, विपणन सुविधा, जलसिंचन, सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटक नाशके, आधुनिक यंत्रे आणि अवजारे यासारख्या संस्थात्मक आणि तंत्रात्मक सुधारणांची जोड दिल्यास कृषी क्षेत्राच्या विकासाला गती मिळते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी जलसिंचन सुविधांची उपलब्धता हि इतर सुधारणांच्या तुलनेत अत्यंत महत्वाची आहे कारण यामुळे कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढते शिवाय कृषी क्षेत्राला स्थैर्य प्राप्त होते.

पाणी हे एक नैसर्गिक संसाधन असून पाण्याचा वापर कृषी क्षेत्रात जलसिंचनासाठी केला जातो याशिवाय पिण्यासाठी तसेच स्वच्छता, घरगुती वापर, उद्योगांमध्ये उत्पादन निर्मिती, वीज निर्मिती, जल वाहतुक यासारख्या विविध कारणांसाठी पाण्याचा वापर केला जातो. पृथ्वीचा दोन तृतीयांश भाग पाण्याने व्यापलेला असला तरी मानवाला वापरण्यायोग्य चांगल्या पाण्याची उपलब्धता मात्र एक टक्क्यापेक्षा कमी आहे म्हणून पाण्याचे जतन, संवर्धन व योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक ठरते. महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या अंदाजानुसार महाराष्ट्रातील सरासरी जलसंपत्ती १६३८२० दशलक्ष घनमीटर एवढी आहे. महाराष्ट्रात राज्यात सर्वाधिक पाणी वापर कृषी क्षेत्रात जलसिंचनासाठी केला जात असून कृषी क्षेत्रातील पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत जाणार असल्याचा अंदाज विविध अहवालातून व्यक्त केला जात आहे.

संशोधन लेखाचे उद्देश:

१. महाराष्ट्रातील निर्मित सिंचन क्षमतेचा आढावा घेणे.

२. महाराष्ट्रातील मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पाच्या निर्मित सिंचन क्षमतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्र वाढीसाठी उपाययोजना सुचवणे.

संशोधन पध्दती : प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून केवळ दुय्यम स्त्रोतांचा आधार घेण्यात आला आहे. यात विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, संगणक संकेतस्थळे यासारख्या दुय्यम स्त्रोतांच्या आधारे संशोधन लेख पूर्ण करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील जलसंपत्ती आणि वापर : महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात दरवर्षी सरासरी १३१५३२ दशलक्ष घनमीटर एवढी जलसंपत्ती उपलब्ध होते. या जलसंपत्तीचे खोरे निहाय विवरण पुढील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे आहे.

तक्ता क्र. १

महाराष्ट्रातील खोरे निहाय जलसंपत्ती

(द.ल.घ.मी.)

पाणी उपलब्धता / नदी खोरे	गोदावरी	तापी	नर्मदा	कृष्णा	कोकणातील पश्चिम वाहिनी	महाराष्ट्र राज्य
वार्षिक सरासरी उपलब्धता	५०८८० (३१.०६)	९११८ (५.५७)	५८० (०.३५)	३४०३२ (२०.७७)	६९२१० (४२.२५)	१६३८२० (१००)
७५ टक्के विश्वासार्हतेची उपलब्धता	३७३०० (२८.३५)	६९७७ (५.३०)	३१५ (०.२४)	२८३७१ (२१.५६)	५८५९९ (४४.५४)	१३१५६२ (१००)

स्त्रोत: सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०२२-२३, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. ५

तक्ता क्र. १ मध्ये महाराष्ट्र राज्यातील नदी खोरे निहाय जल संपत्ती दर्शविलेली असून यातून असे स्पष्ट होते कि, महाराष्ट्रात पर्जन्याच्या माध्यमातून दरवर्षी सरासरी १६३८२० दशलक्ष घनमीटर एवढे पाणी उपलब्ध होते. यात सर्वाधिक ४२.२५ टक्के एवढे पाणी कोकणातील पश्चिम वाहिनी नदी खो-यातून उपलब्ध होते तर सर्वात कमी नर्मदा नदी खो-यातून ०.३५ टक्के एवढे पाणी उपलब्ध होते. नदी खो-यातील पाणी उपलब्धतेचे प्रमाण, दर हेक्टरी पाण्याची उपलब्धता आणि उपलब्ध पाण्यातून कमीत कमी घेता येऊ शकणारी पिके या आधारावर कोकणातील पश्चिम वाहिनी नदी खोरे अतिविपुल पाणी उपलब्धतेचे तर या खालोखाल नर्मदा नदी खोरे विपुलतेचे, गोदावरी आणि कृष्णा खोरे सरासरी पाणी उपलब्धतेचे तर तापी खोरे तुटीच्या वर्गवारीत असल्याचे दिसून येते. कोकणातील पश्चिम वाहिनी नदयातील पाण्याचा महाराष्ट्रातील इतर भागात जलसिंचनासाठी कसा वापर करता येईल यासाठी भविष्यात प्रयत्न होणे आवश्यक आहे.

तक्ता क्र. २

महाराष्ट्रातील सिंचन व बिगर सिंचन पाणी वापर

(३० जून २०२२ अखेर)

वर्ष	एकूण पाणी वापर (दलघमी)	पाणी वापराची टक्केवारी	
		सिंचन	बिगर सिंचन
२०१३-१४	२९९६८	७२	२८
२०१४-१५	२८८८६	६९	३१
२०१५-१६	२३४८२	६३	३७
२०१६-१७	३३०३१	७२	२८
२०१७-१८	३२९०९	७२	२८
२०१८-१९	३००३५	६८	३२
२०१९-२०	३३१५०	७१	२९
२०२०-२१	३२५१५	७५	२५
२०२१-२२	३३१५०	७६	२४
२०२२-२३	३४८९६	७४	२६

स्त्रोत: सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०२२-२३, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र.१४

तक्ता क्र. २ मध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण पाणी वापर तसेच सिंचन आणि बिगर सिंचन पाणी वापराची टक्केवारी दर्शविलेली आहे. तक्त्यावरून असे निदर्शनास येते कि महाराष्ट्र राज्यात बिगर सिंचनाच्या तुलनेत सिंचनासाठीचा पाणी वापर जास्त आहे. सन २०१३-१४ ते २०२२-२३ या काळात सिन्चानासाठीचा पाणी वापर जवळपास ६३

ते ७६ टक्के तर बिगर सिंचनासाठीचा पाणी वापर जवळपास २४ ते ३७ टक्के असल्याचे दिसून येते. सन २०१२-१३ मध्ये सिंचनासाठीचा पाणी वापर ७२ टक्के तर बिगर सिंचनासाठीचा पाणी वापर २८ टक्के एवढा होता. सन २०२२-२३ मध्ये सिंचानासाठीचा पाणी वापर ७४ टक्के तर बिगर सिंचनासाठीचा पाणी २६ टक्के एवढा आहे.

महाराष्ट्रातील जलसिंचनाची सद्यस्थिती : महाराष्ट्र राज्यात जलसिंचन क्षेत्रामध्ये वाढ व्हावी या हेतूने जलसंपदा, जलसंधारण, जिल्हा परिषद, कृषी यासारख्या विभागांतर्गत सतत प्रयत्न केले जातात. महाराष्ट्र राज्यात जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत ८६ मोठे, २९८ मध्यम व ३३१३ लघु प्रकल्पावर जवळपास ५५.६१ लक्ष हेक्टर तर मृद व जलसंधारण विभागाच्या अखत्यारीत एकूण १११६३५ एवढ्या स्थानिकस्तर प्रकल्पावर जवळपास १९.९८ लक्ष हेक्टर अशी एकूण ७५.५८ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे. महाराष्ट्रात एकूण निर्मित सिंचन क्षमतेचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण जवळपास २७ टक्के एवढे असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील जलसिंचनाची सद्यस्थिती पुढील तक्त्यामधून अधिक स्पष्ट होईल.

तक्ता क्र. ३

महाराष्ट्रातील प्रकल्प निहाय निर्मित सिंचन क्षमता

(३० जून २०२२ अखेर, लक्ष हेक्टर)

प्रकल्प प्रकार	प्रकल्प संख्या	एकूण प्रकल्प संख्येतील प्रमाण (%)	निर्मित सिंचन क्षमता	एकूण निर्मित सिंचन क्षमतेतील प्रमाण (%)
मोठे	८६	२.३३	२८.७३	५१.६६
मध्यम	२९८	८.०६	९.९६	१७.९१
लघु	२९७८	८०.५५	१३.३०	२३.९२
उपसा	३३५	९.०६	३.६१	६.४९
एकूण	३६९७	१००	५५.६१	१००

स्त्रोत: सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०२२-२३, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. १८

तक्ता क्र. ३ मध्ये महाराष्ट्रातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पाची संख्या आणि निर्मित सिंचन क्षमता दर्शविलेली आहे. महाराष्ट्र राज्यात जलसंपदा विभागांतर्गत जवळपास ३६९७ एवढ्या प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली असून यात सर्वाधिक ८०.५५ टक्के प्रमाण हे लघु प्रकल्पांचे आहे तर या खालोखाल ९.०६ टक्के एवढे प्रमाण उपसा सिंचन योजनेचे असून मध्यम प्रकल्पाचे प्रमाण ८.०६ टक्के आणि मोठ्या प्रकल्पाचे प्रमाण २.३३ टक्के एवढे आहे. राज्यात ५५.६१ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून यात सर्वाधिक ५१.६६ टक्के प्रमाण हे मोठ्या प्रकल्पाचे तर या खालोखाल लघु प्रकल्पाचे प्रमाण २३.९२ टक्के, मध्यम प्रकल्पाचे प्रमाण १७.९१ टक्के आणि ६.४९ टक्के प्रमाण हे उपसा सिंचन योजनेचे आहे. महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक सिंचन क्षमता मोठ्या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण करण्यात आली असून याखालोखाल लघु आणि मध्यम प्रकल्पाचा क्रम लागत असल्याचे दिसून येते.

तक्ता क्र. ४

महाराष्ट्रातील वर्ष निहाय निर्मित सिंचन क्षमता

(३० जून अखेर, लक्ष हेक्टर)

वर्ष	निर्मित सिंचन क्षमता		
	मोठे व मध्यम प्रकल्प	लघु प्रकल्प (उपसासह)	एकूण
२०१३	३४.०० (७०.७९)	१४.०३ (२९.२१)	४८.०३
२०१४	३४.२८ (७०.४५)	१४.३८ (२९.५५)	४८.६६
२०१५	३४.४६ (७०.१८)	१४.६४ (२९.८२)	४९.१०
२०१६	३४.७६ (७०.०१)	१४.८९ (२९.९९)	४९.६५
२०१७	३५.३४ (७०.१७)	१५.०२ (२९.८३)	५०.३६
२०१८	३५.९५ (७०.१७)	१५.२८ (२९.८३)	५१.२३
२०१९	३६.८८ (६९.५३)	१६.१६ (३०.४७)	५३.०४
२०२०	३७.४३ (६९.१२)	१६.७२ (३०.८८)	५४.१५
२०२१	३८.१६ (६९.४४)	१६.७९ (३०.५६)	५४.९५

२०२२	३८.६९ (६९.५७)	१६.९२ (३०.४३)	५५.६१

स्त्रोत: सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०२२-२३, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, पृष्ठ क्र. १५

टीप: कंसातील आकडे हे एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

तक्ता क्र. ४ मध्ये महाराष्ट्रातील मोठे व मध्यम प्रकल्प आणि लघु प्रकल्प (उपसासह) यांची निर्मित सिंचन क्षमता वर्ष निहाय दर्शविलेली आहे. महाराष्ट्रात मोठ्या व मध्यम प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण करण्यात आलेली सिंचन क्षमता हि लघु प्रकल्पाच्या माध्यमातून (उपसासह) निर्माण करण्यात आलेल्या सिंचन क्षमतेपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रात ३० जून २०१३ अखेर ४८.०३ लक्ष हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली होती ज्यात मोठ्या व मध्यम प्रकल्पांचे प्रमाण ७०.७९ टक्के एवढे तर लघु प्रकल्प व उपसा सिंचन योजनेचे प्रमाण २९.२१ टक्के एवढे होते. राज्यात ३० जून २०२२ अखेर मोठे, मध्यम व लघु (उपसासह) प्रकल्पाची निर्मित सिंचन क्षमता ५५.६१ लक्ष हेक्टर एवढी असून यात मोठे व मध्यम प्रकल्पाच्या निर्मित सिंचन क्षमतेचे प्रमाण ६९.५७ टक्के एवढे आहे तर लघु प्रकल्पाच्या (उपसासह) निर्मित सिंचन क्षमतेचे प्रमाण ३०.४३ टक्के एवढे आहे.

उपाययोजना : महाराष्ट्र राज्यात उपलब्ध पाण्यातून सिंचन क्षेत्रात अधिकाधिक वाढ व्हावी यासाठी शासकीय पातळीवरून विविध प्रयत्न केले जात असले तरी निर्मित सिंचन क्षमतेचे लागवडीलायक क्षेत्राशी असलेले प्रमाण मात्र बरेच कमी असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्रात वाढ व्हावी यासाठी शासकीय पातळीवरील प्रयत्ना बरोबरच वैयाक्तिक पातळीवर देखील विशेष प्रयत्नांची गरज आहे. पुढील काही उपाययोजना राज्यातील सिंचन क्षेत्र वाढीसाठी नक्कीच लाभदायक ठरतील असे वाटते.

१. पावसाचा जमिनीवर पडणारा प्रत्येक थेंब जमिनीत कसा मुरवता येईल किंवा भूपृष्ठावर कसा साठवता येईल यासाठी शासकीय प्रयत्नाबरोबरच मोठ्या प्रमाणात लोकसहभाग वाढवला जावा. शासकीय पातळीवरून कमी वेळेत पूर्ण होणाऱ्या लघु प्रकल्पाची तसेच गाव तलावांची अधिक निर्मिती केली जावी तसेच प्रत्येक नदी नाल्यावर सिमेंट नाला बंधारा, कोल्हापुरी बंधारा, वनराई बंधारा यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करावी. वैयाक्तिक पातळीवर प्रत्येकाने घराच्या छतावरील पाणी जमिनीत मुरविणे, बोरवेलचे जल पुनर्भरण करणे, विहिरीच्या पाण्याचे पुनर्भरण करणे यासारखे उपाय केल्यास पाण्याची उपलब्धता वाढून सिंचन क्षेत्र वाढीस मदत होईल.

२. सिंचन प्रकल्पातील गाळ, नदी नाल्यावरील बंधाऱ्यातील गाळ दरवर्षी काढण्यात यावा तसेच प्रकल्पाची रखडलेली कामे आणि प्रकल्पाची डागडुजी वेळेवर पूर्ण करावी यामुळे पाणीसाठ्यात वाढ होऊन त्याचा वापर सिंचनासाठी करता येईल.

३. प्रत्येक प्रकल्पाचे कालवे आणि चाऱ्या यांची नियमित देखभाल करावी तसेच प्रत्येक कालवा आणि चाऱ्या याना सिमेंट कॉन्क्रीटचे अस्तरीकरण असावे यामुळे पाण्याचा वेग वाढून सिंचनासाठी कमी वेळेत पाणी उपलब्ध होईल तसेच पाणी जमिनीत झिरपणार नाही यामुळे सिंचन क्षेत्रात वाढ होण्यास मदत होईल.

४. प्रत्येक गावाचे हवामान, पर्जन्यमान आणि उपलब्ध पाणी यांचा अभ्यास करून पिक पद्धती ठरविण्यात यावी, पाण्याचा वापर काळजीपूर्वक केला जावा यासाठीची जाणीवजागृती केली जावी, प्रत्येक शेतातील पाणी वाहून जाऊ न देता ते ज्या त्या शेतात कसे मुरवता येईल यासाठी प्रत्येकाने जल पुनर्भरणाचे प्रयोग राबवावे यामुळे भूजल पातळीत वाढ होऊन सिंचनासाठीच्या पाण्यात वाढ होईल.

५. पारंपारिक सिंचन पद्धती ऐवजी ठिबक सिंचन, तुषार सिंचन यासारख्या आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर जास्तीत जास्त केल्यास पाण्याची बचत होऊन अधिक क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध करून देता येईल. आधुनिक सिंचन पद्धतीच्या वापरामुळे पाण्याची बचत होते शिवाय एकाच वेळी मोठे क्षेत्र सिंचित करता येते त्यामुळे आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर जास्तीत जास्त करावा.

६. डोंगर उताराची जमीन, शासकीय पडीत जमीन, माळरानाची पडीत जमीन यावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी तसेच जमीन उताराच्या आडव्या दिशेने चर खोदले जावे यामुळे पाणी वाहून जाण्याचा वेग कमी होऊन पाणी जमिनीत मुरविले जाईल व भूजल पाणीसाठा वाढून सिंचन क्षेत्रात वाढ करता येईल.

संदर्भ सूची :

१. शेखर गायकवाड, कौस्तुभ दिवेगावकर आणि डॉ. चंद्रकांत भोयर, महाराष्ट्राची भूजलगाथा, टेक्निकल पब्लिकेशन, पुणे, ऑक्टोबर २०२०.

२. ढमढेरे एस. व्ही., भारतीय जलसंपदा महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, २०१६.

३. ए. के. पाटील, महाराष्ट्रातील जलसंपत्ती, योजना, विकास समर्पित मासिक, माहिती व प्रसारण मंत्रालय, मुंबई, अंक ७, मार्च २००६.

४. सिंचन स्थितीदर्शक अहवाल २०२२-२३, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन.

५. महाराष्ट्र राज्य जलनीती, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन, २०१९

६. महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल, खंड -१, महाराष्ट्र शासन, १९९९

७. Suresh C., Indian Irrigation System and Its Impact on the Indian Economy, International Journal of Creative Research Thoughts, Vol- 6, Issue- 1, March 2019.

८. Landge A A & Kadam Avinash, Major and Medium Irrigation Projects in Maharashstra – Special Reference to Irrigation Potential Created (IPC) and Irrigation Potential Utilized (IPU), Online International Interdisciplinary Research Journal, Vol -09, Special Issue- 02, Jan. 2019.

९. Dr. Madhukar R. Gitte, Development and Management of Water Resources in Maharashtra, International Journal of Humanities and Social Science Invention, Vol- 2, Issue- 4, April 2013.

१०. Report on Water Auditing of Irrigation Projects in Maharashtra State, Govt. of Maharashtra, 2019

सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास : एक तुलनात्मक अभ्यास

डॉ. आरती राणे

अर्थशास्त्र विभाग

के.आर.एम.महिला महाविद्यालय, नांदेड.

सारांश (Abstract) :

सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास हे आधुनिक कृषी व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे दृष्टिकोन आहेत. रासायनिक शेतीमुळे निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्या, मातीची सुपीकता घट, पाणी प्रदूषण आणि मानवी आरोग्यावर होणारे परिणाम लक्षात घेता या दोन्ही संकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास आवश्यक ठरतो. या शोध निबंधातील समस्या विधान असे आहे की पारंपरिक रासायनिक शेतीमुळे पर्यावरणीय असंतुलन निर्माण होत असून, सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांपैकी कोणती पद्धत दीर्घकालीन दृष्टीने अधिक उपयुक्त आहे हे स्पष्ट करणे आवश्यक आहे.

या अभ्यासाचे प्रमुख संशोधन प्रश्न असे आहेत: (1) सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांमध्ये काय फरक आहे? (2) पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाजावर त्यांचा काय परिणाम होतो? (3) कोणती पद्धत दीर्घकालीन शेती टिकवण्यासाठी अधिक प्रभावी आहे?

या अभ्यासासाठी वर्णनात्मक आणि तुलनात्मक संशोधन पद्धती वापरण्यात आली आहे. प्राथमिक माहिती शेतकऱ्यांच्या मुलाखती व प्रत्यक्ष निरीक्षणातून गोळा करण्यात आली, तर दुय्यम माहिती पुस्तके, शासकीय अहवाल आणि संशोधन लेखांमधून संकलित करण्यात आली. गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करून दोन्ही पद्धतींची तुलना करण्यात आली.

या अभ्यासातील अपेक्षित निष्कर्ष असा आहे की सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणीय प्रदूषण कमी होते आणि आरोग्यदायी अन्न उत्पादन होते, तर शाश्वत कृषी विकासामुळे दीर्घकालीन उत्पादनक्षमता, आर्थिक स्थैर्य आणि संसाधनांचे संरक्षण साध्य होते. दोन्ही पद्धती एकमेकांना पूरक असून त्यांचा समन्वय केल्यास टिकाऊ कृषी विकास साध्य होऊ शकतो.

कीवर्ड्स : सेंद्रिय शेती, शाश्वत कृषी विकास, पर्यावरण संरक्षण, तुलनात्मक अभ्यास, शाश्वत शेती, नैसर्गिक संसाधने, कृषी विकास.

1.प्रस्तावना :

आजच्या आधुनिक काळात वाढती लोकसंख्या, अन्नाची वाढती मागणी आणि नैसर्गिक संसाधनांवर वाढणारा ताण यामुळे शेती क्षेत्रासमोर अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. हरितक्रांतीनंतर रासायनिक खते व कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणावर वापर झाला, ज्यामुळे उत्पादन वाढले असले तरी मातीची सुपीकता कमी होणे, पाण्याचे प्रदूषण आणि मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम यांसारख्या समस्या निर्माण झाल्या.

या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास या संकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सेंद्रिय शेती ही नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने शेती करण्यावर भर देते, तर शाश्वत कृषी विकास हा दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न करतो.

या दोन्ही पद्धतींचा मुख्य उद्देश म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण, मातीची सुपीकता टिकवणे आणि सुरक्षित व गुणवत्तापूर्ण अन्न उत्पादन करणे हा आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांचा तुलनात्मक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

समस्या विधान :

आजच्या शेती व्यवस्थेत रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अतिरेकी वापर, जमिनीची घटती सुपीकता, पाण्याचे कमी होत चाललेले स्रोत आणि पर्यावरणीय असंतुलन या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. यामुळे शेतीची उत्पादनक्षमता दीर्घकालीन दृष्टीने धोक्यात येत आहे तसेच मानवी आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहेत.

या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास या पर्यायी पद्धतींचा विचार महत्त्वाचा ठरतो. मात्र, सेंद्रिय शेतीत सुरुवातीला उत्पादन घटण्याची शक्यता, प्रमाणन प्रक्रिया आणि बाजारपेठेतील मर्यादा या अडचणी आहेत. दुसरीकडे, शाश्वत कृषी विकासासाठी आवश्यक तांत्रिक ज्ञान, आर्थिक गुंतवणूक आणि योग्य नियोजन यांचा अभाव अनेक शेतकऱ्यांसमोर अडथळा ठरतो.

म्हणूनच, या दोन्ही पद्धतींचा सखोल अभ्यास करून त्यातील साम्य, फरक, फायदे आणि मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम अशी शेती व्यवस्था विकसित करता येईल.

अभ्यासाचे महत्त्व :

आजच्या वेगाने बदलणाऱ्या कृषी व्यवस्थेत पर्यावरणीय संतुलन, अन्नसुरक्षा आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य ही मोठी आव्हाने बनली आहेत. रासायनिक शेतीमुळे अल्पकालीन उत्पादन वाढले असले तरी दीर्घकालीन दृष्टीने मातीची सुपीकता कमी होणे, पाण्याचे प्रदूषण आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या समस्या प्रकर्षाने जाणवू लागल्या आहेत. अशा परिस्थितीत सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास या संकल्पनांचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

सेंद्रिय शेती ही नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करून रसायनमुक्त पद्धतीने अन्न उत्पादन करण्यावर भर देते. त्यामुळे मातीतील सूक्ष्मजीवांचे संवर्धन होते आणि जमिनीची सुपीकता टिकून राहते. दुसरीकडे, शाश्वत कृषी विकास हा केवळ उत्पादनावरच नव्हे तर पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज या तिन्ही घटकांचा समतोल राखण्यावर लक्ष केंद्रित करतो. या दोन्ही पद्धतींचा अभ्यास केल्यामुळे पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाचे महत्त्व अधिक स्पष्ट होते.

या अभ्यासाचे आणखी एक महत्त्व म्हणजे आरोग्यदायी अन्न उत्पादन. रसायनमुक्त अन्नामुळे मानवी आरोग्य सुरक्षित राहते आणि ग्राहकांमध्ये जागरूकता वाढते. तसेच, शाश्वत पद्धतींमुळे नैसर्गिक संसाधनांचे जतन होते, पाण्याचा कार्यक्षम वापर होतो आणि हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता वाढते.

आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, सेंद्रिय आणि शाश्वत शेतीमुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन स्थैर्य मिळू शकते. उत्पादनाचा दर्जा सुधारल्यामुळे बाजारात चांगला दर मिळण्याची शक्यता वाढते. याशिवाय, विविध पिकांच्या लागवडीमुळे जोखीम कमी होते आणि उत्पन्नाचे स्रोत वाढतात. एकूणच, सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांचा अभ्यास केवळ पर्यावरण संरक्षणापुरता मर्यादित नसून तो सामाजिक, आर्थिक आणि आरोग्यविषयक दृष्टीनेही

अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे भविष्यातील शेती अधिक सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि टिकाऊ करण्यासाठी या अभ्यासाचे विशेष महत्त्व आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

1.सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांच्या संकल्पना स्पष्ट करणे.

2.सेंद्रिय शेतीच्या पद्धती आणि तंत्रांचा अभ्यास करणे.

3.शाश्वत कृषी विकासाच्या तत्त्वांचा अभ्यास करणे.

4.दोन्ही पद्धतींची तुलना करून साम्य व फरक शोधणे.

5.सेंद्रिय शेतीचे पर्यावरणीय परिणाम विश्लेषित करणे.

6.शाश्वत कृषी विकासाचा नैसर्गिक संसाधनांवर होणारा परिणाम समजून घेणे.

7.दोन्ही पद्धतींचा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर होणारा प्रभाव तपासणे.

8.आरोग्यदायी अन्न उत्पादनात सेंद्रिय शेतीचे योगदान ओळखणे.

9.हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीचे महत्त्व अधोरेखित करणे.

10.पर्यावरणपूरक व दीर्घकालीन शेतीसाठी योग्य उपाय सुचवणे.

अभ्यासाची गृहितके :

1.सेंद्रिय शेतीमुळे मातीची सुपीकता वाढते.

2.सेंद्रिय शेतीमुळे पर्यावरणीय प्रदूषण कमी होते.

3.शाश्वत कृषी विकासामुळे नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन होते.

4.सेंद्रिय शेतीत उत्पादित अन्न अधिक आरोग्यदायी असते.

5.शाश्वत कृषी पद्धतींमुळे दीर्घकालीन उत्पादनक्षमता टिकून राहते.

6.सेंद्रिय शेतीमुळे शेतकऱ्यांना दीर्घकालीन आर्थिक लाभ होतो.

7.शाश्वत कृषी विकासामुळे हवामान बदलाचा परिणाम कमी होतो.

8.सेंद्रिय आणि शाश्वत पद्धतींचा समन्वय केल्यास शेती अधिक फायदेशीर ठरते.

9.रासायनिक शेतीपेक्षा सेंद्रिय शेती पर्यावरणासाठी अधिक सुरक्षित आहे.

10.योग्य प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळाल्यास शेतकरी शाश्वत पद्धती सहज स्वीकारू शकतात.

अभ्यासाची संशोधन पद्धती :

सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास या विषयाचा अभ्यास करताना योग्य आणि सुसंगत संशोधन पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. या अभ्यासासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक आणि तुलनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. ज्यायोगे दोन्ही शेती पद्धतींचे स्वरूप, वैशिष्ट्ये, फायदे आणि मर्यादा यांचे सखोल विश्लेषण करता आले.

या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही प्रकारच्या माहितीचा वापर केला आहे. प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांची मुलाखत, प्रश्नावली तसेच प्रत्यक्ष शेतभेटींचा उपयोग केला. यामुळे सेंद्रिय आणि शाश्वत शेती पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव, अंमलबजावणीतील अडचणी आणि त्यांचे फायदे यांची वास्तव माहिती मिळाली.

दुय्यम माहिती गोळा करण्यासाठी विविध पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल, कृषी विषयक संकेतस्थळे आणि जर्नल्स यांचा आधार घेतला. या स्रोतांमधून सैद्धांतिक माहिती, आकडेवारी आणि आधी झालेल्या संशोधनांचे निष्कर्ष प्राप्त झाले, ज्यामुळे अभ्यास अधिक विश्वसनीय आणि व्यापक बनला.तुलनात्मक पद्धतीचा वापर करून सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास यांतील साम्य व फरक स्पष्ट केले . तसेच, निष्कर्ष काढताना निरीक्षणे आणि उपलब्ध माहितीच्या आधारे तर्कसंगत मांडणी केली.

अशा प्रकारे, विविध संशोधन पद्धतींचा समन्वय साधून केलेला हा अभ्यास अधिक अचूक, सखोल आणि उपयुक्त ठरतो, ज्यामुळे सेंद्रिय आणि शाश्वत शेतीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी योग्य दिशा मिळू शकते.

2.संकल्पना :

i)सेंद्रिय शेती :

व्याख्या: सेंद्रिय शेती म्हणजे अशी शेती पद्धती ज्यामध्ये रासायनिक खते, कीटकनाशके व तणनाशके यांचा वापर टाळून नैसर्गिक घटकांच्या साहाय्याने पिकांचे उत्पादन केले जाते.

या पद्धतीत शेणखत, हिरवळीची खते, वर्मी-कंपोस्ट, जैविक कीटकनाशके यांचा वापर केला जातो.

मातीतील सेंद्रिय अंश वाढवून तिची सुपीकता टिकवण्यावर भर दिला जातो.

उद्दिष्ट: मातीची सुपीकता वाढवणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि सुरक्षित व गुणवत्तापूर्ण अन्न उत्पादन करणे.

ii)शाश्वत कृषी विकास :

व्याख्या: शाश्वत कृषी विकास म्हणजे अशी शेती पद्धती जी वर्तमान पिढीच्या अन्न व आर्थिक गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संसाधने अबाधित ठेवते.

या पद्धतीत पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि समाज या तिन्ही घटकांचा समतोल राखला जातो.

नैसर्गिक संसाधनांचा कार्यक्षम वापर, आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक ज्ञान यांचा समन्वय केला जातो.

उद्दिष्ट: दीर्घकालीन उत्पादनक्षमता टिकवून ठेवणे, पर्यावरण संरक्षण करणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढवणे.

3.उद्दिष्टे :

i)सेंद्रिय शेती :

अ) सेंद्रिय शेतीचे प्रमुख उद्दिष्ट रासायनिक खते व कीटकनाशकांमुळे होणारे प्रदूषण कमी करणे हे आहे.

ब)या पद्धतीत अन्नाची गुणवत्ता आणि त्याचे पोषणमूल्य वाढवण्यावर भर दिला जातो.

क) मातीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संवर्धन करून जमिनीची नैसर्गिक सुपीकता टिकवणे हेही महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

ii)शाश्वत कृषी विकास :

अ) शाश्वत कृषी विकासाचे प्रमुख उद्दिष्ट नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे, विशेषतः पाणी आणि जमीन यांचे संरक्षण करणे हे आहे.

ब) या पद्धतीद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता मिळवून देणे आणि त्यांचे उत्पन्न वाढवणे अपेक्षित आहे.

क) ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास साधणे आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हेही शाश्वत कृषी विकासाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

4.पद्धती :

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेतीमध्ये पिकांचे उत्पादन नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक पद्धतीने केले जाते. यासाठी रासायनिक घटकांचा वापर टाळून जैविक उपायांचा अवलंब केला जातो. या पद्धतीत शेणखत, वर्मी-कंपोस्ट यांसारख्या जैविक खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो, ज्यामुळे मातीची सुपीकता वाढते आणि तिची नैसर्गिक गुणवत्ता टिकून राहते. तसेच पिकांचे फेरपालट करून जमिनीतील पोषक घटकांचे संतुलन राखले जाते. कीड नियंत्रणासाठी नीम, जैविक द्रव्ये आणि इतर नैसर्गिक घटकांचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने कीटकांचा नाश केला जातो.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामध्ये पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक घटक यांचा समतोल राखत शेती केली जाते. यामध्ये एकात्मिक कीड व्यवस्थापन वापरून कीटक नियंत्रणासाठी रासायनिक आणि जैविक पद्धतींचा संतुलित वापर केला जातो. पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन करण्यासाठी ठिबक सिंचन सारख्या आधुनिक तंत्रांचा अवलंब केला जातो, ज्यामुळे पाण्याची बचत होते. तसेच आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक शेती ज्ञान यांचा समन्वय करून उत्पादनक्षमता वाढवली जाते आणि संसाधनांचा योग्य वापर सुनिश्चित केला जातो.

5.पर्यावरणावर परिणाम :

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेतीचा पर्यावरणावर सकारात्मक परिणाम दिसून येतो. या पद्धतीत रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर टाळल्यामुळे माती, पाणी आणि हवा यांचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होते. नैसर्गिक घटकांचा वापर केल्यामुळे शेतजमिनीत उपयुक्त जीवाणू आणि सूक्ष्मजीवांचे प्रमाण वाढते, ज्यामुळे जैवविविधतेला चालना मिळते. तसेच, जमिनीची नैसर्गिक सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते आणि पर्यावरणीय संतुलन राखले जाते.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामध्ये नैसर्गिक संसाधनांचा संतुलित आणि जबाबदारीने वापर केला जातो. पाणी, जमीन आणि इतर संसाधनांचे योग्य व्यवस्थापन केल्यामुळे त्यांचा ऱ्हास कमी होतो. ही पद्धत हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता वाढवते, कारण यात पर्यावरणपूरक तंत्रांचा वापर केला जातो. एकूणच, शाश्वत कृषी विकासामुळे पर्यावरणीय हानी कमी करण्यावर विशेष भर दिला जातो आणि दीर्घकालीन पर्यावरण संरक्षण साध्य होते.

6.आर्थिक पैलू ;

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेतीच्या आर्थिक पैलूंमध्ये सुरुवातीला काही अडचणी दिसून येतात. या पद्धतीत रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर न केल्यामुळे उत्पादन कमी होऊ शकते आणि नैसर्गिक निविष्ठांमुळे खर्च तुलनेने जास्त येऊ शकतो. मात्र, कालांतराने मातीची सुपीकता सुधारल्यामुळे उत्पादन वाढते आणि सेंद्रिय उत्पादनांना बाजारात चांगला दर मिळतो. तसेच, सेंद्रिय शेतीतील उत्पादने निर्यातक्षम असल्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थिक लाभ मिळण्याची शक्यता असते.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामध्ये उत्पादन आणि नफा यांचा संतुलित विचार केला जातो. ही पद्धत दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यावर भर देते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न सतत टिकून राहते. विविध पिकांची लागवड केल्यामुळे आर्थिक जोखीम कमी होते आणि एकाच पिकावर अवलंबित्व राहत नाही. त्यामुळे नैसर्गिक किंवा बाजारातील बदलांचा परिणाम कमी होतो आणि शेती अधिक सुरक्षित व स्थिर बनते.

7.उत्पादनक्षमता :

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेतीमध्ये सुरुवातीच्या टप्प्यात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर न केल्यामुळे उत्पादन तुलनेने कमी होऊ शकते. मात्र, कालांतराने सेंद्रिय पदार्थांचा वापर, कंपोस्ट व जैविक खतांमुळे मातीची रचना सुधारते आणि सुपीकता वाढते. त्यामुळे दीर्घकाळात उत्पादनक्षमता वाढण्याची शक्यता निर्माण होते आणि शाश्वत उत्पादन मिळू शकते.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामध्ये उत्पादनक्षमता टिकवून ठेवणे किंवा वाढवणे यावर भर दिला जातो. या पद्धतीत पाणी, जमीन आणि इतर संसाधनांचा कार्यक्षम आणि संतुलित वापर केला जातो. आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य व्यवस्थापनामुळे उत्पादन स्थिर राहते तसेच दीर्घकालीन शेतीसाठी उपयुक्त वाढ साध्य होते.

8.सामाजिक प्रभाव :

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेतीचा सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण परिणाम दिसून येतो. या पद्धतीत रसायनमुक्त आणि आरोग्यदायी अन्न उत्पादन केले जाते, ज्यामुळे समाजाच्या आरोग्याचे संरक्षण होते. तसेच, सेंद्रिय उत्पादनांमुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण होते, कारण उत्पादनाची गुणवत्ता आणि सुरक्षितता अधिक असते. त्यामुळे समाजात पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत जागरूकता वाढते.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतात, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते. या पद्धतीत सामाजिक समतोल राखण्यावर भर दिला जातो आणि सर्व घटकांचा समावेश करून विकास साधला जातो. परिणामी, ग्रामीण भागाचा सर्वांगीण आणि टिकाऊ विकास होतो तसेच समाजात स्थैर्य निर्माण होते.

9.मर्यादा :

i)सेंद्रिय शेती :

सेंद्रिय शेती ही पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी पद्धत असली तरी तिच्या काही मर्यादा आहेत. या पद्धतीत रासायनिक खतांचा वापर टाळल्यामुळे सुरुवातीच्या काळात उत्पादन कमी होण्याची शक्यता असते, ज्याचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होऊ शकतो. तसेच, सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक असलेली प्रमाणित प्रक्रिया खर्चिक आणि वेळखाऊ असते, ज्यामुळे लहान शेतकऱ्यांसाठी ती अवघड ठरते. याशिवाय, सेंद्रिय उत्पादनांची बाजारपेठ तुलनेने मर्यादित असल्यामुळे विक्रीच्या संधी कमी होऊ शकतात आणि योग्य बाजारभाव मिळणे कधी कधी कठीण जाते.

ii)शाश्वत कृषी विकास :

शाश्वत कृषी विकासामध्ये काही महत्त्वाच्या मर्यादाही आढळतात. या पद्धतीची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि प्रशिक्षण आवश्यक असते, जे सर्व शेतकऱ्यांकडे उपलब्ध नसते. तसेच, सुरुवातीच्या टप्प्यात ठिबक सिंचन, यंत्रसामग्री आणि इतर संसाधनांसाठी जास्त गुंतवणूक करावी लागते, ज्यामुळे आर्थिक भार वाढतो. त्यामुळे काही शेतकरी या पद्धती स्वीकारण्यास संकोच करतात. अशा प्रकारे, जरी ही पद्धत दीर्घकालीन फायदेशीर असली तरी तिच्या अंमलबजावणीत प्रारंभी काही अडचणी निर्माण होतात.

10. समानता :

सेंद्रिय शेती आणि शाश्वत कृषी विकास या दोन्ही शेती पद्धतींचे उद्दिष्ट वेगवेगळे असले तरी त्यांच्यात अनेक महत्त्वाच्या समानता आढळतात. या दोन्ही पद्धती पर्यावरण संरक्षणावर विशेष भर देतात आणि नैसर्गिक संसाधनांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात.

दोन्ही पद्धतींमध्ये मातीची सुपीकता टिकवणे आणि तिची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. यासाठी सेंद्रिय घटकांचा वापर, पिकांचे योग्य नियोजन आणि संसाधनांचा संतुलित उपयोग केला जातो.

समान वागणूक दिली गेली पाहिजे. कुटुंब, शाळा आणि समाज या सर्व स्तरांवर समानतेची मूल्ये रुजविणे आवश्यक आहे. स्त्रियांचे शिक्षण हे पितृसत्ताक व्यवस्थेविरोधातील सर्वात प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि अधिकारांविषयी जागरूकता निर्माण होते. त्यामुळे स्त्रियांना उच्च शिक्षण, व्यावसायिक संधी आणि कौशल्यविकासाच्या सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या स्त्रिया अन्यायाविरोधात अधिक प्रभावीपणे आवाज उठवू शकतात. समाजातील धर्म, परंपरा आणि रूढी यांच्या नावाखाली स्त्रियांवर लादली जाणारी अन्यायकारक बंधने दूर करणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या स्वातंत्र्य, शिक्षण, संपत्तीवरील अधिकार आणि निर्णयक्षमतेला सामाजिक मान्यता मिळाली पाहिजे. विवाहसंस्थेमध्येही स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व स्वीकारले गेले पाहिजे. बालविवाह, हुंडा, कौटुंबिक हिंसा आणि लैंगिक भेदभाव यांसारख्या समस्यांविरोधात कठोर कायदे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. स्त्रियांच्या अधिकारांविषयी समाजामध्ये व्यापक जनजागृती करणेही महत्त्वाचे आहे. माध्यमे, साहित्य, शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक चळवळी यांच्या माध्यमातून स्त्रीसमानतेचा संदेश पोहोचविला गेला पाहिजे.

स्त्री-पुरुष समानतेसाठी शिफारशी :

1. स्त्रियांना सर्व स्तरांवर दर्जेदार आणि समान शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
2. मुलगा आणि मुलगी यांना समान वागणूक देण्याविषयी कुटुंब आणि समाजामध्ये जनजागृती केली जावी.
3. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी समाजामध्ये समानतेची आणि मानवी मूल्यांची जाणीव निर्माण केली. जावी .
4. स्त्रियांना कनिष्ठ समजणारी पुरुषप्रधान मानसिकता बदलण्यासाठी शिक्षण द्यावे सामाजिक प्रबोधन करावे.
5. कुटुंब, शाळा आणि समाज या सर्व स्तरांवर स्त्री-पुरुष समानतेची मूल्ये रुजवावे.
6. ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व मुलींना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्यावी.
7. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी रोजगार, कौशल्यविकास आणि उद्योजकतेला प्रोत्साहन दिले जावे.
8. स्त्रियांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसा, लैंगिक छळ आणि हुंडाबळीविरोधी कायद्यांची कठोर अंमलबजावणी केली जावी.
9. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठी कायदेशीर संरक्षण अधिक मजबूत केले जावे.
10. स्त्रियांच्या तक्रारींचे त्वरित निवारण होण्यासाठी संवेदनशील प्रशासन आणि न्यायव्यवस्था निर्माण करावी.
11. स्त्रियांना संपत्ती, वारसा आणि निर्णयप्रक्रियेमध्ये समान अधिकार दिले जावेत.
12. बालविवाह, लिंगभेद आणि स्त्रियांना दुय्यम मानणाऱ्या सामाजिक रूढी दूर करण्यासाठी सामाजिक प्रबोधन केले जावे.
13. स्त्रियांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मानसिक सक्षमीकरणासाठी विशेष योजना राबविण्यात याव्यात.
14. माध्यमे, साहित्य आणि शिक्षणव्यवस्थेद्वारे स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य समाजामध्ये रुजविले जावे.
15. राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी विशेष संधी उपलब्ध करून दिल्या जाव्यात.

संदर्भ :

1. लोटे रा. ज. (2017), भारतातील समाजशास्त्रीय परंपरा, पिंपळापुरे ॲण्ड कं पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ क्र. 192
2. तत्रैव, पृष्ठ क्र. 194
3. तत्रैव

4. तत्रैव, पृष्ठ क्र. 195
5. पाटील प्रमोद (2017), पाश्चात्य आणि भारतीय साज्शास्त्रीय विचार परंपरा, अंशुल पब्लिकेशन, नागपूर, पृष्ठ क्र. 238
6. आगलावे प्रदीप (2017), मुलभूत समाजशास्त्रीय विचार, श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र.213
7. लोटे रा. ज. (2017), भारतातील समाजशास्त्रीय परंपरा, पिंपळापुरे अॅण्ड कं पब्लिशर्स, नागपूर, पृष्ठ क्र. 198
8. तत्रैव
9. तत्रैव

मराठी भाषा व वृत्तपत्रासाठी जाहिरात लेखन

प्रा. डॉ. नवनाथ निवृत्ती बेंडे

मराठी विभाग

श्री संत गाडगे महाराज महाविद्यालय लोहा, जि. नांदेड

अगदी सुरवातीच्या काळापासून भाषेला विशेष महत्त्व आहे. भाषेच्या माध्यमातून मानवी जीवन व्यवहार सुकर होताना दिसून येतो. आदीम काळापासून मानवाने भाषेचा वापर करून आपली प्रगती घडवून आणली आहे. भाषा हे विचार विनिमयाचे, संदेश वहनाचे प्रमुख साधन आहे. भाषा ही भाषिक व्यवहाराचे व आपले विचार,भावभावना इतरांपर्यंत पोहोचविण्याचे प्रमुख माध्यम आहे. भाषेच्याद्वारे आपणास आपल्या भावभावना वेगवेगळ्या माध्यमाद्वारे मांडता येतात. म्हणून मानवी जीवनात भाषेला अनन्य साधारण महत्व आहे.जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये मानवाकडून प्रत्येक व्यवहार भाषेद्वारे होत असतो. आजही भाषेच्या माध्यमातून आपले प्रकटीकरण, संदेशवहन आणि संप्रेषणाचे महत्त्वपूर्ण कार्य होत असते. भाषा नसती तर मनुष्य हा पशुवत राहिला असता. अन्न,वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांबरोबरच मानवाला भाषेची सुद्धा गरज आहे मानवाचा आजपर्यंतचा विकास हा भाषेमुळेच झाला. असे म्हणता येईल.

समाजात वावरत असताना भाषेचा आणि समाजाचा फार मोठा घनिष्ठ संबंध आहे समाज व्यवहारात भाषेला विशेष महत्त्व आहे. जस जसा समाजाचा विकास होत गेला तस तशी भाषा विकसित होत गेली. भाषा म्हणजे विचार,भावना,अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन होय. 'भाष' या धातूचा अर्थ बोलणे असा होतो. भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पद्धती व्यवस्था. भाषा म्हणजे मनुष्याने परस्पर विचार विनिमयासाठी प्रतिकात्मक ध्वनी समूहांची रूढ केलेली सुसंगत व सर्वमान्य व्यवस्था".1 या सर्वमान्य व सुसंगत व्यवस्थेतून मानवाने भाषिक कौशल्य आत्मसात केली. त्यातूनच त्यानी आपल्या मातृभाषेतून भाषण, संभाषण, संवाद,लेखन व वाचन यामध्ये प्रगती केली आहे.बोलणारा व ऐकणारा यांना जोडणारा दुवा म्हणजे भाषा होय.जगामध्ये हजारो भाषा बोलल्या जातात परंतु अशी एकमेव भाषा आहे तिला आपण मातृभाषा या नावाने संबोधतो आणि ती म्हणजे मराठी भाषा होय.

आज मराठी भाषेने साहित्याच्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.त्याचबरोबर व्यावहारिक जगात मराठीचा बोलबाला आहे. मराठी भाषा शिकून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. आज आपण आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असून खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या धोरणांमुळे शिक्षण क्षेत्रावर चांगला परिणाम झाला आहे. खाऊज्या धोरणामुळे अमेरिकेतील माणूस क्षणात भारतीय बाजारपेठेवर आधारित विक्रीमूल्य निश्चित करू शकतो. हाकेच्या अंतरावर अथवा एका क्लिकवर जग जवळ आले आहे. मराठी भाषेच्या संदर्भात केवळ कथा, कविता, कादंबरी, नाटक या वाङ्मय प्रकारापुरताच मर्यादित न राहता मराठी भाषेचा अभ्यासक्रम हा रोजगाराभिमुख होईल याची काळजी घेणे आवश्यक आहे. शालेय आणि महाविद्यालयीन पातळीवर मराठी भाषेचा अभ्यास करत असताना तो नुसता अभ्यास न राहता मराठी भाषेचे अध्ययन, वाचन लेखन व आकलन याचा उपयोग स्वविकासासाठी करता आला पाहिजे. या दृष्टीने मराठी भाषेकडे पहाणे गरजेचे आहे. अलीकडच्या काळात मराठी भाषेचा वापर करून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. निवेदन, सूत्रसंचालन, प्रवचन, कीर्तन, निरूपण, काव्यवाचन, कथाकथन, गीतलेखन, पटकथालेखन, संहिता लेखन, बातमी लेखन, भाषांतर, अनुवाद आणि

जाहिरात लेखन यासारख्या अनेक क्षेत्रात मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवून स्वविकास व रोजगार मिळू शकतो. विशेषतः वेगवेगळ्या प्रसारमाध्यमांमध्ये जाहिरात लेखन करून चांगल्या प्रकारची रोजगार संधी मिळू शकते.

प्रसार माध्यमातील जाहिरात लेखन

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात जाहिरातीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आजचे युग हे जाहिरातीचे युग आहे. असे म्हटले जाते. आधुनिक काळात जाहिरातीला विविधागी रूपे प्राप्त झाली आहे. असे असले तरी जाहिरातीला खूप जुनी परंपरा आहे. युरोपियन देशांमध्ये काही टोळ्या मालाची विक्री करण्याचा व्यवसाय करत, तेव्हा ते तोंडाने मोठ्याने आवाज करत किंवा एखादे वाद्य वाजवत व आपल्या मालाची जाहिरात करत असत. आपल्याकडेही पूर्वी दवंडी देऊन एखादी गोष्ट लोकांपर्यंत पोहोचवत. आज नव्या संशोधन व तंत्रज्ञानामुळे जाहिरातीचे स्वरूप बदलले आहे. आधुनिक काळातील प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून वर्तमानपत्र,आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांबरोबरच आजच्या सामाजिक माध्यमांचा वापर देखिल जाहिरातीसाठी केला जात आहे.

जाहिरात ही संज्ञा 'ॲडव्हेंचर' या लॅटिन शब्दापासून तयार झाली आहे. या शब्दाचा अर्थ त्याकडे मन वळविणे असा होतो आपल्या उत्पादित मालाकडे लोकांचे लक्ष केंद्रित करून आपल्या मालाचे किंवा वस्तूचे आकर्षण निर्माण करणे हा उद्देश जाहिरातीचा असतो. तसेच ती वस्तू विकत घेण्यास लोकांना प्रेरित करणे. हा जाहिरातीचा मुख्य हेतू असतो. विक्रेता आणि ग्राहक यांना एकमेकाजवळ आणणारे एक प्रभावी माध्यम म्हणजे जाहिरात होय. डॉ.प्रकाश मेदकर यांच्या मते आपल्या मालाचा जनतेला परिचय देऊन मालाची मागणी वाढविण्यासाठी त्याची स्वखर्चाने केलेली प्रसिद्धी म्हणजे जाहिरात होय.2 तर डॉ. केशव तुपे यांच्यामते "आपली वस्तू विकण्यासाठी त्या वस्तूची विविध गुणवैशिष्ट्ये लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी उद्योजक किंवा वितरक आर्थिक मोबदला देऊन जे माध्यम वापरतात त्याला जाहिरात असे संबोधतो"3 डॉ. मेदकर यांच्या मते मालाचा परिचय, मालाची मागणी व स्वखर्च अशा तीन बाबी जाहिरातीमध्ये येतात; तर डॉ.तुपे यांच्या व्याख्येत वस्तूची गुणवैशिष्ट्ये, उद्योजक किंवा वितरक यांचा स्वखर्च इत्यादी घटक महत्त्वपूर्ण वाटतात. असे असले तरी वरील दोन्ही व्याख्येत वस्तू आणि त्यांच्या विक्रीला केंद्रबिंदू मानले आहे.

जगभर व्यापार क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा असल्यामुळे उत्पादित मालाची विक्री होणे, हे खूप जिकरीचे व संघर्षमय काम झाले आहे. अशा परिस्थितीत आपलीच वस्तू किंवा माल इतरांपेक्षा कशी चांगली व दर्जेदार आहे, हे जाहिरातीच्या माध्यमातून कलात्मकरीत्या सांगितले जाते. या वस्तूची जाहिरात प्रभावीपणे व आकर्षक पद्धतीने सांगितली जाते. त्याच वस्तूकडे ग्राहकाचा कल दिसून येतो.यासंदर्भात ल. रा. नशिराबादकराचे मत लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. त्यांच्यामते, ग्राहक ग्रहित धरून उत्पादन सुरू झाल्याने उत्पादित वस्तू खपविण्यासाठी नवनवीन तंत्रे आणि माध्यम शोधली जाऊ लागली. विज्ञानाचे नवनवे शोध आणि सुविधा यामुळे जाहिरातीचे रंग रूप पालटू लागले.ती वृत्तपत्र व इतर माध्यमातून वाचकाला भेटू लागली. जाहिरात हा आजच्या युगाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. म्हणजेच आजचे युग हे जाहिरातीचे युग आहे. कोणत्याही कंपनीच्या उत्पादित मालाचा परिचय लोकांना करून देणे आपल्याच मालाची बाजारपेठेमध्ये मागणी वाढविण्यासाठी लोकांपुढे स्वखर्चाने आपल्या मालाची प्रसिद्धी केली जाते.

आजच्या यंत्रयुगाच्या काळात जाहिरातीचे स्वरूप व कला बदललेली दिसून येते. विज्ञानाच्या प्रगतीमुळे बदलत्या कालखंडात सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी जाहिरातीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे जाहिरातीच्या क्षेत्रात रोजगाराच्या संधी भरपूर उपलब्ध आहेत. यामध्ये दैनंदिन वर्तमानपत्र, मासिके, पोस्टर्स, फलक, आकाशवाणी, दूरदर्शन, मोबाईल, सामाजिक माध्यमे या सर्वांच्या माध्यमातून अनेक उत्पादक

आपल्या उत्पादनाच्या जाहिराती लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवत आहेत. त्यामुळे जाहिरातीचे स्वरूपही बदलत चालले आहे. "सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत प्रत्येक व्यक्तीचे जीवन जाहिरातीनेच व्यापून राहिले आहे. म्हणून जाहिरात लोकांची करमणूक व्हावी व लोकांनी त्यांचा माल घ्यावा म्हणून आकर्षकरित्या सादर केल्या जातात. जाहिरातीवर उत्पादक बराच पैसा खर्च करतात. एखाद्या वस्तूची फक्त एकदाच जाहिरात करून चालत नाही, तर आपला माल चांगला असल्याचे गि्हाईकाच्या मनावर अनेकदा जाहिरात करून बिंबवावे लागतो".5 वस्तूच्या उत्पादकाला किंवा व्यावसायिकाला मोठ्या प्रमाणावर व्यक्तीशी संस्थांशी संपर्क साधण्यासाठी जाहिरात सोयीचे साधन वाटते. उत्पादित वस्तूची किंवा सेवेची प्रतिमा ग्राहकांच्या मनात निर्माण करणे व ग्राहकाला वस्तू खरेदीस भाग पाडणे, ग्राहकाचे प्रबोधन करणे, वस्तूबद्दल आकर्षण निर्माण करणे अशा अनेक उद्देशांसाठी जाहिरात लेखन केले जाते.

वृत्तपत्रासाठी जाहिरात लेखन

जाहिरातीच्या प्रसाराचे मुख्य माध्यम म्हणून मुद्रित माध्यमाचा उल्लेख करावा लागतो. या माध्यमातून जाहिरात ठराविक काळात किंवा दैनिक स्वरूपात प्रसिद्ध होत असतात. यामध्ये वृत्तपत्र हे मुद्रित माध्यम फार प्रभावी व समाजाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचणारे एक समर्थ माध्यम म्हणून त्याचा निर्देश करावा लागतो. सर्वात लोकप्रिय माध्यम म्हणून वृत्तपत्राचा उल्लेख करता येईल. वृत्तपत्र वाचकांची संख्या फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे वृत्तपत्राचा खपही मोठ्या प्रमाणात होतो. वृत्तपत्रे प्रत्येक घराघरात पोहोचत असल्यामुळे त्यामध्ये जाहिराती मोठ्या प्रमाणात दिल्या जातात. वृत्तपत्रांमधून मोठ्या व छोट्या जाहिराती येत असतात. ठराविक काळाने वृत्तपत्रांमधून जाहिराती प्रसिद्ध होत असतात. तसेच यातील जाहिरात साक्षरांसाठी उपयुक्त असतात. तसेच वृत्तपत्र हे अल्प किमतीत असल्यामुळे हे सर्वसामान्य गरीब जनताही खरेदी करू शकतात. ग्राहकाची गरज लक्षात घेऊन जाहिरात व त्यातील शब्द वापरले जातात. कमीत कमी शब्दांच्या माध्यमातून म्हणजेच शब्दसंखेच्या मर्यादेत जाहिरातीचा मजकूर बसविणे हे देखील एक कलाच असल्यामुळे भाषिक कौशल्य वापरून जाहिरातीचे लेखन करावे लागते. त्यासाठी जाहिरात लेखन करणाऱ्या व्यक्तीला भाषेतील संक्षिप्त लेखन किंवा सारांश लेखनाचे ज्ञान आणि कौशल्य असणे आवश्यक आहे.केवळ अधिक तपशील दिल्याने जाहिरात परिणामकारक व प्रभावी होत नाही, तर मोजक्या शब्दयोजनेतून जाहिरात परिणामकारक प्रभावी होऊ शकते. त्यासाठी जाहिरात संहिता लेखन करणाऱ्या लेखकाकडे शब्दसामर्थ्य असले पाहिजेत. जाहिरातीतील शब्द हे ग्राहकाच्या अंतर्मनापर्यंत पोहोचणारे असल्यामुळे ग्राहकाच्या मनाचा ठाव घेतात.

वृत्तपत्रांमध्ये जाहिरात लेखन करण्यासाठी मध्यवर्ती कल्पना,मथळा,पूरक मथळा,संहिता,जाहिरातीची मुद्रा व घोषवाक्य इत्यादी घटकांचा समावेश होतो. या घटकांचा आकृतीबंध ठरलेला आहे.त्याच आकृतीबंधात जाहिरात लेखकाला जाहिरात लेखन करावे लागेल भाषेचे उत्तम ज्ञान असणारा लेखक याच पद्धतीने जाहिरात लेखन करून आपली जाहिरात परिणामकारक करत असत. कोणतीही जाहिरात तयार करताना मध्यवर्ती कल्पना सूचने आवश्यक आहे. त्यानंतर जाहिरातीचा मथळा हा महत्त्वपूर्ण असावा लागतो. म्हणजे 75 टक्के जाहिरात असे मथळ्याच्या बाबतीत म्हटले जाते. वाचकाचे मन आकर्षित करून त्याच्या मनात कुतुहूल निर्माण करणे हे दोन कामे मथळ्यातून केली जातात. त्यामुळे मथळ्याचे लेखन काळजीपूर्वक व कल्पनातीत असावे लागते. त्यासाठी संहिता लेखन करणाऱ्या लेखकाला म्हणी, वाक्प्रचार व काव्य यांचा अभ्यास असावा लागतो. मथळ्याचे लेखन करताना उत्पादनाची अवास्तव

स्तुती न करता मथळा हा अर्थपूर्ण व ग्राहकांना पटणारा असावा.मथळयात अवघड व चुकीची शब्दयोजना करू नये. जाहिरात मसुदा लेखनात मथळा यासोबतच पूरक मथळाही जोडलेला असतो. मथळयाला पुष्टी देणे, आशय स्पष्ट करणे, स्पष्टीकरण देण्याची कार्य पूरक मथळा करीत असतो. मथळा वाचकाला जाहिरातीकडे आकर्षित करतो,तर पूरक मथळा त्याला संपूर्ण जाहिरात वाचण्यासाठी उद्युक्त करतो.

जाहिरात मसुदा लेखन

जाहिरात म्हणजे विक्रीचा पूर्वारंभ असल्यामुळे जाहिरात प्रभावी होण्यासाठी तिचे लेखन काळजीपूर्वक केले तरच ती जाहिरात यशस्वी होईल. जाहिरातीतील वस्तू बदल माहिती द्यावी लागते. ग्राहकाच्या मानसशास्त्राचे आकलन करून जाहिरात मसुदा लेखनाचे काम करावे लागेल. तसेच ग्राहकाच्या सामाजिक,आर्थिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेऊन मसुदा लेखन केले जाते. जाहिरातीच्या भाषेतून अभिव्यक्त होणारा आशय थेट ग्राहकाच्या मनाला भिडणारा असावा. म्हणून जाहिरात लेखन करताना भाषाही साधी सोपी व सुलभ परिचयाची असावी लागते. म्हणून त्यातील शब्द अर्थपूर्ण करणारे असावे तसेच शब्द योजनेसोबतच जाहिरातीत चित्र,रंग, सजावट या घटकांनाही महत्त्व असते. म्हणून जाहिरातीची मांडणी करताना या घटकांकडे लक्ष द्यावे. या सर्वांसोबतच जाहिरातीमध्ये शब्दही महत्त्वाचे असतात. ग्राहकांच्या बुद्धी व भावनेला साद घालण्याचे सामर्थ्य शब्दांमध्ये असते. म्हणून ग्राहकाची बौद्धिक पातळी लक्षात घेऊनच शब्दाचे उपयोजन करावे लागते. म्हणून जाहिरात लेखनासाठी लेखकाकडे शब्द सामर्थ्य असणे महत्त्वाचे ठरते.जाहिरात मसुदा लेखन करणाऱ्या लेखकाकडे शब्द सामर्थ्यासोबतच कल्पकता व निवेदनशैली असावी लागते. शब्दाच्या विविध अर्थछटा व त्याचा अचूक वापर करण्याचे कौशल्य देखील असले पाहिजे. तसेच उत्पादनाच्या स्वरूपानुसार जाहिरातीची भाषा असावी.

एकूणच जाहिरातीचे लेखन वस्तूच्या वैशिष्ट्यानुसार करून जाहिरात प्रभावी व परिणामकारक करणे हे महत्त्वाचे कार्य लेखकाचे आहे. जाहिरात हे एक स्वतंत्र क्षेत्र झाले आहे.तसेच ते स्वतंत्र व्यवसायही झाला आहे. उद्योगाचे व व्यवसायाचे मोठे अर्थकारण त्या भोवती आहे.म्हणून ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक गोष्टी आपल्याजवळ असतील तर त्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे क्षेत्र आहे. स्पर्धेमुळे आणि प्रसिद्धीच्या हव्यासापोटी जाहिरातीचे क्षेत्र वाढत आहे.म्हणून जाहिरात लेखन करणाऱ्या व्यक्तीस व्यवसायाभिमूख संधी उपलब्ध आहे. आज समाजात मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या वाढत आहे. आज अनेक तरुण सामाजिक माध्यमांचा वापर करून अधिकच कल्पकता वापरून वेगवेगळया प्रकारच्या जाहिराती करत आहेत. हीच कल्पकता व शब्द सामर्थ्याच्या जोरावर वेगवेगळया प्रसार माध्यमांद्वारे जाहिरात करून मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो.

संदर्भ ग्रंथ

1. पुंडलिक मधुकर, मराठीचे अध्यापन श्री विद्या प्रकाशन, पुणे,1985,पृ. क्र. 10
2. प्रकाश मेदकर, उपयोजित मराठी भाग दोन, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, 2004
3. माध्यमांची भाषा आणि लेखन कौशल्य, चिन्मय प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर, 2010
4. ल.रा.नसिराबादकर व्यावहारिक मराठी, फडके प्रकाशन, कोल्हापूर 2008 पृ. क्र. 211
5. सदाशिव सरकटे,मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य, एज्युकेशन पब्लिशर्स, छत्रपती संभाजीनगर 2013 पृ. क्र. 117

१९९० नंतरच्या लेखिकांच्या कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह

संशोधक विद्यार्थी
दीपज्योती बन्सीलाल करंडे
(पीएच.डी. संशोधक विद्यार्थी) मु.पो. देहरे, ता.जि. अहिल्यानगर
मार्गदर्शक
प्रा. डॉ. प्रतीक्षा गायकवाड
मराठी विभागप्रमुख, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर
अभ्यास केंद्र: मराठी संशोधन केंद्र, पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर

प्रस्तावना :-

गोष्ट सांगणे आणि ऐकणे ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. त्यानंतर इतरांच्या आयुष्यात डोकावण्याची नैसर्गिक जिज्ञासाही व्यक्तीमध्ये असते. त्यामुळे एक गोष्ट सांगू का? असं म्हटलं की आपोआप उत्सुकता वाढते. तशी प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात गोष्ट बालपणीच आई,आजी, मावशी अशा विविध नात्यामधून आलेली असते. थोडक्यात काय तर स्त्रीच्या विविध नात्यातून, माध्यमातून गोष्ट ही आपणापर्यंत पोहचलेली असते. या अर्थाने स्त्री ही पहिली कथाकार असते. कथेच्या माध्यमातून योग्य संस्कार, मूल्य व्यक्तीच्या अंगात रुजली जातात.

साहित्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन अशा विविध घटकांचा समावेश होतो. ते स्त्रीने लिहिले की, पुरुषाने असा भेद करता येत नाही. परंतु स्त्रियांचे काही नैसर्गिक अनुभव, भावना, विचार, शारीरिक गुणधर्म या सर्वांना एक स्त्री म्हणून ती चांगल्या पद्धतीने मांडू शकते. याविषयी विद्या देवधर म्हणतात, "तिच्या अभिव्यक्तीला, भाषेला तिनेच स्त्रीत्वाचे बंधन घातले आहे. त्या बंधनातून बाहेर येऊन स्त्रीला लेखन करायचे असते. एक लेखक म्हणून स्वतःला सिद्ध करायचे असते. स्त्रियांचे साहित्य आणि आव्हाने असा विचार करू लागलो तर परंपरेतून आलेली भाषिक आणि वैचारिक बंधने पार करून लिहिण्याचे मोठे आव्हान तिच्यासमोर असते."[१] हे आव्हान पेलून आजची स्त्री काही प्रमाणात का होईना पण धाडसाने लिहिताना दिसते.

या ठिकाणी समकालीन लेखिकांच्या कथा आणि तिची प्रवृत्ती व प्रवाह या अनुषंगाने काही निरीक्षणे नोंदविली आहेत. समकालीन हा कालवाचक शब्द आहे. सम म्हणजे समान, समांतर, सोबत होय. एखाद्या विशिष्ट कालखंडामध्ये काही एक प्रमाणात समान, समान जाणिवा, समान अनुभव, समान प्रेरणास्त्रोत, समान भाषावैशिष्ट्ये, समान मूल्यांचा पुरस्कार करणारे, समान जीवनदृष्टी असलेले साहित्य निर्माण होऊ लागते. १९९० नंतरच्या काळातील काही निवडक लेखिकांच्या कथांचा थोडक्यात विचार करावयाचा आहे. १९६० नंतर मराठी साहित्यामध्ये आमूलाग्र बदल झाले. या काळातील ग्रामीण, दलित, आदिवासी अशा प्रवाहांनी मराठी साहित्य विस्तारले गेले. १९७५ नंतर मराठीमधील स्त्रीवादी साहित्य प्रवादाने स्त्रियांचे भावविश्वही धीटपणे मांडायला सुरुवात केली. १९७५ ते १९९० पर्यंत कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, वसुंधरा पटवर्धन यासारख्या लेखिकांनी आणि त्यानंतर गौरी देशपांडे, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, सानिया, उर्मिला पवार अशा लेखिकांनी स्त्रीच्या वाट्याला आलेले दुःख, अवहेलना, व्यथा-वेदना यांना बाजूला करून एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन निर्माण केला. १९९० नंतर भारताने मुक्त अर्थव्यवस्था धोरण स्वीकारले त्यामुळे सर्वत्र जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले व स्त्री लेखिकांनी पुन्हा नव्याने लेखनास सुरुवात केलेली या काळात पहावयास मिळते. त्यामध्ये मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा दया पवार आणि मनस्विनी लता रवींद्र या काही लेखिकांच्या कथांकडे बघून आश्वासकता निर्माण झाली. म्हणून या ठिकाणी या कालखंडातील नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा दया पवार आणि मनस्विनी लता रवींद्र या

लेखिकांच्या कथांचा थोडक्यात विचार केला आहे. काळ बदलला म्हणून साहित्यामध्ये बदल घडून येतो असे नाही. मानवी जीवनात जसजसे बदल घडतात ते संवेदनशील मनात पाझरून त्याचे प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटू लागते अशी ही निरंतर घडत जाणारी प्रक्रिया आहे. परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी हा कालखंड कल्पिलेला असतो. यामुळेच एकविसाव्या शतकातील या वीस वर्षाच्या कालखंडामध्ये आधीच्या कालखंडातील लेखिकांचे कथालेखनही काही प्रमाणात सुरूच आहे. त्यामध्ये गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष, उर्मिला पवार, मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर यांचा उल्लेख करता येईल. तसेच पारंपरिक, कौटुंबिक कथेच्या अनुषंगाने लिहिणाऱ्या छाया महाजन, रेखा बैजल, प्रतिमा इंगोले, मेनका धुमाळे, ललिता गादगे, आशा कर्दळे, नीलम माणगावे अशा काही स्त्री कथाकारांचा उल्लेख करता येईल.

लेखिका नीरजा यांच्या कथालेखनामध्ये 'जे दर्पणी बिबले' (२००१), 'ओल हरवलेली माती' (२००६), 'पावसात सूर्य शोधणारी माणसं' (२०१२) आणि 'अस्वस्थ मी अशांत मी' (२०१८) असे एकूण चार कथासंग्रह या काळामध्ये प्रकाशित झालेले आहेत. ''मला स्वतःला पुरुष नाकारणारा स्त्रीवाद मान्य नाही. मी ज्या स्त्रीवादाविषयी बोलत असते त्याविषयी मी म्हणेन की, आपण एक स्वतंत्र व्यक्ती आहोत, आपले स्वतःचे असे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे, स्वत्व आहे, माझ्या स्त्रीवादाच्या संकल्पनेत स्त्री-पुरुषांनी एकमेकांच्या विचारांचा भावनांचा, निर्णयांचा, स्वातंत्र्याचा आदर करणे यावर प्रामुख्याने भर असतो.''[२] कथालेखनामागच्या समदृष्टीची त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यांच्या कथांमधील स्त्री ही 'स्वत्वा'ची जाणीव असणारी असून ती आत्मसन्मानाने जगते. जसे की 'सावर रे' कथेतील मानसी, 'जवळ तरी दूर' कथेतील माई, 'पार्टी' या कथेतील रंजना यांचा उल्लेख करता येईल. लैंगिक भावनेविषयी त्यांच्या कथेतील स्त्रिया या मोकळेपणाने बोलतात. पारंपरिक स्त्रीवर पुरुषी समाजव्यवस्थेने लादलेल्या त्याग, समर्पण, वात्सल्य, करुणा, ममता, प्रेम या भावना त्यांच्या कथेतील स्त्रिया जुमानत नाहीत. उलट मुक्तपणे वागतात. स्त्री-पुरुष नात्यातील संबंधांना त्या अतिशय संवेदनशीलपणे व धीटपणे हाताळतात.

लेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांचे या काळात 'भूप' (२००४), 'आर्त' (२००८), 'शिल्प' (२०११) असे तीन कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांना कलावंतांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष आकर्षण असून त्यांच्या कथांमध्ये लेखक, चित्रकार, शिल्पकार, गायक असे अनेक कलावंत येतात. उदा. 'भूप' या कथेतील अवधूत पंत, 'आधार' कथेतील मामा. व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या भावना, स्पंदने योग्य पद्धतीने टिपले आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेतील पात्रे ही शारीरिक व्यक्तिमत्त्वापेक्षा आंतरिक स्वभावातून उभी राहतात. कारण त्यांच्या अनेक कथांमधून हळवेपणा सतत पाझरत असतो हे विशेष अनुभवास येते.

लेखिका प्रज्ञा दया पवार यांचा 'अफवा खरी ठरावी म्हणूनन हा कथासंग्रह २०१० मध्ये प्रकाशित झाला आहे. या कथासंग्रहातून दलित जाणिवेच्या गावपातळीवरील वास्तवापासून महानगरीय स्त्री जगण्याची घुसमट दाखविण्याचा प्रयत्न त्या करतात. त्याच्या कथेत येणारा वर्तमान, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक पर्यावरणाचा वापर विशेषत्वाने उल्लेख करण्यासारखा आहे. त्यांच्या कथेतील स्त्रिया या कर्तृत्ववान व सामाजिक भान असणाऱ्या आहेत. 'एक्झिट-१' मधील मीता ही अभिनेत्री असून, ती तिच्या कर्तृत्वाने उभी राहते. लग्न न करता अनेक पुरुषांसोबत लिव्ह इन मध्ये राहते. 'एक्झिट-२' या फॅन्टसीसदृश्य कथेमधून लेखकानेच उभे केलेले स्त्री पात्र प्रश्नांचा भडिमार करून समाजभान देण्याचे काम करते. तर 'पेडिक्युअर' कथेतील सवर्ण स्त्री माया पुरोहित दलित स्त्रीच्या पायाजवळ बसून पेडिक्युअर करते; परंतु तिच्या घरातील खाद्यपदार्थ खाण्याचे टाळते. ही अस्पृश्यता त्या दाखवितात. स्त्रीला दुबळे ठरवणाऱ्या समाजव्यवस्थेला विरोध करतात. प्रज्ञा दया पवार या मुळातच कवयित्री असल्यामुळे त्याच्या निवेदनाला एक काव्यात्मकता प्राप्त होते व कथा आशयपूर्ण बनते. त्यांचे उदाहरण घ्यायचे झाले तर 'एक्झिट-१' या कथेतील निवेदन ''काठावर मिता बसलेली, तिनं आपल्या हाताने योनीतून आपलं गर्भाशय खेचून बाहेर काढलं आणि

नदीच्या पात्रात सोडून दिलं. क्षणार्धात नदीच्या पाण्याचा रंग बदलला. रक्तासारखा लालभडक. ती अचंबित झाली. पलीकडच्या काठाला लक्ष गेलं. तिचं तर तिथं दुसरी बाई तीही बाई तिच्या हातानं तिचं गर्भाशय नदीत सोडत होती. मितानं चमकून आजूबाजूला जरा नीट पाहिलं तर तिला नदीच्या दोन्ही काठांना अशा कितीतरी बायका दिसल्या. आपापली गर्भाशय सोडून देणाऱ्या. आता समुद्र काय करेल? सामावून घेईल अशा नदीला?"[३] या प्रतीकामधून स्त्रीत्वाच्या नैसर्गिक सर्जनशीलतेचा प्रत्यय जसा त्या देतात तसेच याचं सर्जनशीलतेला तिची कमजोरी समजणाऱ्या समाजाला त्या सडेतोडपणे उत्तर देतात.

लेखिका मनस्विनी लता रवींद्र यांच्या 'ब्लॉगच्या आरशापल्याड' (२०१४) या कथासंग्रहास २०१६ चा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार मिळालेला आहे. एक कलावंत म्हणून त्या नाटक, अभिनय, दिग्दर्शन, कथा-पटकथा, संवाद अशा विविध क्षेत्रात स्वतःचा शोध घेताना दिसतात. स्त्री-पुरुष नात्यातील लिंगभावना, लैंगिकता, समाजकारण, जातीयता, राजकारण यांची जाण त्यांच्या ठिकाणी दिसून येते. 'तुझ्याविना' मधील ग्रामीण दुःख, दारिद्र्य, स्त्रीची वेदना नेमकेपणाने मांडली आहे. 'काळ्याकुट्ट वेळी' मधील आर्य पुरुषांच्या परंपरा मिरवणारा व स्वतःच्याच मुलीशा कुकर्म करणारा कर्नल साहेब किंवा 'मळक्या पायाची मुलगी' मधील तारुण्यसुलभ लैंगिक भावनांचा मुक्त आविष्कार असो या व अशा अनेक वृत्ती-प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा त्या उभ्या करतात. या नव्या बदलाविषयी त्या म्हणतात, "इथे कोण माणूस नाही, फक्त जनीवरं आहेत. ओरबाडून घेणारी इथे येऊन हवे तेवढे सर्च करा, समोरच्याला ओरबाडून घ्या, स्वतःच्याच चिधळ्या होऊ द्या. कारण सगळ्यांचे चेहरे झाकलेले आहेत. कोण कोणाशी संभोग करतोय कळत नाहीये आणि संभोगही कसला तर कल्पनेतला, मनातला, मनाची ओकारी करायचं बेसिन आहे हे असंच म्हणायला हवं. अ ग्लोबल सायबर बेसिन."[४] हे सोशल मिडियाच्या विकृततेला त्यांनी दाखवून दिले आहे.

एकविसाव्या शतकाचा विचार केला तर स्त्रियांचे कथालेखन काहीसे कमी झाले आहे. पारंपरिक स्वरूपांच्या कथा निर्माण होत नाहीत. नीरजा, मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा दया पवार, मनस्विनी लता रवींद्र या कथालेखिकांच्या कथा काही प्रमाणात आशादायक वाटतात. हा वीस वर्षाचा काळ झपाट्याने बदलला आहे की, त्याने जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर प्रभाव टाकला आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण साहित्यातून मांडले जायचे तेही आज योग्य पद्धतीने मांडले जात नाही. स्त्रीच्या व्यथा, वेदना योग्य पद्धतीने मांडल्या जात नाही; परंतु असे असले तरी वरील चार कथा लेखिकांच्या कथेने मराठी स्त्री लेखिकांच्या कथेमध्ये चैतन्य निर्माण केले आहे. डॉ. अंजली सोमण म्हणतात त्याप्रमाणे "आरंभ काळातील कथा लेखिकांना सामाजिक बंधनामुळे घराच्या उंबरठ्याबाहेर पडता येत नव्हते, ही त्यांच्या अनुभव विश्वाची मर्यादा होती. आताच्या स्त्री कथाकारांनी स्वतःवर स्त्रीवादी दृष्टिकोनाची मर्यादा घालून आपली जीवन जाणीव मर्यादित करू नये."[५] याचे भान वरील चारही कथा लेखिकांनी स्त्रीवादाची बंदिस्त चौकट बाजूला सारून, जो सामाजिक दृष्टिकोन स्वीकारला आहे तो महत्त्वाचा आहे हा प्रयत्न मराठी कथेसाठी सकारात्मक आहे.

संदर्भ ग्रंथ :-

१) स्त्री-लिखित मराठी साहित्य, संदर्भ आणि चिकित्सा, बदलते समाजवास्तव आणि स्त्रियांचे साहित्य, विद्या देवधर, संपादक आशुतोष पाटील, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २०१५, पृ.क्र. १७७.

२) स्त्री लिखित मराठी कथा १९५० ते २०१० मुलाखत - नीरजा, संपादक अरुणा ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४, पृ.क्र. ५१०.

३) अफवा खरी ठरावी म्हणून, प्रज्ञा दया पवार, शब्द पब्लिकेशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१०, पृ.क्र. १४.

४) ब्लॉगच्या आरशापल्याड, मनस्वी लता रवींद्र, शब्द पब्लिकेशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१७, पृ.क्र. ८९.

५) मराठी कथेची स्थितीगती, डॉ. अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९५, पृ.क्र. २७१.

खानदेशातील लोकपरंपरा : वहीगायन एक अभ्यास

कल्पतेश भिकनराव देशमुख
सहाय्यक प्राध्यापक (CHB) (इतिहास विभाग)
(नानासाहेब य. ना. चव्हाण कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय चाळीसगाव)

सारांश

खानदेश हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध प्रदेश असून येथे विविध लोककला आणि लोकपरंपरा आजही जिवंत स्वरूपात अस्तित्वात आहेत. त्यापैकी वहीगायन ही एक महत्त्वपूर्ण लोककला परंपरा आहे. वहीगायन हा मौखिक स्वरूपातील लोककला प्रकार असून त्यामध्ये स्थानिक लोकजीवन, लोकसंस्कृती, श्रद्धा, दैवतपरंपरा आणि ऐतिहासिक स्मृती यांचे दर्शन घडते. प्रस्तुत संशोधनामध्ये खानदेशातील वहीगायन या लोकपरंपरेचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनासाठी दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून उपलब्ध संदर्भग्रंथ, संशोधन लेख आणि लोकसाहित्यविषयक साहित्याचे विश्लेषण करण्यात आले आहे. अभ्यासातून असे आढळून आले की वहीगायन ही केवळ मनोरंजनाची कला नसून ती सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक वारसा आणि लोकअभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे. तथापि आधुनिकतेच्या प्रभावामुळे, स्थलांतरामुळे आणि लोकाश्रयाच्या कमतरतेमुळे या कलेसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या लोककलेचे संवर्धन आणि जतन करणे आवश्यक आहे.

बीजशब्द : खानदेश, लोकपरंपरा, वहीगायन, लोककला, लोकसाहित्य, लोकसंस्कृती

१. प्रस्तावना

लोकसाहित्य आणि लोककला या कोणत्याही समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाच्या जिवंत अभिव्यक्ती मानल्या जातात. लोकजीवनातील अनुभव, श्रद्धा, परंपरा, मूल्यव्यवस्था आणि सामाजिक संबंध यांचे प्रतिबिंब लोककलांमध्ये दिसून येते. महाराष्ट्रातील विविध भागांप्रमाणेच खानदेश प्रदेशातही अनेक समृद्ध लोककला परंपरा विकसित झालेल्या आहेत. खानदेशातील विविध बोलीभाषा, सांस्कृतिक विविधता आणि लोकश्रद्धा यांमुळे येथील लोककलांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

अशाच लोककलांपैकी वहीगायन हा एक महत्त्वपूर्ण कला प्रकार आहे. हा प्रकार प्रामुख्याने धार्मिक, सामाजिक आणि कुळाचाराशी संबंधित प्रसंगी सादर केला जातो. वहीगायनाच्या माध्यमातून स्थानिक देवता, ऐतिहासिक प्रसंग, लोककथा आणि लोकश्रद्धा यांचे जतन होत आले आहे. मौखिक परंपरेतून पिढ्यान् पिढ्या हस्तांतरित झालेली ही कला आजही ग्रामीण समाजात लोकप्रिय आहे.

२. साहित्य समीक्षा

डॉ. किसन पाटील यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासामध्ये लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते लोकसाहित्य हे समाजाच्या सांस्कृतिक स्मृतीचे जतन करणारे प्रभावी माध्यम आहे.

डॉ. रामचंद्र देखणे यांनी महाराष्ट्रातील विविध लोककलांचा अभ्यास करताना लोककलांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक भूमिकेवर प्रकाश टाकला आहे. लोककला ही समाजातील सांस्कृतिक मूल्ये जपण्याचे कार्य करते असे ते नमूद करतात.

रा. चिं. ढेरे यांनी लोकसाहित्य आणि लोकपरंपरांच्या अभ्यासातून लोकश्रद्धा, लोकसंस्कृती आणि लोककला यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला आहे. त्यांच्या संशोधनामुळे महाराष्ट्रातील अनेक लोकपरंपरांच्या अभ्यासाला दिशा मिळाली.

वरील अभ्यासांचा विचार करता महाराष्ट्रातील लोककला आणि लोकसाहित्य यांवर संशोधन झाले असले तरी खानदेशातील वहीगायन या विशिष्ट लोककला प्रकाराचा स्वतंत्र आणि सखोल अभ्यास तुलनेने कमी प्रमाणात झालेला दिसून येतो.

३. संशोधनातील अंतर

महाराष्ट्रातील लोककला आणि लोकसाहित्य यांवर विविध अभ्यास उपलब्ध आहेत. तथापि खानदेशातील वहीगायन या लोकपरंपरेचे सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक पैलू समजून घेण्यासाठी स्वतंत्र संशोधन अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. तसेच आधुनिक काळात या कलेत झालेले बदल, कलाकारांची सामाजिक पार्श्वभूमी आणि या कलेसमोरील आव्हाने यांचा सविस्तर अभ्यास झालेला दिसत नाही. प्रस्तुत संशोधन या संशोधनातील अंतर भरून काढण्याचा प्रयत्न करते.

४. संशोधनाची उद्दिष्टे

१. खानदेशातील वहीगायन या लोकपरंपरेचा अभ्यास करणे.
२. वहीगायन कला प्रकाराची वैशिष्ट्ये समजून घेणे.
३. वहीगायन कलाकारांची सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
४. वहीगायनातील लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे प्रतिबिंब समजून घेणे.
५. वहीगायनासमोरील आव्हाने आणि संवर्धनाच्या शक्यता अभ्यासणे.

५. संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे वर्णनात्मक स्वरूपाचे असून दुय्यम संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनासाठी लोकसाहित्य, लोककला आणि खानदेशातील सांस्कृतिक परंपरा यांच्याशी संबंधित पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके आणि उपलब्ध संदर्भ साहित्याचा वापर करण्यात आला आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करून वहीगायनाचा इतिहास, स्वरूप, वैशिष्ट्ये आणि वर्तमान स्थिती यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाच्या मर्यादा

१. संशोधन मुख्यतः दुय्यम माहितीवर आधारित आहे.
२. क्षेत्रीय सर्वेक्षण व मुलाखतींचा समावेश करण्यात आलेला नाही.
३. वहीगायन ही मौखिक परंपरा असल्याने लिखित माहिती मर्यादित उपलब्ध आहे.

६. वहीगायन : संकल्पना व स्वरूप

खानदेशातील विविध लोककला प्रकारांमध्ये वहीगायन हा एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण लोककला प्रकार मानला जातो. या लोककलेचा उगम खानदेशात झाल्याचे लोकपरंपरेतून सांगितले जाते. वही हा लोकगीतांचा प्रकार असून त्याची रचना प्रामुख्याने मौखिक स्वरूपाची असते. बहुतांश रचनाकार निरक्षर किंवा अल्पशिक्षित असल्यामुळे वह्यांमध्ये छंद, वृत्त आणि अलंकार यांची शास्त्रीय बांधणी आढळत नाही. तथापि या रचनांमध्ये भावनांची सहजता, अनुभवांची प्रामाणिकता आणि लोकजीवनाचे वास्तव चित्रण दिसून येते.

वहीचे लिखित स्वरूप गद्यसदृश वाटत असले तरी प्रत्यक्ष गायनाच्या वेळी ताल, लय आणि सुरांच्या साहाय्याने ती पद्यात्मक अनुभव देणारी कलाकृती ठरते. त्यामुळे वहीगायन ही लोकजीवनातून निर्माण झालेली उत्स्फूर्त काव्यात्मक अभिव्यक्ती मानली जाते.

७. लोककला प्रकार म्हणून वहीगायनाची वैशिष्ट्ये

वहीगायन ही खानदेशातील सण, उत्सव, नवस, जत्रा, कुळाचार आणि धार्मिक कार्यक्रमांशी निगडित असलेली लोककला आहे. या कलेचे वैशिष्ट्य म्हणजे तिची मौखिक परंपरा, स्थानिक बोलीभाषेचा वापर आणि लोकसंगीताशी असलेली जवळीक.

वहीगायनाच्या माध्यमातून खानदेशातील लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकदैवतांवरील श्रद्धा, सामाजिक मूल्ये आणि ऐतिहासिक स्मृती यांचे जतन केले जाते. वहीची रचना प्रामुख्याने कन्हेर कानबाई, मुंजोबा, ग्रामदैवत तसेच स्थानिक ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे आणि प्रेरणादायी घटनांवर आधारित असते. अनेक वह्यांमध्ये रामायण, महाभारत यांसारख्या महाकाव्यांतील प्रसंगांचाही समावेश आढळतो.

वहीगायनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कलाकार स्वतःच वहीची निर्मिती करतात, तिला चाल लावतात आणि सादर करतात. त्यामुळे या कलेमध्ये सर्जनशीलतेचा आणि लोकसहभागाचा अनोखा संगम दिसून येतो.

८. वहीगायनातील कलाकार, वाद्ये आणि वेशभूषा

वहीगायनामध्ये सहभागी होणारे कलाकार हे प्रामुख्याने शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्गातील असतात. या कला प्रकारात विविध जाती-पंथांतील लोक सहभागी होतात. कला सादर करताना सामाजिक भेद विसरून सर्व कलाकार एकत्रितपणे सहभागी होतात. ही बाब सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानता येईल.

एका वही मंडळामध्ये सामान्यतः मुख्य गायक, कोरस गायक आणि वादक अशा विविध भूमिका पार पाडणारे आठ ते दहा कलाकार असतात. काही ठिकाणी ही संख्या अधिकही असते.

वाद्ये

वहीगायनामध्ये डफ, ढोलकी, टाळ, झांज, खंजिरी, संबळ, कडी आणि तुणतुणे यांसारखी पारंपरिक वाद्ये वापरली जातात. आधुनिक काळात हार्मोनियम आणि इलेक्ट्रॉनिक वाद्यांचाही वापर होताना दिसून येतो.

वेशभूषा

वहीगायन करणारे कलाकार दिवसभर शेती अथवा मजुरीचे काम करीत असल्यामुळे पूर्वी ते दैनंदिन वेशभूषेतच सादरीकरण करीत असत. अलीकडच्या काळात काही मंडळे नेहरू कुर्ता, पायजमा, टोपी, फेटा आणि जाकीट यांसारख्या पारंपरिक पोशाखांचा वापर करताना दिसतात.

९. वहीगायनातील महिलांचा सहभाग

लोककला ही समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य घटक असली तरी अनेक लोककलांमध्ये महिलांचा सहभाग ऐतिहासिकदृष्ट्या मर्यादित राहिलेला दिसून येतो. खानदेशातील वहीगायन या लोककला प्रकारामध्येही अशीच परिस्थिती आढळून येते. उपलब्ध माहितीनुसार वहीगायनामध्ये महिलांचा सहभाग अत्यल्प प्रमाणात दिसून येतो. काही अपवादात्मक ठिकाणी महिलांचा सहभाग आढळत असला तरी बहुतांश ठिकाणी ही कला पुरुषप्रधान स्वरूपात विकसित झालेली दिसते.

यामागे सामाजिक, सांस्कृतिक आणि पारंपरिक घटक कारणीभूत असल्याचे दिसून येते. ग्रामीण भागातील सामाजिक संकेत, सार्वजनिक कार्यक्रमांमधील स्त्रियांच्या सहभागाविषयी असलेले पारंपरिक दृष्टिकोन तसेच घरगुती जबाबदाऱ्या यांमुळे महिलांचा सहभाग मर्यादित राहिला असावा. लोकपरंपरेतून पुढे आलेल्या या कलेमध्ये पुरुषांचे वर्चस्व दीर्घकाळ टिकून राहिल्यामुळे महिलांना संधी मिळण्याचे प्रमाण कमी राहिले आहे.

तथापि आधुनिक काळात शिक्षणाचा प्रसार, सामाजिक जागरूकता आणि सांस्कृतिक क्षेत्रातील महिलांची वाढती उपस्थिती यांमुळे परिस्थितीत काही प्रमाणात बदल होताना दिसत आहे. लोककला संवर्धनाच्या दृष्टीने महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. महिलांचा सहभाग वाढल्यास या कलेला नवीन अभिव्यक्ती, नवीन विषय आणि व्यापक सामाजिक स्वीकार्यता प्राप्त होऊ शकते.

त्यामुळे भविष्यातील संशोधनामध्ये महिलांच्या सहभागाच्या शक्यता, त्यांच्यासमोरील अडचणी आणि या कलेच्या जतनामध्ये त्यांची भूमिका यांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे.

१०. वहीगायनाचा इतिहास, गुरु-शिष्य परंपरा आणि काळानुसार झालेले बदल

खानदेशातील वहीगायन या लोककला प्रकाराचा इतिहास मुख्यतः मौखिक परंपरेवर आधारित आहे. या कलेच्या उत्पत्तीविषयी निश्चित लिखित पुरावे उपलब्ध नसले तरी स्थानिक लोककलावंत आणि लोकपरंपरा यांमधून तिचे प्राचीन अस्तित्व अधोरेखित होते. लोककलावंतांच्या मते ही कला अनेक शतकांपासून अस्तित्वात असून तिच्याशी संबंधित विविध दंतकथा खानदेशात प्रचलित आहेत. यादवकालीन हेमाद्री, फारुकी राजवट, खानबाई यांसारख्या ऐतिहासिक आणि अर्धऐतिहासिक कथांचा उल्लेख लोकपरंपरेत वारंवार आढळतो.

लोकपरंपरेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे सातत्य. वहीगायनाच्या बाबतीत हे सातत्य गुरु-शिष्य परंपरेतून जपले गेलेले दिसते. लिखित नोंदींचा अभाव असला तरी या कलेचे ज्ञान पिढ्यान्पिढ्या मौखिक स्वरूपात हस्तांतरित होत

आले आहे. अनेक वह्यांच्या शेवटच्या चरणांमध्ये गुरु आणि शिष्य यांचा उल्लेख आढळतो, यावरून या परंपरेचे अस्तित्व स्पष्ट होते.

वहीगायन ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून ती सांस्कृतिक वारशाचे संवहन करणारी लोकशिक्षणाची एक प्रभावी पद्धत आहे. लोकदैवतांच्या कथा, ऐतिहासिक प्रसंग, सामाजिक मूल्ये आणि लोकजीवनातील अनुभव यांचे जतन या परंपरेद्वारे होत आले आहे.

मात्र बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे या कलेमध्ये अनेक परिवर्तन घडून आले आहेत. पारंपरिक वाद्यांबरोबर आधुनिक वाद्यांचा वापर वाढला आहे. सादरीकरणाच्या शैलीत बदल झाला आहे. तसेच आधुनिक मनोरंजनाच्या साधनांमुळे लोककलेविषयीचे आकर्षण काही प्रमाणात कमी झालेले दिसते.

विशेषतः युवा पिढीचे शहरांकडे होणारे स्थलांतर, रोजगाराच्या बदलत्या संधी आणि लोककलांमधून मर्यादित आर्थिक उत्पन्न यांमुळे या क्षेत्राकडे वळणाऱ्या तरुणांची संख्या कमी होत आहे. परिणामी वहीगायन मंडळांची संख्या घटत असल्याचे दिसून येते. ही परिस्थिती भविष्यात या लोककलेच्या अस्तित्वासाठी गंभीर आव्हान ठरू शकते.

अशा परिस्थितीत वहीगायनाचे दस्तावेजीकरण, संशोधन आणि संवर्धन यांना विशेष महत्त्व प्राप्त होते. कारण ही कला केवळ सांस्कृतिक अभिव्यक्ती नसून खानदेशाच्या लोकस्मृतीचा आणि सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

११. निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनामध्ये खानदेशातील वहीगायन या लोकपरंपरेचा अभ्यास करण्यात आला. अभ्यासातून असे स्पष्ट होते की वहीगायन ही खानदेशातील एक महत्त्वपूर्ण, प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण लोककला परंपरा आहे. या कलेच्या माध्यमातून स्थानिक लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकश्रद्धा, सामाजिक मूल्ये आणि ऐतिहासिक स्मृती यांचे जतन होत आले आहे.

वहीगायनाचा अभ्यास केवळ एका लोककलेचा अभ्यास नसून खानदेशाच्या सांस्कृतिक इतिहासाचा आणि सामाजिक जीवनाचा अभ्यास आहे. या लोककलेमध्ये विविध जाती, पंथ आणि सामाजिक स्तरांतील लोकांचा सहभाग दिसून येतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य, सांस्कृतिक समन्वय आणि लोकपरंपरेचे जतन या दृष्टीने या कलेचे महत्त्व विशेष अधोरेखित होते.

अभ्यासातून असेही दिसून येते की वहीगायन ही कला मुख्यतः मौखिक परंपरेवर आधारित असल्यामुळे तिच्या जतनासंबंधी अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आधुनिक जीवनशैली, लोकाश्रयाचा अभाव, रोजगारासाठी होणारे स्थलांतर आणि नव्या पिढीचा कमी होत चाललेला सहभाग यांमुळे या कलेसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः तरुण पिढीचा सहभाग कमी होत असल्याने या परंपरेचे सातत्य धोक्यात येण्याची शक्यता आहे.

तथापि, या सर्व आव्हानांनंतरही वहीगायन आजही ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान टिकवून आहे. लोकदैवतांवरील श्रद्धा, सण-उत्सव, कुळाचार आणि सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून या कलेचे अस्तित्व आजही जपले जात आहे.

म्हणूनच वहीगायनाचे शास्त्रीय दस्तावेजीकरण, संशोधन, संवर्धन आणि प्रसार करणे ही काळाची गरज आहे. शासन, शैक्षणिक संस्था, संशोधक आणि लोककलावंत यांच्या संयुक्त प्रयत्नांमधून या लोकपरंपरेचे संरक्षण केल्यास भविष्यातील पिढ्यांसाठी हा अमूल्य सांस्कृतिक वारसा जतन करता येईल.

१२. सूचना

१. वहीगायनाचे ध्वनी आणि दृकश्राव्य दस्तावेजीकरण करण्यात यावे.

२. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लोककला संवर्धन कार्यक्रम आयोजित करावेत.

३. युवा पिढीला या कलेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.

४. लोककलावंतांना आर्थिक सहाय्य, शिष्यवृत्ती आणि मानधन उपलब्ध करून द्यावे.

५. सांस्कृतिक महोत्सवांमध्ये वहीगायनाला प्राधान्याने स्थान द्यावे.

६. लोककला संशोधन केंद्रांमार्फत वहीगायनावर विशेष संशोधन प्रकल्प राबवावेत.

७. डिजिटल माध्यमांद्वारे वहीगायनाचे जतन व प्रसार करण्यासाठी प्रयत्न करावेत.

संदर्भसूची

1. पाटील, किसन. *लोकसाहित्य आणि इहतत्त्व.* अमळनेर : कस्तुरी प्रकाशन.
2. देखणे, रामचंद्र. *महाराष्ट्राची सांस्कृतिक लोककला.* पुणे : पद्मगंधा प्रकाशन.
3. ढेरे, रा. चिं. *लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा.* पुणे : पद्मगंधा प्रकाशन.
4. पाटील, व. भा. *सामाजिक संशोधन पद्धती.*

भारतीय शेतीतील परिवर्तनाचा अर्थशास्त्रीय अभ्यास

प्रा. डॉ. सूर्यकांत पवार

लोकमान्य महाविद्यालय सोनखेड, ता. लोहा जि नांदेड

प्रस्तावना:

1960 पूर्वीच्या अन्नसुरक्षेच्या अभावापासून ते 2024- 25 मध्ये 353.96 दशलक्ष टणांच्या विक्रमी उत्पादनापर्यंत झालेले भारताचे कृषी परिवर्तन हे राष्ट्राच्या विकसित भारताच्या दिशेने होणाऱ्या प्रवासाचे उत्तम उदाहरण आहे. हे कृषी पुनर्जीवन केवळ उदरनिर्वाह पुरते मर्यादित न राहता दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय यासारख्या विविध कृषी उद्योगापर्यंत विकसित झाले आहे. तथापि या उल्लेखनीय कामगिरीनंतरही कृषी क्षेत्राला उत्पादकता, शास्वतता आणि आधुनिकीकरण यामध्ये अजूनही गंभीर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आर्थिक स्थिरतेचा पाया म्हणून कृषी क्षेत्र एका महत्वपूर्ण नदीप्रमाणे आहे, जी एकदा हे अडथळे दूर झाल्यानंतर 2047 पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनवण्याच्या दृष्टिकोनाच्या दिशेने निर्णायकपणे प्रवाहित होईल.

अभ्यासाची उद्दिष्टे:

1. भारतीय कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रमुख घटकांचा अभ्यास करणे
2. भारतीय कृषी प्रणालीचा परिणामकारकतेत अडथळा आणणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
3. कृषी क्षेत्राच्या पुनर कल्पनेचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती:

सदरील संशोधन पेपर लिखाणासाठी दुय्यम साधनसामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे, ज्यामध्ये प्रकाशित ग्रंथ, प्रबंध, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, संकेतस्थळ या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

I] भारतीय कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे प्रमुख घटक:

कृषी पायाभूत सुविधा मधील गुंतवणूक:- भारत सरकारने कृषी पायाभूत सुविधांमध्ये केलेल्या भरीव गुंतवणुकीमुळे या क्षेत्रात परिवर्तन घडत आहे कृषी पायाभूत सुविधा निधी आणि प्रधानमंत्री किसान संपदा योजना यासारख्या उपक्रमामुळे साठवणूक प्रक्रिया आणि वाहतूक प्रणालींचे आधुनिकीकरण होत आहे कापणी नंतरचे नुकसान कमी करण्यासाठी आणि पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी हे प्रयत्न महत्वपूर्ण आहेत. >2022 23 मध्ये कृषी क्षेत्राची सकल भांडवल निर्मिती 19.04 प्रतिशत दराने वाढली. एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे उद्दिष्टे असलेला, अन्नाची नासाडी कमी करण्यासाठी आवश्यक असलेली साठवणूक व्यवस्था, शीत साखळी आणि बाजारपेठेची असलेले संबंध सुधारत आहेत.

तंत्रज्ञानाचे एकीकरण आणि शेतीचे डिजिटलिकरण:- भारत कृषी उत्पादकता वाढवण्यासाठी ए आय ब्लॉक चेन आणि ड्रोन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक अवलंब करत आहे 2024 मध्ये 2817 कोटी रुपयांच्या आर्थिक तरतुदीसह सुरू करण्यात आलेल्या डिजिटल कृषी अभियानाचा उद्देश कृषी क्षेत्रासाठी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा स्थापित करणे आहे. अग्री स्टाक हा डीपीआयचा पायाभूत स्तंभ असून शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणेच एक डिजिटल सार्वजनिक सुविधा म्हणून त्याची रचना करण्यात आली आहे. इ -नाम सारखे डिजिटल उपक्रम शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ सुलभ करत आहेत, चांगला भाव निश्चिती करत आहेत आणि माध्यमांना कमी करत आहेत.

शाश्वत शेती आणि सेंद्रिय शेतीच्या वाढीला चालना:- धोरणात्मक प्रोत्साहन आणि बदलत्या ग्राहक मागणीमुळे सेंद्रिय शेतीच्या जलद वाढीला चालना मिळून शाश्वततेला गती मिळत आहे. मार्च 2024 पर्यंत देशात अंदाजे 17.6 लाख सेंद्रिय शेतीची जमीन होती आणि अतिरिक्त 36.3 जमीन सेंद्रिय शेतीमध्ये रूपांतरित केली जात होती भारतातील सेंद्रिय उत्पादनांची बाजारपेठ 2025 पर्यंत 75 000 कोटी रुपया पर्यंत (9.1 अब्ज अमेरिकन डॉलर्स) पोहोचणार

आहे. यानुसार भारताच्या सेंद्रिय निर्यातीत वाढ झाली असून गेल्या पाच वर्षात सेंद्रिय फळाच्या निर्यातीत 47.5% वाढ झाली आहे जे मजबूत आंतरराष्ट्रीय मागणी दर्शविते.

पशुधन आणि दुग्ध क्षेत्राचे पुनरावजीवन :-वाढलेले उत्पादन आणि जागतिक मागणीमुळे भारताच्या दुग्ध आणि पशुधन क्षेत्रात मोठी तेजी आली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश असून जागतिक दूध उत्पादनात त्याचा वाटा अंदाजे 24% आहे. दूध शीतकरण प्रकल्प आणि पशुंच्या जातीमध्ये सुधारणा यासारख्या पायाभूत सुविधा साठी सरकारने दिलेल्या प्रोत्साहनामुळे भारताला जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश म्हणून स्थान मिळाले आहे. गौचिप आणि महिषाची यासारख्या स्वदेशी जीनोमिक चिप्सच्या विकासामुळे भारतीय गाई आणि म्हशींच्या अनुवंशिक सुधारणेला गती मिळण्यास मदत होत आहे.

मत्स्य व्यवसाय आणि जल शेती विकास:- पायाभूत सुविधा आणि शाश्वत जल शेती पद्धतीमध्ये सरकार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असल्यामुळे मत्स्य व्यवसाय क्षेत्र एक प्रमुख विकासाचे क्षेत्र म्हणून उदयास येत आहे. प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेमुळे आर्थिक वर्षे 2025 पर्यंत मत्स्य उत्पादन 210 लाख टनापर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे, 2014- 15 ते 2024- 25 या कालावधीत भारताची सागरी खाद्यपदार्थाची निर्यात प्रमाण 60 टक्क्यांनी वाढवून 16.85 लाख मॅट्रिक टन झाली .

अन्नप्रक्रिया क्षेत्राचा विस्तार:

भारतातील अन्नप्रक्रिया क्षेत्रांच्या वाढीमुळे मूल्यवर्धनाच्या असंख्य संधी निर्माण होत असून देशांतर्गत आणि निर्यात बाजारपेठांचा विस्तार होत आहे. पी एम के एस वाय आणि अन्नप्रक्रिया उद्योगासाठी उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना यासारख्या सरकारी उपक्रमामुळे हे क्षेत्र 2025 पर्यंत 3. 45 लाख कोटी रुपयांपर्यंत वाढलेले आहे.

कृषी संशोधन आणि विकास बळकटीकरण:- कृषी संशोधन आणि विकासामधील गुंतवणूक पिकांच्या जाती सुधारणे कीड व्यवस्थापन आणि हवामान बदलांना तोंड देण्याची क्षमता यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे सरकार आनुवंशिक सुधारणा आणि पर्यायी शेती पद्धतीमधील प्रगत संशोधनावर लक्ष केंद्रित करत आहे.

II] भारतीय कृषी प्रणालीच्या परिणामकारकतेत अडथळा आणणारे प्रमुख घटक:-

- **संरचनात्मक आणि संसाधनावर आधारित समस्या जमिनीची तुकडे**:- भारतातील कृषी उत्पादकतेसाठी जमिनीचे तुकडे होणे हा एक मोठा अडथळा आहे. भारतातील कृषी प्रधान लोकसंख्या 85 टक्के पेक्षा जास्त असलेले लहान आणि अल्पभूधारक शेतकरी एकूण पेरणीयोग्य क्षेत्राच्या जवळपास 45% क्षेत्रावर लागवड करतात, असे असूनही सन्मान जनक उदरनिर्वाहासाठी लहान जमिनीतून मिळणारे उत्पन्न अपुरे असते.
- **सिंचन पायाभूत सुविधांची कमतरता** :-प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेसारखे प्रयत्न करूनही सिंचन मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून आहे. भारतातील सुमारे 61 टक्के शेतकरी पावसावर अवलंबून असलेल्या शेतीवर अवलंबून आहेत ,आणि एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी 55% क्षेत्र पावसावर आधारित शेती खाली आहे. ज्यामुळे ते हवामान बदलास असुरक्षित बनते.
- **रासायनिक खतावरील सततचे अवलंबित्व** :-रासायनिक खतावरील अति अवलंबनामुळे अल्पकाळात उत्पादनात वाढ होत असली तरी त्यामुळे दीर्घकाळात जमिनीचा ऱ्हास आणि पर्यावरणाची हानी होत आहे. भारत हा जागतिक स्तरावर खतांचा दुसरा सर्वात मोठा उपभोक्ता आहे. 2023- 24 मध्ये एकूण वार्षिक वापर सुमारे 601 लाख मॅट्रिक टन होता. भारतातील खतांच्या अत्याधिक वापरामुळे जमिनीचा सुपीकपणा खालावतो आणि काही विशिष्ट प्रदेशांमध्ये प्रतीही तर उत्पादकता घटली आहे.
- **हवामान बदल आणि पर्यावरण** :-अनियमित पर्जन्यमान, वाढते तापमान आणि दुष्काळ व पूर यासारख्या तीव्र हवामान घटकामुळे पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असल्याने भारताची कृषीक्षेत्र हवामान बदलास अत्यंत संवेदनशील आहे. 2023- 24 मध्ये प्रामुख्याने अपुऱ्या आणि उशिरा आलेल्या

मान्सूनमुळे अन्नधान्याचे उत्पादन 328.8 दशलक्ष टन इतकी कमी होते जे हवामानाच्या अनिश्चिततेच्या थेट परिणाम दर्शवते.

- **संस्थात्मक आणि आर्थिक मर्यादा** :- पत पुरवठा आणि आर्थिक मदतीचा समान प्रवेशाचा अभाव ,अनेक शेतक़ऱ्यांसाठी विशेषता अल्पभूधारक शेतक़ऱ्यांसाठी वेळेवर आणि परवडणारा पतपुरवठा मिळवणे हे एक मोठे आव्हान आहे.
- **किमान आधारभूत किमतीतील समस्या** :-किमान आधारभूत किंमत प्रणाली शेतक़ऱ्यांना बाजारभावातील चढउतारापासून संरक्षण देण्यासाठी तयार केली असली तरी तिच्या अंमलबजावणी आणि परिणामकारकतेमध्ये मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागेल. 23 हून अधिक पिकासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित केलेली असली तरी खरेदी मर्यादित आहे.

III] विकसित भारताच्या उद्दिष्टासाठी सुसंगत राहण्यासाठी कृषी क्षेत्राची पुनर कल्पना डिजिटल सहकारी शेती मंचाद्वारे भूमी एकत्रीकरण भूमीच्या विखंडनावर मात करण्यासाठी भारताने डिजिटल सहकारी शेती वंचना प्रोत्साहन दिले पाहिजे जिथे अल्पभूधारक शेतकरी स्मार्ट करार आणि ब्लॉगचेन समर्पित करारादारे शिवसेने जमीन आणि संसाधने एकत्र करतात हे प्लॅटफॉर्म मालकी हक्क आबाधित ठेवून सामायिक यांत्रिकीकरण निविष्ठांची खरेदी आणि बाजारपेठ प्रवेश सुलभ करू शकतात पंचायत स्तरावरील जलपरिषदामार्फत विकेंद्रीत सूक्ष्म सिंचन केंद्र खराब सिंचन पायाभूत सुविधांची समस्या सोडविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावरील जलसंसाधन परिषदांना सौर उर्जेवर चालणारे पंप आणि जमिनीतील आद्रतेच्या रियल टाईम माहितीचा वापर करून समूह आधारित ठिबक आणि तुषार सिंचन प्रणाली लागू करण्यासाठी सक्षम केले पाहिजे.

निष्कर्ष:-

अन्नतंचाई असलेल्या अर्थव्यवस्थेपासून जागतिक कृषी महासत्ता बनवण्यापर्यंतच्या भारताच्या प्रवासाला आता अन्नसुरक्षा पासून शेतक़ऱ्यांच्या समृद्धीकडे आणि नांगरापासून प्लॅटफॉर्मकडे मोठी झेप घेण्याची गरज आहे. विकसित भारताची संकल्पना साकार करण्यासाठी कृषी क्षेत्राला तंत्रज्ञान एकीकडे हवामान अनुकूल आणि मूल्य आधारित क्षेत्रात विकसित होणे आवश्यक आहे. जिथे माती आणि सॉफ्टवेअर एकत्र येतात आणि मिशन व सर्वसमावेशकता नांदतात, ग्रामीण मुळापासून विकसित भारताची बिजे पेरून भारत हे सुनिश्चित करू शकतो की, कृषी केवळ राष्ट्राला अन्न पुरवणार नाही तरी विकसित अर्थव्यवस्थेत होणाऱ्या त्याच्या परिवर्तनालाही चालना देईल. शेवटी असे म्हणता येईल की भारतीय शेती ही निर्वाह शेतीतून तंत्रज्ञान आधारित आणि हवामान बदलांना तोंड देऊ शकणाऱ्या विकासाच्या इंधनामध्ये रूपांतरित होत आहे.

संदर्भसूची:-

1. Kekane M.A.(2013),Indian Agriculter Status,Importance and Role In Indian economy,International journal of Agriculture and food science Technology, reviewed by research india publications ISSN 2249-3050,Volume 4,pp,343-346
2. Ministry of agriculture, annual report 2025.
3. Directore of economic and statistics, ministry of agriculture.

यशवंत मनोहर यांच्या कवितेतील जीवनदृष्टीचे स्वरूप

डॉ. शिवसांब कापसे

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा जि.परभणी

आंबेडकरवादी कवितेची मूळ प्रेरणा हे महामानव डॉ बाबसाहेब आंबेडकर हेच आहेत. सर्व सृजनाला जीवनाशय देणारी आणि क्रांतीकारी, युवप्रवर्तक, दलितांच्या उत्थानाला नवसंजीवनी, गतप्राण झालेल्यांना संवेदनशील बनवणारी, अस्मिता प्रास करून देणारी उर्जा म्हणून बाबासाहेबांच्या पाहीले जाते. या जाणीवेने स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक अधिकार न्याय यास प्राधान्य देऊन काव्याभिव्यक्ती केलेली आढळते. डॉ बाबासाहेबांनी साहित्यविषयक घेतलेली भूमिका ही जीवनवादी दृष्टीची आहे याविषयी सारीपुत्र तुपेरे म्हणतात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाङ्मयीन चिंतन मूल्याधिष्ठित आहे. साहित्य मानव आणि संस्कृती यांच्यातील दुवा असते, त्यामुळे साहित्यातून मानवी जीवन, समान आणि संस्कृतीला मूल्यात्मकता प्राप्त होऊ शकते. हे जीवनवादी, समाजसन्मुख, संस्कृतीनिष्ठ मूल्यतत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साहित्यविचारात अभिव्यक्त होते. डॉ. बाबासाहेबांनी जीवनातील सारी दुःख, उपेक्षा, यास एकच उत्तर म्हटले ते म्हणजे शिक्षण आणि शिक्षणानेच परिवर्तन, होईल, जुन्या रुढी, परंपरा, अमानुषता, अन्याय, अत्याचार, यातून बाहेर पडावयाचे असेल तर शिका, संघटीत होऊन व संघर्ष करणे हा विचार जीवनात उपयोग करता आला पाहीजे'[1] उपेक्षित, तळागाळातील वर्गाने आपल्या या ऊर्जास्त्रोताचे, प्रज्ञासूर्याचे दैदीप्यमान जीवन डोळ्यासमोर ठेवून जीनवाल दीशा द्यायला सुरुवात केली.

लेखनी, विचार आणि कार्यातून बाबासाहेबांची प्रतिज्ञा उमटू लागली. समग्र जीवनाला व्यापलेले महामानव ही ओळख बनले आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक कवी लिहीते झाले, नामदेव ढसाळ , केशव मेश्राम,त्रिंबक सपकाळे, वामन निंबाळकर, दया पवार, यशवंत मनोहर, अर्जुन डांगळे, ज.वि. पवार, प्रल्हाद चेदंवण-कर, प्रकाश जाधव, हिरा बनसोडे, जोती लांजेवार, राम दोतोंडे, भीमसेन देठे, बबन चहांदे, प्रज्ञा पवार, लहू कानडे , लोकनाथ यशवंत, अशा अनेक कवींनी दलित कविता समृद्ध केली. त्यांच्या जीवनदृष्टीने उभे केलेले काव्य हे अस्सल अनुभवाचे वास्तव रूप म्हणून पाहीले जाते, याविषयी प्रा. केशव वसेकर म्हणतात "येथील दलित माणूस कोंडवाड्यात जगतो आहे. चार मजली मोडकळीस आलेली पायऱ्या नसलेली इमारत पाडण्यासाठी 'सुरुंग ' लावावा लागतो. उच्च वर्णीयांच्या काळ्या कर्तृत्त्वाचे ऑडीट' करावे लागते, असा हा संघर्ष आणि संघर्षच. विशेष म्हणजे हा संघर्ष स्वातंत्र्या-नंतर अस्पृश्य माणसास करावा लागतोय."[2] या संघर्षाला उत्तर देण्याचे बळ डॉ बाबासाहेबांच्या जीवनातून मिळते. आयुष्यभर व्यवस्थेच्या विरोधात सामन्य अति सामन्य जणांनी लढा उभारण्यातून त्यांच्या महानतेची जाणीव होते, कवी अर्जुन डांगळे यांच्या 'हात' कवितेतून बाबासाहेबांविषयीची जाणीव प्रकट होते,

गावकुसाबाहेरील निश्चल वरतीत
तू येऊन गरजलाय
सारी वस्ती खडबडली
धूळ झटकीत सावध झाली "[3]

परंपरा, धर्मव्यवस्थेचा पगडा, अज्ञान, शिक्षणाचा अभाव यातून उपेक्षित समाज बाहेर पडतो आहे, त्याने नव्या दीशा स्वीकारल्या, दास्य, गुलामी, शोषण, अत्याचार याविरोधात बंडाचे निशाण हाती घेऊन तो जीवन जाणतो आहे ,त्यातून आत्मभान, अस्मिता जागी झाल्याचा प्रत्यय येतो. ही जीवनदृष्टी कवितेच्या ओळी ओळीतून साक्षात होते आहे.

ऊरभर ढगाळलेल्या कवितांची ही गर्दी
नकार फोडतानाही छिन्नी थकत नाही
माणूसच आहे अंतिम सत्य आणि सौदर्यही
हा पहाडच पायाखाली वीट होतो नि सागर आटत नाही'[4] (जीवनायन-45)

आंबेडकरी कवितेने 'माणसाला प्रथम महत्त्व दिले आहे. सत, शिव, सौंदर्याची आराधना करणाऱ्या व्यवस्थेला माणसापेक्षा अलौकीक जशा गोष्टीत सौंदर्याची प्रचिती येते, त्या पेक्षा 'माणूस' हेच अंतिम सत्य असा भाव कवी व्यक्त करतो. भदन्त एन. बोधिरत्व नायक थेरो म्हणतात. डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीसारखी डॉ. मनोहरांची दृष्टी भव्य आहे. जीवनमूल्यांची जीननदृष्टी असली पाहीजेया तत्त्वशील स्वभावाचे ते पुरस्कर्ते आहेत.[5] त्यांच्या कवितेने आंबेडकरी तत्त्वज्ञानाला अविभाज्य भाग बनवले, बौध्दिक, मानसिक आणि भावनात्मक पातळीवर ही उविता परिवर्तन, गतीशिलता, सम्यक क्रांती, विज्ञानवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय यासह अभिव्यक्त होते.

या कवितेला मानवाच्या कल्याणाचा वेध आहे परंपरेतून उपेक्षितांना बाहेर काढण्याची जिद्द आहे. सर्वाना समान पातळीवर आणन्याचे ध्येय आहे. माणुसकीची प्रतिष्ठा हे मूल्य मागणारी ही कविता आहे. या सर्वांच्या मुळाशी डॉ. बाबासाहेच आंबेडकर यांची शिकवण आहे. त्या विचार आणि दृष्टीकोनातून कधी विद्रोहाची, कधी बंडाची भाषा बोलत ही निर्मिती होताना दिसते. त्यांच्या आंबेडकरी जाणीवेच्या कवितेविषयी भाष्य करताना वामन निंबाळकर म्हणतात, "मनोहरांच्या आजच्या कविता वाचल्यावर आज मराठी कवितेत मान्यता, प्रतिष्ठा प्राप्त झालेल्या आंबेडकवादी कवींच्या पुढे त्यांची कविता झेपावणारी आहे असे दिसते. एव्हडेच नव्हे तर आजच्या महान कवितेतही त्यांची कविता अग्रेसर दिसते. मनोहर शब्दासाठी अडून बसत नाहीत, तर शब्दांचे खजिने त्यांच्यासाठी सदैव उघडे असतात. प्रतिमा आणि हात जोडून उभ्या असतात सर्व कवितेचे प्रयोजन शोधले तर सर्वांचे हित,परिवर्तन, लोकांच्या कल्याणासाठी तळमळणारा आढळतो.[6]

'आणि एक दिवस अंधार पेटवणारा सूर्य पाहिला।
गरीब हातालाही काव्याची पालवी आली
सगळेच मग उलटेपालले होत गेले
डोके संविधान झाले, लेखणी विद्युत झाली' (स्वप्नसंहिता-32)

भारतीय माणसांना एका संविधानाच्या छताखाली आणून डॉ. बाबासाहेबांनी अनमोल असे कार्य केले. त्यांच्या कार्यातून देशाची एकसंध वाटचाल सुरु आहे. सामान्यातिसामान्यांच्या अधिकाराची हक्काची गळचेपी होऊ न देता देशाच्या नागरिकांना समानतेच्या वाटेवर आणण्याचे काम होते आहे. स्वातंत्र्य, बंधुता,समता,सामाजिक न्याय याची जाणीव साहित्यातून करून देण्याचे प्रयत्न कवी करताना दिसतात.

संदर्भ:

1 डॉ.सारीपुत्र तुपेरे आंबेडकरवादी समीक्षारूपे (प्रतावना) शब्दाली प्रकाशन,पुणे पृ.06
2 संपा.केशव बा. वसेकर मध्ययुगीन व आधुनिक कविता कैलास पब्ली. औरंगाबाद 2008 पृ.46
3 संपा. तू. श. कुलकर्णी स्वातंत्र्योत्तर मराठी कविता साहित्य अकादमी ,2008 पृ.138
4 यशवंत मनोहर जीवनायन पृ.45
5 संपा. सुधीर भगत नवनिर्माणाची कार्यशाळा युगसाक्षी प्रका.नागपूर 2009 पृ.77
6 संपा. अरुणा देशमुख उस्मानगुंफा आकलनाचे आलेख पृ.182

छत्रपती शिवाजी महाराजांची गुणवैशिष्ट्ये : आधुनिक समाजासाठी प्रेरणादायी नेतृत्वाचा आदर्श

श्री. दत्तात्रय अंगद घवले

उपशिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, कोल्हार बुद्रुक, ता. राहाता, जि. अहिल्यानगर

सारांश (Abstract)

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ स्वराज्याचे संस्थापक नव्हते, तर आदर्श नेतृत्व, न्यायप्रियता, दूरदृष्टी, स्त्रीसन्मान, धर्मसहिष्णुता आणि लोककल्याणकारी शासनव्यवस्था यांचे मूर्तिमंत प्रतीक होते. प्रस्तुत संशोधन लेखात शिवाजी महाराजांच्या प्रमुख गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करून त्यांचे आधुनिक शिक्षण, प्रशासन, व्यवस्थापन आणि सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

प्रमुख शब्द (Keywords)

छत्रपती शिवाजी महाराज, गुणवैशिष्ट्ये, नेतृत्व, स्वराज्य, न्याय, व्यवस्थापन, शिक्षण, राष्ट्रनिर्माण

अ. प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय इतिहासात स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणली. त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेक गुणांनी समृद्ध होते. आजच्या बदलत्या सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थितीत त्यांच्या गुणांचा अभ्यास विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासक यांच्यासाठी प्रेरणादायी ठरतो.

आ. संशोधनाची उद्दिष्टे

१. शिवाजी महाराजांच्या प्रमुख गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.
२. शिवाजी महाराजांच्या गुणांचे आधुनिक समाजातील महत्त्व स्पष्ट करणे.
३. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात शिवाजी महाराजांच्या या गुणांचा उपयोग कसा होऊ शकतो याचे विश्लेषण करणे.
४. शालेय शिक्षणामध्ये शिवाजी महाराजांच्या गुणवैशिष्ट्यांवर आधारित व्यक्तिमत्त्व विकास उपक्रमांची आवश्यकता व उपयुक्तता तपासणे.
५. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी शिवाजी महाराजांच्या गुणवैशिष्ट्यांवर आधारित एक प्रभावी व्यक्तिमत्त्व विकास मॉडेल विकसित करणे.

इ. संशोधन पद्धती

- ऐतिहासिक ग्रंथांचा अभ्यास
- संदर्भ साहित्याचे विश्लेषण
- संशोधन लेख व चरित्रग्रंथांचा अभ्यास
- गुणात्मक (Qualitative) संशोधन पद्धती

ई. शिवाजी महाराजांची प्रमुख गुणवैशिष्ट्ये

१. **दूरदर्शी नेतृत्व** - छत्रपती शिवाजी महाराज हे अत्यंत दूरदर्शी नेतृत्व असलेले राजे होते. त्यांनी स्वराज्याची संकल्पना त्या काळात मांडली, जेव्हा भारतातील बहुतांश प्रदेश परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली होता. भविष्यातील धोके आणि संधी यांचा अचूक अंदाज घेऊन त्यांनी आपली रणनीती आखली. किल्ल्यांचे बांधकाम, आरमाराची स्थापना आणि सक्षम प्रशासन यांद्वारे त्यांनी स्वराज्याचा मजबूत पाया रचला. त्यांच्या दूरदृष्टीमुळे मर्यादित साधनसामग्री असूनही स्वराज्याचा विस्तार शक्य झाला. त्यांनी प्रजेच्या सुरक्षिततेला आणि राज्याच्या दीर्घकालीन विकासाला प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांचे नेतृत्व आजही आदर्श मानले जाते.

उदा : सिद्दी, पोर्तुगीज आणि इतर परकीय शक्तींकडून समुद्रमार्गे होणारा धोका ओळखून शिवाजी महाराजांनी किनारपट्टीवर **सिंधुदुर्ग** सारखे जलदुर्ग बांधले आणि आरमार उभे केले. हा निर्णय त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वाचे उत्कृष्ट उदाहरण मानला जातो.

२. **शौर्य** - शिवाजी महाराज अत्यंत पराक्रमी आणि धाडसी होते. संकटसमयी त्यांनी कधीही माघार घेतली नाही. त्यांनी अनेक बलाढ्य शत्रूंना सामोरे जाऊन विजय मिळवला. शौर्याबरोबरच बुद्धिमत्तेचाही वापर केला. त्यांच्या धैर्यामुळे मावळ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्या शौर्यकथा आजही प्रेरणादायी आहेत.

उदाहरण: अफजलखान वध, शायीस्ताखानाची फजिती

३. **स्वराज्यनिष्ठा** - शिवाजी महाराजांचे संपूर्ण जीवन स्वराज्य स्थापनेसाठी समर्पित होते. त्यांनी परकीय सत्तेपासून मुक्त राज्याची संकल्पना मांडली. अनेक अडचणी असूनही त्यांनी स्वराज्याचा ध्यास सोडला नाही. त्यांची स्वराज्यनिष्ठा जनतेसाठी प्रेरणादायी ठरली. स्वराज्य म्हणजे जनतेच्या हिताचे शासन अशी त्यांची धारणा होती.

उदाहरण: रायरेश्वर मंदिरातील स्वराज्याची शपथ.

४. **न्यायप्रियता** - शिवाजी महाराज न्यायनिष्ठ शासक होते. त्यांनी सर्वांना समान न्याय दिला. कोणत्याही व्यक्तीचा दर्जा किंवा पद न पाहता न्याय केला जात असे. प्रशासनात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यांना महत्त्व दिले. अन्याय करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जात असे.

उदाहरण: प्रजेवर अत्याचार करणाऱ्या जवळच्या अधिकाऱ्यांना शिक्षा.

५. **स्त्रीसन्मान** - शिवाजी महाराजांनी स्त्रियांच्या सन्मानाचे कठोर धोरण अवलंबले. युद्धात मिळालेल्या स्त्रियांना सन्मानाने त्यांच्या घरी पाठवले जाई. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जात असे. त्यांच्या राज्यात स्त्रियांच्या सुरक्षिततेला प्राधान्य होते. हा गुण आजच्या समाजासाठीही आदर्श आहे.

उदाहरण: कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला सन्मानाने परत पाठवणे.

६. **प्रजेप्रती प्रेम** - शिवाजी महाराजांना प्रजेच्या सुख-दुःखाची जाणीव होती. त्यांनी लोककल्याणकारी शासन दिले. शेतकरी, व्यापारी आणि सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी सतत प्रयत्न केले. त्यामुळे त्यांना लोकांचा मोठा पाठिंबा मिळाला.

उदाहरण: शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी विशेष उपाययोजना.

७. **संघटन कौशल्य** - शिवाजी महाराजांनी विविध समाजघटकांना एकत्र आणले. मावळे, सरदार आणि अधिकारी यांचे सक्षम संघटन निर्माण केले. योग्य व्यक्तीला योग्य जबाबदारी देण्याची कला त्यांच्याकडे होती. संघटनामुळे स्वराज्य मजबूत झाले. त्यांनी सामूहिक कार्यावर भर दिला.

उदाहरण: अष्टप्रधान मंडळाची स्थापना.

८. **निर्णयक्षमता** - संकटाच्या वेळी योग्य आणि जलद निर्णय घेण्याची क्षमता त्यांच्यात होती. परिस्थितीचे अचूक विश्लेषण करून ते निर्णय घेत. त्यांच्या निर्णयांमुळे अनेक संकटे टळली. नेतृत्वासाठी निर्णयक्षमता अत्यंत आवश्यक मानली जाते.

उदाहरण: आग्रा येथून सुटकेचा निर्णय.

९. **स्वाभिमान** - शिवाजी महाराजांना स्वत्व आणि स्वाभिमानाची जाणीव होती. त्यांनी कोणत्याही परकीय सत्तेसमोर लाचारी पत्करली नाही. स्वाभिमानामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी बनले. त्यांनी मराठी जनतेत आत्मविश्वास निर्माण केला.

उदाहरण: औरंगजेबाच्या दरबारातील स्वाभिमानी भूमिका.

१०. **मातृभक्ती** - जिजाऊंच्या संस्कारांचा शिवाजी महाराजांवर मोठा प्रभाव होता. त्यांनी मातोश्रींचा सन्मान राखला. त्यांच्या मार्गदर्शनातूनच स्वराज्याची प्रेरणा मिळाली. मातृभक्तीमुळे त्यांच्यात नैतिक मूल्ये विकसित झाली.

उदाहरण: जिजाऊंच्या सल्ल्यानुसार अनेक निर्णय.

११. **गनिमी कावा** - गनिमी युद्धतंत्र हे शिवाजी महाराजांचे वैशिष्ट्य होते. कमी साधनसामग्रीत मोठ्या शत्रूला पराभूत करण्याची ही पद्धत होती. भौगोलिक परिस्थितीचा प्रभावी उपयोग केला जात असे. या तंत्रामुळे अनेक विजय मिळाले.

उदाहरण: सुरत मोहिम.

१२. **व्यवस्थापन कौशल्य** - शिवाजी महाराज कुशल व्यवस्थापक होते. त्यांनी सैन्य, अर्थकारण आणि प्रशासन यांचे प्रभावी नियोजन केले. संसाधनांचा योग्य वापर केला. जबाबदाऱ्या स्पष्टपणे वाटून दिल्या. **उदाहरण:** अष्टप्रधान मंडळाची कार्यपद्धती, गड-किल्ल्यांचे व्यवस्थापन.

१३. **लोककल्याणकारी दृष्टीकोन** - प्रजेचे हित हेच राज्याचे उद्दिष्ट असावे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी करप्रणालीत सुधारणा केल्या. शेतकरी व सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले. जनकल्याणाला प्राधान्य दिले. **उदाहरण:** शेतकऱ्यांना संरक्षण देणारी धोरणे.

१४. **चिकाटी** - अनेक अडचणी असूनही शिवाजी महाराजांनी प्रयत्न सुरू ठेवले. अपयशाने खचून न जाता नव्या जोमाने कार्य केले. त्यांच्या चिकाटीमुळे स्वराज्याची स्थापना शक्य झाली. यशासाठी सातत्य आवश्यक असल्याचा संदेश त्यांच्या जीवनातून मिळतो.

उदाहरण: पुरंदर तहानंतर पुन्हा स्वराज्य विस्तार.

१५. **प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व** - शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व लोकांना प्रेरणा देणारे होते. त्यांच्या विचारांनी हजारो मावळे स्वराज्यासाठी झटले. त्यांचे नेतृत्व लोकांना उद्दिष्टपूर्तीसाठी प्रेरित करत असे. आजही त्यांचे चरित्र प्रेरणास्रोत आहे.

उदाहरण: तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे यांचे बलिदान.

१६. **आदर्श शासनव्यवस्था** - शिवाजी महाराजांनी सुशासनाचा आदर्श निर्माण केला. प्रशासनात पारदर्शकता, न्याय आणि उत्तरदायित्व यांवर भर दिला. लोकहिताला केंद्रस्थानी ठेवून शासन चालवले. त्यांच्या शासनपद्धतीचा अभ्यास आजही केला जातो.

उदाहरण: अष्टप्रधान मंडळ आणि कार्यक्षम महसूल व्यवस्था.

फ. आधुनिक काळातील उपयुक्तता

१. **शैक्षणिक नेतृत्व** - छत्रपती शिवाजी महाराजांचे दूरदर्शी नेतृत्व, निर्णयक्षमता आणि संघटन कौशल्य आजच्या शैक्षणिक नेतृत्वासाठी मार्गदर्शक ठरते. शाळा व महाविद्यालयांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टिकोन विकसित करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वगुणांचा उपयोग होऊ शकतो. शिक्षक व प्रशासकांनी त्यांच्या कार्यपद्धतीतून प्रेरणा घेणे आवश्यक आहे.

२. **प्रशासन व व्यवस्थापन** - शिवाजी महाराजांनी सुबक, कार्यक्षम आणि लोकाभिमुख प्रशासन उभारले. योग्य व्यक्तीला योग्य जबाबदारी देणे, संसाधनांचा प्रभावी वापर आणि नियोजनबद्ध कार्यपद्धती ही त्यांची वैशिष्ट्ये होती. आधुनिक प्रशासन व व्यवस्थापन क्षेत्रात ही तत्त्वे यशस्वी नेतृत्वासाठी उपयुक्त आहेत.

३. **सामाजिक ऐक्य** - शिवाजी महाराजांनी जात, धर्म आणि पंथ यांपलीकडे जाऊन सर्व समाजघटकांना एकत्र आणले. धर्मसहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांमुळे सामाजिक सलोखा निर्माण झाला. आजच्या विविधतेने नटलेल्या समाजात सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी त्यांच्या विचारांची गरज आहे.

४. **स्त्री सुरक्षा व सन्मान** - शिवाजी महाराजांनी स्त्रियांच्या सन्मानाचे कठोर धोरण अवलंबले आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना आळा घातला. स्त्रियांना आदराने वागवणे आणि त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हे त्यांच्या राज्यकारभाराचे महत्त्वाचे तत्त्व होते. आधुनिक समाजात स्त्री-सुरक्षा व लैंगिक समानतेसाठी हा आदर्श अत्यंत महत्त्वाचा आहे.

५. **नैतिक मूल्यांचे संवर्धन** - सत्यनिष्ठा, न्यायप्रियता, कर्तव्यनिष्ठा आणि प्रामाणिकपणा ही शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांच्या जीवनातून नैतिक आचरण, जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व स्पष्ट होते. विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये मूल्यसंवर्धनासाठी त्यांचे चरित्र प्रेरणादायी ठरते.

ग. निष्कर्ष

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व हे बहुआयामी होते. त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यास आधुनिक समाजाला आदर्श नेतृत्व, सुशासन आणि नैतिक मूल्यांची दिशा मिळू शकते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा आणि गुणांचा शैक्षणिक अभ्यास अधिक व्यापकपणे होणे आवश्यक आहे.

संदर्भसूची -

१. सभासद बखर
२. शिवभारत
३. जदुनाथ सरकार – Shivaji and His Times
४. बाबासाहेब पुरंदरे – राजा शिवछत्रपती
५. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाची इतिहास पुस्तके
६. विविध संशोधन नियतकालिके व ऐतिहासिक संदर्भग्रंथ

योगीराज वाघमारे यांच्या 'शिक्षणनामा' कादंबरीचा सामाजिक अन्वयार्थ

संशोधक

गुलाब भिमराव टेंभुर्णे

एम.ए. (मराठी, अर्थशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विद्याधर देवदास बन्सोड

एम.ए. (मराठी), नेट, पीएच.डी.

प्राध्यापक तसेच मराठी विभागप्रमुख

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

संशोधन केंद्र : उच्च शिक्षण व संशोधन केंद्र सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर

सारांश:

योगीराज वाघमारे यांची शिक्षणनामा ही कादंबरी मराठी सामाजिक कादंबरीच्या परंपरेत महत्त्वाची ठरते. शिक्षणक्षेत्र हे समाजपरिवर्तनाचे साधन मानले जात असले तरी प्रत्यक्षात ते राजकीय हस्तक्षेप, प्रशासकीय दडपशाही, संघटनात्मक स्वार्थ, जात-वर्गीय संबंध, ग्रामीण गरिबी आणि मूल्यह्रास यांच्या जाळ्यात कसे अडकते, याचे प्रभावी चित्रण या कादंबरीत आढळते. कादंबरीचा केंद्रबिंदू केवळ शाळा किंवा शिक्षक नसून शिक्षणव्यवस्थेभोवती उभा राहिलेला संपूर्ण सामाजिक सत्तासंबंध आहे. जनता दरबार, बदली रद्द करण्याची शिफारस, गटसंमेलनातील सत्कारसंस्कृती, शिक्षकांची अनुपस्थिती, बदली शिक्षक नेमण्याची पद्धत, डेप्युटेशनचा प्रश्न आणि लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप या प्रसंगांतून शिक्षणातील सामाजिक विसंगती उघड होते. प्रस्तुत संशोधनपत्रात *शिक्षणनामा* कादंबरीचा सामाजिक अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक कादंबरीची संकल्पना, कादंबरीतील शिक्षणव्यवस्थेचे राजकारण, ग्रामीण समाजाचे वास्तव, प्रशासकीय यंत्रणेचे स्वरूप, उपरोधात्मक अभिव्यक्ती आणि मूल्यसंकट यांचा अभ्यास या लेखात करण्यात आला आहे.

बीजशब्द: शिक्षणनामा, योगीराज वाघमारे, सामाजिक कादंबरी, शिक्षणव्यवस्था, ग्रामीण समाज, प्रशासन, सत्ताकारण, उपरोध, मूल्यह्रास.

प्रस्तावना:

मराठी वाङ्मयात 'सामाजिक कादंबरी' ही केवळ मनोरंजनापुरती मर्यादित राहिली नसून, ती समाजातील रचनात्मक बदल, वर्गसंघर्ष, जातीय असमानता आणि मानवी अस्तित्वाच्या जटिल समस्यांचे चिकित्सकपणे निदान करते. दिलेल्या अभ्याससाहित्यानुसार, सामाजिक कादंबरीची मूलभूत ओळख ही तिच्या वास्तवनिष्ठतेत आणि सामाजिक चेतनेच्या प्रगल्भतेत दडलेली आहे. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी या संकल्पनेची पायाभरणी करताना स्पष्ट केले आहे की, "सामाजिक कादंबरी ही समाजाच्या गाभ्यातील प्रश्नांना स्पर्श करते आणि केवळ घटना सांगण्यापेक्षा त्या घटनांच्या मागील सामाजिक गतिशीलता व संरचनात्मक बदल उलगडते."[1] द.न. गोगटे यांच्या मते, "कादंबरी जेव्हा वर्गसंघर्ष, सांस्कृतिक मूल्ये आणि मानवी संबंधांचे वास्तवदर्शी चित्रण करते, तेव्हाच ती सामाजिक कादंबरी बनते."[2] शाता शेळके यांनी या व्याख्येला अधिक स्पष्ट करताना लिहिले आहे की, "सामाजिक कादंबरी ही समाजाच्या बदलत्या स्वरूपाचे दस्तऐवजीकरण करते; ती केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून, ती सामाजिक चेतनेला दिशा देणारे साधन आहे."[3] अरुण साधू यांच्या विचारांनुसार, "सामाजिक कादंबरीमध्ये लेखक हा निरीक्षक नसून, तो समाजाचा सक्रिय सहभाग नोंदवणारा इतिहासकार असतो."[4] ना.सी. फडके यांनी या संकल्पनेला वास्तववादी दृष्टिकोनातून मांडले आहे: "सामाजिक कादंबरी ही समाजातील असमानता, जातिव्यवस्था, लिंगभेद आणि आर्थिक शोषण यांसारख्या मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवते आणि त्यांचे मूल्यमापन करते."[5] या सर्व विवेचनांवरून असे स्पष्ट होते

की, सामाजिक कादंबरी ही साहित्यिक कृती असली तरी, तिचा उद्देश केवळ वाचकांना गुंतवून ठेवणे नसून, त्यांच्यात सामाजिक जाणीव व चिकित्सक विचारसरणी निर्माण करणे हा आहे. विशेषतः, दलित समीक्षकांनी या संकल्पनेला जातीय अस्मिता, शोषित अनुभव आणि सांस्कृतिक पुनर्बांधणीच्या संदर्भात नव्याने मांडले आहे. डॉ. शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या मते, "सामाजिक कादंबरीत दलित अनुभवाचे समावेशन हे केवळ विषयवस्तूचा विस्तार नसून, ती सामाजिक न्यायाच्या मागणीची वाङ्मयीन अभिव्यक्ती आहे."[6] शरणकुमार लिंबाळे यांनी हे स्पष्ट केले आहे की, "दलित सामाजिक कादंबरी ही परंपरागत सामाजिक कादंबरीपेक्षा वेगळी आहे; ती शोषिताच्या अंतर्द्वंद्वाला केंद्रस्थानी ठेवते आणि जातीय संरचनेच्या भेसळलेल्या स्वरूपाला उघड करते."[7]

सामाजिक कादंबरीचे स्वरूप अत्यंत बहुआयामी आणि गतिमान आहे. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या मते, "सामाजिक कादंबरीचे स्वरूप केवळ कथानकापुरते मर्यादित नसून, ती सामाजिक परिसराचे सूक्ष्म निरीक्षण करते आणि त्या परिसरातील मानवी वर्तनाचे विश्लेषण करते."[8] द.न. गोगटे यांनी या स्वरूपाचे तीन मूलभूत स्तंभ सांगितले आहेत: वास्तववाद, सामाजिक संदर्भ आणि मानवी चरित्रचित्रण.[9] शांता शेळके यांच्या अनुसार, "सामाजिक कादंबरीमध्ये लेखक हा केवळ कथाकार नसून, तो समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून घटनांचे विश्लेषण करतो; त्यामुळे कादंबरीचे स्वरूप केवळ साहित्यिक न राहता सामाजिक-ऐतिहासिक बनते."[10] अरुण साधू यांनी नमूद केले आहे की, "सामाजिक कादंबरीचे स्वरूप गतिमान असते; ते काळानुसार बदलते आणि नव्या सामाजिक वास्तवांना सामावून घेते. यामुळेच एकाच विषयावर लिहिलेल्या वेगवेगळ्या काळातील कादंबऱ्यांचे स्वरूप भिन्न असते."[11] ना.सी. फडके यांच्या मते, "सामाजिक कादंबरीमध्ये व्यक्तिगत भावना आणि सामूहिक सामाजिक प्रवाह यांचा मेळ साधला जातो; लेखक वैयक्तिक जीवनातून सामाजिक सत्यापर्यंत पोहोचतो."[12] ग.त्रि. माडखोलकर यांनी हे स्पष्ट केले आहे की, "सामाजिक कादंबरीमध्ये लेखक हा समाजाचे आरसे धरतो, ज्यामध्ये समाजाचे सुंदर आणि कुरूप दोन्ही पैलू दिसतात; हे आरसे केवळ दाखवत नाहीत, तर प्रश्नही उपस्थित करतात."[13] दलित दृष्टिकोनातून हे स्वरूप अधिक तीव्र बनते. सुनील गंगाधर पानतावणे यांनी लिहिले आहे की, "दलित सामाजिक कादंबरीचे स्वरूप हा वास्तवाचा केवळ दस्तऐवज नसून, तो जातीय अत्याचाराविरुद्धचा वाङ्मयीन प्रतिकार आहे; लेखक हा येथे नोंदवणारा नसून, तो चिकित्सक आणि क्रांतिकारी बनतो."[14] यशवंत मनोहर यांच्या मते, "सामाजिक कादंबरीतील दलित अनुभवाचे चित्रण हे बाह्य वास्तवाचे प्रतिबिंब नसून, ते अंतर्गत शोषणाच्या मानसिक भूकंपाचे दस्तऐवजीकरण करते."[15] जयंत पावणकर यांनी हे नमूद केले आहे की, "दलित सामाजिक कादंबरीचे स्वरूप परंपरागत नायककेंद्रित कथानकातून मुक्त होऊन, सामूहिक चेतनेच्या प्रवाहाशी जोडले जाते; येथे व्यक्तिगत विजय नसून, सामाजिक मुक्तीचा शोध असतो."[16] नामदेव ढसाळ यांच्या कविता आणि गद्यलेखनाचा प्रभाव सामाजिक कादंबरीच्या स्वरूपावर पडला आहे, हे लक्षात घेता, कादंबरीची भाषा आता केवळ शिष्ट न राहता ती संघर्षाची, आक्रोशाची आणि अस्तित्वाची भाषा बनली आहे, असे दलित समीक्षक स्पष्ट करतात.[17]

'शिक्षणनामा'चा सामाजिक अन्वयार्थ:

शिक्षणनामा कादंबरीतील सर्वांत ठळक सामाजिक आशय म्हणजे शिक्षणव्यवस्थेतील सत्ताकारण. शिक्षण हे ज्ञान, समता आणि सामाजिक परिवर्तनाचे साधन असावे; पण कादंबरीत ते राजकीय आश्रय, शिफारस आणि बदली व्यवस्थेच्या भोवऱ्यात अडकलेले दिसते. गटशिक्षणाधिकारी जनता दरबारात आमदाराची शिफारस मिळवण्यासाठी जातात. लोकशाहीतील जनता दरबार हा लोकांच्या प्रश्नांसाठी असावा; पण कादंबरीत तो सत्तेच्या निष्ठा व्यक्त करण्याचा, शिफारशी मिळवण्याचा आणि प्रशासकीय निर्णयांवर राजकीय शिक्कामोर्तब करवून घेण्याचा मंच बनतो.

आमदाराच्या बंगल्यावर "पक्षकार्यकर्ते, युवाकार्यकर्ते तसेच सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची गर्दी" असते आणि शासकीय अधिकारीही आपल्या विभागाच्या कामाचा आढावा देण्यासाठी तिथे उपस्थित राहतात.[18] ही स्थिती लोकशाही प्रशासनातील विकृती दाखवते. गटशिक्षणाधिकाऱ्याची बदली रद्द करण्यासाठी दगडी कार्यालयातील ओ.एस. त्यांना "लोकप्रतिनिधीची म्हणजे आमदारसाहेबांची शिफारस आणा" असा सल्ला देतो.[19] प्रशासकीय निर्णय नियमांवर न ठरता राजकीय शिफारशींवर ठरतात, ही कादंबरीतील महत्त्वाची सामाजिक टीका आहे. पुढे आमदारसाहेब विचारतात, "यांचा आपणाला काही उपयोग?" आणि पी.ए. उत्तर देतो, "आपल्या शाळा आहेत." त्यानंतर शिफारस दिली जाते.[20] या संवादात शिक्षणव्यवस्थेचे राजकीय उपयोजन स्पष्ट होते. अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संस्था यांचा संबंध सार्वजनिक हितावर नव्हे तर परस्पर उपयोगितेवर आधारित आहे. येथे 'जनहित' ही संकल्पना देखील व्यंगात्मक बनते. बदली रद्द होण्याच्या आदेशात "जनहित लक्षात घेऊन बदली रद्द करण्यात आली आहे" असे नमूद होते.[21] प्रत्यक्षात निर्णय वैयक्तिक स्वार्थ, ओळखी आणि राजकीय हस्तक्षेपातून घडतो; पण त्याला 'जनहित' अशी अधिकृत भाषा दिली जाते. अशा प्रकारे कादंबरी समाजातील भाषिक ढोंगाचेही उघड रूप दाखवते.

कादंबरीतील गटसंमेलनाचा प्रसंग शिक्षणक्षेत्रातील दिखाऊ संस्कृतीवर तीव्र उपरोध करतो. गटशिक्षणाधिकाऱ्याची बदली रद्द झाल्यानंतर शिक्षकसंघटना त्यांचा सत्कार करण्याचा निर्णय घेते; पण थेट सत्कार करता येत नसल्याने "शैक्षणिक मेळावा" आयोजित करण्याची कल्पना मांडली जाते[22] येथे शैक्षणिक उद्देश हा केवळ आडोसा आहे. कार्यक्रमाचे शीर्षक शैक्षणिक असले तरी केंद्रस्थानी ज्ञानचर्चा नाही, तर अधिकारीसंतुष्टी, संघटनात्मक प्रदर्शन आणि राजकीय गणित आहे. कार्यक्रमात "चर्चासत्र – शैक्षणिक साहित्य प्रदर्शन – सांस्कृतिक कार्यक्रम आणि त्यासोबत सत्कार समारंभ" अशी योजना आखली जाते.[23] परंतु प्रत्यक्षात शैक्षणिक चर्चा दुय्यम ठरते. स्टेजवर फेटे, शाली, श्रीफळे, हार, विशेषणे आणि चरणस्पर्श यांचा सुळसुळाट दिसतो. अधिकारीवर्गाचे गौरवीकरण इतके वाढते की अनाऊंस करणारे शिक्षक "ज्ञानवंत, बुद्धीवंत, प्रज्ञावान, तालुक्याचे लाडके भाग्यविधाते" अशा विशेषणांनी थकून जातात.[24] शिक्षणक्षेत्रात विचारांचा सन्मान व्हावा; पण येथे पदसत्तेचा सन्मान होतो. शिक्षकवर्गाचा आत्मसन्मान अधिकारीभक्तीत रूपांतरित झालेला दिसतो. या प्रसंगातील सामाजिक अन्वयार्थ असा की शिक्षणसंस्था समाजातील सत्ताक्रमाची पुनरावृत्ती करतात. शिक्षक ज्ञानदाता असण्यापेक्षा संघटनात्मक 'समर्थक' बनतात. अधिकारी मार्गदर्शक असण्यापेक्षा 'सत्कारमूर्ती' बनतो. शैक्षणिक कार्यक्रम तमाशात रूपांतरित होतो. लेखकाचा प्रश्न "कार्यक्रम शाळेचे आहेत की तमाशाचे आहेत ते समजायचे नाही" हा शिक्षणसंस्कृतीवरील थेट प्रहार आहे.[25] अशा उपरोधातून लेखक शिक्षणातील मूलभूत मूल्यह्रास दाखवतो.

कादंबरीतील सामाजिक वास्तवाचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे ग्रामीण शाळांची अवस्था. शिक्षणव्यवस्थेवरील राजकारण, संघटना आणि प्रशासकीय चर्चा यांत सर्वाधिक दुर्लक्षित राहतो तो विद्यार्थी. धुमाळवाडीच्या शाळेचा प्रसंग हे स्पष्ट करतो. पंचायत समिती सदस्या सांगते की सातवीपर्यंतच्या शाळेत सात वर्ग असून फक्त चार शिक्षक आहेत; त्यापैकी एक सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आहे आणि एका शिक्षिकेचे डेप्युटेशन झाले आहे. परिणामी "तीन शिक्षक आहेत. कसं शिकवायचं? पट तर भरपूर हाय. पण गुरुजीच नाहीत" अशी स्थिती निर्माण होते.[26] हा संवाद ग्रामीण शिक्षणव्यवस्थेतील मूलभूत विसंगती उघड करतो.

शिक्षणाच्या घोषणांमध्ये सर्वांसाठी शिक्षण, गुणवत्तापूर्ण शिक्षण, समता, ग्रामीण विकास अशा संकल्पना मांडल्या जातात; परंतु वास्तवात वर्ग आहेत, विद्यार्थी आहेत, पालक आहेत, पण शिक्षक नाहीत. शिक्षक असले तरी ते स्थिर नाहीत; डेप्युटेशन, बदली, राजकीय हस्तक्षेप, संघटनात्मक दबाव यांमुळे शाळांची शैक्षणिक सातत्यता खंडित होते. येथे ग्रामीण मुलांचे शैक्षणिक नुकसान ही कादंबरीची केंद्रस्थानी असलेली सामाजिक चिंता आहे. लेखक शिक्षक

किंवा अधिकारी यांना वैयक्तिकरित्या दोष देत नाही; तो संपूर्ण व्यवस्थेतील गुंतागुंत दाखवतो. धुमाळवाडीचा प्रश्न फक्त एका शाळेचा नाही; तो ग्रामीण समाजातील संसाधनवाटपाचा प्रश्न आहे. सत्ता केंद्रांकडे असलेल्या लोकांना आपल्या सोयीच्या ठिकाणी शिक्षक, डेप्युटेशन आणि शिफारशी मिळतात; परंतु दुर्गम गावातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा मूलभूत अधिकारही अपूर्ण राहतो. त्यामुळे शिक्षणनामा ही कादंबरी शिक्षणातील सामाजिक न्यायाचा प्रश्न उपस्थित करते.

कादंबरीत प्रशासकीय यंत्रणा सर्वशक्तिमान वाटते. परंतु प्रत्यक्षात ती अनेकदा असहाय, दबावाखालील आणि दुटप्पी दिसते. अधिकारी शाळा तपासणीस जातात; पण स्थानिक राजकारण, शिक्षक संघटना आणि लोकप्रतिनिधी यांच्या दबावामुळे त्यांची कारवाई निष्प्रभ ठरते. एका शाळेच्या तपासणीत ठोंबरे गुरुजी अनुपस्थित असतात. त्यांच्या जागी बी.ए. झालेला अशोक सावंत नावाचा तरुण मुलांना शिकवत असल्याचे उघड होते. तो सांगतो की "झालं की तीन महिने" तो शिकवत आहे आणि महिन्याला तीनशे रुपये मिळतात.[27] हा प्रसंग शिक्षणातील अवैध पद्धती, गैरजबाबदारी आणि प्रशासनातील मौनसंमती उघड करतो.

शिक्षणाधिकारी या प्रकरणाचा मागोवा घेऊ पाहतात; पण लवकरच त्यांना समजते की ठोंबरे गुरुजी "संघटनेचा नेता" असून "शिक्षण समिती सभापतीचा मेव्हणा" आहे.[28] पुढे सभापती त्यांचे समर्थन करतात आणि म्हणतात की द्राक्षाचा मोसम असल्यामुळे गुरुजींना हैदराबादला जावे लागले; मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी बदली माणूस ठेवला आहे.[29] अशा प्रकारे नियमभंगाला सामाजिक व्यवहाराची वैधता दिली जाते. शिक्षणाधिकारी सत्य पाहतात; पण सत्ताकारणापुढे त्यांची बोलती बंद होते.

ही स्थिती नोकरशाहीच्या दुटप्पी स्वरूपावर प्रकाश टाकते. अधिकृत नियम एक असतात; प्रत्यक्ष सामाजिक व्यवहार दुसरा असतो. नियमभंग करणारा शिक्षक दोषी असला तरी तो संबंधांच्या जाळयात सुरक्षित असतो. शिक्षणाधिकारी नियमाचा प्रतिनिधी असला तरी सामाजिक-राजकीय दडपणापुढे तो कमजोर ठरतो. त्यामुळे कादंबरीतील प्रशासन केवळ भ्रष्ट नाही; ते एकाच वेळी भ्रष्ट, दबलेले, आत्मसंरक्षणवादी आणि विसंगत आहे.

कादंबरीत स्त्रीप्रश्न थेट केंद्रस्थानी नसला तरी महिला शिक्षिका, पंचायत समिती सदस्या आणि ग्रामीण महिला यांच्या संदर्भातून सत्ता आणि लिंगसंबंधांचे सूक्ष्म चित्रण होते. डेप्युटेशनच्या प्रश्नावर महिला शिक्षिकेचे नाव पुढे येते. शिक्षणाधिकारी वस्तुस्थिती तपासण्यासाठी शाळेला भेट देतात; परंतु सभागृहात त्यांच्यावरच प्रश्न उपस्थित केला जातो की अशा वारंवार भेटींमुळे महिला शिक्षिका निर्भयपणे शिकवतील काय?[30] येथे स्त्रीसुरक्षेचा मुद्दा प्रत्यक्षात व्यवस्थात्मक उत्तरदायित्व टाळण्यासाठी वापरला जातो. स्त्रीच्या सुरक्षिततेचा प्रश्न खरा असला तरी तो शैक्षणिक अनियमितता झाकण्यासाठी राजकीय शस्त्र बनतो. यातून कादंबरी स्त्रीप्रश्नाचे गुंतागुंतीचे रूप दाखवते. ग्रामीण समाजात महिला शिक्षिकांना राहण्याच्या, सुरक्षिततेच्या आणि प्रवासाच्या अडचणी असतात; पण त्याच वेळी या अडचणींचा वापर प्रशासकीय तपासणी रोखण्यासाठी केला जातो. त्यामुळे स्त्री, सत्ता आणि शिक्षण या तिन्हींचा परस्परसंबंध कादंबरीत सूक्ष्मपणे उलगडतो.

शिक्षणनामाची एक महत्त्वाची ताकद म्हणजे तिची उपरोधात्मक शैली. लेखक गंभीर सामाजिक वास्तव सांगताना भाषेत विनोद, व्यंग आणि बोलीचा प्रभावी वापर करतो. जनता दरबारातील गर्दी, गटसंमेलनातील घोषणाबाजी, सत्कारातील अतिरेक, शिक्षकांच्या गप्पा, अधिकारीभक्ती, राजकीय संवाद आणि ग्रामीण बोली यांमधून कथनाला जिवंतपणा येतो. उपरोधामुळे कादंबरी उपदेशात्मक होत नाही; उलट वाचकाला वास्तवाची विडंबनात्मक तीव्रता जाणवते. उदाहरणार्थ, गटसंमेलनात अधिकारी "आता काही बदलून जात नाहीत" या वाक्यावर लोक हसतात.[31] हा विनोद केवळ प्रसंगातील हलकेपणा नाही; तो बदली-राजकारणाच्या संपूर्ण संरचनेवर भाष्य करतो. शिक्षणक्षेत्रातील स्थैर्य, निष्ठा आणि सेवा या मूल्यांऐवजी बदली, शिफारस आणि पदसंबंध हे निर्णायक घटक

बनतात. त्याचप्रमाणे "साहेब म्हणजे अमर" अशी अभिव्यक्ती अधिकारीसत्तेच्या मिथकीकरणावर तीव्र टीका करते.[32] लेखक बोलीभाषेच्या माध्यमातून ग्रामीण समाजाचे सामाजिक चित्रण प्रतिबिंबित करतात. "पट तर भरपूर हाय. पण गुरुजीच नाहीत" किंवा "गोरगरिबांची पोरं शिकूच नाय असं तुमाला वाटतंय?" अशा वाक्यांतून ग्रामीण लोकांचा रोष, असहायता आणि भाषिक वैशिष्ट्ये दिसतात.[33] बोलीभाषा ही येथे केवळ रंगत आणणारी बाब नाही; ती सामाजिक वास्तवाची प्रामाणिक अभिव्यक्ती आहे.

सामाजिक कादंबरीची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे समाजाच्या संस्थांचे चित्रण, वर्ग-जात-सत्ता संबंधांचा अभ्यास, वास्तववादी घटना, व्यापक सामाजिक संदर्भ आणि मूल्यचिकित्सा ही होत. शिक्षणनामा ही कादंबरी या सर्व निकषांवर सामाजिक कादंबरी ठरते. तिचे कथाविश्व शिक्षण विभागाभोवती फिरत असले तरी त्यात राजकारण, प्रशासन, संघटना, ग्रामीण समाज, जातीय संकेत, आर्थिक स्वार्थ, स्त्रीप्रश्न आणि लोकशाहीतील विकृती यांचा समावेश आहे. कादंबरीतील पात्रे व्यक्ती म्हणून जितकी महत्त्वाची आहेत तितकीच ती सामाजिक भूमिकांचे प्रतिनिधित्व करतात. या कादंबरीमध्ये गटशिक्षणाधिकारी म्हणजे सत्तेच्या जवळ राहू इच्छिणारा अधिकारीवर्ग, आमदार म्हणजे लोकशाहीतील आश्रयदाता, पी.ए. म्हणजे सत्तेचा मध्यस्थ, शिक्षक संघटना म्हणजे सामूहिक हक्कांच्या नावाखाली चालणारी हितसंबंधी रचना, ग्रामीण पालक म्हणजे शिक्षणाच्या आशेवर जगणारा पण व्यवस्थेकडून उपेक्षित वर्ग, आणि विद्यार्थी म्हणजे सर्व निर्णयांचे निमित्त असूनही प्रत्यक्षात सर्वाधिक वंचित घटक होत. त्यामुळे कादंबरी व्यक्तिपरक न राहता समाजपरक बनते. कादंबरीतील शिक्षणव्यवस्था ही समाजाची प्रतिकृती आहे. जिथे सत्ता आहे तिथे शिफारस आहे; जिथे शिफारस आहे तिथे नियमांचे वाकडे अर्थ लावले जातात; जिथे नियमांचे उल्लंघन केले जाते तिथे सार्वजनिक हिताचा बळी जातो. या प्रक्रियेत शिक्षणाचे मूलभूत ध्येय म्हणजेच विद्यार्थ्यांचा विकास दिसेनासा होतो. त्यामुळे *शिक्षणनामा*चा सामाजिक अन्वयार्थ असा की शिक्षणक्षेत्रातील संकट हे फक्त शाळांचे किंवा शिक्षकांचे नाही; ते संपूर्ण सामाजिक-सत्तात्मक रचनेचे संकट आहे.

निष्कर्ष:

योगीराज वाघमारे यांची 'शिक्षणनामा' ही कादंबरी सामाजिक कादंबरी म्हणून मराठी साहित्य विश्वात महत्त्वपूर्ण आहे. शिक्षणव्यवस्था समाजाच्या प्रगतीचे साधन मानली जाते परंतु या कादंबरीत तीच व्यवस्था राजकीय आश्रय, प्रशासकीय तडजोड, संघटनात्मक स्वार्थ, सत्कारसंस्कृती, अनियमितता आणि ग्रामीण उपेक्षा यांच्या कचाट्यात सापडलेली दिसते. लेखकाने कोणताही सरळ उपदेश न करता प्रसंग, संवाद, बोलीभाषा आणि उपरोध यांच्या सहाय्याने शिक्षणक्षेत्रातील सामाजिक वास्तव उभे केले आहे.

कादंबरीचा सामाजिक अन्वयार्थ अनेक स्तरांवर उलगडतो. पहिला स्तर म्हणजे शिक्षणव्यवस्थेतील राजकारण. बदली, डेप्युटेशन, शिफारस आणि पदसंबंध यांमधून शिक्षणातील निर्णयप्रक्रिया विकृत होते. दुसरा स्तर म्हणजे प्रशासकीय असहायता. अधिकारी नियम जाणतात; पण संबंधांच्या दबावामुळे ते निष्प्रभ होतात. तिसरा स्तर म्हणजे ग्रामीण विद्यार्थ्यांची उपेक्षा. शिक्षणाविषयी मोठमोठ्या घोषणा असूनही ग्रामीण शाळा शिक्षकांशिवाय चालतात. चौथा स्तर म्हणजे सांस्कृतिक विडंबन. शैक्षणिक कार्यक्रम ज्ञानकेंद्रित न राहता सत्कार, नृत्य, जेवण आणि प्रदर्शन यांभोवती फिरतात. पाचवा स्तर म्हणजे मूल्यह्रास. शिक्षक, अधिकारी, संघटना आणि लोकप्रतिनिधी सर्वजण शिक्षणाचा वापर स्वतःच्या हितासाठी करतात.

या सर्वांमधून शिक्षणनामा ही कादंबरी केवळ शिक्षणक्षेत्रावरील कथन राहत नाही; ती भारतीय ग्रामीण समाजातील लोकशाही संस्था, सत्तासंबंध आणि सामाजिक न्याय यांचे चिंतन बनते. सामाजिक कादंबरी म्हणून तिचे महत्त्व याच ठिकाणी आहे. ती वाचकाला प्रश्न विचारते की शिक्षण खरोखरच कोणासाठी आहे? विद्यार्थ्यांसाठी, समाजासाठी की सत्तेसाठी? हा प्रश्न आजही तितकाच ज्वलंत आहे. म्हणून *शिक्षणनामा* ही कादंबरी समकालीन शिक्षणव्यवस्थेच्या चिकित्सेसाठी उपयुक्त आणि अभ्यासनीय ठरते.

संदर्भ सूची:

१. माडखोलकर, ग.त्रि. *मराठी कादंबरीचा विकास.* देशमुख प्रकाशन, १९६५. पृ.१२.

२. गोगटे, द.न. *मराठी कादंबरीचा इतिहास.* लोकवाङ्मय गृह, १९७०. पृ. २४.

३. शेळके, शांता. *मराठी कादंबरीत सामाजिक प्रवाह.* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५. पृ. ३५.

४. साधू, अरुण. *कादंबरीविश्व.* देशमुख अँड कंपनी, १९८८. पृ. ४८.

५. फडके, ना.सी. *कादंबरी: स्वरूप आणि संकल्पना.* विद्या वाचन मंदिर, १९८२. पृ.६७.

६. मुक्तिबोध, डॉ. शरच्चंद्र. *दलित समीक्षा: संकल्पना आणि पद्धती.* सकाळ प्रकाशन, १९८४. पृ.७८.

७. लिंबाळे, शरणकुमार. *दलित साहित्य: अस्मिता आणि अभिव्यक्ती.* ग्रंथाली, १९८९. पृ. ८९.

८. माडखोलकर, ग.त्रि. *मराठी कादंबरीचा विकास.* देशमुख प्रकाशन, १९६५. पृ. ७२.

९. गोगटे, द.न. *मराठी कादंबरीचा इतिहास.* लोकवाङ्मय गृह, १९७०. पृ. ८९.

१०.शेळके, पृ. १०३.

११.साधू, पृ. ११५

१२.फडके, पृ. १३०

१३.माडखोलकर, पृ. १४५

१४.पानतावणे, सुनील गंगाधर. *दलित कादंबरी: स्वरूप आणि संदर्भ.* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९८९. पृ. १५८.

१५.मनोहर, यशवंत. *दलित वाङ्मय आणि सामाजिक बदल.* राजहंस प्रकाशन, १९८७. पृ. १७२.

१६.पावणकर, जयंत. *सामाजिक कादंबरीतील दलित अनुभव.* देशमुख प्रकाशन, १९८५. पृ. १८५.

१७.ढसाळ, नामदेव. *दलित साहित्य: संकल्पना आणि स्वरूप.* लोकवाङ्मय गृह, १९८३. पृ. १९८.

१८.वाघमारे, योगीराज. *शिक्षणनामा.* प्रबुद्ध प्रकाशन, २००४. पृ. ११-१३

१९.तत्रैव, पृ. १४

२०.तत्रैव, पृ. १५

२१.तत्रैव, पृ. १५

२२.तत्रैव, पृ. १५

२३.तत्रैव, पृ. १६

२४.तत्रैव, पृ. १८

२५.तत्रैव, पृ. १९

२६.तत्रैव, पृ. ३२

२७.तत्रैव, पृ. २६-२७

२८.तत्रैव, पृ. २७

२९.तत्रैव, पृ. २८

३०.तत्रैव, पृ. ३७

३१.तत्रैव, पृ. १८

३२.तत्रैव, पृ. १९

३३.तत्रैव, पृ. ३२, ३०

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक उत्कृष्ट प्रशासक

प्रा. वसंत पांडुरंग सरवदे

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर, महाविद्यालय राणीसावरगाव, ता. गंगाखेड जि परभणी, पिन कोड 431536

प्रस्तावना :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे इ.स. १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी या खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे त्या गावचे पाटील होते. त्यावेळेस स्त्रीशिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. आख्यायिकेनुसार, ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना, मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला, स्वतःचा मुलगा खंडेराव याची वधू म्हणून आणले. मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत. अहिल्यादेवींचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेबेरीच्य लढाईत धारातीर्थी पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षांनंतर, मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार बघू लागल्या. त्या लढाईत अहिल्यादेवी स्वतः सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर, यांना भारताच्या **"कॅथरीन द ग्रेट, एलिझाबेथ मार्गरिट"** असे म्हणाले थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गरिट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हणले आहे की ज्या वेळेस जगातील सर्वात महान स्त्रीयांचा इतिहास लिहिला जाईल त्या वेळेस पुण्यशलोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्व प्रथम लिहिले जाईल.अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढचं नाही तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखल, प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला; महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यांत द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक, पुरी जगन्नाथ मंदिर व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळ येथील सोमनाथचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक शंकराचे एक देऊळ बांधले. सोमनाथला जाणारे लोक या देवळालाही भेट देतात. अहिल्याबाईंना प्रजेसाठी कल्याणकारी असे काम करण्याची आवड होती. आज ही ती वास्तुशिल्पे व त्यांनी उभारलेली स्थापत्य कला मातोश्रीच्या भव्य कार्याची साक्ष देत उभी आहेत. वास्तुशिल्प व बांधकाम केल्यामुळे कारागिरांची कला जोपासून संकृतीचा वारसा तर जपलाच पण त्याच बरोबर गोरगरीब जनतेच्या हाताला काम मिळवून दिले. त्यांच्या कामगिरीचा हा दुहेरी बाणा निश्चीतच अभिमानास्पद आहे

सैन्या तुकडी. :

ज्या प्रमाणे आहिल्यादेवी लोककल्याण आणि समाज सुधारना करीत त्याच प्रमाने लोकांमधे समानता अनन्याच काम करीत आहिल्यादेवी नी आपल्या सैन्या मध्ये पुरुषा ना संधी देत त्याच प्रमाने महिला नाही संधी मिळत आणि

म्हणुनच आहिल्यादेवी नी सैन्या मध्ये महिला ची ही एक मोठी तुकडी खास सामावुन घेतली आणि म्हणुनच आहिल्यादेवी ना समान न्याय करनार्या न्यायदेवता म्हनुन आहिल्यादेवी ना ओळखल जातं.

शेती व शेतकरी उद्धाराची कार्य :

शेतकरी सुखी तर जग सुखी या संकल्पनेतून शेतक़ऱ्यांच्या जाचक करातून मुक्त केले. अनेक ठिकाणी तलाव व विहिरी बांधल्या. शेतक़ऱ्यांना गोपालनाचे महत्त्व पटवून प्रजेला गाई देऊन मोठ्या प्रमाणात गोपालन घडवून आणले.

गुणग्राहता :

मातोश्रीची लोककल्याणाची कीर्ती ख्याती ऐकुन अनेक विद्वन लोक त्यांची भेट घेण्यास येत असत आणि नंतर त्या ठिकाणीच राहत असत. अनेक विषयाचे विद्वान, शास्त्री पंडीत, व्याकरणकार, कीर्तनकार, ज्योतिषी, पुजारी, वैद्य, हकीम यानाही त्या मुद्दाम बोलावून घेऊन त्यांना त्या राजाश्रय देत असत. महेश्वर नगरीत वास्तव करीत होते म्हणूनच महेश्वर नगरी त्याकाळी संस्कृती विद्वान व धर्माचे माहेरघर म्हणून नावारूपाला आली होती . ग्रंथ संपंदा-निर्मिती छापखाने नसल्याने त्या काळी धर्माचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याकरिता हस्तलिखिते यावरच अवलंबून राहावे लागत होते. हस्तलिखिते लिहिणारे मोठ्या प्रमाणात रकमेची मागणी करत असत. ज्या प्रमाणे हिरा व रत्ने पारखणाऱ्या जवाहिऱ्याप्रमाणे त्या विद्द्येची महत्त्व जाणत असल्याने त्याच्या मागणीप्रमाणे रक्कम देऊन ग्रंथाची हस्तलिखिते तयार करून विद्वान विद्यार्थ्यांसाठी अनमोल ग्रंथसंपदा निर्माण करून जतन केली. शाळा काढून विद्याप्रसाराचे काम केले.

अंधश्रद्धा निवारण :

या काळात सती जाण्याची मोठी रूढी व परंपरा होती. सती गेल्याने पुण्य व न गेल्याने पाप असा समज समाजात रूढ होता. रामायण आणि महाभारत यामध्ये अनेक युद्ध होऊनही कोणी सती गेल्याचा उल्लेख नाहीत असे अनेक दाखले देऊन सती प्रथेला शास्त्राचा आधार नाही हे प्रजेला पटवून दिले. कालांतराने १८२९ साली राजाराम मोहन रॉय यांचा प्रयत्नामुळे सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करण्यात आली यावरून अहिल्याबाई होळकर यांच्या दूरदृष्टतेची प्रचीती आपणास यते.

चोर व दरोडेखोर यांचे मत परिवर्तन

त्या काळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व प्रजेची चोर दरोडेखोर व भिल्ल लुटमार करीत असत अशा लुटारू लोकांना ठिंगळे सरदारांमार्फत सैन्यात सामील करून पाळीव पशु व गायी, म्हशी आणि शेत जमीनी दिल्या व त्यांचे मत परिवर्तन केले व ते लोक शेती करू लागले त्यामुळे त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. भिल्ल लोकांना भिलकवाडी कर घेण्याची परवानगी दिली. एवढे करूनही प्रजेला त्रस्त करणाऱ्या या लोकांना त्यांनी तोफेच्या तोंडी देऊन एक प्रकारचा दरारा नर्माण केला.

न्यायप्रियता :

अहिल्याबाई होळकर यांच्या न्यायप्रियतेची ख्याती सर्व दूर पसरली होती. सर्वांना समान न्याय हा त्यांचा बाणा होता. त्यांच्या संस्थानचा सुभेदार तुकोजी होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्याला तुरुंगात डांबले. तर अहिल्यादेवी च्या सर्वांना समान न्याय या विचाराने डाॅ.बाबासाहेब आंबेडकर हे सुद्धा प्रभावित होते

शोकात्म अखेर – मृत्यू :

महेश्वर येथे संस्कृत पाठशाळा सुरू केली. अन्नछत्रे घातली. अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. गुजराथेतील सोरटी सोमनाथाच्या मंदिराचा जिर्णोद्धार केला. असे पुण्यसंचयाचे काम अहिल्यादेवी करीत होत्या. तशातच त्यांचा नातू तेराव्या वर्षी मरण पावला. काही दिवसातच जावई लढाईत कामी आला आणि मुलगीही सती गेली. आयुष्यभर कोसळलेल्या संकटांनी त्यांचा अंत पाहिला होता. त्यांची प्रकृती बिघडत गेली आणि अखेर १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांनी शांतपणे मृत्यूला जवळ केले.

अहिल्यादेवी एक अतिशय योग्य शासक व संघटक होत्या. मध्य भारताच्या इंदूरमधील त्याचा राज्यकाळ सुमारे तीस वर्षे चालला. हा एक स्वप्नवत काळ होता. या काळात कायद्याचे राज्य होते आणि त्यामुळे त्या काळात जनतेची भरभराट झाली. अहिल्यादेवी होळकरांना जीवनकालात तर सन्मान मिळालाच पण मृत्यूनंतरही लोकांनी त्यांना संताचा दर्जा दिला." "ज्याप्रमाणे शिवाजी महाराज हे जसे पुरुषांमधले उत्तम राजे होते, तसेच अहिल्यादेवी ही स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होती. तिच्या चांगल्या बुद्धीचे, चांगुलपणाचे व गुणांचे उदाहरण देता येऊ शकते. अशी अहिल्यादेवी ही एक महान स्त्री होती." "आपल्या असामान्य कर्तृत्वाने अहिल्यादेवींनी रयतेचे मन जिंकले. नाना फडणवीसांसकट अनेक उच्च धुरीण आणि माळव्यातील लोकांनुसार ती एक दिव्य अवतार होती. ती आजतागायतची सर्वांत शुद्ध व उदाहरण देण्याजोगी शासक होती. अलीकडच्या काळातील चरित्रकार अहिल्यादेवींना 'तत्त्वज्ञानी राणी' असे संबोधतात. याचा संदर्भ बहुतेक 'तत्त्वज्ञानी राजा' भोज याच्याशी असावा.

अहिल्यादेवी होळकर ह्या एक खरोखरीच विस्तृत राजकीय दृश्यपटलाच्या एक सूक्ष्म अवलोकनकर्त्या होत्या. सन १७७२ मध्ये पेशव्यांना लिहिलेल्या एका पत्रात त्यांनी ब्रिटिशांबरोबर हातमिळवणी करण्याबाबत एक ताकीद दिली होती. त्यांना कवटाळणे हे अस्वलास कवटाळण्याजोगे असल्याचे त्यांनी नोंदले आहे :" वाघासारखे इतर प्राणी हे शक्ती वा युक्तीने मारले जाऊ शकतात, परंतु अस्वल मारणे हे फारच कठीण असते. सरळ त्याच्या चेहऱ्यावर वार केल्यासच ते मरते. एकदा त्याच्या मजबूत पकडीत सापडल्यावर ते त्याच्या शिकारीस, गुदगुल्या करून ठार मारते. असाच इंग्रजांचा मार्ग आहे. हे बघता, त्यांच्यावर मात करणे कठीण आहे. "या इंदूरमधील शासकांनी, त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्वांस चांगले काम करण्यास प्रोत्साहन दिले. व्यापाऱ्यांनी चांगल्या कपड्यांचे उत्पादन केले, व्यापार वाढला, शेतकरी हे शांततेत व दबावरहित होते. कोणतेही प्रकरण राणीच्या निदर्शनास आले की ते कडकपणे हाताळले जाई. अहिल्यादेवीना आपल्या प्रजेचा उत्कर्ष आवडत असे. तसेच ती प्रजा राजा हिसकावून घेईल म्हणून आपली संपत्ती उघड करण्यास घाबरत नाही, हे बघणे आवडत असे. दूरदूरपर्यंत, रस्त्यांच्या कडेला, दाट छायादार वृक्ष लावण्यात आले होते, विहिरी केल्या होत्या, पथिकांसाठी विश्रांतीगृहे. गरीब, घर नसलेले व अनाथ या सर्वांना त्यांच्या जरुरीनुसार, सर्व मिळत होते. बहुत काळापासून, भिल्ल लोक पहाडांतून सामानाची नेआण करत असतांना लूटमार करीत असत. अहिल्याबाईंनी भिल्ल लोकांना त्यापासून मुक्ती मिळवून दिली व प्रामाणिकपणे शेती करण्याची संधी त्यांना देऊ केली. सर्व समाजाला अहिल्यादेवी आवडत असत आणि तो त्यांच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करी. त्यांच्या कन्येने तिचा पती, यशवंतराव फानसे यांच्या मृत्यूनंतर सती जाणे हे अहिल्यादेवींच्या आयुष्यातले शेवटचे सर्वात मोठे दुःख होते.वयाच्या ७०व्या वर्षी अहिल्यादेवी होळकरांची प्राणज्योत मावळली.भारत स्वतंत्र झाल्यावरही पुढील अनेक वर्षे शेजारील भोपाळ, जबलपूर किंवा ग्वाल्हेर या शहरांपेक्षा इंदूर सर्व बाबतीत प्रगतिशील राहिले. याच्या मागे अहिल्यादेवीची दूरदृष्टी होती.

संदर्भ :

1. ज्ञात अज्ञात अहिल्याबाई होळकर -विनया खडपेकर
2. लोकमाता अहिल्यादेवी - डॉ. धम्मपाल रेवन माशाळकर
3. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर - श्री. बी. आर. काळे
4. अहिल्याबाई होळकर - ओमप्रकाश वसंत नजन

5. लोकमाता अहिल्यामाई - अशोक राणा
6. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर - अंजली ठाकूर
7. लोकमाता अहिल्यादेवी होळकर - पुरुषोत्तम खेडेकर
8. हिंदुस्तानी यशवंताचा इतिहास - प्राचार्य मधुकर सलगरे.

शोधनिबंधाचा विषय: 'नटसम्राट' नाटकातील 'कावेरी' या भूमिकेचा चिकित्सक अभ्यास

प्रा. सुकृत भोसकर

मराठी विभाग, नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड

१. प्रस्तावना

'नटसम्राट' हे केवळ एक नाटक नसून मराठी रंगभूमीवरचा एक धगधगता इतिहास आहे. थोर कवी आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांनी १९७० मध्ये लिहिलेली ही कलाकृती कालातीत असून आजही तितकीच प्रभावी आणि काळजाला भिडणारी ठरते.

नटसम्राट' या अजरामर नाटकातील 'कावेरी' (सरकार) ही व्यक्तिरेखा म्हणजे सोशिकता, वात्सल्य आणि संघर्षाचे एक मूर्तिमंत प्रतीक आहे. कुसुमाग्रजांनी गणपतराव बेलवलकरांच्या वादळी व्यक्तिमत्वाला तोलून धरणारा 'कावेरी' हा आधारस्तंभ अत्यंत सामर्थ्याने व संवेदनशीलतेने उभा केला आहे.

१. नाटकाची पार्श्वभूमी

हे नाटक विल्यम शेक्सपिअरच्या 'किंग लिअर' (King Lear) या अजरामर शोकांतिकेवरून प्रेरित आहे. मात्र, शिरवाडकरांनी त्याला भारतीय कौटुंबिक व्यवस्थेचा, संस्कृतीचा आणि मराठी रंगभूमीचा असा काही साज चढवला की, ते पूर्णपणे भारतीय मातीतले नाटक बनले.

२. मध्यवर्ती विषय

नाटकाचा केंद्रबिंदू 'गणपतराव बेलवलकर' नावाचा एक वयस्कर व निवृत्त नट आहे. चाळीस वर्षे रंगभूमीवर पात्रांच्या मनोव्यापारांचे सूक्ष्म चित्रण करणाऱ्या अतिशय आव्हानात्मक विविध भूमिका स्वतःच्या अजोड अभिनयसामर्थ्याच्या बळावर लिलया रंगवणारा हा नट प्रत्यक्ष आयुष्यात बापाच्या भूमिकेत मात्र सपशेल अपयशी ठरतो. नटसम्राट आप्पासाहेब बेलवलकर यांच्या आयुष्याच्या माध्यमातून दोन पिढ्यांमधील संघर्ष दाखवण्यात लेखक कमालीचे यशस्वी ठरले आहेत.

नाटकाचे संक्षिप्त कथानक: काळ हा एक निष्ठूर न्यायाधीश आहे. प्रत्येकाचा काळ येतो आणि जातो. आपल्या तारुण्याचा काळात आप्पासाहेब बेलबलकरांनी रंगभूमी गाजवली, नाट्यसृष्टीचा अजरामर अनभिषिक्त सम्राट म्हणून लौकिक मिळवला. पत्नी कावेरी हिने त्यांची खंबीरपणे साथ दिली सुखदुःखाच्या प्रत्येक क्षणी ती त्यांच्यासोबत राहिली. कावेरी म्हणजे आप्पासाहेबांसाठी एकमेव आधार असते.

"बायको म्हणजे बंदर असतं कावेरी नवरा नावाच्या गलबतासाठी"

पैसा, पद, प्रतिष्ठा, पराकोटीची लोकप्रियता इत्यादी सर्व गोष्टी अप्पासाहेबांनी आपल्या कलेच्या सामर्थ्याच्या बळावर मिळवल्या. पण "कालाय तस्मै नमः" या उक्तीप्रमाणे त्यांचाही काळ निघून गेला आणि वृद्धत्व आले तेव्हा त्यांनी आपली सर्व मालमत्ता मिळकत कमाई आपल्या दोन्ही मुलांमध्ये वाटून दिली. हा विश्वास ठेवून की मुले त्यांचा नीट सांभाळ करतील. आप्पासाहेबांनी जगाची रीत पाळली पण मुले आप्पासाहेबांचा स्वभाव त्यांचा ताठरपणा त्यांची परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल न करण्याची वृत्ती या सर्व कारणांमुळे त्यांच्याशी जमवून घेऊ शकत नाहीत व आप्पा साहेबांना आपल्या मुलगा व मुलगी यांच्या घरातून कालानुक्रमे दुःखी व अपमानित होऊन बाहेर पडावे लागते. त्यांची प्रिय पत्नी कावेरीचा दुःखद मृत्यू होतो. आप्पासाहेब आता पूर्णपणे कोलमडून पडतात. मुलगी नलू च्या घरातून न सांगता बाहेर पडून विमनस्क अवस्थेत विक्षिप्तपणे वाट फुटेल तिकडे फिरत राहतात. आप्पासाहेबांना अपेक्षित असलेले निरपेक्ष निस्वार्थी प्रेम त्यांना थिएटरच्या बाहेर बूट पॉलिश करणारा मुलगा राजा याच्या माध्यमातून काही काळ का होईना मिळते. पण तिथेही त्यांची खरी मुले नंदा आणि नलू त्यांना परत आपल्या घरी

घेऊन जायला येतात. कारण त्यांना आपल्या चुकीची उपरती झालेली असते पण अप्पासाहेब तेव्हा त्यांच्या घरी जायला परत जायला ठामपणे नकार देतात. शेवटी अप्पासाहेबांचा अंत नाटक आणि थिएटरच्या सानिध्यातच होतो हे दाखवून अस्सल कलाकाराची कला ही त्याला मरेपर्यंत सोबत करते आणि त्याशिवाय तो जिवंतही राहू शकत नाही हा संदेशही नाटककाराला द्यायचा आहे. निवृत्तीनंतर उतारवयात आप्पासाहेब आपली सर्व संपत्ती मुलांच्या नावे करतात. आणि एक प्रकारे मुलांवर अवलंबून राहण्यास भाग पाडले जातात. सर्व काही मुलांच्या नावे केल्यानंतर स्वार्थापोटी मुले त्यांना कशी वागवतात, याचे भीषण चित्रण यात आहे.

३. प्रमुख आकर्षण: स्वगतं (Soliloquies)

नटसम्राटची खरी ताकद त्यातील संवादांत आणि स्वगतांमध्ये आहे. ही स्वगतं मराठी साहित्यातील सर्वोच्च लेणं मानली जातात. ही स्वगतं म्हणजे आप्पासाहेबांचा प्रेक्षकांच्यासमोर केलेला स्वतःचा स्वतःशीच संवाद असून त्यातून त्यांच्या मनातील तीव्र दुःख, संताप इत्यादी भावना व्यक्त होतात. 'टु बी ऑर नॉट टु बी दॅट इज द क्वेश्चन, जगावं की मरावं? हा एकच सवाल आहे' या स्वगतातून आप्पांच्या जीवन, मृत्यू व स्वअस्तित्वाविषयीच्या असलेल्या गंभीर चिंतनाचे दर्शन प्रेक्षकांना घडते. "कुणी घर देता का घर? एका तुफानाला कुणी घर देता का घर?" – हे स्वगत नाटकातील व्याकुळता व करुणरसाच्या परिपोषाचा परमोच्च बिंदू गाठते. ऐकताना प्रेक्षकांच्या हृदयात कालवाकालव व डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहत नाही.

नाटकाची पार्श्वभूमी: वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या 'नटसम्राट' नाटकाचा थोडक्यात परिचय. महान लेखक व कवी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) लिखित 'नटसम्राट' हे मराठी रंगभूमीवरील एक अजरामर आणि मैलाचा दगड ठरलेले नाटक आहे. हे नाटक शेक्सपिअरच्या 'किंग लिअर' आणि शिरवाडकरांच्या स्वतःच्या अफाट कल्पकतेचे अपत्य आहे. संपूर्ण नाटक गणपतराव बेलवलकर या नटाच्या भोवती फिरत असले, तरी या वादळाला आपल्या संसाराच्या परिघात बांधून ठेवणारी आणि शेवटपर्यंत साथ देणारी व्यक्तिरेखा म्हणजे त्यांची पत्नी—कावेरी (ज्यांचा उल्लेख गणपतराव प्रेमाने 'सरकार' असा करतात).

बहुतांश वेळा नटसम्राटाच्या अथांग अभिनयापुढे आणि त्यांच्या भारदस्त, पल्लेदार मोठमोठ्या संवादांपुढे कावेरीची भूमिका गौण मानली जाते. परंतु, चिकित्सक दृष्टीने पाहिल्यास असे लक्षात येते की, जर कावेरी नसती तर गणपतरावांचे 'नटसम्राट' असणे कधीच पूर्ण झाले नसते. हा निबंध कावेरीच्या याच मूक त्यागाचा, तिच्या सोशिकतेचा आणि तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा अभ्यास करतो.

विषयाची निवड: गणपतराव बेलवलकरांच्या छायेत असूनही कावेरीचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आणि तिचे महत्त्व.

संशोधन समस्या: पुरुषप्रधान मानसिकतेत आणि कौटुंबिक विघटनात कावेरीच्या संघर्षाचे स्वरूप काय आहे?

२. संशोधनाची उद्दिष्टे

1. कावेरीच्या स्वभावातील विविध पैलू (पत्नी, आई आणि आजी) उलगडणे.
2. गणपतराव आणि कावेरी यांच्यातील परस्पर संबंधांचे विश्लेषण करणे.
3. नाटकातील शोकांतिकेला गती देण्यात कावेरीच्या भूमिकेचे योगदान तपासणे.
4. कावेरीच्या पात्रातून व्यक्त होणारी मध्यमवर्गीय भारतीय स्त्रीची मानसिकता अभ्यासणे.

३. गृहीतके (Hypotheses)

कावेरी ही केवळ गणपतरावांची सावली नसून, ती संसाराचा खरा कणा आहे. ती गणपतरावांचा खंबीर आधार आहे. तिचा मृत्यू हा नाटकातील संघर्षाचा सर्वोच्च बिंदू (Climax) आहे, ज्यानंतर गणपतराव पूर्णपणे कोलमडतात.

४. संशोधनाची कार्यपद्धती (Research Methodology)

प्राथमिक साधने: 'नटसम्राट' नाटकाचे मूळ संहिता वाचन.

दुय्यम साधने: नाटकाची विविध समीक्षणे, ज्येष्ठ लेखक, नट-नटींच्या मुलाखती, विश्लेषणपर लेख आणि संबंधित ग्रंथ.

१. कावेरी: एक सोशिक, सजग गृहिणी

कावेरी ही पारंपरिक भारतीय मध्यमवर्गीय स्त्रीचे प्रतिनिधित्व करते. तिच्या संपूर्ण आयुष्याचा केंद्रबिंदू तिचा संसार, तिची मुले (नंदा आणि थोरला मुलगा) आणि तिचे पती हेच आहेत. गणपतरावांनी रंगभूमीला आपले सर्वस्व मानले, तर कावेरीने गणपतरावांना आपले दैवत मानले. त्यांच्या कामाची वेळ अनियमित होती , रात्र रात्रभर पहाटेपर्यंत चालणाऱ्या नाटकांच्या प्रयोगांमुळे त्यांना घरी यायला होणारा उशीर, त्यामुळे झोपेचे होणारे खोबरे, नाटक संपल्यानंतर पहाटे अप्पासाहेबांचं जेवण आणि तिचं जेवण त्यांच्याही नंतर! आपोआप घडणारे व पती, मुलांच्या व संसाराच्या कल्याणासाठी ठरवून केलेले उपास, गरिबी-श्रीमंती, अभावग्रस्तता-चंगळ,विविध सुख-दुःखात ती सदैव पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी होती. हे सर्व तिने आपले कर्तव्य मानले. त्याबदल्यात कशाची अपेक्षा केली नाही. नाटकाच्या सुरुवातीला जेव्हा गणपतराव आपली सर्व संपत्ती मुलांच्या नावे करून टाकतात, तेव्हा कावेरीला भविष्याची चिंता असते.

ती म्हणते, "एक वेळ वाढलेलं जेवायचं ताट द्यावं पण बसायचा पाट देऊ नये माणसाने"

ती एका व्यावहारिक स्त्रीसारखा विचार करून गणपतरावांना सावध करण्याचा प्रयत्न करते.

परंतु, पतीच्या निर्णयावर तिचा इतका विश्वास आहे की ती स्वतःचा विरोध बाजूला सारून त्यांच्या निर्णयाला होकार देते. "तुम्ही म्हणाल ते मला प्रमाण आहे" मुलांवरील तिचे प्रेम इतके अधिक आहे की, भविष्यात त्यांच्याकडून होऊ शकणाऱ्या अपमानाची तिला कल्पनाही येत नाही.

२. कावेरी - एक त्यागी स्त्री, एक आदर्श भारतीय माता व पत्नी

कावेरीने पतीला प्रत्येक सुखदुःखाच्या क्षणात साथ देऊन भले अनुभव पचवले. पतीच्या मुलांच्या सुखासाठी स्वतःच्या इच्छांचा, स्वप्नांचा त्याग केला. शरीराची, मनाची हेळसांड सहन केली. झोपमोड, वेळीअवेळी जेवण, अनेक प्रसंगी घडणारे उपास आनंदाने सहन केले.

नाटकाच्या प्रयोगानंतर पतीला दृष्ट लागू नये म्हणून मीठमोहऱ्यांनी अगदी उतारवयातही त्याची दृष्ट काढत असे. नाटकाच्या पडत्या काळातील वनवासही कर्तव्य म्हणून आनंदाने सोसला. कोणत्याही परिस्थितीत पतीची साथ सोडली नाही. घरात आचारी असतानाही ती स्वतः स्वयंपाक घरात रमते. त्याशिवाय तिला करमत नाही स्वतःच्या हाताने विविध पदार्थ करून सर्वांना खाऊ घालण्यात तिला खूपच समाधान वाटते. सत्काराच्या दिवशी अप्पासाहेब जेव्हा चंद्रहार घेऊन येतात तेव्हा 'अहो मला कशाला पोरांना द्यायचं ते' असं म्हणून नाकारू लागते. नवऱ्याची पूरेपूर काळजी घेणारी कावेरी एक आदर्श पत्नी आहे. स्वतःच्या सुखाचा विचार न करता मुलांची व पतीचीही मायेनं काळजीनं सांभाळ करणारी ती आदर्श माता आहे.

३. गणपतराव आणि कावेरी: सहजीवनाचा प्रवास

नटसम्राट' मधील गणपतराव आणि कावेरी यांचे नाते हे मराठी साहित्यातील अत्यंत सुंदर आणि परिपक्व नात्यांपैकी एक आहे. गणपतराव तिला 'सरकार' अशी हाक मारतात. या एका शब्दात तिचा आदर, धाक, अधिकार आणि प्रेम सामावलेले आहे. अनेक वर्षांच्या संसारात कावेरीने कटुगोड अनुभवांत पतीची साथ दिली आहे त्याला सावरले आहे. ती अप्पासाहेबांचा खंबीर आधार आहे त्यांच्या घराचा, संसाराचा व आयुष्याचा ती कणा आहे.

गणपतराव हे अत्यंत भावनाप्रधान, विक्षिप्त आणि रागीट स्वभावाचे आहेत. त्यांच्या या वादळी स्वभावाला शांत करण्याचे काम कावेरी अत्यंत कौशल्याने करते. रंगभूमीवरील राजा असलेल्या गणपतरावाला खऱ्या आयुष्यात 'राजेपण' देणारी ही कावेरीच आहे. जेव्हा जग गणपतरावांना विसरते, तेव्हाही कावेरी त्यांच्यातील कलावंताचा आणि त्यांच्या स्वाभिमानाचा आदर करते.

४.अपमान आणि स्थलांतर

नाटकाच्या उत्तरार्धात जेव्हा मुलांच्या घरी या वृद्ध दांपत्याला जे अनुभव येतात तेव्हा कावेरीची खरी कसोटी लागते. सून शारदाच्या जुळवून न घेण्याच्या व सहन न करण्याच्या असमंजस स्वभावामुळे अप्पासाहेबांचा झालेला अपमान तिच्या जिव्हारी लागतो. मुलगा नंदा हा सुद्धा आपला संसार टिकवण्याच्या अपरिहार्यतेमुळे असहायतेने तिलाच साथ देतो व आप्पासाहेबांनाच आपल्या वर्तनात व स्वभावात बदल घडवण्याचा सल्ला देतो तेव्हा स्वाभिमानी स्त्रीला ते सहन होत नाही. ती म्हणते, "तुमचा अपमान झालेला एक वेळ तुम्ही सहन कराल पण मी नाही करायची." असे म्हणून खंबीर मनाने, ठाम निश्चय करून ती अप्पासाहेबांसोबत मुलाच्या घरातून बाहेर पडते व राहीनगरला मुलीकडे जाऊन राहण्याचा निर्णय घेते.

मुलीच्या घरी काही दिवस सुखात गेल्यानंतर एके दिवशी नवरा सुधाकरच्या पाकिटातले पैसे सापडत नसल्याने अस्वस्थ झालेली मुलगी नलू आईच्या ट्रंकेत पैसे पाहते. तिला आप्पांनी पैसे चोरल्याचा संशय येतो. मुलगी नलू अप्पासाहेबांवर पैसे चोरल्याचा आळ घेते. काही वेळानंतर पैसे सापडतात पण स्वतःच्या मुलीकडूनच झालेल्या त्या आरोपामुळे आपल्या प्रचंड स्वाभिमानी पतीचा झालेला घोर अपमान, त्याची कमालीची व्यथित अवस्था व उद्विग्नता हे सर्व कावेरीला सहन होत नाही व त्याचप्रसंगी छातीत कळ येऊन तिचा अत्यंत शोकपूर्ण असा मृत्यू होतो.

५. कावेरीचा मृत्यू: एक शोकांतिका

कावेरीचा मृत्यू हा या नाटकातील सर्वात मोठा परमोच्च बिंदू आहे. मुलीकडून पतीवर करण्यात आलेल्या चोरीच्या गलिच्छ आरोपामुळे, त्याच्या झालेल्या भयंकर अपमानामुळे घडून आलेल्या संघर्षाचा ताण असह्य होऊन छातीत तीव्र कळ येऊन कावेरीचा अंत होतो. मरतानाही तिच्या मनात केवळ पतीचाच विचार असतो. तिचा मृत्यू हा केवळ एका पात्राचा अंत नसून, गणपतरावांच्या जगण्याच्या आधाराचा अंत आहे. कावेरी जिवंत असेपर्यंत तिने गणपतरावांना वेडे होण्यापासून वाचवले होते. त्यांना समजून घेणारी त्यांचा सन्मान करणारी, काळजी घेणारी ती एकमेव व्यक्ती होती. ती गेल्यावर गणपतरावांच्या मनाचा बांध फुटतो आणि ते खऱ्या अर्थाने एकाकी, बेघर आणि निराधार होतात.

निष्कर्ष

१. खरा आधारस्तंभ : कावेरी ही 'नटसम्राट' नाटकाचा अदृश्य कणा आहे. गणपतरावांच्या यशापयशाच्या मागे तिची सोशिकता, सजग, जाणकार वृत्ती आणि मानी स्वभाव कारणीभूत आहे.

२. स्त्री मनाचे प्रकटीकरण : कुसुमाग्रजांनी कावेरीच्या माध्यमातून केवळ एका नटाच्या पत्नीचे दुःख मांडलेले नाही, तर भारतीय कुटुंब व्यवस्थेत स्वतःची ओळख पुसून जगणाऱ्या प्रत्येक आईचे आणि पत्नीचे वास्तव मांडले आहे.

३. अपराजित व्यक्तिमत्त्व : परिस्थितीपुढे शरणागती पत्करण्यापेक्षा स्वाभिमानाने गरिबी स्वीकारणारी कावेरी ही एक सशक्त आणि अपराजित व्यक्तिरेखा ठरते.

४. कावेरी: आदर्श भारतीय स्त्रीत्वाची प्रतिनिधी: भारतीय कुटुंब व्यवस्थेतील स्त्रीची ओढाताण या पात्राद्वारे प्रभावीपणे मांडली गेली आहे. स्वसुखाचा, स्वतःच्या इच्छांचा त्याग करून ती सतत पती व कुटुंबासाठी झिजताना आयुष्य व्यतीत करते. नवऱ्याच्या आत्मसन्मानाची जपणूक स्वतःच्या मानापमानापेक्षा अधिक पावलोपावली करताना दिसते.

७. संदर्भ सूची

१. नटसम्राट (मूळ नाटक) - वि. वा. शिरवाडकर
२. साहित्यातील स्त्री-वादविषयक विविध समीक्षा ग्रंथ.
३. मराठी नाटकांचा इतिहास.

महाश्वेता कादंबरीतील अनुपमा

सौ. पांचाळ सागर गोविंदराव

संशोधक विद्यार्थी

भाषा, वाङ्मय आणि संस्कृती, अभ्यास संकुल, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड

सुधा मुर्ती लिखित 'महाश्वेता' या कादंबरीचा उमा कुलकर्णी यांनी मराठीत अनुवाद केला आहे. अनुपमा ही या कादंबरीची नायिका आहे. धैर्याने समर्थपणे जीवन जगू पाहणाऱ्या 'कोडग्रस्त' स्त्रियांची व्यथा, तिचा संघर्ष अनुपमाच्या जीवनप्रवासातून उलगडण्याचा प्रयत्न प्रस्तुत कादंबरीत करण्यात आलेला आहे. अंगावर कोडाचा डाग उमटणं म्हणजे जीवनाचा अंतच जवळ आला असं मानलं जातं. कोडाचा डाग म्हणजे केवळ 'चर्मरोग' आहे. असा विचार कुणी करत नाही आणि जर एखाद्या वयात येणाऱ्या मुलीच्या अंगावर कोडाचा डाग आला तर तो पांढरा/श्वेत डाग साऱ्या घराण्यावरचा कसा शाप बनतो ? याचे लेखिकेने चित्रण केले आहे. अनुपमा ही महाश्वेता या कादंबरीची नायिका असून ती अनुपम लावण्यवती, हुशार पण गरीब शाळा मास्तराची मुलगी असते. प्रथमदर्शनी आनंद तिच्या प्रेमात पडतो. आनंद हा एक देखणा डॉक्टर घरंदाज लक्ष्मीपुत्र असतो. सर्वांच्या मर्जीनुसार आनंद अनुपमाचा विवाह होतो. परंतु आनंदच्या आईला श्रीमंत घरातील मुलीला सून म्हणून आणायचे असते. वरकरणी हा विवाह जरी सर्वांच्या मर्जीनुसार वाटत असला, तरी तो सर्वांच्या मनाविरूद्ध होता. परंतु दुर्देवाने लग्नानंतर अल्पावधितच अनुपमाच्या अंगावर कोडाचा पांढरा डाग उमटतो. हे सत्य जेव्हा घरात कळते तेव्हा सासरची मंडळी तिला हीन समजते. तिच्याशी दुजाभाव करतात, तिला माहेरी हाकलून लावतात. सर्वांगाने हतबल झालेल्या अनुपमाने आपले स्वतंत्र अवकाश निर्माण केले. आयुष्यात आलेल्या अडचणी व संकटांवर निर्भीडपणे मात करत ती स्वत:च्या पायावर उभी राहते. कालांतराने तिचा डॉक्टर पती आनंद देखील अंतर्मनात तडफडू लागतो. तिचा शोध घेऊन तिला घरी आणायला जातो. पण... तोपर्यंत उशीर झालेला असतो. आयुष्यात होरपळून निघालेल्या अनुपमाला वास्तवाचे भान आल्यामुळे शेवटी स्वत:च्या आयुष्याला समर्थपणे आकार देण्याइतपत प्रगल्भता: तिच्यात आलेली दिसून येते.

'महाश्वेता' या कादंबरीचे कथानक 'अनुपमा' या स्त्रिच्या भोवती फिरते. अनुपमा ही या कादंबरीची मुख्य नायिका असून ती कादंबरीच्या कथानकाचा केंद्रबिंदू आहे. सुधा मूर्तींनी अनुपमाच्या सौंदर्यामुळे खुलणाऱ्या आयुष्याबरोबरच श्वेतकुष्ठामुळे होणारी त्या सौंदर्याची अवहेलना दाखवताना तिच्या कोमल मनाचेही कठोर, व्रतस्थ जीवनात होणारे स्थित्यंतर दर्शवले आहे.

सुख-दु:ख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. हे विसरता कामा नये. अनुपमाच्या जीवनात डॉ.आनंदच्या आगमनाने सुख तर येतेच पण त्या पाठोपाठ दु:खही येते. आनंद-अनुपमाचं लग्न पार पडलं. तिचं जीवन आनंदानं बहरून आलेल्या ताटव्यासारखे भासत होते, पण तीन महिन्यानंतर आनंद इंग्लंडला जातो. त्याचा विरह तिला सोसावा लागतो. ननंद 'गिरिजा' हिच्या अव्यवहार्य वागण्याला प्रतिबंध घालण्याचा उघड प्रयत्न तिने केला नाही. अनुपमाचे हे वागणे भारतीय स्त्रियांच्या मर्यादा स्पष्ट करणारे आहे. साहजिकच स्वस्थ बसून पाहत राहणे आणि निमुटपणे सहन करणे अशी स्त्रियांची मुस्कटदाबी पूर्वापार चाल आलेली दिसते. अशातच दुर्देवाने काही महिन्यातच अनुपमाच्या अंगावर कोडाचा डाग उमटला. अन् न दिसणाऱ्या देवाशी आणि दैवाशी तिचा वाद चालला होता.

श्वेतकुष्ठ हा चर्मरोग आहे. त्याने संसर्ग होत नाही. त्यामुळे केवळ त्वचा कुरूप होते. एवढेच, या आजारामुळे कुठल्याही प्रकारची विकृती निर्माण होत नाही. असा डॉक्टरांनी विश्वास दिला तरी अनुपमा हे सत्य घरातील कोणालाही पटवून देऊ शकली नाही. तिच्या या कोडामुळे घरची छोटी मालकिणीचे असलेले स्थान कामवाल्या बाईपेक्षाही खालचे झाले. मानसिक क्लेश सहन करीत ती वडिलांसोबत माहेरी जाते. सा़ऱ्या घरादाराने तिला माहेरी हाकलून दिले. ती माहेरी सावत्र आई आणि वसुधा व नंदा या दोन सावत्र बहिणी अनुपमाचा लग्नाअगोदर पासूनच द्वेष करतात. त्या नेहमी म्हणायच्या, ''चार अक्षरं येतात म्हणून उगाच भाव खाते मेली ! शिवाय ती म्हण आहेच ना एक गोरी लाख चोरी म्हणून ! त्यातलीच हिची गत''[1] महाश्वेतातील मुख्य पात्रांच्या स्वभावाचे उठावदार वर्णन करण्यासाठी अशा 'बहीण' या स्त्री व्यक्तिरेखेचे चित्रण आले आहे. बहिणी बरोबरच मैत्रीण या नात्याकडे सुधा मूर्ती ठराविक अंतरावरूनच पाहतात. त्यांच्या महाश्वेता कादंबरीतून मैत्रीची काही उदाहरणे आलेली आहेत. निवेदनाच्या ओघात आणि गरज म्हणून मोजक्या प्रसंगातून त्यांनी मैत्रीचा निर्देश केलेला आहे. 'महाश्वेता' मधील अनुपमा आणि सुमन यांची कितीतरी वर्षापासूनची घट्ट मैत्री होती. एकाच हॉस्टेलमध्ये त्या दोघी राहत होत्या. बहिणीपेक्षाही जवळची अशी त्यांची मैत्री होती. अगदी जिवाभावाची प्राणप्रिय मैत्री. सुमन श्रीमंत होती. परंतू अनूपमापेक्षा रूपाने डावी होती. ती थट्टेनं म्हणायची, ''अनु तुझ्याबरोबर मी असते म्हणजे काजळाचं बोट लावल्यासारखंच ! तुला दृष्ट लागणार नाही कुणाची !''[2] अशी ही खेळकर मिश्कील स्वभावाची सुमन तिच्या रेशमी साड्या अनुपमाला नेसायला देत असे. पुढे परितक्त्या झालेल्या आपल्या मैत्रीणीला अनुपमाला सुमन मुंबईला आपल्या घरी आसरा देते. तिला नोकरी शोधून द्यायला मदत करते. पण मैत्रीणीचा नवरा अनुपमावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. पण अनुपमा मैत्रीणीच्या संसाराचा विचार करून तिथून निघून जाते. सर्व बाजूंनी निराधार होत चाललेली अनुपमा नवरा डॉक्टर आहे. त्याला तर सगळेच माहित आहे. पत्रातून तिने सर्व व्यथा मांडली पण तिच्या पदरी निराशाच पडते. आनंदचं एकही पत्र तिला येत नाही. आनंदचा शाब्दिक दिलासा मिळेल या आशेपोटी आसूसलेली पण मिळालेल्या निराशेमुळे ती आणखी हतबल होते. पण स्वत:ला सावरत खंबीरपणे उभी राहते. कणखर मनाने स्वावलंबी जीवनाचा मार्ग अनुसरते. या कणखर मनाच्या पलीकडे तिचं स्त्रीपण उभं आहे. किमान समाजात नव़ऱ्याने टाकलेल्या किंवा नव़ऱ्यापासून अलिप्त राहणा़ऱ्या स्त्रियांना कुणीतरी आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांचा आधार असावा लागतो. वखवखलेल्या नजरेने सावज टिपायला निघालेल्या पुरूषी समाजात तिचा केव्हा आणि कसा बळी घेतला जाईल हे सांगणे कठीणच आहे. स्त्री कितीही शिकली आणि कितीही मोठी झाली तरीही तिला या आश्रयाची गरज आजही आहे. याचेच येथे आपल्याला दर्शन घडते. कादंबरीच्या शेवटी मित्रांसोबत नाटक पहायला गेलेल्या आनंदला अनुपमा भेटली, नाटकाच्या ठिकाणीच पहिली भेट कादंबरीच्या सुरूवातीला होते. या भेटीतून प्रेम होते. प्रेमाचे रूपांतर विवाहात होते, पण इथे म्हणजे शेवटच्या भेटीत अनुपमा-आनंद दोघेही वेगवेगळे होतात. याचे कारण 'कोड' असते. या कोडासाठी आपण अनुपमाला सोडलो याची खंत आनंदला असते. कालांतराने आनंदमध्ये परिवर्तन होते अन् तो अनुपमाला घरी घेऊन जाण्यासाठी तिच्या माहेरी जातो. पण ती तिथे नसते. तिचा खूप शोध घेतो पण ती भेटत नाही. आता ती वेळ निघून गेलेली असते. जेव्हा अनुपमा भेटली तरी ती आनंद सोबत जात नाही. अनुपमा तिची शिक्षिकेची नोकरी, विद्यार्थी व आवडती रंगभूमी यासाठी ती स्वत:ला वाहून घेते.

संदर्भ :

१. मूर्ती सुधा, 'महाश्वेता', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट 2002, पृ.क्र.14

एच. आय. व्ही. एड्सच्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात

डॉ. शिवाजी विठ्ठलराव वायभासे

सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख

समाजशास्त्र विभाग, कै. डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय, कळमनुरी. जिल्हा हिंगोली.

प्रस्तावना

भारतासारख्या प्राचीन परंपरा असलेल्या देशांमध्ये एच आय व्ही एड्स सारख्या अत्यंत दुर्मिळ व गंभीर अशा आजाराने आपले पाय रोवले असून केंद्र सरकार तसेच विविध राज्य सरकारांना या रोगाची गंभीर दखल घेत यावर उपचार व प्रतिबंध करण्याकरिता विविध असे उपाय करावे लागले आहेत. त्याकरिता वेगवेगळ्या जिल्ह्यात एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अंतर्गत आयसीटीसी व एआरटी केंद्र, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत एचआयव्ही समुपदेशन, तपासणी व उपचार सेवा तसेच त्याकरिता विविध शिबिर आयोजित करून लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम करावे लागले आहे. या आजाराची हिंगोली जिल्ह्यात काय स्थिती आहे याचा अभ्यास व्हावा याकरिता ' एच आय व्ही एड्स च्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास:हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात' हा अभ्यास विषय निवडून या संदर्भाची माहिती घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.

Keywords : एच आय व्ही (HIV) एड्स (AIDS) संसर्ग, विषाणू, प्रतिबंध, बाधित रुग्ण, समुपदेशन. इत्यादी

अभ्यास विश्व

प्रस्तुत शोधनिबंधासाठी हिंगोली जिल्हा हे अभ्यास विश्व म्हणून निवडले आहे. हिंगोली जिल्ह्यात एच आय व्ही एड्स ची सद्यस्थिती काय आहे याचा अभ्यास होण्याच्या दृष्टिकोनातून एच आय व्ही एड्स च्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात हा अभ्यास विषय निवडला आहे.

अभ्यास विषयाची निवड

'एच आय व्ही एड्सच्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास : हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात' हा अभ्यास विषय निवडून या संदर्भात माहिती घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे. परंतु हा अभ्यास विषय निवडण्यामागे महत्वपूर्ण हेतू हा आहे की, हिंगोली जिल्हा हा एक नवीन व औद्योगिक दृष्ट्या मागास असलेला जिल्हा आहे या जिल्ह्याची लोकसंख्या ही इतर जिल्ह्याच्या तुलनेत कमीच आहे. तसा या जिल्ह्याला ग्रामीण भागाचा फार मोठ्या प्रमाणात संपर्क आहे. तेव्हा इतर जिल्ह्याच्या तुलनेत हिंगोली जिल्ह्यात आणि हिंगोली शहरांमध्ये एच आय व्ही एड्सची काय स्थिती आहे. याचा अभ्यास व्हावा या दृष्टिकोनातून या अभ्यास विषयाची निवड केली आहे.

अभ्यास विषयाचे महत्त्व

या संशोधनाचे महत्त्व हे अशा स्वरूपाचे आहे की येणाऱ्या काळात तरुण पिढीला तसेच समाजातील इतर सर्वांना एच आय व्ही एड्स बद्दल माहिती होऊन जनजागृती व्हावी. तसेच या आजाराची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचावी आणि या आजारापासून दूर कसे राहता येईल व यावर प्रतिबंध कसा करता येईल याची माहिती सर्वांपर्यंत पोहोचेल या दृष्टिकोनातून हा अभ्यास विषय महत्त्वपूर्ण आहे.

संशोधनाचा उद्देश

1. एच आय व्ही एड्सच्या स्वरूपाचा आढावा घेणे.
2. एच आय व्ही एड्सच्या कारणांचा शोध घेणे.
3. एच आय व्ही बाधितांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन काय आहे याचा वेध घेणे.
4. उपाययोजना सुचविणे.

गृहीतकृत्य

1. एच आय व्ही बाधितांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.
2. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात एच आय व्ही बाधितांचे प्रमाण जास्त आहे.
3. स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण अधिक आहे.
4. एच आय व्ही बाधित व्यक्तींकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.
5. एच आय व्ही बाधितांसाठी शासनाचे धोरण सकारात्मक आहे.

तथ्यसंकलन

प्रस्तुत शोधनिबंधासाठी संशोधकाने दुय्यम तथ्यसंकलनाच्या साधनाचा उपयोग केला आहे. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित असे ग्रंथ तसेच वर्तमानपत्रे व इंटरनेटचा उपयोग केला आहे.

संशोधन आराखडा

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग केला असून या आधारे ही समस्या लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत समस्येचे वर्णन करून समाजातील सर्वांना ही समस्या काय आहे ते कळेल व या समस्येपासून दूर कसे राहता येईल याची माहिती होईल. या दृष्टिकोनातून वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आला आहे.

हिंगोली जिल्ह्याची ओळख

हिंगोली जिल्हा तसा मराठवाड्याच्या उत्तरेस आहे. हिंगोली जिल्ह्याचा पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण असा विचार केला असता हिंगोली जिल्ह्याच्या पूर्वेला विदर्भातील यवतमाळ व मराठवाड्यातील नांदेड, पश्चिमेला परभणी जालना, उत्तरेला बुलढाणा व वाशिम तर दक्षिणेला परभणी व नांदेड जिल्हा आहे.म्हणजेच परभणी, नांदेड, वाशिम, जालना, बुलढाणा, यवतमाळ या सहा जिल्ह्यांच्या सीमा हिंगोली जिल्ह्याला लागून आहेत. महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागातील उत्तरेकडील भागात हिंगोली जिल्हा वसला आहे. या जिल्ह्याचे क्षेत्रफळ 4526 चौ.कि.मी. असून एकूण लोकसंख्या 2011 च्या जनगणनेप्रमाणे 11,77,345 एवढी आहे. यामध्ये पुरुष 6,06294 (50.50%) तर स्त्रियांची संख्या 5,71,051(48.50%) एवढी आहे. लोकसंख्येची घनता 260 प्रति चौरस किलोमीटर आहे. तसेच साक्षरता दर 76.04 असून दर हजार पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण 942 आहे.

हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ व वसमत हे पाच तालुके असून प्रमुख बाजारपेठा म्हणून आहेत.

हिंगोली हे जिल्ह्याचे ठिकाण असून या शहराचे नाव जुन्या काळात वंजारगढी म्हणून प्रसिद्ध होते. या शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून येथील अनेक भागांना ऐतिहासिक नावे आहेत जसे की वंजारवाडा, पलटण, रिसाला, तोफखाना, पेन्शनपुरा, गाडीपुरा, गवळीपुरा, गोलंदाज गल्ली, चांदमारी,बुरुड गल्ली ही नावे आजही कायम आहेत.

2001 च्या जनगणनेनुसार हिंगोली शहराची लोकसंख्या 69432 असुन यामध्ये 35639 पुरुष तर 33793 स्त्रिया होत्या एका दशकात शहरात 14 हजार 975 लोकांची वृद्धी झाली असलेली दिसून येते. ज्याप्रमाणे लोकसंख्येची वृद्धी होत गेली त्याप्रमाणेच विविध समस्या निर्माण होत गेल्या ज्यामध्ये एचआयव्ही एड्स ही एक मोठी गंभीर समस्या आजच्या काळात निर्माण झाली आहे. तेव्हा या आजारापासून दूर राहण्याकरिता काय करावे. म्हणजेच या आजारास प्रतिबंध कसा घालता येईल याची माहिती व्हावी या दृष्टिकोनातून 'एच आय व्ही एड्स च्या सद्यस्थितीचा चिकित्सक अभ्यास: हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भात' हा अभ्यास विषय निवडला आहे.

एच आय व्ही (HIV) म्हणजे काय.

एच आय व्ही चा अर्थ ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस (Human Immunodeficiency virus) असा आहे. हा एक असा विषाणू आहे जो शरीराच्या (D4 पेशींवर) रोगप्रतिकारक शक्तीवर हल्ला करतो. ज्यामुळे संसर्गाशी लढण्याची शरीराची क्षमता हळूहळू कमकुवत होते.

एड्स (AIDS) म्हणजे काय.

एड्स म्हणजे अक्वायर्ड इम्युनोडिफिशियनसी सिंड्रोम (Acquired Immunodeficiency syndrome) होय. म्हणजेच जेव्हा एचआयव्हीमुळे रोगप्रतिकारक शक्ती अत्यंत कमकुवत होते तेव्हा त्या स्थितीला एड्स म्हटले जाते. या स्थितीत शरीर साध्या आजारांशीही लढू शकत नाही आणि विविध संसर्ग सहज होतात.

लक्षणे

वजन वेगाने कमी होणे, सतत ताप येणे, अतिसार, थकवा, तोंडावर किंवा त्वचेवर चट्टे उठणे अशी लक्षणे दिसून येतात.

एच आय व्ही आणि एड्स मधील फरक

एचआयव्हीची लागण झाली म्हणजे एड्स झाला असे नाही. तर एड्स हा एचआयव्ही संसर्गाचा शेवटचा आणि सर्वात गंभीर टप्पा आहे. एच आय व्ही वर योग्य उपचार न केल्यास बऱ्याच वर्षानंतर रोगप्रतिकारक शक्ती अत्यंत कमकुवत होऊन एड्स होतो.

एच आय व्ही चा इतिहास.

उगम आणि मानवात प्रवेश.

एचआयव्ही हा आजार विसाव्या शतकापासून सुरू झाला आहे. शास्त्रज्ञांच्या मते एचआयव्हीचा उगम हा विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मध्य आणि पश्चिम आफ्रिकेतील चिपांझी मध्ये आढळणाऱ्या (SIV) या विषाणूपासून झाला 1920 च्या दशकात कांगो मधील शिकारीदरम्यान रक्ताच्या संपर्कातून हा विषाणू मानवामध्ये पसरला असावा असा अंदाज आहे.

जागतिक ओळख.

जून 1981 मध्ये अमेरिकेत काही तरुण समलैंगिक पुरुषांमध्ये अत्यंत दुर्मिळ आजाराची लक्षणे आढळली. ऑगस्ट 1982 मध्ये अमेरिकेच्या सीडीसी (CDC) ने या आजाराला एड्स असे नाव दिले.

भारतातील प्रसार

भारतात एच आय व्ही एड्स 1986 मध्ये सुरू झाला. जेव्हा चेन्नईतील महिला सेक्स वर्कर्समध्ये या आजाराची लक्षणे दिसून आल्यानंतर त्यांची तपासणी केली असता त्यांना हा आजार झाल्याचे दिसून आले. त्यानंतर संपूर्ण देशात

या आजाराचा प्रसार झाला. नॅशनल एड्स कंट्रोल ऑर्गनायझेशन (NACO) च्या अंदाजानुसार भारतात 25 लाख लोकांना एचआयव्हीची लागण झाली असून भारताचा एचआयव्ही बाधित झालेल्यांमध्ये जागतिक पातळीवर दुसरा क्रमांक लागतो. यामध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी असून 15 ते 29 या वयोगटातील तरुणांची संख्या ही अधिक म्हणजे 31 टक्के आहे. असे असले तरी एच आय व्ही संसर्गाच्या प्रमाणात 44% घट झाली आहे.

सर्वाधिक बाधित राज्य

भारतात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांचा एचआयव्ही बाधित झालेल्यामध्ये सर्वाधिक प्रमाण असलेल्या राज्यांमध्ये क्रमांक लागतो.

महाराष्ट्रराज्याची सद्यस्थिती.

(NACO) च्या अहवालानुसार संपूर्ण देशात एच आय व्ही चा प्रसार दर 0.19 टक्के असताना महाराष्ट्रात हा दर 0.23% इतका जास्त आहे. एकूण संख्या 03 लाख 90 हजार एवढी आहे. यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर आणि कोल्हापूर ही जिल्हे राज्यातील उच्च जोखीम क्षेत्रामध्ये येतात. या शहरांमध्ये एच आय व्ही चे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. तसेच ग्रामीण व शहरी अशी आकडेवारी प्रसिद्ध केली जात नाही. परंतु राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार ग्रामीण (0.25%) भागाच्या तुलनेत शहरी भागात (0.35%) एचआयव्ही संसर्गाचे प्रमाण किंचित जास्त असल्याचे दिसून येते.

हिंगोली जिल्ह्याची स्थिती

जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रण समितीच्या अहवालानुसार 2022 ते 26 या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये नवीन बाधित रुग्णांचे प्रमाण हे प्रत्येक वर्षी सरासरी 70 ते 85 असे आढळल्याचे दिसून येते. यामध्ये दरवर्षी 25 हजार लोकांची तपासणी करण्यात येते. सध्या एच आय व्ही पॉझिटिव्ह असलेल्या व्यक्तींची संख्या हिंगोली जिल्ह्यात 4304 असून असून यामध्ये 288 गर्भवती महिला बाधित नोंदल्या गेल्या असून 3471 जणांची ए आर टी केंद्रात नोंद झाली आहे. त्यांना नियमित औषधोपचार केले जातात.

एच आय व्ही बाधित रुग्णांसाठी आरोग्य विभागामार्फत समुपदेशन, मोफत औषध उपचार, गरोदर मातांमधील संसर्ग रोखण्यासाठी (पीपीटीसीटी) विशेष सुविधा पुरविल्या जातात.

एच आय व्ही होण्याची कारणे

1. असुरक्षित लैंगिक संबंध. असुरक्षित लैंगिक संबंध हा प्रमुख मार्ग किंवा कारण आहे ज्यामुळे एचआयव्हीचा संसर्ग होतो.
2. संक्रमित सुया किंवा सिरींज. संक्रमित सुया किंवा सिरींजचा उपयोग केल्यास रक्ताचा संपर्क येऊन एच आय व्ही चा प्रसार होऊ शकतो. तसेच अंमली पदार्थ सेवन करण्यासाठी किंवा टॅटू काढण्यासाठी सुद्धा या संक्रमित सुया किंवा सिरींज वापरल्या जातात त्यामधून सुद्धा प्रसार होऊ शकतो.
3. बाधित रक्त किंवा अवयवांचे संक्रमण. तपासणी न करता रक्तांचा संपर्क झाल्यास किंवा अवयव दान केल्यानंतर त्याची तपासणी न करता दुसऱ्या व्यक्तीला त्याचा वापर केल्यास त्या व्यक्तीला एचआयव्ही संक्रमण होऊ शकते.
4. आईकडून बाळाला. एच आय व्ही बाधित आईकडून तिच्या बाळाला एचआयव्ही संसर्ग होऊ शकतो परंतु यामध्ये जर व्यवस्थित काळजी घेतली तर आईकडून बाळाला होणारा संसर्ग टाळता येऊ शकतो.

5. या कारणामुळे एचआयव्ही होत नाही. एचआयव्ही बाधित व्यक्तीला मिठी मारल्याने, हस्तांदोलन केल्याने, एकत्र जेवल्याने, एकाच भांड्याचा वापर केल्याने किंवा एकाच शौचालयाचा वापर केल्याने, डास चावल्याने एचआयव्हीचा प्रसार होत नाही.

परिणाम.

1. रोगप्रतिकारक शक्ती नष्ट होते. हा विषाणू सीडी4 नावाच्या पांढऱ्या रक्तपेशी नष्ट करतो ज्यामुळे शरीर किरकोळ आजाराचाही सामना करू शकत नाही. तेव्हा रोगप्रतिकारक शक्ती नष्ट होणे हा सर्वात मोठा परिणाम या आजाराचा दिसून येतो.
2. संधी साधू संसर्ग. रोगप्रतिकारक शक्ती कमजोर झाल्यामुळे क्षयरोग, न्यूमोनिया आणि गंभीर संसर्ग सहज होतात.
3. दीर्घकालीन लक्षणे. जास्त प्रमाणात वजन कमी होणे, सतत ताप येणे, अतिसार आणि तीव्र थकवा जाणवणे इत्यादी.
4. मानसिक आणि सामाजिक परिणाम. समाजात आजही या आजाराला कलंक मानला जातो. प्रत्येक बाधित व्यक्तीला कलंकी समजले जाते. त्यामुळे एचआयव्ही बाधित रुग्णांना मानसिक तणाव, भेदभाव आणि सामाजिक एकाकीपणाचा सामना करावा लागतो. एखाद्या घरातील व्यक्तीला एचआयव्ही झाल्यास त्या घरातील इतर व्यक्तींचे विवाह जुळविणे सुद्धा अशक्य होते.
5. आर्थिक भार. नियमित वैद्यकीय तपासण्या आणि आयुष्यभर चालणाऱ्या औषधोपचारामुळे रुग्णावर मोठा आर्थिक भार पडू शकतो.

उपचार आणि काळजी

सद्यस्थितीत एच आय व्ही वर पूर्णपणे बरा होणारा कोणताही इलाज नाही. मात्र एआरटी या औषधोपचारामुळे विषाणूची वाढ नियंत्रित करता येते. नियमित औषध उपचारामुळे बाधित व्यक्ती दीर्घ आणि निरोगी आयुष्य जगू शकतो.

गृहितकृत्याची सत्यता.

एचआयव्ही बाधितांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

या गृहीतकृत्यानुसार माहिती घेतली असता असे दिसून येते की, एच आय व्ही बाधित रुग्णांच्या संख्येमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात जी वाढ होत आहे ती निश्चितच कमी होत आहे. असे असले तरी मात्र जागतिक पातळीवर एच आय व्ही एड्स बाधित रुग्णांमध्ये भारताचा दुसरा क्रमांक लागतो. परंतु मागील काही वर्षापासून जवळजवळ 44% घट झाली आहे. नवीन संसर्ग होऊ नये म्हणून शासनाने कठीण प्रयत्न केले आहे. यावरून एचआयव्ही बाधितांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हे गृहीतकृत्य अंशतः सिद्ध होत आहे.

ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात एचआयव्हीचे प्रमाण जास्त आहे.

या गृहीतकृत्यानुसार माहिती घेतली असता असे आढळून आले की, राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागाच्या (0.25%) तुलनेत शहरी भागात (0.35%) एचआयव्ही संसर्गाचे प्रमाण किंचित जास्त आहे. तसेच पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, नागपूर आणि कोल्हापूर हे जिल्हे राज्यातील उच्च जोखीम क्षेत्रामध्ये येतात. या ठिकाणी सेक्स वर्कर्स काम करत असल्यामुळे व शहराची लोकसंख्या मोठी असल्यामुळे या ठिकाणी लोक बिनधास्तपणे लैंगिक

संबंध ठेवतात तसेच इतर अनेक गोष्टींची काळजी न घेता ते करत राहतात पर्यायाने अशा लोकांना एचआयव्ही संसर्ग सहज होतो. त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात एचआयव्हीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. तेव्हा ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात एचआयव्हीचे प्रमाण जास्त आहे हे गृहीतकृत्य सिद्ध होते.

स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचे एचआयव्हीचे प्रमाण अधिक आहे.

भारतातील एकूण संख्या बघितली असता स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचे एचआयव्हीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून आले. तसेच यामध्ये जवळजवळ 31 टक्के तरुण व्यक्ती म्हणजेच 15 ते 29 या वयोगटातील तरुणांचा समावेश असल्याचे दिसून आले .याचाच अर्थ असा की स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचे एचआयव्हीचे प्रमाण अधिक आहे हे गृहीतकृत्य सिद्ध होते .

समाजाचा एचआयव्ही बाधित व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे.

एचआयव्ही संसर्ग होणे हा भारतीय समाजामध्ये कलंक समजला जातो त्यामुळे समाजातील व्यक्ती बाधित व्यक्तीकडे व त्याच्या कुटुंबाकडे कलंकित या दृष्टिकोनातून बघते. ज्यामुळे या व्यक्तीला समाजात एकाकीपणाचा अनुभव येतो. तेव्हा समाजाचा एचआयव्ही बाधित व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक आहे हे गृहीतकृत्य सिद्ध होते.

एच आय व्ही बाधितांसाठी शासनाचे धोरण सकारात्मक आहे.

या गृहीत कृत्यानुसार माहिती घेतली असता असे दिसून आले की, शासनामार्फत एआरटी सेंटर चालविले जाते. यामध्ये नोंदणीकृत रुग्णांना नियमित मोफत औषध उपचार दिले जातात तसेच समुपदेशन, गरोदर मातांमधील संसर्ग रोखण्यासाठी पीपीटीसीटी ही विशेष सुविधा पुरविली जाते. तेव्हा शासनामार्फत विविध अशा केंद्रातून एचआयव्ही बाधित रुग्णांसाठी फार मोठ्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत तसेच प्रत्येक जिल्ह्यातील आरोग्य विभागामार्फत त्या जिल्ह्यातील 25 ते 50 हजार व्यक्तींची दरवर्षी एच आय व्ही तपासणी केली जाते तसेच हा संसर्ग रोखण्याकरिता नियमित जाणीव जागृती केली जाते विविध अशा समाज माध्यमाच्या मार्फत जाणीव जागृती करण्याचे काम प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय केंद्र करत असताना दिसून येते तेव्हा एच आय व्ही बाधितांसाठी शासनाचे धोरण सकारात्मक आहे हे गृहीतकृत्य सिद्ध होते.

उपाय योजना.

सुरक्षित लैंगिक संबंध

लैंगिक संबंध ठेवत असताना कंडोमचा वापर करा तसेच एकापेक्षा अधिक जोडीदाराशी संबंध ठेवू नका. यासंदर्भात तरुणांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

निर्जंतुक सुयांचा वापर.

दवाखान्यामध्ये तसेच अंमलीपदार्थ घेताना, टॅटू काढताना निर्जंतुक सुयांचा वापर करा.

सुरक्षित रक्त संक्रमण.

रक्त घेत असताना व देत असताना एच आय व्ही ची तपासणी करूनच ते द्यावे व घ्यावे.

माता ते बाळ प्रतिबंध

एचआयव्ही बाधित मातेकडून आपल्या बाळाला एचआयव्ही होऊ नये म्हणून पीपीटीसीटी अंतर्गत विशेष काळजी घ्यावी म्हणजे गरोदर मातेकडून आपल्या बाळाला हा आजार होणार नाही.

नियमित एच आय व्ही ची चाचणी.

समाजातील प्रत्येक स्त्री- पुरुषाने एचआयव्हीची नियमित चाचणी करून घ्यावी. जेणेकरून एच आय व्ही संदर्भात आपणास नियमित औषधोपचार घेता येतील.

समाजाने एचआयव्ही बाधित रुग्णांकडे बघण्याच्या नकारात्मक दृष्टिकोनात बदल करावा.

आज एचआयव्ही बाधित रुग्ण असेल तर समाज त्याच्याकडे एक कलंकित व्यक्ती म्हणून बघतो. ज्यामुळे त्याला एकाकी पणाचा अनुभव येऊ लागतो. ज्यामुळे तो खचून जातो तसेच त्याचे कुटुंब ही खचून जाते. त्यामुळे समाजातील इतर व्यक्तींनी या आजारातील व्यक्तीला कलंकित न मानता एक समाजातील घटक मानावे कारण हा आजार संपर्क झाल्याशिवाय होत नाही. हस्तांदोलन केल्याने, कपडे घातल्याने, डास चावल्याने किंवा एकाच भांड्यात जेवल्याने किंवा एकच शौचालय वापरल्याने तो होत नाही. त्यामुळे अशा रुग्णांकडे समाजाने नकारात्मक दृष्टिकोनातून बघू नये जेणेकरून समाजात ह्या व्यक्ती खचून न जाता आपले जीवन व्यवस्थित व्यथित करू शकतील.

सारांश.

भारतात नवीन एचआयव्ही संसर्गाचे प्रमाण खूप घटले असून भारत एचआयव्ही नियंत्रणात एक यशस्वी देश मानला जातो. इतर जिल्ह्याच्या तुलनेत हिंगोली जिल्ह्यात एच आय व्ही बाधित रुग्णांची संख्या कमी असल्याचे दिसून येते. असे असले तरी मात्र या रोगांकडे आपणास डोळे झाक करता येणार नाही. तेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीने सुरक्षित लैंगिक संबंध ठेवावेत, सुरक्षित निर्जंतुक सुया व सिरींजचा उपयोग करावा, नियमित रक्त तपासण्या कराव्यात, रक्त घेताना व देताना तपासूनच घ्यावे. तसेच समाजातील प्रत्येक व्यक्तीने या रुग्णांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून बघावे व एचआयव्ही संसर्ग होणार नाही. आपण या आजारापासून कसे दूर राहुत याची नेहमी काळजी करावी.

संदर्भ ग्रंथ

1. नाडगोंडे गुरुनाथ - सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2003.
2. वायभासे शिवाजी - स्त्री बळी, विश्व क्रांती प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर, प्रथम आवृत्ती, डिसेंबर 2020
3. वायभासे शिवाजी - नागरीकरण, समृद्धी प्रकाशन, हिंगोली, प्रथम आवृत्ती, जानेवारी 2026.
4. दैनिक लोकमत, बुधवार दिनांक 21 फेब्रुवारी 2024.
5. www.google.com.

मा.शरदरावजी पवारसाहेब यांचे कृषिविषयक धोरण

प्रा. महेशकुमार पांडुरंग सोनावणे
सहा.प्राध्यापक व प्रमुख,मराठी विभाग
एस.वी आर.कॉलेज,म्हसवड
ता.माण, जि.सातारा,पि.४१५५०९
संलग्न: शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
मोबा./व्हॉ.ॲप: ९६५७३१२७९५
ता.माण, जि.सातारा,पि.४१५५०९
संलग्नित, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
Email: mpsonawane69@gmail.com

१.प्रस्तावना -

देशाच्या राजकारणात, समाजकारणात आणि सांस्कृतिक क्षेत्रात १९६० नंतर जी नवीन पिढी पुढे आली या पिढीतील महाराष्ट्राचे प्रतिनिधी होते मा.शरदरावजी पवारसाहेब.त्यांचे वर्णन कोणत्या शब्दांत करावयाचे! 'शरद पवार हे एक अजोड व्यक्तिमत्त्व आहे'.[१] विकास आणि प्रगतीसाठी भविष्यवादी दृष्टीकोणातून कौशल्याने तसेच संवाद आणि सर्वसमावेशकतेच्या आधारे कोणतेही कार्य ध्येयापर्यंत तडीस नेणारे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व म्हणजे मा.शरद पवार.'त्यांच्या स्वभावाचे पैलू म्हणजे हिऱ्यांची खाण आहे.शासन ,प्रशासन,व्यवस्थापन, सामाजिक, सहकार, राजकीय,सांस्कृतिक, शैक्षणिक , वैचारिक, कृषी, उद्योग, व्यापार, औद्योगिक ,साखर कारखानदारी ,शेती, तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, पाणी, अर्थ, देश- विदेश आदि कित्येक क्षेत्रात त्यांचे ज्ञान प्रगल्भ आहे.[२] मा. पवारसाहेब ही एक व्यक्ती असली तरी कर्तृत्त्व अनेक असलेली असामान्य व्यक्ती आहे.महाराष्ट्राच्या आणि देशाच्या सर्वांगिण उत्कर्षा साठी मा.पवारसाहेब यांनी गेल्या पाच दशकात विविध स्तरांवरून पुरोगामी आणि प्रगतीशील नेतृत्व दिलेले आहे.विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे 'ग्रामीण भागातील शेतमजूरापासून ते शेतकऱ्यांपर्यंत, शहरातील झोपडपट्टीपासून ते उद्योगपतीपार्यंत सर्वांगिण माहिती असणारा देशातील एकमेव नेता म्हणून त्यांची ख्याती आहे.कोकणचा कॅलिफोर्निया करणारा ध्येयवादी नेता, देशातील शेतीचे सखोल ज्ञान असलेला, वारंवार अत्याधुनिक प्रयोगातून शेतीची उत्पादकता वाढविणारा, सहकार टिकवून त्याच्या जोपासनेसाठी मदत करणारा , देशाचे राजकरण समजणारा एकमेव नेता म्हणजे मा.शरदरावजी पवारसाहेब हेच आहेत केवळ याच दृष्टीकोणातून प्रस्तुत शोधनिबंधात 'मा.शरदरावजी पवारसाहेब यांचे कृषिविषयक धोरण' या विषयावर प्रकाशझोत टाकण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

२.पूर्वचरित्र -

मा.शरदरावजी पवारसाहेब यांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी श्री.गोविंदराव व सौ.शारदाबाई पवार या दांपत्याच्या पोटी पुणे जिल्हयातील 'काटेवाडी' या गावी झाला.काटेवाडी हे बारामती तालुक्यातील गाव होय.त्यांचे मूळ गाव 'नांदवळ' (ता.कोरेगाव) असे असून वडिलांच्या व्यवसायानिमित्ताने ते 'काटेवाडी' येथे स्थायिक झाले .पुढे बारामती हे त्यांचे कार्यक्षेत्र बनून ते बारामतीचे सुपुत्र झाले.त्यांचे बालपण अत्यंत सामान्य परिस्थितीत गेले.त्यांचे

प्राथमिक शिक्षण बारामती येथील नगरपालिकेच्या शाळेत व माध्यमिक शिक्षण एम.ई.एस.हायस्कूल बारामती येथे झाले.पुढे महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते पुणे येथे गेले.वृहन्महाराष्ट्र वाणिज्य कॉलेजमध्ये शिकत असतानाच त्यांना राजकारणाचे बाळकडू मिळाले.येथूनच त्यांच्या राजकीय नेतृत्व विकासाला आरंभ झाला.पुढे यशवंतरावांच्या सहवासात त्यांचे राजकीय क्षेत्र बहराला आले.त्यांचा 'काटेवाडी ते दिल्ली' हा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे.आरंभाच्या क्षणापासून अगदी आजपर्यंत प्रवाहित राहिलेला आहे.त्यांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व आणि कार्यही हिमालयाच्या उंचीसारखेच उत्तुंग आहे.

३.मा.शरदरावजी पवारसाहेब यांचे कृषिविषयक धोरण -

भारत हा कृषिप्रधान देश आहे असे आपण म्हणतो तेव्हा देशाचा विचार करताना पहिला विचार हा देशातील कृषिव्यवस्थेचा व्हायला हवा.कारण शेती उद्योग हा आपल्या देशाचे बलस्थान आहे.याचे प्रथम श्रेय आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा.यशवंतराव चव्हाण यांना दिले जाते.त्यानंतर त्यांचा वारसा समर्थपणे चालविण्याचे सर्व श्रेय मा.शरदरावजी पवारसाहेब यांच्या नेतृत्वाला दिले जाते.याचे प्रमुख कारण असे की, त्यांनी कृषिक्षेत्रात केलेले अतुलनीय कार्य हे होय.महाराष्ट्र राज्य आणि केंद्रीय कृषिमंत्री म्हणून पदावर असताना त्यांनी कृषिक्षेत्रात केलेले बदल, अवलंबिलेले नवतंत्रज्ञान, घेतलेले विधायक कृषिपूरक निर्णय, केलेले ठराव, अतिशय महत्त्वपूर्ण ठरलेले आहेत.त्यांना मंत्रिमंडळात उच्च पदाच्या मखमली पायघडयांची शक्यता असतानाही देशातील दीनदुबळया,कष्टकरी शेतकऱ्यांची सेवा करता यावी, त्यांच्या सुखदु:खात सहभागी होता यावे म्हणून उदात्त हेतूने त्यांनी कृषि खात्याचा स्वीकार केला.पवारसाहेबांच्या कृषिखात्याचे महत्त्व अधोरेखित करताना.प्रणव मुखर्जी म्हणतात, "शरदरावांनी कृषि खाते मागून घेतले आणि मला धक्का बसला.त्यांनी मागून घेतलेल्या खात्यात अविरत काम केले.अन्नधान्याच्या संकटातून देशाला बाहेर काढले.एका अर्थाने त्यांनी देशात दुसरी हरितक्रांती घडवून आणली".इतकेच नव्हेतर ते केंद्रीय पातळीवरील मंत्री झाले तरीही त्यांचा ऋणानुबंध कायम शेती आणि शेतकऱ्यांशी राहिला आहे.ती नाळ अद्यापही तुटलेली नाही.

कृषिक्षेत्रातील पवारसाहेबांचा अभ्यास दांडगा आहे. "त्यांनी जेव्हा महाराष्ट्राचे कृषिमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली तेव्हा पुणे येथे कृषि विद्यापीठातील वैज्ञानिकांच्या बैठकीत चर्चेच्या आधारे गहू आणि ज्वारीच्या "किमान उत्पनाची हमी" या अभिनव योजनेचा प्रारंभ केला.आपल्या शेतातील दर एकरी उत्पादनावद्दल शेतकऱ्यांना अधिक जागरूक करण्याचा हा पहिलाच धोरणात्मक पुढाकार होता.[३] पुढे राष्ट्रीय विकास परिषदेची शेतीच्या संदर्भात जी पहिल्यांदा बैठक झाली तीही पवारांच्या पुढाकारानेच झाली.या बैठकीतील अहवालाच्या आधारे केंद्र व राज्य सरकार यांनी कृषिक्षेत्राचा व शेतकऱ्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने स्वत:ला बांधून घेतले आणि पुढील पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत समग्र स्वरूपाचा कार्यक्रम राववून कृषिक्षेत्रात विशेष बदल घडवून आणण्याचा ठराव संमत करण्यात आला.

आपल्या देशातील फलशेतीतील क्रांतीच्या शिल्पकारातही शरद पवार हेच प्रमुख आहेत.यामुळेच शंकरराव कोल्हे यांनी पवारांना 'फलोत्पादन क्रांतीचे जनक'[४] तर डॉक्टर एम.एस.स्वामीनाथन् यांनी 'फळशेतीचे शिल्पकार'[५] असे गौरवाने म्हटले आहे.परंतु हे फळशेतीचे बरेचसे यश नवतंत्रज्ञानावर आधारित असते.हे पवार यांनी अचूक

ओळखले. इतर प्रगत राष्ट्रात नवतंत्रज्ञानाचा अवलंब मोठया प्रमाणावर होत होता. भारताचे तसे नव्हते. भारतात पारंपरिक कृषिव्यवस्थेला महत्त्व दिले जात होते. अशा देशाला पारंपरिक कृषिव्यवस्थेतून नवतंत्रज्ञानाकडे वळवण्याचे सर्वात मोठे कार्य शरदचंद्रजी यांनी केले. रोगमुक्त वियाण्यांचा पुरवठा आणि ठिवक सिंचनासारखे तंत्र शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने त्यांनीच प्रथम पावले उचलली. आपल्या पूर्ण राजकीय वाटचालीत त्यांनी नवतंत्रज्ञान, सार्व जनिक धोरण, उत्पादन व पीक तयार झाल्यानंतरचे धोरण यात साहचर्य व समतोल असला पाहिजे यावर विशेष भर दिला. शेती व शेतकऱ्यांबाबतीत हितैषी धोरण घेताना किंवा त्याची अंमलबजावणी करताना शासनकर्ते नेहमीच नाक मुरडत असतात. आणि मग शेतकऱ्यांना संप,हरताळ,फासून शासनकर्त्याच्या पायाशी लाचार होऊन न्यायहक्कासाठी झगडावे लागते. या दृष्टीने विचार करता मा. पवारसाहेब यांनी शासकीय वळाधारे व स्वकौशल्याने शेतीला सहकाराची जोड दिली. आणि त्यातून कृषि व कृषिपूरक उद्योगांना प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांच्या हितासाठी त्यांच्या पाठीशी ते सदैव उभे राहिले. कारण शेतकरी हा त्यांचा श्वास होता आणि आजही आहे.

शरदरावजी यांनी सहकाराच्या माध्यमातून आरंभलेल्या योजना तळागाळांपर्यंत, शेतकऱ्यांच्या गाई - गुरांच्या गोठयांपर्यंत, शेताच्या बांधापर्यंत पोहचविल्या. साखर उद्योग, फलोत्पादन, फुलशेती, कुक्कुटपालन, पशुपालन या व अशा अनेक सहकारी उद्योगांच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना दिली. वळ दिले. पशुपालन उद्योगाधारे जर्शी, होस्टन गाईच्या रूपाने त्यांनी महाराष्ट्रात धवलक्रांती घडवून आणली. ही सर्व उद्योग क्षेत्रे मा. पवारसाहेबाच्या दूरदृष्टितूनच विकसित झालेली आहेत.

उद्योग आणि उत्पादन क्षेत्रातील जैव-तंत्रज्ञानाच्याबाबतीत ते आजही आग्रही आहेत. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासासाठी विज्ञान आणि जैव-तंत्रज्ञान हे महत्त्वाचे साधन आहे हे त्यांनी पुरेपूर जाणले. त्यांच्या या आधुनिक दृष्टिकोणाबाबत डॉ. माशेलकर म्हणतात, "आधुनिक जैव-तंत्रज्ञान शेतीसह सर्व क्षेत्रात कायापालट घडवून आणू शकेल याबाबतचा त्यांचा दृढविश्वास मला अनेक वैज्ञानिकांत व तंत्रज्ञानातही आढळला नाही".[६] यावरून पवारसाहेब यांनी माहिती-तंत्रज्ञान व जैव-तंत्रज्ञान या क्षेत्रात किती भरीव कार्य केले आहे हे समजून येते. या खेरीज त्यांनी कृषि संशोधनसंस्था, शिक्षणसंस्था यांची उभारणी केली. फळपिकांच्या संघटना काढल्या शेतीच्या प्रशिक्षणाचे निरनिराळे कार्यक्रम आखले व असंख्य प्रयोग केले. कृषि, औद्योगिक विकासमंत्रामुळे महाराष्ट्रातील हजारो शेतकरी व शेकडो कार्यकर्त्यांना संपन्न जीवन लाभले. याचे सर्व श्रेय मा. यशवंतराव चव्हाण, मा. वसंतदादा पाटील यांच्या नंतर मा. पवारसाहेबांनाच द्यावे लागेल.

मा. पवारसाहेबाच्या कारकीर्दीत शेतमजूरांसाठी 'किमान वेतन धोरण' आखण्यात आले. मच्छिमारांना,शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली. कृषि विकासासाठी बीजदरात सवलत , ठिवक सिंचनाला प्राधान्य, कृषिप्रक्रिया उद्योगांना चालना,वि-वियाणे फळपिकांना सरकारी अनुदान, शेतमालाच्या निर्यातीला प्राधान्य, कृषि संशोधनावर भर इ. माध्यमातून त्यांनी कृषिक्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले.

जलव्यवस्थापनाच्या कार्यात त्यांचे वेगळया प्रकारे कार्य आहे. दुष्काळ आणि पाणीटंचाई याबाबत राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम,नदी खोरे विकास योजना,अवर्षणप्रवण विकास कार्यक्रम अशी जलसंधारणाची कामे, नदी

नाले अडवून तलाव, तळी व धरणांची बांधणी करून कृषिक्षेत्राला किंवहुना एकूण सजीवाच्या जीवनाला कर्दनकाळ ठरणाऱ्या पाण्याचे (पाणी हे जीवन असूनही) मेगा पाणलोट प्रकल्प रावबून व्यवस्थापन केले.

आज कुठे शेती पिकत नाही म्हणून आणि कुठे शेती भरघोस पिकली तरी शेतमालाला दर मिळत नाही म्हणून, परिणामी शेतकरी नैराश्यग्रस्त व कर्जबाजारी होऊन आत्महत्या करीत आहे. म्हणजे याचा अर्थ असा नव्हे की, मा. पवारसाहेबांच्या सत्ताकार्यकाळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नव्हत्या. त्यावेळीही आत्महत्या होत होत्या पण त्याचे प्रमाण अगदी नगण्य होते. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न त्यांनी कौशल्याने, मनापासून हाताळला. अगदी सत्तेत नसतानाही विविध भागात दौरे काढून, शेतकरी सभा, मेळावे घेऊन शेतकऱ्यांना आत्महत्या न करण्याविषयी तळमळीने आजही ते आवाहन करीत आहेत. कारण ते स्वत:च जातिवंत हाडाचे शेतकरी आहेत. वस्तूत: शेवटी शेती व्यवहार हा आतबट्ट्याचा ,एक प्रकारचा जुगारच असतो. पण एक लक्षात घेतले पाहिजे की शेतकऱ्यांने शेती पिकवली नाही तर .....! शेती शिवाय जे इतर उद्योग आहेत त्या उद्योगांना खूप मर्यादा आहेत. राष्ट्राच्या विकासासाठी अशा उद्योगांची आवश्यकताही आहे. परंतु बहुतांशी उद्योग हे कृषिव्यवस्थेशी निगडित आहेत. त्यामुळे 'शेतकऱ्याला आत्मविश्वास देणे ही आपली जबाबदारी आहे. तरच ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था बळकट होईल'.[७] तसेच शेतकरी जगला, त्याला आधार दिला; तरच शेती जगेल, फुलेल. सजिवाचे आस्तित्व टिकेल. देशातील शेती आणि शेतकऱ्याच्या उन्नती शिवाय बहुसंख्यांकांच्या जगण्याला अर्थ उरणार नाही अशी पवारसाहेबाची ठाम भूमिका आहे.

आज जागतिकीकरणामुळे शेतीत नवनवीन तंत्रज्ञान आले आहे. शेतकरी त्याचा मोठ्या प्रमाणावर वापरही करीत आहे. त्यामुळे उत्पन्नात वाढ झालेली आहे. परंतु यांचबरोबर शेतकऱ्यांच्या मालाच्या दराचा प्रश्न भेडसावत आहेत. एका बाजूला शेतमालाचे उत्पन्न करणारा गरीब, कष्टाळू शेतकरी आहे. आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या मालाची किंमत ठरवणारा अनुत्पादक शासनकर्ता, व्यापारी वर्ग आहे. शेती, शेतकरी, उत्पन्न, त्या उत्पन्नाचा दर आणि सत्ताधारी शासनकर्ता, व्यापारी वर्ग याच्यातील ही विषम, असमतोल दरी अनेक भयावह यक्ष प्रश्न निर्माण करीत आहे. त्यामुळे कष्टकरी, श्रमजीवी, शेतकरी वर्ग भांबावलेला आहे. व्यसनग्रस्त बनून आत्महत्येसारखा मार्ग जवळ करून काळोखाचा रस्ता स्वीकारत आहे. या पार्श्वभूमीवर शेती, शेतकरी आणि सहकारी चळवळ या पुढे आज; आणि या पुढे; काय आव्हाने असतील तसेच ही आव्हाने पेलण्यासाठी काय करावे लागते याची सखोल जाण असणारे भारत देशातील कृषिसमूहजनाचे एकमेव नेते म्हणून मा. शरदरावजी पवारसाहेब यांच्याकडेच पहावे लागते.

४. समारोप

उपरोक्त मांडणीतून मा. पवारसाहेबांच्या कृषिधोरणाबावत काही एक कल्पना येते. राज्य आणि देशाच्या कृषिमंत्री कार्यकाळात त्यांनी शेती व शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक विधायक निर्णय घेतले. "विपन्न अवस्थेत असलेल्या भारतीय शेतकऱ्याला शरदरावांनी नवा प्रकाश दिला . शेती करणे फार कठीण झाले आहे. हा वाक्यप्रयोग त्यांनी पुसून टाकला. शेतीमालाला उचित बाजारभाव दिले. शेतकऱ्यांची ७१ हजार कोटींची कर्जे माफ केली. त्याला स्वस्तात पुरेसे कर्ज उपलब्ध करून दिले. फळबागा समृद्ध केल्या. शेतीतून नवनवी उत्पन्नाची साधने दिली. या साऱ्यातून भारतीय शेतीला नवा आत्मविश्वास मिळाला. मातीशी इमान राखण्याचे नवे बत मिळाले. पडिक जमिनीवर उपवने

झाली ,मेहनतीला मोल आले.श्रमांना महत्त्व आले.शेतीला नवा श्वास आला.[८] एकूणच कृषिक्षेत्राला आणि शेतकऱ्याला उर्जितावस्था मिळण्यासाठी त्यांनी ज्या ज्या योजना आखल्या त्या प्रत्यक्ष कृतीतून अमलात आणल्या. "कृषिच्या क्षेत्रात महाराष्ट्राने मोठी आघाडी घ्यावी,यासाठी मोठया जोमाने पाठपुरावा करणाऱ्यामध्ये शरदराव नेहमीच पुढे राहिले आहेत.त्यांनी राज्याच्या कृषिक्षेत्राला ,सहकार चळवळीला आणि तंत्र विज्ञानाच्या क्षेत्राला नवी दृष्टी दिली.भविष्याचा वेध घेणारी दिशा दिली.यावद्दल कोणाच्याही मनात शंका नाही.[९] यामुळेच महाराष्ट्र आणि भारतीय कृषिक्षेत्र आणि कृषिशास्त्राच्या इतिहासात मा.शरदरावजी पवारसाहेब यांचे नाव चिरकाल घेतले जाईल.

संदर्भ व टीपा :

१.मगर सतीश : "भविष्यवादी नेता" (लेख),दै.लोकसत्ता (पुणे),रविवार, २० डिसेंवर २०१५,पृ.४

२.कोल्हे शंकरराव : "विचारांचा ठेवा-संपादकीय", दै.पुण्यनगरी (पुणे)रविवार २० डिसेंवर २०१५ पृ.६

३.स्वामीनाथन् एम.एस : "फलशेती क्रांतीचे शिल्पकार" (समाविष्ट लेख) 'चैतन्याच चांदणं' शरद पवार गौरव समिती स्मरणिका,मुंबई,प्र.आ.२००२ पृ २३

४.कोल्हे शंकरराव : "फलोत्पादन क्रांतीचे जनक" (समाविष्ट लेख) 'चैतन्याच चांदणं' शरद पवार गौरव समिती स्मरणिका,मुंबई,प्र.आ.२००२ पृ ३५

५.उनि.स्वामीनाथन् एम.एस.पृ २३

६.माशेलकर रघुनाथ : "जैव-तंत्रज्ञानावर दृढविश्वास" (समाविष्ट लेख) 'चैतन्याच चांदणं' शरद पवार गौरव समिती स्मरणिका,मुंबई,प्र.आ.२००२ पृ ५१

७.टीप: राष्ट्रवादी मासिकाचे संपादक डॉ.सुधीर भोंगळे,यांनी मा.शरद पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त घेतलेल्या मुलाखतीतील मा.शरदरावजी पवार यांचा विचार. 'राष्ट्रवादी' (मासिक),मुंबई, वर्ष ७ वे, अंक १२, डिसेंवर २०१५पृ.३६

८.भोंगळे सुधीर : "अमृतमहोत्सवी चांदणे -संपादकीय", 'राष्ट्रवादी' (मासिक) मुंवई, वर्ष ७ वे ,अंक १२, डिसेंवर २०१५पृ.११

९.गडकरी नितीन : "विधायक दृष्टी असलेले शरदराव" (समाविष्ट लेख) 'चैतन्याच चांदणं' शरद पवार गौरव समिती स्मरणिका,मुंवई,वर्ष ७ वे ,अंक १२.डिसेंवर२०१५ पृ ६०